म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
अ. नं. ३२.

REFBK-0004090

६२१३

# गृह सौख्य.

# याच लेखकाचे

## याच धर्तीचे संकल्पित ग्रंथ

१ **सुगृहिणीचा संसार:**—उत्कृष्ट संसाराचें लक्षण काय? तो कसा करावा? त्यांत कोणत्या अडचणी येतात? गृहलक्ष्मीनें कोणती दक्षता घेतली पाहिजे? इत्यादि गोष्टीविषयीं या पुस्तकांत इतका सुंदर विचार केला आहे कीं, सुगृहिणींना हें पुस्तक म्हणजे एक अमूल्य देणगीच वाटेल.

२ **गृहरत्नांची घडण:**—मुलामुलींच्या घरगुती शिक्षणाविषयीं यांत फार बारकाईनें विचार केला आहे. मुलांचे स्वभाव, त्यांना जडणाऱ्या खोडी, त्यांना द्यावयाचें शिक्षण याचें सांगोपांग विवेचन अगदीं सुलभ व व्यवहारी भाषेंत केलें आहे. होतकरू मातापित्यांना अत्यंत आवश्यक.

३ **विवाहमांगल्य:**— काल झपाट्यानें बदलतो आहे. नव्या पिढीचे विवाहविषयक विचार व मतें मोठीं क्रांतिकारक आहेत. हा प्रश्न कसा सोडवावयाचा हें समाजाला कोडें आहे. विवाहेच्छु तरुण तरुणींना कोणता मार्ग उत्तम हें सुचत नाहीं. जुन्या चालीरीति त्यांना मान्य नाहींत. मातापित्यांचें कांहीं चालत नाहीं. अशा स्थितींत 'विवाह मांगल्यानें' वाटाड्याचें कार्य पत्करलें आहे. लेखकानें नव्या जुन्या रीतींचा समतोल विचार करून आपले विचार समाजापुढें ठेविले आहेत. ते समाजास, मातापित्यांस व नवमतवादी तरुणपिढीलाहि रुचतील अशी त्यास आशा वाटते.

४ **संसारांत पडण्यापूर्वी:**— मधुकर मासिकांत क्रमशः आलेली ही लेखमाला तरुणांना अत्यंत आवडली आहे. तीच पुनः नीट सुधारून छापण्यास घेतली आहे. लौकरच तयार होईल.

# गृहसौख्य.

लेखक

नारायण हरि आपटे

REFBK-0004090

४०८०

—: प्रकाशक :—

आपटे मंडळी. कोरेगांव, जि. सातारा.

मुद्रकः—ना. ह. आपटे.
श्रीनिवास मुद्रामंदिर
कोरेगांव (सातारा)

पुनर्मुद्रणाचे व भाषांतराचे
सर्व हक्क लेखकानें आपल्या
स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

संसार कितीही दुःखमय असो, मनुष्याचें परमसाध्य गांठण्याचा मार्ग त्यांतून गेला आहे यांत शंका नाहीं. अर्थात् त्यांत जें कांहीं थोडें फार सुख आहे तें त्यांत पडलेल्या मनुष्यास उचित तितकें मिळालें पाहिजे. असें सुख मिळणें हा त्याचा जन्मसिद्ध हक्क असून तें प्रयत्नेंकरून मिळविणें हें त्याचें आद्य कर्तव्य आहे.

हें मत ज्यांस मान्य असेल किंवा होईल त्यांच्याकरितां प्रस्तुत प्रयत्न आहे. यांत एखादें नवीन तत्वज्ञान सांगितल्याचा बहाणा नाहीं किंवा कोणास माहीत नसलेले सिद्धांत मांडले आहेत असाही आग्रह नाहीं. बहुतेक सर्वांच्या प्रत्ययास येणाऱ्या साध्या व्यवहारज्ञानाचा उहापोह आहे. पटेल त्यांनीं घ्यावा. न पटेल त्यांनीं पुस्तक बाजूला ठेवावें.

मला स्वतःला गृहस्थाश्रम पत्करून वीस वर्षें झालीं. एवढ्या दीर्घकालांत संसाराचें जें स्वरूप मला दिसलें, त्यांत जीं सुखदुःखें मी अनुभविलीं किंवा लोकांचीं पाहिलीं आणि जें यशापयश मिळविलें त्या सर्वांचा आढावा घेऊन ही लेखमाला गुंफण्यांत आलेली आहे. मध्यमस्थितींत वाढलेल्या व वागलेल्या अशा एका संसारी मनुष्याचे हे अनुभवसिद्ध विचार आहेत. त्यांत कांहीं अपुरेपणा नसेल असें म्हणवत नाहीं. जेवढ्याची प्रचिती तेवढ्याचेंच वर्णन आहे. हें ध्यानीं वागवून वाचकांनीं त्यास कस लावावा.

प्रस्तुत पुस्तक कादंबरी नसतांहि बहुजनसमाजाला तें कादंबरीसारखेंच प्रिय होईल अशी कल्पना आहे. कारण, प्रस्तुत पुस्तक लेखमालेच्या रूपानें किर्लोस्कर ( खबर ) मासिकांतून क्रमशः येत असतां अनेक स्त्रीपुरुषवाचकांकडून प्रशंसापर पत्रें आलीं आणि सदर लेखमाला पुस्तकरूपानें काढण्याबद्दल आग्रहाच्या सूचना आल्या. सर्वांच्या इच्छा पूर्ण होण्याचा योग आज येत आहे.

गृहसौख्याची ही नवी आवृत्ति पुष्कळच सुधारून वाढवली आहे. पहिला व शेवटचा लेखांक सर्वतोपरी नव्यानें लिहिला असून इतर लेखांकही इतके बदलले आहेत कीं, त्यामुळें मूळ लेखमाला वाचलेल्या वाचकांनाही प्रस्तुत पुस्तक अगदीं नवें वाटेल.

लेखांक २ व लेखांक ६ हे वाचकांना अपुरे वाटण्याचा संभव आहे. पण ते विषय असे महत्वाचे आहेत कीं, त्यांच्यावर स्वतंत्र ग्रंथ होणेंच आवश्यक आहे. म्हणून '**विवाहमांगल्य**' व '**गृहरत्नांची घडण**' या दोन नव्या पुस्तकांची योजना केली आहे. वाचकांना ही सेवा रुचल्याचें आढळून आल्यास, या नव्या पुस्तकांची सेवाही त्यांना सादर करण्यांत येईल.

प्रस्तुक पुस्तक पुढें येण्यास अनेक सन्मित्रांचे व हितचिंतकांचें अत्यंत साह्य झालें आहे. त्याबद्दल मी सर्वांचा कृतज्ञ आहे.

कोरेगांव
कार्तिक १८५२

वाचकांचा नम्र सेवक
**नारायण हरि आपटे.**

प्रिय भार्येस

सप्रेम अर्पण

# गृहसौख्य.

## अनुक्रमणिका.


| लेखांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | विषयप्रवेश. | ३ |
| २ | पतिपत्नीची परस्पर अनुरूपता. | १९ |
| ३ | गृहसौख्याविषयीं पुरुषांचें कर्तव्य. | ३५ |
| ४ | ” स्त्रीचें कर्तव्य. | ६१ |
| ५ | धनोपार्जन व गृहसौख्य यांचा संबंध. | ८३ |
| ६ | गृहसौख्यांत मुलांबाळांचें स्थान. | १०५ |
| ७ | गृहसौख्याचे इतर भागीदार. | १२१ |
| ८ | गृहसौख्य व शेजारधर्म. | १३९ |
| ९ | ” व राष्ट्रधर्म. | १५९ |
| १० | ” व विषयोपभोग. | १७३ |
| ११ | दाम्पत्यप्रेम व वियोगकाल. | १८९ |
| १२ | जीविताची सफलता. | २०३ |

## लेखांक पहिला

## विषयप्रवेश.

# गृहसौख्य

## लेखांक पहिला.

## विषयप्रवेश

यथा यथा हि पुरुषो नित्यं शास्त्रमवेक्षते।
तथा तथा विजानाति विज्ञानमथ रोचते॥

मनुष्य जसजसा नेहमीं शास्त्राचें अवलोकन करीत जाईल तसतसें त्यास समजू लागेल आणि मग त्यास ज्ञानाची आवड उत्पन्न होईल.

महाभारत.

भारतवर्षाची भाग्यप्रभात जवळ आलेली दिसते. जरी भोंवताली गडद अंधकार दिसत किंवा भासत असला, तरी प्रभातकाळचीं चिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं आहेत, यांत शंका नाहीं. स्वातंत्र्याचा नवजीवनप्रद वायु मंद मंद गतीनें वाहूं लागला असून भारतवर्षाचा भाग्यरवि लौकरच उदयाचलीं येणार असल्याची साक्ष सर्वत्र भरून राहिली आहे. ही खोटी आशा नव्हे किंवा कधींच अनुभवास न येणारें गोड भविष्यहि नव्हे. विनाशांतून विकासाकडे जाणें व रात्रीच्या गडद अंधकारांतूनच सूर्याचा उदय होणें हा सृष्टीच्या रचनेतील

# गृहसौख्य.

## अनुक्रमणिका.


| लेखांक | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | विषयप्रवेश. | ३ |
| २ | पतिपत्नीची परस्परं अनुरूपता. | १९ |
| ३ | गृहसौख्याविषयीं पुरुषांचें कर्तव्य. | ३५ |
| ४ | ” स्त्रीचें कर्तव्य. | ६१ |
| ५ | धनोपार्जन व गृहसौख्य यांचा संबंध. | ८३ |
| ६ | गृहसौख्यांत मुलांबाळांचें स्थान. | १०५ |
| ७ | गृहसौख्याचे इतर भागीदार. | १२१ |
| ८ | गृहसौख्य व शेजारधर्म. | १३९ |
| ९ | ” व राष्ट्रधर्म. | १५९ |
| १० | ” व विषयोपभोग. | १७३ |
| ११ | दाम्पत्यप्रेम व वियोगकाल. | १८९ |
| १२ | जीविताची सफलता. | २०३ |

## लेखांक पहिला

## विषयप्रवेश.

# गृहसौख्य

## लेखांक पहिला.

### विषयप्रवेश

यथा यथा हि पुरुषो नित्यं शास्त्रमवेक्षते।
तथा तथा विजानाति विज्ञानमथ रोचते॥

मनुष्य जसजसा नेहमीं शास्त्राचें अवलोकन करीत जाईल तसतसें त्यास समजू लागेल आणि मग त्यास ज्ञानाची आवड उत्पन्न होईल.

महाभारत.

भारतवर्षाची भाग्यप्रभात जवळ आलेली दिसते. जरी भोंवताली गडद अंधकार दिसत किंवा भासत असला, तरी प्रभातकाळचीं चिन्हें दृग्गोचर होऊं लागलीं आहेत, यांत शंका नाहीं. स्वातंत्र्याचा नवजीवनप्रद वायु मंद मंद गतीनें वाहूं लागला असून भारतवर्षाचा भाग्यरवि लौकरच उदयाचलीं येणार असल्याची साक्ष सर्वत्र भरून राहिली आहे. ही खोटी आशा नव्हे किंवा कधींच अनुभवास न येणारें गोड भविष्यहि नव्हे. विनाशांतून विकासाकडे जाणें व रात्रीच्या गडद अंधकारांतूनच सूर्याचा उदय होणें हा सृष्टीच्या रचनेतील

एक अबाधित नियमच आहे. तो कोणत्याहि शक्तीला थांबवितां किंवा मोडतां येणार नाहीं. तसा खुळचट प्रयत्न कोणी केलाच तर ती शक्ति पोलादी असली तरी काडकन् मोडेल! म्हणून आम्हाला निराश होण्याचें कारण नाहीं.

विनाशांतून विकास होणें हा सृष्टीच्या रचनेतील सामान्य परंतु प्रमुख नियम असला तरी पददलित मनुष्यानें किंवा राष्ट्रानें तेवढ्यावर विसंबून आतां आपला काल येईलच अशा विश्वासानें स्वस्थ राहतां उपयोगी नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. निसर्ग जितका उदार हितकर्ता आहे, तितकाच निष्ठुर न्यायाधीश आहे! मनुष्यानें काय किंवा कोणत्याहि वस्तुमात्रानें काय पुनर्विकासाकरितां जोराची खटपट केल्यावांचून त्यास निसर्गाचें साह्य मिळत नाहीं. भूमींत पडलेल्या प्रत्येक बीजास अंकुर फुटतोच किंवा फुटला पाहिजेच असा नियम नाहीं. जल, वायु व प्रकाश इत्यादि पोषक द्रव्यें निसर्ग पुरवील; पण विकसनाचें कार्य ज्याचें त्यानें केलें पाहिजे. ज्यांची जीवनशक्ति जोरदार असेल त्यांना अंकुर फुटतात, बाकीच्यांचा नाश होतो. नीचावस्थेस पोहोंचलेल्या मनुष्यानें ही गोष्ट लक्षांत घेऊन पुनरुत्थानाकरितां अविश्रांत झगडलें पाहिजे. नाहीं तर त्याचा तरणोपाय नाहीं. एकाचा नाश हा दुसऱ्याला खताप्रमाणें उपयोगी पडतो.

या दृष्टीनें आम्ही आमच्याकडे किंवा आपल्या देशाकडे पाहिल्यास काय दिसते? आम्ही मरणाकडे जात आहों कीं, आमचें पुनर्विकसन होणार आहे? आही खत बनत आहोंत कीं अंकुर? निःसंशय दुसरा प्रकार घडत आहे. भारतवर्षाचें पुनरुत्थान होत असून अनेक शतकें घोरत पडलेली हिंदुजाति उन्नतशीर्ष होण्याच्या प्रयत्नास लागली आहे!

भोंवतालच्या गाढ अंधकाराचा पूर्ण निरास अद्यापि झाला नसला तरी त्यांतील भयप्रदता नष्ट झाली आहे. आमच्या राष्ट्रपुरुषाच्या बधीर झालेल्या शरीरांत पुन्हां नवें चैतन्य येऊं लागलें आहे. स्वातंत्र्याच्या अमृताचा एक पेला त्याच्या पोटांत जाताच त्याच्या नसानसांतून विद्युत् खेळूं लागेल आणि त्याचें दिव्य तेज प्रगट होईल !

आमच्या नाशाकरितां टपलेल्या परकीयांना किंवा दारुण परिस्थितीमुळें भांबावून जाऊन निराश झालेल्या स्वकीयांना आमचा पुनर्विकास पटत नाहीं, आणि जगाच्या चढाओढीच्या शर्यतींत भाग घेण्यास उतावीळ झालेल्या नव्या पिढीला तो फारच मंद वाटतो; परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं हें सर्वांनी लक्षांत घेतलें पाहिजे. सृष्टीच्या घडामोडींत दिसून येणारें स्थित्यंतर सर्वांच्या वाटणीला सारख्या प्रमाणांत येत नाहीं. कांहीं वस्तूंचा विनाश जलद तर कांहींचा विकास जलद ! कांहींचा जन्म मंदगतीनें तर कांहींचें मरण न कळत येणारें ! आमचा भारत जगांतील सर्व राष्ट्रांना आजोबा–पणजोबा शोभेल अशा योग्यतेचा आहे व हिंदुजातीचें आतांपर्यंतचें आयुष्य कमीत कमी दहा हजार वर्षांचें आहे ! आजची त्याची दीनावस्था कितीही भयंकर व शोचनीय असली तरी ती अगदीं अलीकडची, गेल्या शतकादोशतकांतील आहे, निरन्तर चालत आलेली नव्हे; ही गोष्ट ध्यानांत घेतली पाहिजे.

आमच्या राष्ट्रपुरुषाच्या पुनरुत्थानाचा चालू प्रयत्न अत्यंत अभिनंदनीय व कौतुकास्पद आहे. भविष्यकालांतील जगाच्या इतिहासांत त्यास मोठें मानाचें स्थान मिळाल्यावांचून राहणार नाहीं. आजही जगांतील थोर विभूति त्याच्या खटपटीकडे अत्यंत आदरयुक्त

औत्सुक्यानें पाहात असून त्यास आशीर्वाद देत आहेत. तो वाया जाईल का ?–नाहीं जाणार. पण केव्हां ?—

आम्ही शिथिल पडलों नाहीं तर !

हिंदुस्थानांतील प्रत्येक व्यक्तीचें हें कर्तव्य आहे कीं तिनें दैन्य व दुर्बलता, निराशा व निरुत्साह, आलस्य व दैववाद यांचा सर्वस्वी त्याग केला पाहिजे. व्यक्ति सबल, सुदृढ, निरोगी, सुबुद्ध व सुविचारी बनली कीं, राष्ट्रोत्कर्षाचा निराळा विचार करण्याचें कारण राहात नाहीं. कारण,

**व्यक्ति + कुटुंब + समाज + राष्ट्र.**

या परम्परेनें व्यक्तीच्या उत्कर्षाचें लोण राष्ट्रापर्यंत आपोआपच जाऊन पोंचते. असो.

व्यक्तीवरून राष्ट्राच्या किंवा राष्ट्रावरून व्यक्तीच्या सुखा-दुःखाचा, उत्कर्षापकर्षाचा किंवा हिताहिताचा विचार करूं लागल्यावर आपण केवढीही मोठमोठी वर्तुळें घेतली तरी त्याची पद्धतशीर मांडणी करावयाची झाल्यास त्याच्या मध्यबिंदूकडे लक्ष दिल्यावांचून गत्यंतर नाहीं. हा मध्यबिंदु किंवा मूळ अगदीं सूक्ष्म, लक्षांत न येण्यासारखें किंवा डोळ्यांत न भरण्यासारखें असेल; पण तेवढ्यानें तें उपेक्षणीय होऊं शकत नाहीं. मधुर फळें जगास देऊन त्याच्या आदरास पात्र झालेल्या आम्रवृक्षाच्या विस्ताराचा मध्यबिंदु त्याच्या कोयींत दडलेला असतो. आम्रवृक्षाच्या बृहत्स्वरूपावरून कोयीकडे पाहिल्यास ती अगदीच क्षुल्लक नाहीं काय ? पण म्हणून तिची उपेक्षा करतां येईल ? हीच गोष्ट व्यक्तीच्या विकासाच्या मध्यबिंदूला लागू आहे.

व्यक्तिविकासाचें मूळ कोठें आहे ? उथळ विचार केला तरी त्याचें उत्तर ' गृह ' असें निघतें.

अखिल मानवजातीच्या एवढ्या मोठ्या पसाऱ्याचें मूळ एवढ्याशा घरांत समावलेलें आहे. तें जसें असेल तशी व्यक्ती निर्माण होतें आणि तिच्या योग्यतेनुरूप राष्ट्र असतें ! ज्याला म्हणून व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या उत्कर्षाचा विचार कर्तव्य असेल त्यानें या गाभ्याचा विचार आधी केला पाहिजे. आत्मोद्धाराचे भिन्न भिन्न प्रयत्न करतांना या केंद्राकडे दुर्लक्ष केलं तर फळाची आशा शून्यापलीकडे नाहीं; पण या एकाला अगोदर स्थान दिलें व बाकीच्या गोष्टी कशाही केल्या किंवा त्यांचेकडे मुळींच दुर्लक्ष केलें तरी यशाची संख्या वाढल्यावांचून राहणार नाहीं. जगांतील कोणतीही महनीय व्यक्ति घ्या, तिच्या साऱ्या परक्रमाचें मूळ तिच्याघरांत सांपडेल ! म्हणून गृह आणि गृहसौख्य याचा विचार करावयाचा.

मनुष्यास आपलें घर किती प्रिय असतें, हें काय सांगावयास पाहिजे ? सर्वांच्या नित्याच्या अनुभवांतील ती गोष्ट आहे. मनुष्यालाच नव्हे तर यच्चयावत् प्राण्याला आपलें निवासस्थान स्वभावत:च प्रिय असतें. कोठेंही आढळणाऱ्या एवढयाशा मुंगीकडे पाहा, किंवा अरण्यांत स्वेच्छेनें हिंडणाऱ्या विशालकाय हत्तीकडे पाहा, त्यांना त्यांचें निवासस्थान आहे व तें त्यास प्रियही आहे. सायंकाळीं मजा पहावी. निशाचराखेरीज सर्व प्राणी आपआपल्या निवासस्थानाकडे आतुरतेनें व त्वरित गतीनें जात असतात ! आपआपल्या घराची ओढ सर्वांना कां असते ? प्रेम, विश्रांति, अन्न, संरक्षण, जूट या सर्वांचा लाभ तेथें असतो म्हणून.

मग विश्वसंसाराच्या या मध्यबिंदूची उपेक्षा करता येईल?

पक्ष्याचें घरटें, मुंग्यांचें वारूळ, सश्याचें बीळ किंवा वाघाची गुहा हीं स्थानें त्यांना त्यांना प्रिय असलीं तरी मनुष्यानें आपलें गृह निर्माण करण्यांत जो अलौकिकपणा दाखविला आहे, तो कांहीं भिन्नच आहे. मुंग्यांचें वारूळ त्या प्राण्याची उद्योगप्रीति दाखवितें तर पक्ष्याचें घरटें त्याचें उपजत चातुर्य दाखवितें. पण या पलीकडे त्यांचें महत्त्व नाहीं. मनुष्याच्या घरासंबंधीं मान तसें नाहीं. प्राणीमात्रांत जसें त्यास महत्त्वाचें व सर्वोच्चस्थान लाभलें आहे तसेंच इतरांच्या घर-घरट्या-मध्यें त्याच्या गृहासही लाभलें आहे! अशा या स्थानाचा विचार करूं लागल्यावर त्याचे धागेदोरे किती लांबवर पसरलेले दिसतात!-सारेंच अलौकिक, विशाल, आश्चर्यकारक! केवढासा बिन्दु आणि केवढा त्याचा विस्तार!

घर, पतिपत्नी, कुटुंब, मुलेंबाळें, या सर्वांचें भरणपोषण, त्या-करितां उद्योग, त्या उद्योगांचे अनंत प्रकार, त्या प्रकारांची विलक्षण वाढ इत्यादि गोष्टींचा जों जों विचार करीत सुटावें तों तों मानव जातीनें चालविलेल्या सर्व खटाटोपांचें मूळ गृह व गृहसौख्य यांत येऊन भिडलेलें आढळतें. थोरांचीं चरित्रें, पराक्रमी पुरुषांचे पराक्रम, कवींचीं काव्यें, कलाभिज्ञांची कलानिपुणता या सर्व लहानमोठ्या गोष्टींचा उगम घरांतून आहे. तात्पर्य गृह हा मध्यबिंदु असून सारें विश्व त्याचें वर्तुल आहे ह्मटल्यास त्यांत कांहींच अतिशयोक्ती नाहीं.

शिवाजीसारखा स्वराज्यसंस्थापक, रामदास, तुकारामासारखे संत, गुरु नानकासारखे धर्मक्रांतिकारक, न्यूटनूसारखे शोधक, एडिसन सारखे कल्पक निर्माण होण्यास गृह अमुकच पद्धतीचें लागतें असा

मुळींच भाग नाहीं. थोर पुरुषांचा जन्म राजवाड्यांतच होतो आणि झोंपडींत होतच नाहीं किंवा जगन्मोहिनी ललना मोठमोठ्या प्रासादांतच जन्मास येतात, पर्णकुटिकेंत येत नाहींत असा नियम नाहीं. मनुष्यानें आपल्या विश्रामाकरितां व रक्षणाकरितां जें वास्तुशास्त्र निर्माण केलें आहे त्यांत झोपडीपासून राजवाड्यापर्यंतचा समावेश होतो. परंतु 'गृह' या शब्दानें मनांत जो भाव उभा राहतो, तो सर्व ठिकाणीं असेलच असा मात्र नियम नाहीं. घराची उच्चनीचता बाह्य देखाव्यावरून किंवा त्याच्या बांधणीस लागलेल्या मालमसाल्यावरून ठरवावयाची नसते तर ती त्यांत वास करणाऱ्या माणसांच्या परस्पर संबंधावरून व योग्यतेवरून ठरवावयाची असते.

संगमरवरानें बांधलेला, चंदनाच्या सुगंधानें दरवळलेला आणि मरकत मण्यांनीं सजलेला मोठा राजवाडा आहे. महाद्वारांत हत्ती झुलत आहेत, अश्वशाळेंत घोडे नाचत आहेत, आणि रत्नागारांत अमित द्रव्य भरलेलें आहे, आंत दासदासी आहेत, भोंवताली उद्यान आहे. इतका थाट असूनही जर तेथें राहाणाऱ्या पति-पत्नीमध्यें, भावाभावांत, पिता-पुत्रांत प्रेम नसेल तर?—सर्व वैभव-सर्व शोभा व्यर्थच नाहीं काय? प्रेम नाहीं, बंधुत्व नाहीं, आदर नाहीं, विश्वास नाहीं, शील नाहीं, सदाचार नाहीं आणि बाकीचें आहे तर तें सर्व खोटेंच नाहीं काय? शुद्ध चित्त नाहीं, निरोगी शरीर नाहीं, गोड वाणी नाहीं अशा स्थितींत कुबेराचें वैभवसुद्धां मातीमोलाचें नाहीं काय? ह्मणून असा राजवाडा 'गृहाच्या' व्याख्येंत येत नाहीं.

तेंच आतां दुसरें चित्र पहा; चार वेड्या वांकड्या मेढींची

झोंपडी आहे, वर नुसतें पाचट आहे, भोंवतालीं पाल्यापाचोळ्याचा कूड आहे, आंत गाडग्यामडक्यांची रास आहे, सर्वत्र दारिद्याचा वास आहे, परंतु पतिपत्नि परस्परानुरक्त आहेत, मुलेंबाळें आज्ञाधारक आहेत, वडील माणसें समंजस आहेत आणि सर्वांस उद्योगाचें महत्त्व पटलें आहे; बाहेर पुरुषवर्ग कष्टानें भाकरी मिळवित आहे, घरांत स्त्रिया कुशलतेनें कोंड्याचा मांडा बनवीत आहेत, मुलांबाळांच्या हंसण्याखिदळण्याचा सुवास सर्वत्र भरलेला आहे, सर्वांस चुरचुरींत भूक आहे आणि सुखाची गोड झोंप आहे, पत्नी पतीकरितां आतुरतेनें वाट पहात आहे, तोही लगबगीनें विश्रामार्थ घराकडे धांवत आहे अशा स्थानीं अठराविश्वे दारिद्य असलें तरी त्याचा त्रास होईल काय? प्रेमाचें रामराज्य जेथें सुरू आहे तेथें लक्ष्मी असो नसो ती झोपडी त्या राजवाड्यापेक्षां सहस्त्रपटींनें श्रेष्ठ आहे, समाजाला उपयुक्त आहे.

कोणत्याहि समाजाच्या किंवा राष्ट्राच्या अभ्युदयाची बीजें या अशा धर्तीच्या गृहांतून पेरलीं जातात. जगांतील सर्व विचारवन्त सज्जनांना आणि सुसंस्कृत राष्ट्रांना गृहाची ही योग्यता मान्य आहे. म्हणूनच गृह, गृहस्थाश्रम किंवा गृहसौख्य या विषयींच्या सर्वांच्या विचारांत शब्दाच्या मांडणींत भिन्नत्व असलें तरी—अर्थात एकवाक्यता आहे.

इंग्लंडची प्रसिद्ध कवयित्री हिमन आपल्या The homes of England या लोकविश्रुत चुटक्यांत म्हणतेः—

The merry homes of England
Around their hearths by night

म. नि १४



What gladsome looks of household love
Meet in the ruddy light
There woman's voice flows forth in song
Or childish tale is told
Some glorious page of old

याच्याच जोडीला भर्तृहरीचा हा सुंदर श्लोक मांडा:—

सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कांता मनोहारिणी।
सन्मित्रं सधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः॥
आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे।
साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः॥

भिन्न देश व भिन्न संस्कृति यामुळें या दोघां कवींच्या विचारप्रदर्शनांत भिन्नत्व निःसंशय आहे; परंतु अर्थाच्या सुरांत किती मनोहर एकवाक्यता आहे! तुलनाच करावयाची झाली तर वरील आंग्ल कवितेला कमीपणा न देतां असें अभिमानानें म्हणतां येईल, कीं, भर्तृहरीनें थोड्या शब्दांत संसाराची सुंदरता विशेष चातुर्यानें प्रगट केली आहे.

पण आजच्या हिन्दुजातीला गृहस्थाश्रमाची ही धन्यता पटते आहे का? विचार करण्यासारखा प्रश्न आहे. अरेरे! दुर्दैवी हिन्दु! किती आंबट तोंडानें व निराश मनानें जगांत वावरतो आहे! संसार कोणालाच सुटलेला नाहीं. सखेदाश्चर्याची व लांच्छनास्पद गोष्ट म्हणजे वैराग्यदर्शक वस्त्रांमध्यें सुद्धां कैकदा संसाराची कुलंगडी दिसून येतात. असें असतांही धर्माच्या नांवाखालीं व वेदांताच्या मिषानें संसारनिन्देचा केवढा मोठा गजर आमच्या समाजाच्या कानीं पडतो आहे! आणि त्या नादानें आम्ही किती नादान बनलो आहों! संसारांत सुख नाहीं,

ही समजूत आमच्या हाडीमांसी इतकी खिळली आहे कीं, त्याचा परिणाम म्हणजे आमचें घोर पारतंत्र्य व त्याचे पायी अठराविश्वे दैन्य!

संसारविरक्तीच्या थापा मारून पुनः त्यांतच लिडबिडणाऱ्या ढोंग्यानों आणि त्यांच्यावर विसंबून नादानपणें संसार करणाऱ्या मूढानों! नीट डोळे उघडून पहा. संसाराविषयींची तुमची आजची विचारसरणी आर्यांची नव्हे! तुमच्या प्रतिष्ठित व पराक्रमी पूर्वजांनीं जें वैभव भोगिलें तें अशा नेभळट समजुतीनें नव्हे. आर्यांचा वेदांत, तत्वज्ञान, धर्म, नीतीच्या कल्पना सर्व कांहीं श्रेष्ठ–श्रेष्ठतम–आहेत. किंबहुना त्याच्या तुलनेला दुसरी वस्तूच नाहीं हें सारें खरें; परंतु त्याबरोबर हेंही सांगणें भाग आहे कीं तुमचे आजचे आचार व विचार त्यांना सम्मत नाहींत. त्यांना वेदांत, पुराणांत किंवा तत्वज्ञानांत आधार नाहीं!

कथाकीर्तनांतून व पोथ्यापुराणांतून वैराग्याचा इतका काथ्याकूट होत असतां आम्हाला त्याच्या अर्थाचा लवलेश तरी सापडला आहे का? अशी शंका मनाला सारखी डवचते!–आजचा हिन्दु खरो-खरच वैराग्यशील आहे का?

स्वतःच्या ब्रह्मचर्याची महति कोणी गावी? ज्या पुरुषाच्या अंगांत तारुण्य मुसमुसत असेल त्यानें. षंढानें नव्हे! मी क्षमाशील आहे असें अभिमानानें कोणास म्हणतां येईल? ज्यांचे अंगीं भीमा-सारखें बल आहे त्याला!–वाऱ्यानें उडून जाणाऱ्या तितिर्षुला नव्हे! त्याचप्रमाणें ज्याचे पायाशीं सारें ऐहिक वैभव लोळतें आहे, त्यानें म्हटलें पाहिजे कीं, हा पहा मी वैराग्यशील आहे. मी त्याचा त्याग करतो!

नंतर त्यानें म्हणण्याप्रमाणें केलें तर त्याचें कौतुक! एखाद्या भिकाऱ्यानें तसें सोंग करण्यांत लाभ कोणता? जगांत हंसें मात्र व्हावयाचें.

आजचा हिंदुसमाज जगांत हास्यास्पद आहे तो यामुळें! त्यानें आपल्या वैराग्याची प्रशंसा गाण्यांत मौज नाहीं.

अगोदर संसार मग त्याची विरक्ति! अगोदर ऐहिक वैभव मिळवावयाचें आणि तें पूर्ण समाधानवृत्तीनें उपभोगून मग त्याचा त्याग करावयाचा अशी आर्यांची विचारसरणी व राहाणी होती. महाभारतासारखे राष्ट्रीय ग्रंथ चाळून पाहा. गृहस्थाश्रमाच्या श्रेष्ठत्वाविषयीं किती समर्पक व आदरयुक्त उद्गार महर्षी व्यासांनीं काढले आहेत:—

**गृहस्थस्त्वेष धर्माणां सर्वेषां मूलमुच्यते ।**

गृहस्थाश्रमी पुरुष हा सर्व धर्मांना मूळ आधार आहे.

**यथा मातारमाश्रित्य सर्वे जीवन्ति जन्तवः ।**
**एवं गार्हस्थ्यमाश्रित्य वर्तन्त इतराश्रमाः ।**

जसे सर्व प्राणी मातेच्या आश्रयानें जिवंत राहतात तसे इतर सर्व आश्रम गृहस्थाश्रमाच्या आधारानें राहतात.

महाभारतकाराप्रमाणेंच रामायणकर्त्यांचीही संसाराकडे पाहण्याची दृष्टी अशीच उदार आहे. खालील सुंदर वाक्य पहा:—

**चतुर्णामाश्रमाणां हि गार्हस्थ्यं श्रेष्ठमुत्तमम् ।**

चारहि आश्रमामध्यें गृहस्थाश्रम हाच उत्तम होय.

वेदवचनाविषयीं बोलावयालाच नको. ऐहिक वैभवाविषयीं अत्यंत उत्कंठित अशा ऋषींनींच त्यांची रचना केली असल्यामुळें

पदोपदीं त्याचाच जयजयकार सर्वत्र आढळतो. वेदांताची बडबड करणाऱ्या लोकांनी याचा अवश्य विचार केला पाहिजे.

आमच्या प्राचीन ग्रंथांतून केवळ गृहस्थाश्रमाचीच स्तुति आहे असें नाहीं तर संसार सुखाचा होण्यास ज्या ज्या वैभवाची व उपभोगांची आवश्यकता आहे त्या त्या सर्व विषयांची मुक्तकंठानें प्रशंसा केलेली आहे. संपत्ति, बल, विद्वत्ता, कीर्ति, सत्ता, राज्यवैभव यापैकीं एकाचीही अकारण निंदा आढळत नाहीं.

अर्थात् आपल्या पूर्वजांची ही थोर शिकवण जोंपर्यंत आचरणांत येत होती तोपर्यंत आमचा ऱ्हास झाला नाहीं. अगोदर बुद्धि गेली आणि मागून वैभव नामशेष झालें! पुन्हां तें हस्तगत करणें असेल तर आर्यांचा श्रेष्ठ गृहस्थाश्रम यथायोग्य पाळण्याचा निश्चय आम्ही केला पाहिजे.

आनंदाची गोष्ट आहे कीं, पाश्चिमात्त्यांच्या संगतीनें आमची या विषयींची दृष्टी निवळूं लागली आहे. या नवविचारांच्या लोटानें समाजांतील कांहीं लोकांचे पाय सुटून ते बरेच वाहवत गेले असले तरी एकंदरीत ते त्याज्य नाहींत. त्यांचा जयजयकार झाला पाहिजे. तरच आम्ही सुखानें व स्वाभिमानानें जगूं.

आपला धर्म, संस्कृति व तत्वज्ञान यांच्याशी यत्किंचितही विरोध न करतां आम्हाला पाश्चिमात्त्यांची भोगतृष्णा उत्कलता-अंगिकारता-येईल. आणि असें झाले तर हिंदुस्थानची भावी पिढी जगाला एका नव्या संस्कृतीचे धडे देण्यास समर्थ होईल.

नव्या मताच्या तरुणांनो! ऐहिक वैभवाची पूर्ण आकांक्षा धरा. याचा उगम तुमच्या घरांतून होऊं दे. माझें गृह सुंदर

निर्माण करीन आणि त्यापासून मिळणारें गृहसौख्य; पत्नी, संतती, आप्त व मित्र यांच्यासह दीर्घकाल भोगेन अशी प्रतिज्ञा करा. या ध्येयाकरितां प्राणावर उदार होऊन झगडा! वेदांताचा विचार आपण मागाहून करूं. गेलेलें वैभव व हरपलेलें स्वातंत्र्य पुन: परत मिळवून हृष्ट, पुष्ट, बलिष्ट होऊं या! आधी श्रीरामचंद्रानें आचरिलेला गृहस्थाश्रम आचरणांत आणूं या! मग या सर्व ऐहिक पसाऱ्याचा त्याग कसा करावयाचा हें भगवान् श्रीकृष्ण शिकवतील.

सर्व प्रकारचीं सुखें यथासांग देणाऱ्या संसाराचा जयजयकार असो.

एथवर आपण आपल्या हातीं धरलेल्या विषयाचा सामान्य विचार केला. आतां गृहाचा मुख्य आधार म्हणजे पतिपत्नी त्यांचेकडे वळूं.

लेखांक दुसरा :

पतिपत्नीची परस्पर

अनुरूपता.

## लेखांक दुसरा.

# पतिपत्नींची परस्पर अनुरूपता.

**साम्याद्धि सख्यं भवति वैषम्यान्नोपपद्यते ।**

काहीं सारखेपणा असेल तरच सख्य उद्भवते. विषमता असल्यास तें शक्य नाहीं.

महाभारत.

विवाहविधीनें एक झालेल्या दाम्पत्याबरोबर समाजांत एका नव्या घराची भर पडते; परंतु हें स्थान सुखासमाधानाचें होण्यास तेथें नांदू पाहणाऱ्या जोडप्यांत अगोदर प्रेमाचा उदय झाला असला पाहिजे, हें सांगावयास नकोच. हा प्रेमभाव निर्माण होणार कसा? अर्थात् तें दाम्पत्य परस्पर अनुरूप असेल तर. एरव्हीं नाहीं. म्हणून कोणत्याही पतिपत्नींचें रूप, गुण, वय, बल, व शील इत्यादि गुण शक्यतों मिळतेजुळते पाहिजेत. हें साम्य जितकें अधिक तितकी त्यांची परस्परानुरक्ति अधिक. एक सुंदर दुसरा कुरूप, एक निरोगी दुसरा रोगी, एक हंसतमुख दुसरा रड्या, एक उत्साही दुसरा ऐदी, एक चतुर दुसरा निर्बुद्ध अशांचा जोडा धर्मनीतिसंबंधांनीं कितीही जखडून टाकला तरी त्यांच्यामध्यें प्रेम उत्पन्न होणें अगदींच अशक्य नसलें तरी कठिण खास आहे. पतिपत्नीचा जोडा असाच असावा

कीं, त्यांची अनुरुपता जगास कौतुकास्पद व त्यांना स्वतःला अभिमानास्पद वाटावी. अशा ठायीं दाम्पत्यप्रेम निर्माण होण्यास कितीसा वेळ लागेल !

मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं, आमच्या समाजांत या बाबत फारच हेळसांड झालेली दिसून येतें. सर्व धार्मिक संस्कारामध्यें अत्यंत प्रतिष्ठित, दक्षतापूर्वक करण्यासारखा व परम कल्याणकारक असा जर कोणता संस्कार असेल तर तो विवाहाचा होय. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, वधूवरांच्या विवाहाचा संबंध त्यांच्या दोघांच्या ऐहिक सुखाकरितां करावयाचा असला तरी त्याच्या परिणामांची मर्यादा मात्र त्यांच्यापुरतीच नसतें. दोन स्त्रीपुरुषें एकत्र आणावयाची म्हणजे समाजांतील दोन कुटुंबें, त्या कुटुंबांचा गोतावळा, त्यांच्या भोंवतालचा समाज आणि भावी पिढी इतक्याशीं त्यांचें सूत्र निगडित झालेलें असतें. तेव्हां इतक्या महत्त्वाच्या व चिरपरिणामी संस्काराविषयीं किती दक्षता घेतली पाहिजे ! परंतु याच बाबतींत आमचा समाज इतकी डोळेझाक करतो व त्याचे इतके विपरीत व गर्ह्य परिणाम होतात कीं, त्याला तुलना नाहीं. आमच्या सामाजिक अधःपतनाचें हें एक प्रमुख कारण आहे असें बिनदिक्कत म्हणतां येईल. खरोखर ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. इतर अनेक गोष्टी डोळ्यांत तेल घालून करावयाच्या पण ज्यांच्या सुखाकरितां हा सारा खटाटोप त्यांच्या अनुरुपतेविषयीं मात्र उदासीन राहावयाचें. केवढा वेडेपणा हा ! पण त्याबद्दल वरानें चकार शब्द काढण्याची सोय नाहीं. वधूला तर वाचाच नाहीं. यामुळें ठिकठिकाणीं विजोड जोडपीं आणि त्यांच्या विवाहानें घडून आलेले दुष्परिणाम समाजांत सर्वत्र पाहण्यास मिळतात. मग कोठले दाम्पत्यप्रेम न्

कोठलें गृहसौख्य. आणि जर घरें सुखी नाहींत तर मग समाजाचें सुख व बल तरी कोठून आणावयाचें ?

अलीकडे शहरांतून व सुशिक्षित कुटुंबांतून या गोष्टीकडे विशेष लक्ष देण्यांत येत आहे ही त्यांतलेत्यांत समाधानाची गोष्ट होय. बाकी सर्वत्र अंधार आहे. तो दूर झाल्यावांचून गृहसौख्याची निर्मिती आढळून येणार नाहीं.

संसाराकडे निराशदृष्टीनें पाहण्याची चाल जशी आर्यांची नव्हे, तशीच वधूवरांचा विवाह जुळवितांना त्यांच्या अनुरूपतेविषयीं कांहींच दक्षता न घेणें हीहि चाल आर्यांची नव्हे. सुप्रजाजननाप्रीत्यर्थ वधूवरांचा जोडा जमवितांना कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे याचा सूक्ष्म विचार आमच्या धर्मशास्त्रांमध्यें जितका आढळेल तितका अन्यत्र आढळणार नाहीं. असें असतां इतर कित्येक चांगल्या गोष्टीप्रमाणेंच याही गोष्टीचा लोप झाला असून ‘ काप गेले आणि भोकें राहिलीं ’ ही म्हण विवाहसंस्कारांतहि प्रत्ययास येऊं लागली आहे. पण यापुढें समाजानें अशीच डोळेझांक करून चालणार नाहीं. नव्या मनूतील नव्या तरुणपिढीकरितां विवाहसंबंधाचा विचार विशेष उदारतेनें व दक्षतेनें व्हावयास पाहिजे. असो.

वधूवरांच्या अनुरूपतेविषयीं विशेष काळजी न घेतांहि आमच्या समाजांत पुष्कळ ठिकाणीं दाम्पत्यप्रेमाचीं सुंदर उदाहरणें आढळून येतात. पण याचें पुष्कळसें श्रेय आमच्या स्त्रीजातीच्या मनोरचनेकडे द्यावें लागेल. पति हें आपलें दैवत आहे, ही उच्च भावना आमच्या वधूच्या मनांत विवाहाच्या मंगल अक्षता मस्तकावर पडतांच उत्पन्न होते आणि ती अल्पावकाशांतच तिच्या रोमरोमांत पसरून तिला

पातिव्रत्यधर्माचें ज्ञान देतें. यामुळें साहजीकच तिच्या धर्माचा परिणाम तिच्या पतीवर होऊन दोघांत प्रेमभाव निर्माण होतो. कांहीं स्थानीं ' पदरीं पडले आणि पवित्र झाले ' या म्हणीप्रमाणेंहि दाम्पत्य-प्रेमाचा प्रादुर्भाव होत असेल, नाहींसें नाहीं. पण त्याचेंहि श्रेय बहुतांशीं आमच्या स्त्रीजातीकडेच जाईल यांत शंका नाहीं.

या जगांत प्रत्येक गोष्टीला कांहींना कांहीं अपवाद आढळतोच. त्याचप्रमाणें दाम्पत्यप्रेमाचें बाबतींतही तसे अपवाद आढळणें अशक्य नाहीं. अत्यंत अनुरूप वधूवरांचा बेबनाव आणि विजोड जोडप्यामध्यें आत्यंतिक प्रेम असा प्रकारही क्वचित आढळेल पण तो अपवादादाखलच. त्यावरून आमच्या नियमाला बळकटीच येईल अशी खात्री आहे.

अनुरूपतेच्या अभावी कोणीकडून दोन माणसें विवाहबंधनानें एकत्र आणलेल्या विजोड जोडप्यांच्या गृहसौख्याचा विचका पहावयाचा आहे काय?— समाजांत जरा नजर टाकून पहा. आम्हाला वाटतें असलींच घाणेरडीं संसारचित्रें पाहून आमच्या समाजामध्यें संसाराविषयीं अप्रीति निर्माण झाली असावी.

सहवासानें प्रेम जमतें. निदान सामान्य सद्भाव तरी जागृत होतो म्हणतात. पण इथें पहा. नवराबायकोंत प्रेमाचें नांव तर नाहींच, उलट असंतोषाचा अग्नि सारखा धुमसत असतो आणि मधून मधून त्याच्या तीक्ष्ण ज्वाला उठत असतात. पत्नीला पशूप्रमाणें मानणारे आणि वागविणारे नराधम थोडेथोडके नाहींत. त्याचप्रमाणें पतीला खेटराप्रमाणें लेखून त्या बिचाऱ्याला अपमानाचें मरण पदोपदीं देणाऱ्या त्राटिकाही कमी नाहींत. चार मुलांची

आई झालेल्या बरोबरीच्या पत्नीच्या अंगावर हात टाकणारे, चार चौघांत तिचा यथेच्छ अपमान करणारे आणि इतर अनेक बाजूंनीं तिची अनास्था करून तिला सधवा स्थितींत वैधव्याचा नरकवास भोगायला लावणारे मानवजातीचे दुष्टमणी किती हवेत ? बालवृद्ध-विवाहाचें एखादें करुण चित्र पाहून आपण हळहळतो आणि त्या दुष्ट चालीबद्दल आपण दांत ओठही खातो. पण त्याच समाजांत वरील नराधम व त्याची अनाथ पत्नी यांचें भेसूर चित्र मुकाट्यानें पाहतो. तो पराक्रमी पुरुष ' पुरुष ' म्हणून सुटून जातो आणि त्याची दुर्दैवी पत्नी आपला जन्मच बायकोचा म्हणून मूक वृत्तीनें नरकवास भोगत असते. काय, या पापांचा सामाजिक स्वास्थ्यावर कांहींच परिणाम होत नसेल ? या असल्या पतींच्या बायका वटसावित्रीचें किंवा हरतालिकेचें व्रत आचरतांना मनांतून असलाच पति जन्मोजन्मी मागतील कीं, या चांडाळाचें पुनः मुखावलोकन नको असें चिंतीत असतील ! खास त्या रात्रंदिवस मूक हुंबरडे फोडीत असल्या पाहिजेत. जी स्थिति अशा स्त्रियांची तीच कित्येक पुरुषांचीही आहे. परपुरुषाची आवड, दागिन्यांचा लोभ, माहेरचा ओढा, गृहिणीधर्माची पराङ्मुखता इत्यादि दुर्गुणांनीं कितीतरी बायकांनीं आपल्या पतीच्या तोंडास काळें फासून त्यांना जगांतून उठवलें आहे. सांगा समंजस वाचकांनो! अशा स्थानीं गृहस्थाश्रमाची धन्यता आढळेल काय ! किंवा पातिव्रत्याचें तेज दिसेल काय ? असलीं गर्ह्य व खेदकारक उदाहरणें फार मोठ्या प्रमाणावर आहेत असें आमचें म्हणणें नाहीं; पण त्यांचें अस्तित्व समाजाचें स्वास्थ्य बिघडविण्याइतकें खास आहे.

यापेक्षां कमी तीव्र परंतु बऱ्याच मोठ्या प्रमाणावर आढळणारीं उदाहरणें म्हणजे नवरा घरांत असेपर्यंत कपाळाला आठी व तोंडाला मिठी हें खडतर व्रत नशिबीं आलेल्या बायकांचीं आणि कजाग बायकोच्या त्रासानें घराबाहेरच प्रसन्न राहणाऱ्या दुर्दैवी पुरुषांचीं होत. याशिवाय आपल्याच पत्नीचा मुळीच विश्वास न धरणारे संशयी पुरुष आणि आल्यागेल्याजवळ मनमोकळेपणानें आपल्याच पतीची निंदा करणाऱ्या स्त्रिया सर्वत्र आढळतात. मग—

Where there is strife 'twist man and wife 'tis hell. या कुकच्या उक्तीप्रमाणें आमच्या समाजांत कांहीं स्थानीं नरकाचें चित्र आढळलें तर त्यांत नवल तें काय?

ज्या समाजापुढें पतिपत्नीधर्माचें दिव्य उदाहरण दाखविणारें रामायण हजारों वर्षें कित्त्यादाखल ठेविलें गेलें आहे, त्याच समाजांतील दाम्पत्यप्रेमाची अशी होळी झालेली दिसावी ही शरमेची गोष्ट नाहीं काय? म्हणून गृहसौख्याचा विचार व्यापक प्रमाणावर करावयाचा झाल्यास या अनर्थाकडे कानाडोळा करून चालणार नाहीं. याला धरबंध पाहिजे असल्यास पतिपत्नीच्या अनुरूपतेचा विचार झालाच पाहिजे.

आपल्याकडे संसारास रथाची उपमा दिली जाते व पतिपत्नी हीं रथाचीं चाकें होत असें समजलें जातें. आम्हाला वाटतें दाम्पत्यास निर्जीव चाकजोडीची उपमा देण्यापेक्षां त्यांस रथी व सारथी समजावें.

### पति रथी व पत्नी सारथी.

संसाराच्या क्षेत्रांत झगडून सर्व प्रकारची श्री मिळविण्याचें

कष्टप्रद कार्य पुरुषाकडे आहे. म्हणून तो रथी. आणि त्यानें आणिलेल्या श्रीची योग्य व्यवस्था करून संसाररथ कुशलतेनें चालविण्याचें कार्य पत्नीकडे आहे म्हणून ती सारथी. अर्थात् रथी व सारथी एकमेकांस अनुरूप व तुल्यबळ पाहिजेत. तसें नसेल तर एकाचा कमीपणा दुसऱ्यास बाधून यशाविषयीं शंका उपस्थित होईल. असो.

संसारांत सौख्य पाहिजे असल्यास पतिपत्नीमध्यें सख्य पाहिजे आणि तें निर्माण व्हावयाचें झाल्यास अनुरूपता आवश्यक आहे, या विषयीं एथवर विचार झाला. आतां अनुरूपता म्हणजे तरी काय? याचा उलगडा स्पष्ट झाला पाहिजे. मूठभर वाटाणे घेऊन त्यांच्याकडे सहज पाहिलें तरी त्या सर्वांत विलक्षण सारखेपणा असल्याचें दिसून येतें. असाच बेमालूम सारखेपणा पतिपत्नीमध्यें असावयास पाहिजे काय? दोघांचींहि वयें सारखीं, गुण सारखे, आरोग्य सारखें, रूप सारखें असणें इष्ट आहे काय? कोणीहि समंजस मनुष्य नाहीं असेंच उत्तर एकदम देईल. मग सारखेपणा किंवा अनुरूपता पाहिजे ती कशी? यावर थोडक्यांत उत्तर असें कीं, केवळ लठ्ठपणा म्हणजे जसें आरोग्य नव्हे, केवळ गोरेपण म्हणजे जसें सौंदर्य नव्हे किंवा केवळ विद्या म्हणजे जसे गुण नव्हेत, तसेंच अगदीं एकसारखेपणा म्हणजे अनुरूपता नव्हे.

एका आंग्ल सुभाषिताप्रमाणें मनुष्य हें परमेश्वराचें सर्वश्रेष्ठ असें सुंदर कार्य आहे व तें त्यानें **स्त्री+पुरुष** अशा मिश्रणानें बनविलें आहे. एकटा पुरुष किंवा एकटी स्त्री म्हणजे मनुष्य नव्हे. त्या दोघांच्या पूर्णतेनें मनुष्याची निर्मिती. आतां सृष्टीचा नियमच असा आहे कीं, दोन अगदीं सारखे पदार्थ घेऊन त्यांचें मिश्रण केलें तर त्यांच्या स्वरू-

पांत कांहींच फरक पडत नाहीं. उदाहरणार्थ साखर घ्या. साखर+साखर असें मिश्रण कितीही लहान मोठ्या प्रमाणांत केलें तरी परिणाम काय? साखर साखरच राहणार! परंतु तेंच साखर+दूध किंवा तूप असें मिश्रण केलें तर? एक नवीन अत्यंत रुचकर असा पदार्थ निर्माण झाला! आणखी उदाहरण पाहिजे असल्यास साधें मिठाचें घ्या. मिठांत मीठ कितीही ओतलें तरी त्याचा काय उपयोग?–पण एखाद्याशा मिठाला आवळ्याची जोड दिली तर? जिभेला चटकदार चव निर्माण होते? स्त्रीपुरुषांची अनुरूपता पाहिजे ती अशी. त्यांच्यांतील सारखेपणा पाहिजे तो या धर्तीचा.

सृष्टिरचनेसंबंधीं शास्त्रज्ञांचें असें म्हणणें आहे कीं, सृष्टीचा जो एवढा मोठा पसारा आपल्यापुढें दिसतो तो कांहीं मूळचाच तसा नव्हे. मूळ अगदीं थोडीं अशीं तत्वें किंवा पदार्थ होते. त्यांच्याच मिश्रणानें किंवा त्यांच्यांत कांहीं विकृति होऊन अनेक भिन्न भिन्न पदार्थ निर्माण झाले. दोन परस्परांत मिळण्यासारखें पदार्थ मिसळले जायचे आणि त्यांतून तिसरा पदार्थ निर्माण व्हायचा. रंगाचेंच उदाहरण घ्या. मूळ रंग तीन. तांबडा, पिंवळा आणि निळा. पण या तिघांच्याच परस्पर मिश्रणानें किती नयनमनोहर रंग निर्माण होतात! तात्पर्य, कोणत्याहि दोन वस्तूंच्या मिश्रणानें तिसऱ्या वस्तूचा जन्म व्हावयाचा हा सृष्टीचा नियम. ती चांगली किंवा वाईट, मोहक किंवा हिडीस, हितप्रद किंवा टाकाऊ होणें हें केवळ त्या पदार्थांच्या गुणदोषांवर अवलंबून राहील! मनुष्य हा तरी सृष्टींतील चैतन्यमय वस्तूच नाहीं का?– मग तो या नियमांतून कसा चुकणार? मात्र तो सत् किंवा असत् होणें हें केवळ मूळ घटकांच्या (स्त्री–पुरुषांच्या) प्रकृतीवर अवलंबून राहणार हें उघडच

आहे. चांगल्या मानव जातीकरितां मूळ घटक चांगले पाहिजेत, हें काय सांगायला हवें ?

मानवजातीच्या उत्पत्तिकरितां स्त्री-पुरुषांचे घटक बनवितांना विधात्यानें विलक्षण चातुर्य दर्शविलें आहे, यांत शंका नाहीं. योग्य काल येतांच या उभय घटकांचीं मनें एकमेकांकडे आकर्षिलीं जावीं, त्यांना परस्पर समागमाची विलक्षण उत्कंठा लागावी आणि तिच्या तृप्तीकरितां त्यांनीं वाटेल तो त्रास किंवा संकटें सहन करण्यास प्रवृत्त व्हावें अशी कल्पकता त्यांच्या देहरचनेंत व मनोधर्मांत लढविण्यांत आलेली आहे. दोघांचेंहि कांहीं कांहीं गोष्टींत विलक्षण साम्य आहे. कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें दोघांनाही सारखी; देहाची रचना मात्र भिन्न. तोच नियम मनोधर्माला लागू. कांहीं मनोधर्म अगदीं सारखे, पण कांहीं अगदीं भिन्न; परंतु भिन्नत्व असें गमतीचें कीं, त्याच्याचमुळें त्या दोघांचें ( स्त्री पुरुषांचें ) अभिन्नत्व घडून यावें व तें घडवून आणण्यास दोघांनाही सुलभ जावें. स्त्रीपुरुषांच्या या मनोव्यापारासच प्रेम ही संज्ञा आहे. विधात्याच्या प्रतिभेनें हें सूक्ष्म तंतुजाल रचतांना एवढी उच्च भरारी मारिली आहे कीं, त्यांतून कोणताही जीव सुटलेला नाहीं. प्रत्यक्षांत कांहींच नाहीं. पण अप्रत्यक्षांत त्याची शक्ति एवढी विलक्षण कीं, त्यांतून मुक्तता करून घेण्यास देवाचें बारसें खाऊन उठलेल्या बुद्धिमान् मनुष्यासही अशक्य होऊन बसलें आहे. स्त्रीजातीला तुच्छ लेखून त्यांना दोन हात दूर किंवा मागें टाकणाऱ्या पुरुषांनों ! आणि पुरुषाच्या स्वामित्वांत सांपडावयाचें नाहीं, अशा बाण्यानें स्वतंत्रता मिळविण्यास प्रवृत्त झालेल्या स्त्रियांनों! तुम्ही


दोघांनाही एकत्र आणणारी ही शृंखला तोडण्याचा अट्टाहास का करतां? तुम्हाला त्यांत यश येईल?–नांव कशाला!

स्त्रीपुरुषांमध्यें अदृश्य रूपानें वावरून सृष्टीचें कार्य करणारी ही दिव्य शक्ति सर्वांना सुलभ, हितकर, अनिर्बंध व्हावी म्हणून समाजानें धर्माची व नीतीची स्थापना केली आणि त्यांच्याकरवी विवाहविधी प्रचारांत आणिला! याच संस्कारानें या दिव्यशक्तीस दाम्पत्यप्रेम असें नांव दिलेलें आहे.

ज्या स्त्रीपुरुषांना परस्परसमागमाचें सौख्य अनिर्बंधतेनें उपभोगणें असेल त्यांनीं व्यक्तिस्वातंत्र्याच्या भ्रामक मोहाला बळी न पडतां विवाहबद्ध होणें इष्ट आहे. या बंधनानें त्यांची जबाबदारी वाढत असली तरी तें त्यांना कल्याणप्रद व समाजास स्वास्थ्यकारक असते यांत शंका नाहीं.

निसर्गानें योजिलेले स्त्रीपुरुषांचे मनोधर्म व त्यांस अनुसरून मनुष्यानें स्थापन केलेला विवाहसंस्कार या दोहोंच्या समीकरणानें **गृहसौख्याचें अधिष्ठान** कसें निर्माण होतें, हें सुलभतेनें समजावें म्हणून या लेखासोबत एक चित्र देण्यांत येत आहे. रसिक वाचकांना ही कल्पना मनोज्ञ वाटेल अशी आशा आहे.

या चित्रांत भूमितींतील समभुज त्रिकोण साधण्याची कृति अनुसरलेली आहे. सर्व समाजास एकत्र सांधणारा धर्म ही मुख्य रेखा असून हिच्यावर गृहसौख्याचा समभुज त्रिकोण साधावयाचा. धर्म या रेखेचीं दोनही टोकें म्हणजे पतिपत्नी होत. आतां पतीनें पत्नीपर्यंत व पत्नीनें पतीपर्यंत आपलें जीवितकेंद्र धरून कर्तव्याचें वर्तुळ आखावयाचें. या योगें धर्मरेखेवरती त्रिकोण निर्माण होतो. पुरुषा-


गृह सौख्याचें अधिष्ठान
पुरुषाचे प्रमुख गुण.
१ सामर्थ्य
२ सुदृढता
३ तर्कनिष्टा
४ धैर्य
५ कल्पकता
६ काटकपणा
७ उच्छृंखलत्ता
८ मानीपणा
९ बुद्धिमत्ता
१० न्यायनिष्ठुरता
११ उपभोगवृत्ति
उत्कृष्ट मानव
अर्थ
काम
धर्म
जीवित साफल्य
पति
पत्नी
स्त्रीचे प्रमुख गुण.
१ सौंदर्य
२ कोमलता
३ धर्मनिष्ठा
४ साहस
५ कलानिपुणता
६ सहनशीलता
७ लज्जाशीलता
८ तेजस्विता
९ चातुर्य
१० वत्सलता
११ त्यागवृत्ति

कडून अर्थ व स्त्रीकडून काम असे समांतर भुज निर्माण होतात. यांतून उत्कृष्ट मानवजातीचें केंद्र सांधलें जातें आणि खालच्या बाजूस जीवितसाफल्यहि दिसून येतें. गृह, कुटुंब, जाती, समाज, गांव, प्रांत व राष्ट्र अशा चढत्या पायरीनें पसरत जाणाऱ्या मानव-समाजास सुख, समाधान व शांति पाहिजे असेल तर असे सम-भुज त्रिकोण सर्व स्त्रीपुरुषांत घडून आले पाहिजेत. कोणतीहि दोन वर्तुळें एकमेकास ओलांडून गेलीं कीं, त्यांच्या सांध्यांत त्रिकोणाची उत्पत्ति होते. परंतु ते समभुज नसतात. निर्मळ गृहसौख्य सम-भुज त्रिकोणावांचून नाहीं. ज्या समाजांत असे त्रिकोण नाहींत तेथें वैभव, सत्ता व सुखसाधनें यांची विपुलता असली तरी बजबज पुरी माजते; मग जो समाज पददलित असेल, दुःखानें व दारि-द्र्यानें पिडलेला असेल, तो कोणत्या दुःस्थितीला जाऊन पोचेल हें काय सांगावें ?

याच दृष्टीनें स्त्रीपुरुषांच्या प्रमुख गुणांकडेही दुर्लक्ष करून चाल-णार नाहीं. निसर्गानें योजिलेलें हें भिन्नत्व केवळ एकमेकाच्या पूर्णते-करितां आहे. स्त्रीला अडवण्याकरितां किंवा पुरुषाला चढवून ठेवण्या करितां नव्हे. पूर्ण मनुष्याला दोघांचेंहि साह्य पाहिजे. पुरुषांचें सामर्थ्य व सुदृढता आणि स्त्रीचें सौंदर्य व कोमलता यांच्या मिश्रणानें मानव-जातीस शरीरसौष्ठव व आरोग्य यांचा लाभ होतो. पुरुषाचें धैर्य व स्त्रीचें साहस यांच्या मिश्रणानें मनुष्याला पराक्रम करावासा वाटतो. पुरुषाचा काटकपणा व स्त्रीची सहनशीलता यामुळें मानवामध्यें चिकाटी निर्माण होते. पुरुषाच्या कल्पकतेनें स्त्रीच्या कलानैपुण्याचा हात धरूनच नानाविध शास्त्रीय ज्ञानाचा उत्कर्ष केला आहे. एकाचा

मानीपणा दुसऱ्याच्या तेजस्वितेमध्यें एकरूप होऊन त्यांनीं पवित्रतेस जन्म दिलेला आहे. उच्छृंखल पुरुष व लज्जाशील स्त्री यांच्या मिश्रणानें मनुष्यास समतोल वागण्याची इच्छा होते. एकाची त्यागवृत्ती व दुसऱ्याची उपभोगवृत्ती यामुळें मनुष्यास औदार्य या श्रेष्ठ गुणाचा लाभ होतो.

याचप्रमाणें तर्कनिष्ठा+धर्मनिष्ठा, वत्सलता+न्यायनिष्ठुरता, बुद्धिमत्ता+चातुर्य यांच्या मिश्रणानें मनुष्यजातीनें संस्कृतीचे अनेक नमुने तयार करून विश्वसंसारास रंग आणिला आहे. त्याकडे लक्ष न देतां जर स्त्रीपुरुषांनीं व्यक्तिस्वातंत्र्याचें स्तोम माजविलें आणि आपआपल्या गुणकर्मांचा त्याग केला तर त्याचा घोर परिणाम मानवजातीस भोगावा लागेल. स्त्रीची लज्जाशीलता सुटेल तर पुरुषामध्यें स्वतःच्या कीर्तीस जपण्याची चाड आढळून येणार नाहीं. पुरुषांचा काटकपणा नाहींसा झाला तर स्त्रींचा सोशीकपणा ओहोटीला लागेल. स्त्रीची वत्सलता निर्मूल होईल तर पुरुषांची न्यायनिष्ठुरता निर्दय बनेल. स्त्रीचे ढंग पुरुषांत किंवा पुरुषाचे ढंग स्त्रीत उतरूं लागले कीं मानवजातीला भिरड लागली असें खुशाल समजावें. म्हणून स्त्रीपुरुषांनीं आपल्या जन्मजात गुणांचा त्याग न करतां किंवा त्यांत कमीपणा न मानतां दाम्पत्यप्रेमाचा पाठ पढावा आणि गृहसौख्याचा त्रिकोण साधावा. असो.

या ठिकाणीं प्रश्न असा उद्भवेल कीं, ज्यांचे विवाह होण्याचे आहेत, त्यांना या लेखांकानुरूप वागतां येईल पण जीं जोडपीं विवाहबद्ध झालीं त्यांची वाट काय? त्यांनीं काय करावयाचें! त्यांचा त्रिकोण विषम झाला असेल तर! उत्तर असें:—

प्रस्तुत ग्रंथ तरुण जोडप्याकरितां आहे. ज्यांचे संसार कशाही तऱ्हेनें का होईना परिपक्व झाले त्यांनीं आपल्या पुढील पिढीची काळजी वहावी. पण ज्यांनीं नुकताच संसारप्रवेश केला आहे, त्यांना आपला संसार आदर्शवत् करण्यास पुष्कळच वाव आहे. अशा नवविवाहित तरुणांनीं पहिल्यापासूनच आपला त्रिकोण विषम होईल कीं काय? अशी धास्ती घेऊं नये. सर्वांनाच मनासारखा जोडीदार मिळत नाहीं असें होत नाहीं. अत्यंत अनुरूप विवाह जसे अगदीं बोटावर मोजण्याइतके होतात, तितकेच विषम विवाहही होतात. मध्यम प्रकारच विशेष. त्यांनीं प्रयत्नानें आपला त्रिकोण जुळवून आणावा. आमच्या इकडील कोणतीही बाला विवाहबद्ध होतांच आपलें वर्तुळ बरोबर आंखतें. तेव्हां तिच्या पतीनेंही ती आपल्या योग्यतेची नाहीं अशी उगीचच समजूत करून नाउमेद होऊं नये. आपल्या पत्नीमध्यें स्त्रीजातीला भूषणास्पद असे सर्व गुण आहेत असें गृहित धरून तिच्या वर्तुळाशीं आपल्या गुणकर्मानुरूप कर्तव्याचें वर्तुळ भिडवावें. बहुशः समभुज त्रिकोणच साधेल. प्रथमतः थोडासा त्रास पडेल पण त्याचे काय होय?

ज्यांना हें करणें नसेल अथवा जे आपल्या पत्नीविषयीं अगदींच उदासीन असतील, त्यांना कोण काय सांगणार! जगांत आपण जन्माला आलों हीच पहिली चूक केली असें त्यांनीं समजून चुकीनें चूक मारून टाकावी! इतर तरुणांनीं आपलें गुणकर्म ओळखून मार्गाला लागावें हें बरें.

लेखांक तिसरा :

गृहसौख्याविषयीं

पुरुषाचें कर्तव्य.

## लेखांक तिसरा.

# गृहसौख्याविषयीं पुरुषाचें कर्तव्य.

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**

आपआपलें कर्तव्य आनंदानें करीत राहिल्यानें मनुष्यास परम सिद्धि प्राप्त होते.

गीता.

Within the limits every man has it in his power to make of his life so harmonious a whole, that wheather it be magnificent or modest, it will be perfect of its kind.

कांहीं मर्यादेपर्यंत आपलें जीवित पूर्ण सुसंगत करणें प्रत्येक मनुष्याच्या आटोक्यांत आहे. तें झगझगीत असो किंवा सामान्य असो त्याच्यापुरतें तें यशस्वी ठरेल.

जर्मन कवि गेटे.

पूर्वीं आपल्याकडे एकत्र कुटुंबाची पद्धत असल्यामुळें कोणत्याहि तरुण पुरुषावर संसाराची जबाबदारी एकदम पडत नसे. त्यामुळें तो चांगला जाणता होईपर्यंत त्यास निर्बंध मनानें वावरता येई. कालमानानुसार ती सोय आतां कमी होत चालली आहे. एकत्र कुटुंबपद्धत सर्वांशीं नष्ट झाली नसतांहि बहुतेक तरुणांना उदर-

निर्वाहार्थ देशोधडी व्हावें लागतें. अर्थात् विवाहाच्या मंगल अक्षता डोक्यावर पडतात न पडतात तोंच त्यास संसाराची जबाबदारी स्वीकारावी लागते. कांहीं दृष्टीनें हें स्वातंत्र्य सुखावह असलें तरी त्यांत धोका अगदींच नाहीं असें नाहीं. इहलोकचीं नानाविध सुखें उपभोगण्याचें स्थान संसार हेंच असलें तरी येथें सुखाबरोबर दुःख, लाभाबरोबर हानी, यशाबरोबर अपयश, मानाबरोबर अपमान ठेव लेला आहे. पहिलें शक्य तों वाढवावयाचें आणि दुसऱ्याचा शक्य तों निरास करावयाचा. हें कार्य सहजी होण्यासारखें नाहीं. याकरितां प्रत्येक संसारी तरुणानें जागरूक राहून आपला मार्ग चातुर्यानें काढला पाहिजे.

माझा संसार मी आदर्शवत् करीन असा निश्चय प्रत्येक तरुणानें करावा आणि त्याकरितां पडेल ती कर्तव्याची किंमत देण्यास तयार असावें. कोणत्याहि कर्तव्याची पहिली चव कडवट असते. पण तिला कंटाळून भागणार नाहीं. पुढील अमृतोपम सुखाचा जन्म त्या कडवट कर्तव्याचे पोटीं असतो. असो.

आतां संसारांत प्रवेश केलेल्या तरुणाचीं कर्तव्यें कोणती आहेत तें पाहूं.

पहिली गोष्ट धनोपार्जनाची होय.

**धनमाहुः परं धर्मं धने सर्वं प्रतिष्ठितम् ।**
**जीवन्ति धनिनो लोके मृता ये त्वधना नराः ॥**

धन मिळविणें हा श्रेष्ठ धर्म होय असें म्हणतात. धनावरच सर्व कांहीं अवलंबून आहे. धनसंपन्न लोकच जगांत जिवंत असतात. धनहीन पुरुष मेल्यांतच जमा. महाभारत.

यापेक्षां धनाची प्रशंसा आणखी काय करता येईल? पैसा आहे तर सर्व कांहीं आहे हें मनांत पक्कें बाळगून पुरुषानें धनोपार्जनाकरितां कसून प्रयत्न केला पाहिजे.ज्याला हें साधणार नाहीं त्यानें सुखाची आशा धरूं नये. दैवावर भरंवसा ठेवण्यांत विशेष लाभ नाहीं. त्याचें अस्तित्व नाकारता येण्यासारखें नसलें तरी प्रयत्नांत ढिलेपणा करण्यांत पुरुषार्थ नाहीं.

पुरुषाची देहरचना आणि स्वभावधर्म त्यानें निसर्गाशी झगडून आपलें व आपल्यावर अवलंबून असलेल्या माणसांचें सौख्य जास्तीत जास्त प्राप्त करून घ्यावें अशा धर्तीचा बनविण्यांत आला आहे. त्यानें पराक्रम केलाच पाहिजे. तो करतांना त्यानें दुसऱ्याच्या सुखा-प्रगति-आड येण्याचें करूं नये म्हणजे झालें. ती दक्षता न घेतली तर जशास तसें या न्यायानें इतर त्याच्या इच्छिताचे आड आल्यावांचून राहणार नाहींत.

दैवाचा आश्रय घ्यावासा वाटणें व प्रयत्नांत शिथिलता दर्शविणें हीं कापुरुषाचीं लक्षणें होत. शहाण्यानें तीं दूर ठेवावीं. उत्साहानें सतत प्रयत्न करणें प्रारंभी थोडे कंटाळवाणें आहे. पण—

**शक्नोति जीवितुं दक्षो नालसः सुखमेधते।**

तत्परतेनें उद्योग करणारा मनुष्य चांगल्या प्रकारें जगूं शकतो. आळशी मनुष्याला सुख म्हणून मिळत नाहीं. हें वचन ध्यानांत ठेऊन आळसाला गचांडी दिली पाहिजे. खरें सौख्य कष्टाचें फळ आहे. तें सहज लाभत नाहीं आणि एखादे वेळीं लाभलें तरी तें फार वेळ टिकत नाहीं.

मुळांत श्रीमंत म्हणूनच सुखी कुटुंबें कालांतरानें भिकेला लाग-

लेलीं आढळतात किंवा नामशेष होतात, याचें मुख्य कारण त्यांच्या घरांत नकळत शिरलेला आळस. श्रीमंतीच्या सावलींत बसून रिकामा काळ घालवितांना हळूच बिऱ्हाडास येणारा आळस इतका निरुपद्रवी भासतो कीं, शहाण्याच्या बुद्धीलाहि भ्रम पडावा. Laziness grows on people; it begins in cobwebs and ends in iron chains. आळस माणसांच्या अंगीं हळू हळू वाढतो. सुरुवातीला तो कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें सूक्ष्म तंतूमय असतो परंतु शेवटीं त्याचे लोखंडी लंगर बनतात. प्रत्येक तरुणानें याविषयीं फार सावध असावें.

आळस श्रीमंताला दरिद्री करणारा व दरिद्र्यांना जिवंतपणीं नरक दाखविणारा आहे. त्याच्यायोगें कार्योत्साह झिजणीला लागतो आणि उत्कर्ष मरतो. शिवाय तो एकटा कधींच येत नाहीं. सहकुटुंब सहपरिवारें येऊन कार्यसिद्धी करतो. अल्पसंतोष हा त्याचा छोटाभाई तर घामटपणा बडाभाई आहे. अतिझोप व निराशा या त्याच्या लाडक्या बहिणी असून चिंता पत्नी आहे. अर्थात् असलें कुटुंब आपल्या घरीं बिऱ्हाडाला ठेवणें किती अनर्थावह आहे याचा विचार ज्याचा त्यानें करावा. गृहसौख्याविषयीं उत्कंठ असलेल्या संसारी मनुष्यानें याची ओळख करून घेऊं नये. इतकेंच नव्हे तर जेथें त्याची वस्ती आढळेल, तो भाग प्लेगच्या दूषित हवेप्रमाणें वर्ज्य मानावा. असो.

जगांत मनुष्याच्या मुख्य गरजा तीन आहेत. अन्न—वस्त्र—घर. राखेंत बुडलेला गोसावी किंवा कावेनें रंगलेला संन्यासी यांना सुद्धां त्यांचा पिंड सोडतां येत नाहीं. मग तीन दगड मांडून बसलेल्या संसाऱ्याची गोष्टच बोलायला नको. धडपणें जगायचें म्हणजे निर्वाहा-पुरते अन्न, लज्जारक्षणापुरतें वस्त्र व झोंपण्याकरितां झोपडी एवढें

साहित्य पाहिजेच. पण तें जेवढ्यास तेवढेंच मिळवून आयुष्य कंठण्यांत माणुसकी कोणती ? जो गृहस्थाश्रम सर्वांचा पोशिंदा त्यांत पडल्यावर कुत्र्यामांजराच्या जिण्यानें जगायचें !–तरुणाला तरी ही गोष्ट लांच्छनास्पद आहे. माझ्या वाडवडिलांपेक्षां मी वरच्या स्थितींत जाईन अशी महत्त्वाकांक्षा–तो पुरुष म्हणवीत असेल तर–त्यानें धरली पाहिजे. ती आचरणांत आणण्यास झटलें पाहिजे.

मूठभर डाळेचुरमुऱ्यांनीं उदरनिर्वाह होऊं शकतो. लंगोटीनें लज्जारक्षण होतें. आश्रयार्थ झाडाखालीं पडता येतें. म्हणून काय संसारी तरुणानें एवढ्यांतच धन्यता मानायची ? केव्हांही नाहीं. पुढें–पुढें–आहे त्यापेक्षां चांगलें. हा त्याचा मंत्र असला पाहिजे.

चारी बाजूंनीं ध्वनी येण्याचा संभव आहे कीं, "काय हो ! झगडूनही यश न आलें तर ? श्रीमंती, सुख, मान, सत्ता काय कोणाला नको आहे ? जगांत इतकी धडपड चालू आहे ती काय आळसामुळें ! पण यश कितीजणांना आहे !"–याला उत्तर असें कीं, ज्यांना यश मिळत नाहीं, त्यांच्या प्रयत्नांत कोठें तरी चूक होत असली पाहिजे. हातपाय उगीच हलविणें व कार्याकरितां हलविणें यांत महदंतर आहे. दैव काय करील कोण जाणें अशा शंकेनें व निरुपाय म्हणून झगडणें व यश मिळालेंच पाहिजे या श्रद्धेनें प्रयत्नपूर्वक झगडणें यांतही अंतर आहे. पहिल्या प्रकारानें खटपट करणारा जेथल्या तेथें राहील पण दुसऱ्याची प्रगति झालीच पाहिजे. एका जागेंत रिंगण धरून काशीला जाण्याची इच्छा धरणाऱ्यानें सारखी धांवपळ चालू ठेवली तरी तिचा काय उपयोग ? त्याऐवजीं अगदीं मंदगतीनें चालणाराहि काशीची दिशा धरून पावलें टाकूं लागला

लेलीं आढळतात किंवा नामशेष होतात, याचें मुख्य कारण त्यांच्या घरांत नकळत शिरलेला आळस. श्रीमंतीच्या सावलींत बसून रिकामा काळ घालवितांना हळूच बिऱ्हाडास येणारा आळस इतका निरुपद्रवी भासतो कीं, शहाण्याच्या बुद्धीलाहि भ्रम पडावा. Laziness grows on people; it begins in cobwebs and ends in iron chains. आळस माणसांच्या अंगीं हळू हळू वाढतो. सुरुवातीला तो कोळ्याच्या जाळ्याप्रमाणें सूक्ष्म तंतूमय असतो परंतु शेवटीं त्याचे लोखंडी लंगर बनतात. प्रत्येक तरुणानें याविषयीं फार सावध असावें.

आळस श्रीमंताला दरिद्री करणारा व दरिद्र्यांना जिवंतपणीं नरक दाखविणारा आहे. त्याच्यायोगें कार्योत्साह झिजणीला लागतो आणि उत्कर्ष मरतो. शिवाय तो एकटा कधींच येत नाहीं. सहकुटुंब सहपरिवारें येऊन कार्यसिद्धी करतो. अल्पसंतोष हा त्याचा छोटाभाई तर घामटपणा बडाभाई आहे. अतिझोप व निराशा या त्याच्या लाडक्या बहिणी असून चिंता पत्नी आहे. अर्थात् असलें कुटुंब आपल्या घरीं बिऱ्हाडाला ठेवणें किती अनर्थावह आहे याचा विचार ज्याचा त्यानें करावा. गृहसौख्याविषयीं उत्कंठ असलेल्या संसारी मनुष्यानें याची ओळख करून घेऊं नये. इतकेंच नव्हे तर जेथें त्याची वस्ती आढळेल, तो भाग प्लेगच्या दूषित हवेप्रमाणें वर्ज्य मानावा. असो.

जगांत मनुष्याच्या मुख्य गरजा तीन आहेत. अन्न–वस्त्र–घर. राखेंत बुडलेला गोसावी किंवा काविनें रंगलेला संन्यासी यांना सुद्धां त्यांचा पिंड सोडतां येत नाहीं. मग तीन दगड मांडून बसलेल्या संसाऱ्याची गोष्टच बोलायला नको. धडपणें जगायचें म्हणजे निर्वाहा-पुरतें अन्न, लज्जारक्षणापुरतें वस्त्र व झोंपण्याकरितां झोपडी एवढें

साहित्य पाहिजेच. पण तें जेवढ्यास तेवढेंच मिळवून आयुष्य कंठण्यांत माणुसकी कोणती? जो गृहस्थाश्रम सर्वांचा पोशिंदा त्यांत पडल्यावर कुत्र्यामांजराच्या जिण्यानें जगायचें!—तरुणाला तरी ही गोष्ट लांच्छनास्पद आहे. माझ्या वाडवडिलापेक्षां मी वरच्या स्थितींत जाईन अशी महत्त्वाकांक्षा—तो पुरुष म्हणवीत असेल तर—त्यानें धरली पाहिजे. ती आचरणांत आणण्यास झटलें पाहिजे.

मूठभर डाळेचुरमुऱ्यांनीं उदरनिर्वाह होऊं शकतो. लंगोटीनें लज्जारक्षण होतें. आश्रयार्थ झाडाखालीं पडता येतें. म्हणून काय संसारी तरुणानें एवढ्यांतच धन्यता मानायची? केव्हांही नाहीं. पुढें—पुढें—आहे त्यापेक्षां चांगलें. हा त्याचा मंत्र असला पाहिजे.

चारी बाजूंनीं ध्वनी येण्याचा संभव आहे कीं, "काय हो! झगडूनही यश न आलें तर? श्रीमंती, सुख, मान, सत्ता काय कोणाला नको आहे? जगांत इतकी धडपड चालू आहे ती काय आळसामुळें! पण यश कितीजणांना आहे!"—याला उत्तर असें कीं, ज्यांना यश मिळत नाहीं, त्यांच्या प्रयत्नांत कोठें तरी चूक होत असली पाहिजे. हातपाय उगीच हलविणें व कार्याकरितां हलविणें यांत महदंतर आहे. दैव काय करील कोण जाणें अशा शंकेनें व निरुपाय म्हणून झगडणें व यश मिळालेंच पाहिजे या श्रद्धेनें प्रयत्न पूर्वक झगडणें यांतही अंतर आहे. पहिल्या प्रकारानें खटपट करणारा जेथल्या तेथें राहील पण दुसऱ्याची प्रगति झालीच पाहिजे. एका जागेंत रंगण धरून काशीला जाण्याची इच्छा धरणाऱ्यानें सारखी धांवपळ चालू ठेवली तरी तिचा काय उपयोग? त्याऐवजीं अगदीं मंदगतीनें चालणाराहि काशीची दिशा धरून पावलें टाकूं लागला

तर कांहीं काळानें आपल्या अपेक्षित स्थानीं जाऊन पोंचल्यावाचून राहणार नाहीं. ऐहिक वैभव मिळवू पाहणाऱ्या पुरुषानें हेंच धोरण ठेवलें पाहिजे.

दुसरी गोष्ट. निरलस व प्रयत्नवादी मनुष्य फार श्रीमंत होणार नाहीं कदाचित. परंतु तो दारिद्र्यांत तरी खास खितपणार नाहीं. ही अनुभवाची गोष्ट आहे. बरें इतकेंही करून त्याच्या दारिद्र्यानें त्यास नाहीं सोडलें (हें खरें नाहींच. उगीच गृहीत धरावयाचें) तरी फारसें बिघडत नाहीं. सुखाचीं तीन मोठीं साधनें त्यास प्राप्त होतातच होतात. तीं म्हणजे कडकडीत भूक. उत्कृष्ट अन्नपचन आणि शांत झोप. हें पारितोषक काय थोडें आहे ? या तीन साधनामुळेंच लाभणारें आरोग्य, उत्साह आणि आनंद कोण हिरावून घेऊं शकेल ?—तेंच आळशी माणसाचें चित्र पहा. निरुद्योगीपणामुळें जडलेलें अग्निमांद्य त्यामुळें वाटणारा निरुत्साह, त्याचे पोटीं निर्माण झालेला घामटपणा, त्याच्यामुळें निर्लज्जपणा—शी ! शी ! त्या विटंबनेला पारावार नाहीं !

म्हणून आळस टाका. ऐहिक वैभव मिळविण्याकरितां पराकाष्टा करा. वैभवसंपन्न व्हा ! तुमच्याकरितांच नव्हे, तर संसारसागर तरून जाण्याकरितां जिचा कर तुम्ही धरला आहे, तिच्याकरितां तुम्हाला पुरुषकर्तव्य पार पाडलें पाहिजे. आहे त्या स्थितींत खितपत पडणाऱ्या पुरुषाला पत्नीलाभ होईल परंतु तिच्या प्रेमाचा लाभ क्वचितच मिळेल. विवाहबंधनानें अजागळ पुरुषाशीं जखडून टाकलेली ललना पतिव्रताधर्म मुकाट्यानें पाळते याचा अर्थ तिचा निरुपाय असतो म्हणून. गळ्याला झालेलें आवाळू कापून काढता येत नाहीं हें समजल्यावर

माणुस काय करते ? गप्पच बसतें ना ?—का त्यास भूषण मानतें ? हिंदु पतिव्रतेची स्थिति तशी आहे.

स्त्रीजातीला तुच्छ लेखून स्वपत्नीला बटीक समजणाऱ्या नरपुंगवाच्या मुद्रेवर हसू झळकणार, हें मी जाणून आहे. पुरुषानें पत्नीच्या प्रेमाप्रीत्यर्थ पराक्रम करायचा ? धिक् ! धिक् !! तयाचें जिणें !- टाळी महाराज !!!

---

यच्चयावत् स्त्रियांना कस्पटाप्रमाणें मानून आपल्या गृहराज्ञीकडे क्षुद्रदृष्टीनें पाहण्याची निंद्य खोड आमच्या समाजांत किती बोकाळली आहे. आमच्या धर्मानें—

**अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ।**
**भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥**

स्त्री हें पुरुषाचें अर्धं अंगच होय. स्त्री हाच पुरुषाचा सर्वोत्तम मित्र होय. तीनही पुरुषार्थांचें मूळ स्त्रीच आहे. संसार तरून जाण्याची इच्छा करणाऱ्याचें मुख्य साधन स्त्रीच आहे. अशी घोषणा करावी आणि आम्ही मात्र रूढीच्या गळचेपीखालीं नादान बनून 'स्त्रीजात हरामखोर' असें मानावें व तसें वागावें, किती लाजिरवाणी गोष्ट आहे ! आपला जन्म कोठून याचेहि भान आम्हाला राहूं नये ? अरेरे !

स्वातंत्र्याकरितां बद्धपरिकर झालेल्या व स्वराज्याविषयीं आतुर असलेल्या नवजवानांनीं या निंद्य सामाजिक अन्यायाला आळा घातला पाहिजे. स्त्रियांची अवहेलना म्हणजे स्वतःचीच विटंबना. तिनें कोणाचेच कल्याण नाहीं व संसार सौख्याचा माल होम. काय ही आग अशीच राहूं द्यावयाची ?—मग आमचें कल्याण कसें होईल ?

संसारांत स्त्रियांची योग्यता किती श्रेष्ठतम आहे, याविषयीं मनूची साक्ष पहाः—

"स्त्रिया संततिदायक, अनेक कल्याणप्रद गुणांनीं युक्त, सत्कार करण्यास पात्र, लक्ष्मीप्रमाणें गृहास शोभा देणाऱ्या, मुलाबाळांचें संवर्धन व रक्षण करणाऱ्या, आलेगेले व इष्टमित्र यांची बरदास्त राखणाऱ्या, सेवासुख देणाऱ्या, आणि वंशवृध्दि व धर्मकार्यें करण्यास सहाय्यभूत होऊन पितरांसहवर्तमान सर्व कुलास स्वर्गप्राप्ति करून देणाऱ्या अशा अत्यंत उपकारक आहेत. यास्तव **पुरुषांनी त्यांचा सन्मान राखणें व त्यांवर प्रेम करणें ही गोष्ट मेहेरबानीची नव्हे. तर तें त्यांचे महत्त्वाचें कर्तव्य आहे.** दारापरिग्रहानें मनुष्य क्रियावान्, गृहस्थाश्रमी, आनंदी व भाग्यवान् होतो."

आतांपर्यंत या सर्व सदुपदेशाकडे दुर्लक्ष करून आम्ही आमच्या स्त्रियांना गुलामाप्रमाणें वागविलें व स्वतःही नीचाहून नीच झालो. यांतून उध्दार व्हावा असें वाटत असल्यास आपल्या घरांतील ही गुलामगिरी आधी नष्ट झाली पाहिजे.

स्त्रियांना तुच्छ लेखतांना आम्ही मनुष्यस्वभावाचें साधें ज्ञानही विसरलों याचें नवल वाटतें. दुसऱ्याकरितां काटे पसरून ठेवल्यावर आम्हाला फुलांचा लाभ कसा होणार ? स्त्रीलाही सुखदुःख मानापमान याची चाड आहेच. पातिव्रत्याच्या नावानें तिची कितीही मुस्कटदाबी केली तरी तिचा आत्मा तळमळल्यावर ती शाप दिल्यावांचून कशी राहील?—गृहसौख्याचा शोध घेऊ पाहणाऱ्या युवकांनो, साध्या माणुसकीला स्मरून तरी स्त्रियांची योग्यता ओळखा आणि त्यांना योग्य तो मान द्या.

तुमची पत्नी कशी असावी ? असा प्रश्न केला तर तुम्ही सुगृहिणीचें एक सुंदर शब्दचित्र रेखाटाल आणि अशा धर्तीच्या स्त्रीचें प्रेम—जें कादंबऱ्यांतून वाचलेलें व नाटकांतून पाहिलेलें असतें—आपल्यावर असावें असें इच्छाल. मग असा मोबदला होण्यास तुम्ही उलटपक्षी उत्कृष्ट पुरुष असावयास नको काय ? राकेलची किंमत देऊन गुलाबी अत्तर मिळेल ? शिव्या दिल्यावर ओव्या ऐकण्यास मिळतील ? चिखल उडवून स्वच्छता लाभेल ?—थोडा विचार करून पहा.

**हंसतमुख पुरुष स्त्रीला जितका चटकन् आवडतो, तितका सुतकी चेहऱ्याचा आवडत नाहीं. पराक्रमी पुरुषाला स्त्रिया तेव्हांच भाळतात, यांतील रहस्यहि काय असावें बरें?**

**आपली पत्नी आपल्यावर मनोभावानें प्रसन्न असली पाहिजे, असें वाटणाऱ्या पुरुषानें आपल्या परिस्थित्यनुरूप पराक्रमी, उत्साही, हंसतमुख असलेंच पाहिजे.** केवळ नवरेपणाच्या हक्कावर त्यास तिचें मन जिंकता येणार नाहीं. लोकलज्जेस्तव, धर्मबंधनाकरितां, निरुपायानें स्त्रीनें आपल्या पतीला देव मानणें निराळें आणि मनोभावानें त्याच्यावर अनुरक्त होऊन त्यास आपला देव मानणें निराळें. पहिलें बंधन केव्हां तुटेल याचा नियम नाहीं, तर दुसरें मृत्यूहि तोडूं शकत नाहीं.

पुरुषानें प्रथमपासून दक्षता बाळगिली तर त्यास उच्च प्रेमबंधन निर्माण करितां येतें आणि स्वर्गसुखाच्या तोडीचें गृहसौख्य भोगतां येतें, यांत तिळमात्र शंका नाहीं. 'सदा शृंगार भूषणें कांता लवे बहूमानें ।' हें वचन तुकोबांचें असलें, तरी तें सर्वांशीं खरें नाहीं. विवाहाच्या मंगल मंत्रांनीं पवित्र झालेल्या वातावरणांत अग्नि,

द्विज व गुरुजन यांचेसमोर सर्वांच्या आशिर्वादासह आम्ही आपल्या गृहलक्ष्मीचे पाणिग्रहण करितों, तें काय केवळ तिला पगारावर नजर ठेवणाऱ्या सेवकाप्रमाणें समजण्याकरितां ?—खास नाहीं. दागिन्यांनीं मढविल्याखेरीज पत्नीचें प्रेम लाभणें शक्य नाहीं, असें मानण्यांत स्त्रीजातीचा अपमान असून स्वतःची फसवणूक आहे.

" यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः " या लोकप्रसिध्द मनुवचनाला स्मरून जो पुरुष आपल्या पत्नीला सन्मित्र समजेल, तिच्या सुखाकरितां झटेल, तिच्या संरक्षणाची चिन्ता वाहील, तिच्या लहानमोठ्या इच्छा यथाशक्ति पुरवून तिला आनंदी ठेवील, ती त्याचें-करितां आपल्या हृदयाच्या तबकांत पंचप्राणांची आरती घेऊन सदैव तत्पर राहील, यांत शंकाच नाहीं. गृहसौख्याची इच्छा धरणाऱ्या तरुणानें हें महद्भाग्य प्रयत्नेंकरून मिळवावें. असो.

वर सांगितलेल्या गोष्टी सुलभतेनें घडून येण्यास द्रव्योपार्जन हा जसा एक उत्कृष्ट उपाय आहे तसाच पत्नीला आपल्या मनाप्रमाणें तयार करून घेणें हाही आहे. पहिल्याइतकेंच याचेंही महत्त्व आहे. एक आचरून दुसऱ्याकडे दुर्लक्ष होईल तर गृहसौख्याचें मनोवांच्छित अर्धवट राहील. म्हणून आतां या नव्या विषयाकडे वळलें पाहिजे.

आंग्लविद्याविभूषित तरुणापुढें वैवाहिक जीवन हें एखाद्या बिकट कोड्याप्रमाणें होऊन बसलें आहे. त्यांतून त्याच्या बुद्धिवर नाटकें-काव्यें व कादंबऱ्या यांच्या वाचनाचा परिणाम झालेला असावा. मग तर विचारावयासच नको. हा स्वतः आदर्शपुरुष कोठवर असतो, हें त्याचें त्यासच माहीत पण त्यास आपल्याला आदर्शपत्नी लाभावी व आपलें जीवन काव्यमय व्हावें असें मात्र वाटत असतें.

आतां इतक्या तरुणांना पुरतील अशा आदर्श तरुणी आणावयाच्या कोठून? उत्कृष्ट तेवढें दुर्मिळ असावयाचें हा जणूंकाय सृष्टीचा नियमच. मग जें सहजीं लाभण्यासारखें नाहीं तें प्रयत्नानें मिळवून घ्यावयास नको काय? म्हणून कोणाहि तरुणानें कांहींतरी भ्रमांत राहून आकाशाला गवसणी घालण्यापेक्षां व ती घातली जात नाहीं म्हणून दुःखी होण्यापेक्षां आहे त्या परिस्थितीवर मात करावी हेंच योग्य. पत्नीला आपल्या मनासारखी तयार करून घेणें याचा अर्थच हा कीं, आपल्या परिस्थितीप्रमाणें जी नोवरी आपल्यास मिळेल तिलाच घडवून घ्यावयाची.

सुदैवानें ज्यांना विद्याविभूषित, गृहकार्यकुशल व सुंदर पत्नी लाभली असेल, त्यांना काय हिऱ्याची खाणच सांपडली म्हणायची; पण ज्यांना सर्वसाधारण योग्य अशा वधु लाभतात, त्यांनीं खंत मानण्याचें कारण नाहीं. प्रयत्न केल्यास त्यांनाहि भाग्यवान होता येईल.

मुळांत स्त्रिया सोन्याच्या चिपा आहेत. त्यांचे अलंकार आपल्या इच्छेनुरूप घडवणें केवळ आपल्या स्वाधीनचें आहे. एखा-द्याला दगड लागेल. पण त्यानेंही एकदम निराश होऊं नये. कदाचित् तो उत्कृष्ट संगमरवर असेल. टाकी लावून पाहावी. हें सांगायला सोपें व करण्यास कठिण आहे खरें; पण मग दुसरा उपाय काय? जन्माची निराशा भोगण्यापेक्षां प्रारंभीच काय श्रम पडतील ते पडतील.

मूर्ख व अजागळ आईबापांच्या पोटीं आलेल्या व त्यांच्याच गचाळ शिक्षणाखालीं वाढलेल्या मुली आपण बाजूला काढूं. त्यांच्या करितां तसे धटिंगण नवरे आहेतच; पण साधारणपणें सर्व कुलीन

घराण्यांतील मुली सुगृहिणी होण्यास पात्र असतात, असें आम्हास वाटतें. आमच्या समाजाची रचना, कुटुंबशिक्षणाची पध्दत आणि पतिव्रताधर्माची चालत आलेली परंपरा यामुळें आमच्या मुलींना गृहिणीत्वाचे कांहीं धडे विवाहाआधी मिळालेले असतातच. त्यांत त्यांच्या मस्तकावर विवाहाच्या अक्षता पडतांच काय चमत्कार होतो कोण जाणे पण पतिविषयीं आदर व प्रेम याचें बीजारोपण पहिल्याच दृष्टभेटीला होतें म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. नवविवाहित तरुणमुली स्वपतीच्या इच्छेनुरूप वागण्यास पहिल्या दिवसापासून तयार असतात. ही त्यांची मनोभूमिका आदर्श संसाराचें शिक्षण देण्यास योग्य नाहीं असें कोण म्हणेल ?

माझ्या सर्व नवविवाहित तरुण वाचकांना असें सांगणें आहे कीं, त्यांनीं आपल्या पत्नीची कसोटी लागोलाग ठरवूं नये. आपल्या इच्छे-प्रमाणें शिक्षण देऊन तिला मनोनुकूल करून घ्यावी. तिची मनो-भूमिका तुम्ही द्याल तें शिक्षण ग्रहण करण्यास तयार आहे असें बेलाशक समजा व प्रयत्नास लागा.

बहुतेकांना हें म्हणणें पटेल असें वाटतें. कित्येक तसा प्रयत्नही करीत असतील. परंतु यावेळीं काय करावें व कसें वागावें याचा उलगडा त्यांना नीट न झाल्यामुळें त्यांची फसगत होत असेल. तसें होऊं नये म्हणून पत्नीच्या शिक्षणाचा हा खाजगी क्रम कसा असावा हें थोडक्यांत पाहूं.

आतां याविषयीं प्रथमतः तुम्ही कसें वागलें पाहिजे हें सांगतो. जसा गुरु तसा शिष्य हें तत्व विसरूं नका. अर्थात् जें तुमच्या पत्नीनें आचरावें, असें तुम्हाला वाटतें तें तुम्ही अगोदर अमलांत आणा व

मग तिला सांगा. किंबहुना मग सांगण्याचें कारणच पडणार नाही. पत्नीला सहधर्मिणी म्हणतात. ती आपोआपच तुमच्या कलाप्रमाणें वागूं लागेल. त्याविषयीं चिंता करण्याचें कारण पडणार नाही.

तुमच्या अंगीं पहिला गुण आत्मसंयमनाचा पाहिजे. तुम्ही संन्यस्त वृत्तीनें राहा असें आमचें सांगणें नाही. तुमचें तरुणवय आहे. तेव्हां योग्य ते इंद्रियाचे भोग योग्य प्रमाणांत तुम्ही भोगलेच पाहिजेत. पण त्यांतही नियमबद्धता व निग्रहशक्ति पाहिजे. तारुण्याच्या पहिल्या धडाडीत हें मोठें कठिण कर्म आहे यांत शंका नाही. पण तें आपल्या व पत्नीच्या भावी कल्याणाकरितां शक्य तों आचरणांत आणिलेंच पाहिजे.

या एका बाबीविषयीं पहिल्यांदाच काळजी घेतली म्हणजे पुढच्या सर्व गोष्टी फार सोप्या आहेत.

मनुष्याचें शिक्षण अनेक मार्गांनीं सतत चालू असतें. तो डोळ्यांनीं पाहतो, कानांनीं ऐकतो, तोंडानें खातो, शरीरानें स्पर्श करितो किंवा नाकानें वास घेतो त्या त्या वेळीं त्याचें शिक्षण चालू असतें. म्हणून डोळ्यांनीं चांगल्या वस्तु पाहाव्या, कानांनीं चांगल्या गोष्टी ऐकाव्या, तोंडानें चांगल्याच गोष्टी बोलाव्या असा निर्बंध आहे. मुलांच्या तोंडांत शिव्या का बसतात, आईबापांची वाणी दुष्ट असते म्हणून !-- मुलें वाईट खोडी का आचरतात, त्या तीं पाहतात म्हणून. सर्व माणसें शिक्षण घेण्यांत मुलाप्रमाणें आहेत. एकमेकाचें अनुकरण करण्याकडे त्यांची वृत्ति असते.

मात्र हें शिक्षण त्यांच्यावर बळजबरीनें लादून इष्टसिद्धी होत नाही. अतिराग, अतिलोभ, अतिशिस्त—कोणतेंहि अति माती करतें.

घराण्यांतील मुली सुगृहिणी होण्यास पात्र असतात, असें आम्हास वाटतें. आमच्या समाजाची रचना, कुटुंबशिक्षणाची पध्दत आणि पतिव्रताधर्माची चालत आलेली परंपरा यामुळें आमच्या मुलींना गृहिणीत्वाचे कांहीं धडे विवाहाआधीं मिळालेले असतातच. त्यांत त्यांच्या मस्तकावर विवाहाच्या अक्षता पडतांच काय चमत्कार होतो कोण जाणे पण पतिविषयीं आदर व प्रेम याचें बीजारोपण पहिल्याच दृष्टभेटीला होतें म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाहीं. नवविवाहित तरुणमुली स्वपतीच्या इच्छेनुरूप वागण्यास पहिल्या दिवसापासून तयार असतात. ही त्यांची मनोभूमिका आदर्श संसाराचें शिक्षण देण्यास योग्य नाहीं असें कोण म्हणेल ?

माझ्या सर्व नवविवाहित तरुण वाचकांना असें सांगणें आहे कीं, त्यांनीं आपल्या पत्नीची कसोटी लागोलाग ठरवूं नये. आपल्या इच्छेप्रमाणें शिक्षण देऊन तिला मनोनुकूल करून घ्यावी. तिची मनोभूमिका तुम्ही द्याल तें शिक्षण ग्रहण करण्यास तयार आहे असें बेलाशक समजा व प्रयत्नास लागा.

बहुतेकांना हें म्हणणें पटेल असें वाटतें. कित्येक तसा प्रयत्नही करीत असतील. परंतु यावेळीं काय करावें व कसें वागावें याचा उलगडा त्यांना नीट न झाल्यामुळें त्यांची फसगत होत असेल. तसें होऊं नये म्हणून पत्नीच्या शिक्षणाचा हा खाजगी क्रम कसा असावा हें थोडक्यांत पाहूं.

आतां याविषयीं प्रथमत: तुम्ही कसें वागलें पाहिजे हें सांगतो. जसा गुरु तसा शिष्य हें तत्व विसरूं नका. अर्थात् जें तुमच्या पत्नीनें आचरावें, असें तुम्हाला वाटतें तें तुम्ही अगोदर अमलांत आणा व

मग तिला सांगा. किंबहुना मग सांगण्याचें कारणच पडणार नाही. पत्नीला सहधर्मिणी म्हणतात. ती आपोआपच तुमच्या कलाप्रमाणें वागूं लागेल. त्याविषयीं चिंता करण्याचें कारण पडणार नाही.

तुमच्या अंगीं पहिला गुण आत्मसंयमनाचा पाहिजे. तुम्ही संन्यस्त वृत्तीनें राहा असें आमचें सांगणें नाही. तुमचें तरुणवय आहे. तेव्हां योग्य ते इंद्रियाचे भोग योग्य प्रमाणांत तुम्ही भोगलेच पाहिजेत. पण त्यांतही नियमबद्धता व निग्रहशक्ति पाहिजे. तारुण्याच्या पहिल्या घडाडीत हें मोठें कठिण कर्म आहे यांत शंका नाही. पण तें आपल्या व पत्नीच्या भावी कल्याणाकरितां शक्य तों आचरणांत आणिलेंच पाहिजे.

या एका बाबीविषयीं आपल्याकडून काळजी घेतली म्हणजे पुढच्या सर्व गोष्टी फार सोप्या आहेत.

मनुष्याचें शिक्षण अनेक मार्गांनीं सतत चालू असतें. तो डोळ्यांनीं पाहतो, कानांनीं ऐकतो, तोंडानें खातो, शरीरानें स्पर्श करितो किंवा नाकानें वास घेतो त्या त्या वेळीं त्याचें शिक्षण चालू असतें. म्हणून डोळ्यांनीं चांगल्या वस्तु पाहाव्या, कानांनीं चांगल्या गोष्टी ऐकाव्या, तोंडानें चांगल्याच गोष्टी बोलाव्या असा निर्बंध आहे. मुलांच्या तोंडांत शिव्या का बसतात, आईबापांची वाणी दुष्ट असते म्हणून !-- मुलें वाईट खोडी का आचरतात, त्या तीं पाहतात म्हणून. सर्व माणसें शिक्षण घेण्यांत मुलाप्रमाणें आहेत. एकमेकाचें अनुकरण करण्याकडे त्यांची वृत्ति असते.

मात्र हें शिक्षण त्यांच्यावर बळजबरीनें लादून इष्टसिद्धी होत नाही. अतिराग, अतिलोभ, अतिशिस्त–कोणतेंहि अति माती करतें.

म्हणून तुम्हाला आपल्या अर्धांगीला शिक्षण देतांना या गोष्टीला जपलें पाहिजे.

फार नियम करून द्याल, अभ्यासक्रमाचा बोजा घालाल, सतत उपदेशाची टकळी चालू ठेवाल, अशक्य ध्येय डोळ्यापुढें धराल तर तुमचा हेतु थोडाही तडीला जाणार नाही, हें लक्षांत ठेवा. मनुष्य न कळत शहाणा होऊं शकतो. आपल्या मागें कांहीं नियम आहेत याची त्यास जाणीव नसतांना तो ते आनंदानें व बिनपरिश्रमानें पाळतो.

सुगृहिणी पतीचें कल्याण करते, स्वतः सुखी होते, कुलाचें नांव वाढवितें, समाजांत वंद्य ठरते आणि इहपरलोकीं धन्य होते, याची जाणीव तुमच्या पत्नीला तीव्रतेनें द्याल तर तें ध्येय स्त्रीच्या हृदयांत खोल रुजून ती तें पूर्णतेला नेण्यास झटेल.

सुगृहिणीच्या योग्यतेचें महत्त्व बायकांना पटवून द्यायला मोठें व्याख्यान दिलें पाहिजे किंवा कांहीं नियम ठरवून त्यांच्याकडून ते पाठ करून घेतले पाहिजेत, असें मुळींच नाहीं. हंसत, खेळत, विनोद करीत ही गोष्ट समजाऊन देतां येईल आणि अशी ती समजावली तरच ती लवकर पटेल.

याविषयीं आपण आर्यलोक अत्यंत भाग्यवान आहों. परमवंद्य अशा श्रीरामचंद्राचे आणि परमपूज्य सीतामाईचें चरित्र प्रत्येक पुरुष स्त्रीनें वाचावें, अभ्यासावें, त्याचा ध्यास घ्यावा, तसें आचरण करावे, असें आहे.

याकरितां प्रथमतः तुम्ही आपल्या पत्नीस सीताचरित्राचें महत्व समजाऊन द्या. संवादरूपानें गोष्ट सांगत, सीता इतकी पूज्य

कां ठरली याचीं कारणें तुमच्या पत्नीकडूनच काढून घ्या. तिचें पतिप्रेम, कुलाभिमान, पतिकरितां राजसुखांतून वनवासाला जाण्याची तिची उत्कंठा, रावणाच्या गृहीं गेली असतांना तेथें तिनें दाखविलेलें धैर्य आणि पतिनिष्ठा या तिच्या गुणांचें संकीर्तन तुम्ही आपल्या पत्नीपुढें असें केले पाहिजे कीं, तें ऐकून तिनें खरोखरच रममाण व्हावें.

अलीकडे बहुतेक मुलींना थोडेंतरी लिहिणें वाचणें येत असतें. तसें तुमच्या पत्नीलाहि येत असेलच. तें वाढवा. चांगल्या स्वरांत, न अडखळता, ठसकेदार, कमीजास्त जोर देऊन वाचण्यास शिकवा, प्रत्यहि कांहींतरी मोठ्यांदा वाचून घ्या. इकडचे तिकडचे कांहीं वाचण्यापेक्षां एखादें स्त्रियोपयोगी पुस्तक रोज कांहीं पानें वाचून घ्यावें. आपल्या जुन्या पोथ्यासुध्दां चालतील.

याच वाचनाबरोबर कांहींतरी लेखन असावें. सदा लिहिण्याचा व्यासंग असला म्हणजे अक्षराला वळण लागते. मधून मधून दुधाचे हिशेब किंवा घरगुति जमाखर्च समजाऊन द्यावा. आणि पुढें पुढें तो वेडावाकडा का होईना तिच्याचकडून लिहून घ्यावा.

अर्थात हें काम कंटाळवाणें होऊं नये म्हणून चांगल्या कादंबऱ्या वाचण्याचा नाद लावावा. हा मुद्दाम लावावा लागत नाहीं. उसळत्या तारुण्यांत कल्पनाशक्ति मोठी तीव्र असते. जगाची दुःखमय बाजू समजावयाची असते. म्हणून बहुतेक सर्वांना कादंबरीवाचनाचा नाद पूर्ववयांतच लागतो. त्याचा फायदा घ्यावा. कादंबऱ्यांची निवड योग्य असली म्हणजे झालें.

कोणत्याहि कादबरीमध्यें कांहींतरी उपदेशसार निघतेंच. परंतु त्यांची निवड करतांना ज्यांच्या योगें मनोवृत्ति उच्छृंखल होतील, कर्त-

त्यांचा विसर पडेल, वेळेची किंमत समजणार नाहीं, व्यवहाराकडे दुर्लक्ष होईल आणि कल्पनासृष्टींत रमण्याची संवय जडेल असल्या कादंबऱ्या पाखडून दूर सारल्या पाहिजेत. चोऱ्या, खून, दरोडे, मारामाऱ्या, व्यभिचार, गुप्त कारस्थानें यांच्या वर्णनाचीं पुस्तकें वाचायला गोड वाटत असलीं तरी त्यामुळें वर सांगितल्याप्रमाणें मनाची नासाडी होते म्हणून अशीं पुस्तकें अगदीं टाळावीं.

या पुस्तकांना टाळावयाचें वेळीं खोटी जिज्ञासा जागृत न होईल याला जपले पाहिजे. अमूक पुस्तक तूं वाचूं नकोस, तें बायकांनीं वाचण्यासारखें नाहीं असें म्हटलें कीं, 'असे त्यांत काय आहे ?' ही जिज्ञासा जागृत होतें आणि ती कोणत्याहि आज्ञेला जुमानीत नाहीं.

यापेक्षां चांगली कादंबरी चांगली का ? हें समजाऊन द्यावें. उदाहरणार्थ, "दुःखाअंतीं सुख" ही कादंबरी घ्या. त्यांतील एकंदर कथानक व निरनिराळें प्रसंग, राधाबाईनें आपल्या मुलांच्या शिक्षणाविषयीं घेतलेली दक्षता, तिच्या मुलांची तिच्या ठिकाणची भक्ति इत्यादि गोष्टी अशा सुंदर आहेत कीं, त्यांचा चांगुलपणा चटकन पटलाच पाहिजे.

तात्पर्य, चांगल्या कादंबऱ्या समजून उमजून वाचून घेतल्या म्हणजे टाकाऊ कादंबऱ्या मनुष्यास आपोआपच रुचेनाशा होतात.

या कादंबऱ्यांचें वाचन चालू असतां तुम्ही आपल्या पत्नीला जसें सीताचरित्र समजाऊन दिलें तशा पद्धतीनें त्या त्या पुस्तकांत गुप्तरूपानें असणारें शिक्षण काढून घेण्यास शिकवावें. बहुतेक कादंबऱ्यांतील नायिका पतिवर प्रेम करणाऱ्या, संसारदक्ष, विनयी, मधुर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ★ दा. क्र. ४०२० ★

भाषिणी, दुःख सहन करण्यास तयार आणि पातिव्रत्यरक्षणार्थ प्राणावर उदार होण्यास तयार असल्याचें दाखविलेलें असतें. हाच सुगृहिणीचा आदर्श होय. तो आपल्या आजच्या संसारांत कसा उपयोगी करून घ्यावयाचा एवढें दाखवून दिलें म्हणजे झालें.

संसारांत लक्ष कसें ठेवावें, सुगृहिणीला पाकशास्त्राची उत्कृष्ट माहिती असणें कसें भूषणास्पद आहे, उधळमाधळ कां करूं नये, हात राखून खर्च करण्यास कसें शिकावें, आपल्या ऐपतीबाहेरचा खर्च कां व कसा टाळावा, उधारी–उसनवारी हानिकारक का आहे, खोटी श्रीमंती कां दाखवू नये, आपली गरीबी कां झाकून ठेवावी, स्वाभिमानी कां असावें, मित व मधुर भाषण कां करावें, शेजार-धर्म कसा ठेवावा, दुर्जन–संगतीपासून कसें दूर राहावें इत्यादि इत्यादि शील संवर्धनाच्या सर्व गोष्टी तुम्हाला चांगल्या कादंबऱ्या ( किंवा त्यासारख्या इतर पुस्तकावरून ) तुमच्या पत्नीस शिकवितां येतील आणि तीही पण हळूहळू शिकेल. पी हळद हो गोरी असला उतावीळपणा तुमच्या अंगी नसला पाहिजे.

आपण पुरुष काव्यें, नाटकें, कादंबऱ्या वाचून जसें मनोराज्य करूं शकतो; आपलें आयुष्य अद्‌भुतरम्य असावें, असें जसें पुरुषांना वाटतें, तसेंच तरुणीनाही वाटूं लागतें. त्याचा फायदा आपण घेऊन त्यांच्यामध्यें आपल्यास हवे ते गुण निर्माण करून घेतले पाहिजेत. नटणें, मुरडणें, सुंदर दिसण्याचा प्रयत्न करणें या गोष्टी तरुण मुली वाचनामुळें जास्त चांगल्या करूं शकतात. तसेंच आपला संसार, आपलें घर, आपला स्वयंपाक, आपलें ज्ञान, आपलें शिवणेंटिपणें इतर स्त्रियांहून चांगलें, वाहवा करण्यासारखें असावें याचाहि प्रयत्न त्या वाचनामुळें

विशेष उत्साहानें करतात. त्यांच्या बोलण्यांत नागरपणा येतो. उच्च दर्जाचा विनोद व श्रृंगार त्या उमजूं शकतात आणि त्यांचे वागणेंहि समंजस होत जातें.

कादंबरीवाचन बरेचसें झाल्यावर चांगल्या कवितांचें वाचन करून घेणें हिताचें आहे. चांगलीं गाणीं, चांगली पदें, चांगल्या कविता, त्यांना गाऊन वाचून दाखवाव्या आणि त्यांच्या तोंडीं त्या बसतील असें करावें.

काव्यवाचनानें हृदयाच्या कोमल वृत्ति जास्त तरतरीत होतात. प्रेमाचें सत्यस्वरूप कळूं लागतें आणि तें कसें द्यावें घ्यावें हें समजतें.

यानंतर सोपी चरित्रें, इतिहास व ऐतिहासिक कादंबऱ्या यांचेकडे वळावें. या बाबतींतहि आपण फार भाग्यवान आहों. श्री शिवाजी महाराजाचें चरित्र म्हणजे श्रीरामचरित्राइतकेंच रमणीय आहे. तरुण स्त्रियांना तें कादंबरी इतकें आवडेल.

यानंतर आपल्या देशाचा व थोडासा जगाचा भूगोल समजावून द्यावा. आपली राजकीय परिस्थिति कशी आहे, स्वराज्याचें महत्व काय ? स्वदेशीचा स्वीकार कां करावयाचा ? इत्यादि विषयांचें महत्त्व सांगून ठेवावें.तरुण स्त्रियांना बाहेरच्या जगाची व आपल्या देशस्थितीची कांहींच कल्पना नसल्यामुळें त्या चिनी मातीची भांडीं, मण्यार माल, लोकर, सुया व सूत यांची अगदी बेदरकारपणें खरेदी करीत असतात. मग आपण त्यांच्यापुढें कितीही कंठशोष केला तरी त्याचा उपयोग होत नाही. म्हणून त्यांचे त्यांनाच परदेशी मालाच्या खरेदीनें आपल्या राष्ट्राचा किती भयंकर नाश होतो हें कळलें पाहिजे

याकरितां केसरीसारख्या वर्तमानपत्राचें शारसें वाचन पाहिजे.

असलें वाचन वाचण्यास स्त्रिया पहिल्यापहिल्यांदा नाखुष असतात; पण त्याचें महत्त्व त्यांच्या मनावर बिंबवल्यास मग त्या केसरीचीहि उत्सुकतेनें वाट पाहतात. पुनः पुनः वाचन केल्यानें गीतारहस्यासारखा ग्रंथहि बायकांना कळूं लागतो.

पण अशाप्रकारें केवळ पुस्तकी ज्ञानावरच भिस्त ठेवूं नये. शक्य असल्यास मधून मधून थोडा प्रवास करावा आणि अवांतर अनेक गोष्टीविषयीं चर्चा करीत असावें. विशेषेंकरून सत्संगतीचें महत्त्व समजावून द्यावें आणि आपल्या शेजाऱ्यामध्यें कोणत्या बायका सुगृहिणी आहेत, याचा अदमास घेऊन त्यांची संगत धरण्यास सांगावें. चालू जग अतिशय कृत्रिम झालें आहे. खऱ्या खोट्याची निवड करणें मोठें कठिण होऊन बसलें आहे. म्हणून कुसंगतिपेक्षां एकलकोंडेपणा पुरवला अशी शिकवण द्यावी. भांडकुदळ, कर्कश बोलणारी, नानाप्रकारच्या उलाढाली करणारी, सदा बाहेर फिरणारी, चोरून खाणारी अशा स्त्रीपासून जपण्यास सांगावें. पहिल्यापहिल्यांदा तरुण मुलींना अशी चर्चा कळत नाहीं. पण त्यांना जर आपलें खरें खरें मित्र करून घेणें असेल तर त्यांच्यावर न रागावतां किंवा मूर्खत्वाचा आरोप न करतां त्यांची समजूत पाडीत गेलें पाहिजे. स्त्रिया स्वभावतःच भावनाप्रधान असल्यानें आणि अज्ञ आईबापांच्या शिकवणीनें त्यांच्या नानाप्रकारच्या वेडगळ समजुती असतात. त्या सर्व हळूंहळूं काढून टाकता येतात. फाजील विटाळ चांडाळ न मानणें, सोवळ्याचें स्तोम न माजवणें, आपल्यापेक्षां निराळ्या जातींना तुच्छ किंवा दूर ठेवण्यासारख्या न मानणें या गोष्टी बायकांना आतां शिकविल्याच पाहिजेत.

याशिवाय मधून मधून आपल्या बाळपणीच्या गोष्टी तिला सांगणें व आपण तिच्या ऐकणें, आपल्या कुलाचा इतिहास व कुलाचार सांगणें, तिचा समजून घेणें, आपले नातेवाईक, इष्टमित्र यांच्या ओळखी करून देणें इत्यादि गोष्टी अवश्य कराव्या.

त्याचप्रमाणें ज्या नामांकित स्त्रिया समाजकार्यें करीत आहेत, त्यांचीं चरित्रें सांगावी, फोटो दाखवावे आणि त्यांच्या कार्याचें महत्त्व समजाऊन द्यावें. माहिती मात्र बरोबर असावी.

एकाद्या प्रसिद्ध स्त्रीचें कार्य सांगितल्यावर बायका इटकून त्यांच्यामागें संसार आहे का ? त्यांना स्वयंपाक करतां येतो का ? त्यांना मुलेंबाळें किती आहेत, त्यांचें शिक्षण किती झालें आहे ? इत्यादि माहिती विचारतात. तेव्हां अशाच स्त्रियांचीं नांवें सांगावीत कीं, ज्यांनीं दोहींतही यश मिळविलें आहे.

चालू कालाची माहिती स्त्रियांना अवश्य पाहिजे. चुलीपुढें बसून ज्ञान दाखविण्याचे दिवस आतां राहिले नाहीत. गृहशास्त्राबरोबर बाह्य जगताचें ज्ञान त्यांना मिळालें पाहिजे. प्रसंगीं बाजारहाट करणें, पांच पन्नास मैलाचा प्रवास करणें झाल्यास न भितां एकट्यानें जाणें, पैशाचा व्यवहार समजणें, पतीच्या कामधंद्याची सामान्य माहिती असणें या व या दृष्टीनें इतर सुचतील त्या गोष्टी स्त्रियांना माहित असणें आवश्यक आहे. असो. आम्हाला वाटतें, याप्रमाणें रीतसर प्रयत्न झाल्यास अवघ्या दोन वर्षांत कोणतीही तरुणी सुगृहिणी होईल.

इथवर एका दृष्टीनें विचार झाला. आतां दुसऱ्या एका दृष्टीनें पत्नीशिक्षणाकडे पाहूं.

आपल्या पत्नीनें आपणास मानावें, तिच्यावर आपली छाप

असावी आणि तिचें पूर्ण प्रेम आपणांस मिळावें असें प्रत्येक तरुणास वाटतें. मनुष्यस्वभावास धरूनच ही इच्छा आहे; पण ती तडीस नेण्याचे मार्ग मात्र पुष्कळांचे चुकीचे असतात. भीतिग्रस्त मनुष्यास आपलेसें करतांना त्याच्यावर रागावणें, त्याच्या चुका डोळ्यांत तेल घालून पाहणें, सदा आपल्याच तोऱ्यांत असणें, कोणतीही गोष्ट त्यास नीट समजावून सांगणें इत्यादि चुका न करण्यास जपलें पाहिजे. रागाच्या शब्दांनीं भित्रा मनुष्य जास्त गांगरतो. याकरितां समंजसपणा पाहिजे. राग अगदीं कामाचा नाहीं असें नाहीं. राग येण्यासारख्या चुका पत्नीच्या हातून घडणें शक्य आहे व योग्य प्रसंगीं रागावलें पाहिजेहि. परंतु त्या रागावण्यास तारतम्य पाहिजे. अयोग्य रागानें मनाची मिळणी होण्यास जड जातें. याकरितां पत्नीस अनुरूप बनवितांना पतीनें कठोरतेपेक्षां कोमलतेचा व रागापेक्षां विनोदाचा उपयोग जास्त करावा. फाजील लाडानें बायको डोक्यावर बसते हें जितकें खरें आहे, तितकेंच तिच्याशीं कुऱ्यांत वागल्यानें ती मनांतून सदैव अप्रसन्न राहते, हेंही खरें आहे. तेव्हां या दोन्ही टोंकाला जपावें.

दुसऱ्यास वश करण्यांत गुणग्राहकता फार उपयोगीं पडते. पत्नीच्या अंगचे विशेष सद्गुण दृष्टीस पडतांच त्यांची योग्य शब्दांत वाखाणणी करण्यांत कांहींच गैर नाहीं. त्याप्रमाणें तिच्या किरकोळ इच्छा तात्काल पुरविण्याची तत्परता पतीनें दाखविली पाहिजे. आपल्या आवांक्यांत असलेली, सहजीं घडून येणारी आणि माणुसकीला योग्य असणारी पत्नीची कोणतीहि इच्छा तृप्त करण्यांस कसूर करूं नये. पतीच्या जीवावरच पत्नीच्या सर्व उड्या अवलंबून असतात. आपल्याविषयीं व आपल्या घराविषयीं तिच्या मनांत प्रेम निर्माण

होण्यास तिला आपलेपणाची जाणीव झाली पाहिजे. आपण गृहाच्या स्वामिनी आहोंत, योग्य तऱ्हेनें योजलेली कोणतीहि गोष्ट आपणांस सहज करतां येतें, ही कल्पना पत्नीच्या हृदयास पटल्यास आपली जबाबदारी ओळखण्यास ती तावडतोब शिकते.

पत्नीचें मन अशा युक्तीनें प्रथमपासूनच आपल्या आवडी-निवडींशीं समरस करून घेतल्यानें गृहसौख्याची वाण बहुशः पडत नाहीं.

या शिवाय आणखी कोणकोणत्या गोष्टींविषयीं पुरुषानें जपलें पाहिजे याचा थोडक्यांत विचार करून हें प्रकरण संपवूं.

पुरुषाचें अंगीं नियमितपणा व टापटीप पाहिजे. वेळचे वेळीं कामावरून घरीं न येणें, सुट्टीचे दिवशीं आपल्याकरितां पत्नीस जेवा-वयाचे बाबतींत ताटकळत ठेवणें, वाटेल त्यावेळीं पुष्कळशी मित्र-मंडळी आणून चहा उपहाराची तयारी करण्यास सांगणें, तिच्या विश्रांतीचे वेळीं आपलें कांहींतरी त्रासदायक काम काढणें, तिच्या प्रकृतिविषयीं बेफिकीर असणें, इत्यादि वर्तन पुरुषानें न करण्याची अत्यंत खबरदारी घ्यावी. पत्नीकडून दासीप्रमाणें सेवा घ्यावी, असें समजून तिला तशी वागविण्यांत शहाणपणा नाहीं व यामुळें प्रेमाची वाढ होणें शक्य नाहीं हें ध्यानात ठेवावें.

वेळेच्या नियमितपणाप्रमाणेंच पत्नीनें घरांत ठेवलेली स्वच्छता व टापटीप बिघडूं न देण्याविषयीं जपणें पुरुषाचें कर्तव्य आहे. स्त्रीपेक्षां पुरुष गैरशिस्त आहे हें खरें असलें तरी त्यानें पत्नीला कंटाळा येईपर्यंत घरांत अस्वच्छता करणें किंवा टापटीप नाहींशी करणें फारसें बरें नाहीं. टापटीप व स्वच्छता यांचेविषयीं वेळच्यावेळीं काळजी घेतल्यास कोणालाच फारसा त्रास पडत नाहीं.

पत्नी ही गृहाची मालकीण असली तरी ती पुरुषाची अनुगामिनी असते. पुरुष गदीपणानें वागूं लागल्यास अनुकरणप्रवृत्तीनें व कंटाळून पत्नीहि त्याचें अनुकरण करते. मग त्याच खोडी मुलाबाळांत पसरतात. याकरितां पुरुषानेंच याविषयीं जपलें पाहिजे.

कित्येक पुरुषांमध्यें स्त्रियांना वागविण्यांत आणखी एक विशेष दिसून येतो. ते सुधारक असतात, स्त्रीदाक्षिण्याचे ते मोठे चहाते असतात व स्त्रीस्वातंत्र्याच्याहि लंब्या लंब्या बाता ते मारतात; पण तेंच स्त्रीदाक्षिण्य किंवा स्वातंत्र्य त्यांना आपल्या घरांत दाखवितां येत नाहीं. आपलीं कांहीं लाडकीं व फार सुधारलेलीं मतें ते आपल्या पत्नीवर पहिल्या तडाक्याला लादूं बघतात थोडा विचार केला तर हा त्यांच्यावर जुलूमच होत नाहीं काय ?—स्त्रियांना समाजांत स्वतंत्र आस्तित्व आहे. त्यांना तें टिकवावयाचें असतें. त्यांच्यावर आपलीं मतें ( अति उत्तम असली तरी ) एकदम लादण्यास पुरुषांनीं कां प्रवृत्त व्हावें ? त्यांना शिकवून त्यांची समजूत काढून त्यांना तीं मतें खुशाल सांगावीं. पण तीं तूं अंमलांत आणलीच पाहिजेस असा जुलूम करणें केव्हांही गैरच होय असो.

गृहांतर्गत व्यवस्थेंत पुरुषानें फारसें लक्ष घालूं नये, हें बरें. कित्येकांना कारण नसतां या असल्या गोष्टींत मन घालून बायकांची मनें व्यथित करण्याची वाईट खोड असते. गृह हें गृहिणीचें राज्य आहे. तेथें तिचीच सत्ता चालली पाहिजे. तिच्यांत पतीनें उगीच ढवळाढवळ कां करावी ? हें असें का झालें, तसें का नको इत्यादि चौकशी करून पत्नीला पिसाळून सोडण्यांत पौरुष नाहीं. याचा अर्थ पुरुषानें आंतील व्यवस्थेविषयीं अगदीं तिऱ्हाइताप्रमाणें वागावें असा

नव्हे. तसें होईल तर प्रसंग पडल्यावर कावाकावीचा प्रश्न उद्भवेल. तो टाळण्याकरितां पुरुषानं तेथील वस्तुस्थितीचें सामान्य ज्ञान मिळवून ठेवलेलें असावें. म्हणजे अडचणीच्या प्रसंगीं पत्नीस साह्य करण्यास पुरुषास सोपें जातें. घरांत दुसरें स्त्रीमनुष्य नसल्यास व चार माणसें जास्त जमलीं असल्यास पत्नीच्या कांहीं कामांत तिला हातभार लावून तिचा कार्यभाग हलका करण्यांतहि पुरुषास कमीपणा वाटण्याचें कारण नाहीं. पत्नी संसारांतील उत्कृष्ट मित्र आहे. तिचे श्रम हलके करण्यांत वावगें काय आहे ?

आपल्या मित्रांप्रमाणें तिच्या मैत्रिणींचा उपसर्ग सहन करणें. आपण आपल्या हौसेबरोबर तिच्या हौशी पूर्ण करणें, नाटकें, सिनेमा यांसारख्या करमणुकीच्या साधनांत तिला आनंदानें भागीदार करणें, सुट्टीच्या दिवशीं कांहीं काळ तिच्याशींच हास्यविनोदांत घालविणें आणि सदैव तिला सन्मानानें वागविणें, या गोष्टी अत्यंत श्रेयस्कर आहेत. त्यामुळें गृहसौख्याची सहजीच वृद्धि होते.

**संतुष्टो भार्यया भर्ता भार्या भर्त्रा तथैव च।**
**यस्मिन्नेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥**

"भार्येमुळें भर्ता व भर्त्यामुळें भार्या जेथें संतुष्ट आहे, त्या कुलांत नेहमीं कल्याण निश्चयेंकरून असतें," ही मनुची उक्ति प्रत्येक गृहस्थाश्रमी पुरुषानें लक्षांत ठेऊन संसार चालवावा.

लेखांक चवथा

गृहसौख्याविषयीं

स्त्रीचें कर्तव्य.

## लेखांक चवथा.

# गृहसौख्याविषयीं स्त्रीचें कर्तव्य.

**न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।**
**गृहं तु गृहणीहीनमरण्यसदृशं मतम् ॥**

नुसत्या घराला घर म्हणत नाहींत. गृहिणी हेंच घर. गृहिणीविना घर अरण्याप्रमाणें होय. महाभारत.

विश्वांतल्या प्रेमाच्या, मांगल्याच्या, कोमलतेच्या, सौंदर्याच्या आणि पावित्र्याच्या सारभूत सर्वस्वाची स्त्री ही एकरूप विजयपताका आहे.

गडकरी–पुण्यप्रभाव.

पुरुषाचें कार्यक्षेत्र विशाल जग आहे तर स्त्रीचें तिच्या गृहापुरतेंच मर्यादित आहे. परंतु तेवढ्यानें तें कमीप्रतीचें ठरत नाहीं. उलट त्याचें महत्त्व विशेषच आहे.

जगाच्या पाठीवर अनेक शाखाप्रशाखांनीं विस्तारलेल्या मानवजातीच्या वटवृक्षाचें मूळ एवढ्याशा घरांतून आहे व त्याची धनीण स्त्री आहे. एवढी एकच गोष्ट लक्षांत घेऊन स्त्रीजातीच्या कर्तव्याकडे दृष्टी टाकल्यास पुरुषी अहंभाव बाजूला ठेवून तिला नमन करावें लागेल. हिंदवी स्वराज्याची भूमि तयार करण्याकरितां थोरले शहाजी राजे यांना नर्मदेपासून तुंगभद्रेपावेतों आपले घोडे नाचवावे लागले;

पण त्याच भूमिकेवर स्वराज्याचा भव्य प्रासाद उभारण्याचें आश्चर्यकारक कार्य करणाऱ्या श्रीशिवबांना श्रीजिजामाउलीनें एवढ्याशा शिवनेरीच्या किल्ल्यांत बसून तयार केलें. या एका उदाहरणावरूनच स्त्रीजातीच्या अचाट कर्तृत्वाची ओळख पटण्यासारखी आहे. या जगांत आपलें कर्तव्य कमी प्रतीचें आहे असें कोणाही स्त्रीनें मानण्याचें कारण नाहीं. तिनें आपलें तेज प्रगट करण्याची तत्परता मात्र दाखविली पाहिजे.

परंतु गरीब बिचारी आजकालची हिंदु स्त्री! समाजानें तिला तसा वाव ठेविलाच नाहीं. तिचें शरीर किंवा मन कार्यक्षम होण्याच्या आधींच तिच्यावर विवाहित होण्याची पाळी येतें. त्याचे मागोमाग लगेच संसाराची जबाबदारी. पतीची पुरती ओळख व्हावयाची असते तर घरांत जें पोक्त स्त्रीमनुष्य असेल तें सासूच्या रूपानें सदा कमीपणा पाहण्यास टपलेलें. पुरुषाच्या शतांशानेंहि स्वतंत्रता नाहीं कीं निर्भयता नाहीं. अशा स्थितींत हिरकणीसुद्धां गारगोटी ठरतें. मग जी खरीच गारगोटी असणार, तिची गोष्टच बोलायला नको. इतक्यांतूनही तिचें तेज प्रगट झालें असतें. परंतु थोडा काळ लोटतो न लोटतो तोंच निसर्गाचा शाप अपत्यरूपानें तिच्याभोंवतीं फिरूं लागतो! झालें! ‘चूल व मूल’ या पलीकडे तिच्या कर्तृत्वाला अवकाशच राहात नाहीं. बाहेरच्या जगाचें ज्ञान नाहीं. समाजांत निर्भयता नाहीं. घरांत असावें तसें स्वातंत्र्य नाहीं. तिचा पति कोठें-तरी नोकरींत गुंतलेला गुलाम. त्याची ही घरांतली गुलाम! अशांतून पुढची पिढी कशी निघत असेल, याचा विचार ज्याचा त्यानेंच करावा! आमच्या पुरुषांच्या साऱ्या तेजाचा लोप जसा निर्घृण पारतंत्र्यानें केला आहे, तसाच सामाजिक अन्यायांनीं आमच्या स्त्रियांच्या गुणांचा

केला आहे. जुन्या चालीरीति व समजुती यांची लगट सोडण्यास नाखुश असलेल्या जुन्या वळणाच्या लोकांनीं याचा विचार करावा. असो.

त्यांतले त्यांत समाधानाची गोष्ट आहे कीं, अलीकडे आमच्या राजकीय स्वातंत्र्याची प्रभात जशी जवळ आलेली दिसतें, तशीच स्त्रियांच्या सामाजिक स्वातंत्र्याची प्रभात जवळ आलेली दिसतें! खुरटलेल्या स्त्रीजातीला आपला विकास करून घेण्यास यापुढें पुष्कळच वाव मिळेल आणि त्यांच्या साह्यानें पुरुषजातीलाहि स्वातंत्र्य लाभेल.

नवविवाहित भगिनीनों! तयार व्हा! आणि आपलें दिव्य तेज प्रगट करण्याचे कर्तव्याचे नवीन धर्तीचे पाठ समजावून घ्या. तुमची पाळी आली आहे. पुरुषानों! तुम्ही त्यांना पुढें येण्यास अवकाश द्या. त्यांचें साहाय्य करा! गृहसौख्य त्याविना नाहीं.

आमच्या स्त्रियांची कितीहि कुचंबणा झाली असली, तरी संसारकर्तव्याचे नव धडे समजून घेण्यास त्यांना फारसें जड जाणार नाहीं. आदर्श संसार करून दाखविण्यांत त्या पुरुषवर्गास हां हां म्हणता मागें टाकतील!

उत्कृष्ट संसार करून दाखविण्यास स्त्रियांची मनोभूमिका सदाचीच अनुकूल आहे. मुलगा, बापाची फटिंगवृत्ती लहानपणापासून दाखवूं लागतो, तर मुलगी आपल्या आईची हुबेहूब नक्कल करण्याच्या खटपटीत असते. मुलाची खेळाची आवड अमूकच असल किंवा त्याविषयीं तो पित्याचे गुण उचलील असें मुळींच नाहीं. पण मुलीचें पहा. ती जमिनीतून उगवते न उगवते तों तिला बाहुली पाहिजे आणि भातकुलीचा संसार मांडण्यास पाहिजे. म्हणजे अपत्यसंगोपन आणि गृहकार्य करण्याची हौस मूळापासूनच. अर्थात् जिनें

अगदीं बालपणापासून कळत न कळत गृहिणीधर्माचा पाठ घेतला आहे तिला नव्या मनूतील थोडासा नव्या धर्तीचा पाठ घेण्यास कितीसा वेळ लागेल ?

इतर कित्येक चांगल्या गोष्टीप्रमाणें आमच्याकडे गृहिणीधर्माचाहि सुंदर विचार केलेला आहे. तो अगदीं जशाचा तसा जरी नाहीं तरी योग्य तो फेरबदल करून आजही स्वीकारतां येण्यासारखा आहे. मात्र त्यांत रूढीप्राबल्यानें शिरलेला एकांगीपणाचा केर झाडून टाकला पाहिजे. पातिव्रत्यपालनाच्या कांहीं खुळचट कल्पना काढून टाकून मोकाट सोडलेल्या पुरुषवर्गावर पत्नीव्रताची जबाबदारी लादली पाहिजे. म्हणजे आमच्या गृहस्थाश्रमाची शुद्धता होईल. असो.

ही गोष्ट लवकर अमलांत यावी असें वाटत असल्यास स्त्रियांनींच तिला चालना दिली पाहिजे. बदलत्या काळाबरोबर पुरुषवर्गाची दृष्टि निवळली असून स्त्रियांची योग्यता आदरानें विचारांत घेतली जात आहे. त्यांच्याविषयींचे पूर्वीचे कांहीं वेडगळ निर्बंध तटतटा तुटत आहेत, पण त्याबरोबरच नवीन धर्तीच्या कांहीं जबाबदाऱ्याहि वाढत आहेत. अशावेळीं स्त्रियांनीं नव्या मनूचा आपला गृहिणीधर्म नीट समजून घेतला पाहिजे. या बाबतींत पुरुषांची जी अडचण तीच स्त्रियांची आहे. मागें सांगितल्याप्रमाणें एकत्र कुटुंबपध्दत मोडत चालली आहे. नोकरी, धंदा किंवा इतर अनेक कारणांनीं बहुतेक तरुण स्त्रियांना आपल्या पतिसमवेत एकेकटें राहण्याचा प्रसंग येऊं लागला आहे. आणि तोहि आपल्या पंचक्रोशींत नव्हे तर अगदीं अनोळखी शहरागांवांतून. यामुळें प्रत्येक स्त्रीचा बाहेरच्या जगाशीं जास्त संबंध येत चालला आहे, आणि

जगहि जास्त धकाधकीचें, निष्ठुर, स्वार्थलोलुप आणि बेदरकार होत चाललें आहे. अर्थात प्रत्येक स्त्रीनें या नव्या स्थितींत आपला व आपल्या घराचा नीट निभाव लागेल एवढ्याकरितां फार हुशार झालें पाहिजे, हें सांगावयास नको. पूर्वीं एकत्र कुटुंबांत पोक्त बायकांच्या हातांखालीं तरुण मुलींचें शिक्षण होत असल्यामुळें त्यांच्या चुका निभावल्या जात; पण आतां तसें चालणार नाहीं. पती तिच्या समवेत सतत असणें शक्य नाहीं. पोक्त विचाराचा योग्य सल्ला वेळींच देणारें मनुष्य मिळणें कठिण, आणि जग दोष पाहण्यास टपलेलें. म्हणून प्रत्येक स्त्रीनें संसारकर्तव्याचा आपण होऊनच नीट अभ्यास केला पाहिजे. त्यांनीं तितकी उत्कंठा दर्शविली तर त्यांच्या पतींचें साह्य त्यांना मिळाल्यावांचून राहणार नाहीं.

**पतिर्हि देवो नारीणां पतिर्बन्धुः पतिर्गतिः ।**
**पत्या समा गतिर्नास्ति दैवतं वा यथा पतिः ॥**

पति हाच स्त्रियांचा देव, पति हाच बांधव आणि पति हेंच आश्रयस्थान होय. स्त्रियांना पतिसारखी गति नाहीं. पति हा खरोखर देवासमान होय.

हें शास्त्रवचन आजहि गृहित धरून चालण्यांत स्त्रियांना कमीपणा नाहीं. पतिपत्नीचें सेव्यसेवक नातें थोडेसें आहे. पण तेंहि वरील श्लोकांत दर्शविलेलें नाहीं.पतीच्या स्वरूपांत अभिन्नतेनें मिसळून जाण्यानेंच तिचें महत्व वाढतें. या करितां पतीच्या इच्छा समजाऊन घेऊन त्याप्रमाणें बनण्यांत भूषण आहे. आजकाल पुष्कळ वेळा असा योग घडून येतो. पतीची सामाजिक, बौध्दिक वा आर्थिक योग्यता मोठी पडते व त्याच्या तोडीला त्याची पत्नी पहिल्यांदा बसू

शकत नाहीं. बाकीच्या गोष्टींत अनुरूपता असली तरी पत्नीचा हा कमीपणा पुरुषाला जाचक होतो. केव्हां केव्हां त्यास त्याबद्दल लज्जास्पद व्हावें लागतें. ही स्थिती चतुर तरुणींनी फार वेळ चालूं देऊं नये. आपल्या मृदु वचनांनीं पतीचें मन जिंकून घेऊन त्यास असें स्पष्ट दर्शवावें कीं, तुम्ही ज्या पध्दतीनें माझी मूर्ति इच्छिता, त्या प्रमाणें मला बनवून घ्या. टाकीचे घाव सोसण्यास मी तयार आहे.

पुष्कळ पुरुषांना आपली पत्नी आपल्या तोलाची करण्याची इच्छा असतें. आणि त्याकरितां ते वाटेल तो स्वार्थत्याग करण्यास तयार असतात. परंतु कांहीं स्त्रिया इतक्या दुराग्रही आणि विचित्र मताच्या असतात कीं, त्यांना पतीचें चित्त आकलनच करतां येत नाहीं. त्या गृहिणीधर्मापासून च्युत होऊं पाहतात असें नव्हे. इतर अनेक गोष्टींत त्या तो पाळीत असतात. पण समाजाला भिऊन म्हणा किंवा पूर्वग्रहदूषित मनामुळें म्हणा त्या पतीनें इच्छिलेल्या कांहीं सुधारणेच्या गोष्टी करण्यास मागें घेतात. असा आडमुठेपणा करण्यांत त्यांचा हेतु शुध्द असतो इतकेंच. कोणत्याहि तरुणीनें असला आडमुठेपणा करूं नये. पति सुजाण आहे एवढी खात्री असल्यावर त्यानें सांगितलेली कोणतीहि गोष्ट परंपरेला धरून नसली तरी त्याची इच्छा सांभाळण्या करितां तिनें ती आनंदानें केली पाहिजे.

**भर्तुरिच्छा हि नारीणां पुत्रकोट्या विशिष्यते ।**

पतीच्या इच्छेप्रमाणें चालणें हें कोटी पुत्रलाभापेक्षांहि अधिक आहे. रामायण.

समजा, एखाद्या सुंदर तरुणीचा विवाह एखाद्या अत्यंत बुद्धिवान् अशा वकील, प्रोफेसर किंवा डाक्टर तरुणाबरोबर झाला.

पुढें त्यास असें आढळून आलें कीं, आपल्या पत्नीचें शाळेंतील शिक्षण तोकडें आहे किंवा तिला इंग्रजी येणें आवश्यक आहे, तिला पुन: शाळेंत घातली पाहिजे. तर त्याच्या या सदिच्छेप्रमाणें त्या तरुणीनें तो मार्ग पत्करावयास नको काय? -अलबत पाहिजे.

या व अशा आणखी कितीतरी गोष्टी आहेत. कोणा पुरुषांना आपल्या पत्नीनें आपणाबरोबर फिरण्यास चलावें, अशी इच्छा असते, कोणाला तिनें बाजारहाट करण्यास शिकावें असें वाटतें, कोणाला तिनें सभाधीट होऊन वक्तृत्व शिकावें असें वाटते. कोणाला काव्याची आवड असते व ती पत्नींत दिसावी असें वाटतें. तात्पर्य, जो तो आपआपल्या आवडीप्रमाणें आपला संसार थाटूं बघतो. अलीकडच्या आंग्लविद्याविभूषित तरुणामध्यें इतर कांहीं दोष असले तरी त्याच्या ठायीं अविचार कमी आहे व स्त्रीजातीविषयींची त्याची दृष्टी उदार होत चालली आहे, यांत शंका नाहीं. त्यामुळें संसार करण्याची त्याची दृष्टी नवी असते. पण ती नवी असते म्हणून इष्ट नसते असें मात्र नाहीं. समाजानें तितकें मतस्वातंत्र्य त्यास दिलें पाहिजे आणि त्याच्या पत्नीनें त्याच्या पावलावर पाऊल टाकण्याचा कसून प्रयत्न केला पाहिजे. तसें तिनें न केलें तर तिच्या पतीची मोठी केविलवाणी स्थिती होतें आणि दाम्पत्यप्रेमांत बिघाड येण्याचें बी पेरलें जातें. प्रत्येक नव-विवाहित तरुणीनें या संकटास जपलें पाहिजे. समाजाच्या रुष्टतेला भिऊन पतीचें मन दुखविण्यापेक्षां, पतीला प्रसन्न ठेऊन समाजाला व धर्मसमजुतीला दुखवावें लागलें तरी हरकत नाहीं असा तिचा बाणा असावा. स्त्रियांच्या वर्तनासंबंधींच्या ज्या नव्या चाली रूढ होत आहेत, त्या सर्वच त्याज्य नाहींत. त्यांत ज्या योग्य आहेत व ज्या

पतीला मान्य आहेत, त्यांचा अंगिकार पत्नीनें केलाच पाहिजे. नव्या युगांतील पत्नीधर्माचा हाच विशेष आहे.

एवढी बाजू सांभाळली म्हणजे मग चालत आलेला गृहिणीधर्म पूर्वीप्रमाणें पाळण्यास कांहींच हरकत नाहीं. बहुतेक तरूण मुलींना तो त्यांच्या आईपासून मिळालेलाच असतो. शिवाय इतर सुगृहिणींचा कित्ता डोळ्यापुढें ठेऊन त्यांना तो सुंदर प्रकारें गिरवतां येतो. परंतु यांतही ज्या छोट्या मोठ्या सुधारणा होणें आवश्यक आहे, त्यांचा विचार करूं.

दिवसेंदिवस जग इतकें झपाट्यानें बदलत चाललें आहे कीं, त्याच्या झपाट्यांत जुनें तें सोनें समजून चिकटून बसण्यांत विशेषसा राम राहिलेला नाहीं. समाजाचे आचार विचार, रुढी, चालीरीति, कपडेलत्ते, भाषा व एकंदर राहणी यांत कितीतरी पालट पडलेला आहे. मग संसारशकट चालविण्याच्या पूर्वीच्याच रीति अगदीं तंतोतंत तशाच कशा पाळता येणार? संसार तोच व तो करावयाचीं कर्तव्यें तींच; परंतु त्यांत नवीनपणा आणिला पाहिजे. त्यावांचून त्यास मजा येणार नाहीं. अंगावरील साधा दागिना—पाटल्या घ्यानात घटकाभर. पतीनें त्यांत थोडी भर घालून त्या उजळून आणाव्या असें बायकांना वाटतें कीं नाहीं?—तसेंच संसारकार्याचें आहे. त्यास उजळा दिला पाहिजे. ज्याप्रमाणें पुरुषांनीं ऐहिक सुखोपभोग जास्तींतजास्त मिळवून संसारास रंग आणीन असें समजून त्याकरितां झटत राहावयाचें. त्याचप्रमाणें स्त्रियांनींहि नवीन धर्तीनें संसार थाटून तो यशस्वी करण्याबद्दल झटायचें. दोघांच्या इच्छा अशा एका दिशेनें काम करूं लागल्यावर गृहसौख्याला वाण पडण्याचें कारणच राहणार नाहीं असो.

नमुनेदार संसाराचा पहिला गुण म्हणजे गृहांत जिकडे तिकडे स्वच्छता व टापटीप असणें हा होय. घर, भांडीकुंडी, वस्त्रेंप्रावर्णें हीं जितकीं स्वच्छ असतील तितकीं दृष्टीला मोहित करतात. यामुळें स्वतःला तर बरें वाटतेंच; पण परक्यांना त्याचें भारी कौतुक वाटतें. हें स्वतःचें समाधान व परक्याचें कौतुक पाहिजे असेल तर प्रत्येक तरुण गृहिणीनें प्रभातकाळीं लौकर उठून कामास लागले पाहिजे. सूर्योदयापूर्वी उठणाऱ्या मनुष्याचे अंगीं चपळता व उत्साह आपो-आपच येतो. म्हणून गृहिणीनें लौकर उठण्याची संवय ठेविली पाहिजे. या संवयीनें आळसाला थारा मिळत नाहीं. कामें लौकर आटोपतात व वेळेची पुष्कळ बचत होते. केरवारे करणें, भांडीकुंडी घासणें, पाणी भरणें, पुढील स्वयंपाकाचें साहित्य जुळवून घेणें इत्यादि गोष्टी न चुकता, ओळीनें व मोठ्या टापटिपीनें कराव्या. प्रत्येक जिन्नस जेथल्या तेथें ठेवण्याचा कटाक्ष असावा. म्हणजे घरांत अडगळ वाटत नाहीं, सांड-लवंड होत नाहीं, केर साचत नाहीं आणि गोंधळ उडत नाही. संसार वाढेपर्यंत तरी गृहिणीनें कामें मोलानें करून घेऊं नयेत. विद्याभ्यासास वेळ पाहिजे असेल किंवा तसेंच कांहीं महत्व असेल तर गोष्ट वेगळी. परंतु होता होईतों सर्व गृहकृत्यें करण्याचा उरक अंगीं पाहिजे. म्हणजे अडवणूक होत नाहीं व गडी, मोलकरीण यांची मनधरणी करावी लागत नाहीं. मोलानें कामें करून घ्यावयाचीं झाली तरी आपली तीक्ष्ण नजर त्यांचेवर ठेवावी. दाम मोजावयाचे तर कामही शक्य तों चांगलें करून घ्यावें. अर्थात् त्या हलक्या नोकर माणसावर उगीच तोंड केव्हांही टाकूं नये. गोडी गुलाबीनेंच घ्यावें; पण लोकांना ही पक्की खात्री वाटूं द्यावी कीं, आपण जर काम टाकलें तर या

बाईचें कांहीं अडत नाहीं. गृहिणीनें दक्षता घेतली म्हणजे गडीमाणसें थोडीतरी वचकून असतात.

पण हीं गृहकृत्यें करतांना आणखी एका गोष्टीकडे लक्ष ठेविलें पाहिजे. तें म्हणजे आरोग्य होय. शरीर सुदृढ व निरोगी असणें ही परमेश्वराची मोठ्यांत मोठी देणगी आहे. पतीची व समाजाची शाबासकी मिळविण्याच्या हेतूला बळी पडून शक्तीबाहेर कामें करणें बरें नाहीं. आळसानें जसें आरोग्य बिघडतें तसेंच तें अति व अविचारी श्रमानेंहि बिघडतें. याकरितां जीं कामें आपल्या शक्तीबाहेरची आहेत, तीं एकदम किंवा एकट्यानें करूं नयेत. इतर स्त्रियांच्या साह्यानें किंवा मोलानें करून घ्यावीत. तसें साधण्यासारखें नसल्यास हळूहळू करावीत. पुष्कळ तरुण मुलींमध्यें असा एक अवगुण आढळतो कीं पहिल्यापहिल्यांदा त्या संसारकृत्यांत भारी खस्ता खातात. इतक्या कीं, त्यांचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. तारुण्याच्या पहिल्या भरांत अतिश्रम करण्याची ही ढोबळ चूक जाणवत नाहीं; पण ती आपली खूण कायमची करून ठेविते. कांहीं कालानंतर त्या अतिश्रमाचा परिणाम त्या अविचारी तरुणींच्या प्रकृतीवर दिसून येऊं लागतो. मग बारीक ताप, खोकला, अशक्तपणा, जेवण न जाणें इत्यादि तक्रारी सुरू होतात. त्यांच्या पतीच्या लक्षांत या गोष्टी पहिल्यांदा सहसा येत नाहींत. बरें येऊन त्यांनीं औषधपाण्याची योजना केली तरी 'बायकांना इतकं जपून कसं चालेल ?' अशा भ्रामक समजुतीनें त्या तिकडे दुर्लक्ष करितात; मग पुढें एखादें बाळंतपण झालें कीं, त्यांची प्रकृति एकदम ढांसळतें, व मग ती सुधरून घेतांना फार जड जातें.

संसारांत पुरुष आळशी असणें जसें वाईट—गृहसौख्यास विघातक आहे, तसेंच पत्नी रोगग्रस्त असणेंहि वाईट आहे. नवऱ्याच्या आळसानें दारिद्र्य सुटत नाहीं. **बायकोच्या रोगी प्रकृतीनें घरांत कोणासच सुख लागत नाहीं. म्हणून प्रत्येक गृहिणीनें प्रकृति उत्तम राखण्याबद्दल फार जपावें.** आपलें चातुर्य व कामाचा उरका दाखविण्याकरितां जीवापाड मेहनत करूं नये आणि कांहीं अस्वास्थ्य निर्माण झाल्यास तें तसेंच रेटूं नये. कारण ज्या पतीला सुख होण्याकरितां आज इतका स्वार्थत्याग करावयाचा त्याची किंमत जन्मभर रडव्या तोंडानें देण्याचा प्रसंग आणूं नये.

आमच्याकडे स्त्रियांच्या प्रकृतीविषयींची अनास्था पुरुषांकडून तर होतेंच होते; पण बायकाहि हेकेखोरपणानें फार करून घेतात. यात त्यांना व पतीलाहि सुख नाहीं. शिवाय त्याचा दुष्परिणाम पुढें संततीला भोगावा लागतो. नव्या विचाराच्या तरुण गृहिणींनीं ही चूक होऊं देऊं नये. आपल्या प्रकृतीचे फाजील चोचले करणें जितकें वाईट आहे तितकेंच तिची अनास्था करणेंहि वाईट आहे.

तरुण भगिनींनो! आपल्या पतीचें आपल्यावर अकृत्रिम प्रेम असावें, त्याचें लक्ष दुसरीकडे कोठेंहि जाऊं नये असें तुम्हांला मनापासून वाटतें कीं नाहीं?—मग तुम्ही आपल्या प्रकृतीची काळजी घेतली पाहिजे. शरीर रोगी झालें कीं, त्याची टवटवी कमी होते व तारुण्याला ओहोटी लागते. तरुण स्त्रियांचें तारुण्य कोणत्याहि कारणामुळें लौकर कोमेजून जाणें बरें नाहीं. पतिप्रेमाच्या बळकटीकरितां त्याची फार आवश्यकता आहे. स्त्री सुंदर असो नसो. ती निरोगी व सुदृढ पाहिजे. दिवसभर श्रमून घरीं आलेल्या पतीला आपल्या

पत्नीचें प्रसन्न मुखकमल पाहण्यास मिळालें पाहिजे. पतीला मोह पाडणारी प्रसन्नता मुखावर दिसण्यास पत्नीचें आरोग्य उत्कृष्ट असलें पाहिजे व तिचें तिनें तें राखलें पाहिजे.

अतिकामाप्रमाणेंच स्त्रियांकडून आरोग्यनाशाच्या आणखी एकदोन चुका होतात. त्या म्हणजे देवाधर्माच्या नांवाखालीं व भोंवतालच्या मूर्ख थेरड्या बायांच्या उपदेशानें उपासतापास करणें आणि दूरदूरचे देव पाहण्याकरितां पायीं रखडत जाणें या होत. प्रकृतिस्वास्थ्याकरितां मधून मधून उपास करणें किंवा प्रसंगानुरूप पायीं लांबचा प्रवास करून देवदर्शनाला जाणें गैर नाहीं. पण त्याचा अतिरेक न व्हावा. पतीच्या इच्छेविरुध्द तर या गोष्टी मुळींच करूं नयेत.

**व्रतोपवासनिरता या नारी परमोत्तमा ।**
**भर्तारं नानुवर्तेत सा च पापगतिर्भवेत् ॥**

जी उत्तम स्त्री व्रतोपवासादि नियमांच्या ठिकाणीं आसक्त होऊनहि पतीच्या आज्ञेनुसार वागत नाहीं, तिला पापगति मिळते. रामायणांतील हा सदुपदेश तरुण गृहिणींनी ध्यानांत ठेवून वर्तावें. या विषयीं लोकांनीं नांवें ठेविलीं तरी त्याची क्षिति बाळगूं नये.

आरोग्यानें तारुण्यकाल लांबतो. आपल्या तारुण्याच्या बळावर स्त्रीला आपल्या पतीच्या मनावर प्रेमाची हुकमत चालविता येतें. मन सदैव प्रसन्न असल्यामुळें स्वच्छता व टापटीप ठेवण्याचा कंटाळा येत नाहीं. शेजारधर्मास अनुसरून इतर बायकांना साह्य करता येतें. मग त्यांचाहि आपल्याला उपयोग करून घेता येतो. चांगल्या आरोग्यानें सामान्य रूपही उठावदार दिसतें आणि स्वच्छ वस्त्राप्रावर्णांनीं श्रीमंती भपक्याचें कारण उरत नाहीं. त्यामुळें लोकावर आपली छाप पडते.

समाजांत पुरुषांचा अजागळपणा कसाही खपून जातो. स्त्रियांचे बाब-तींत मात्र तसें होत नाहीं. तो उघडकीस येतो व निंद्य ठरतो. म्हणून संसारसौख्य भोगूं इच्छिणाऱ्या गृहिणीनें आरोग्याचे नियम समजाऊन घेऊन प्रकृति चांगली राखावी. कोणत्याहि सबबीवर तिची हेळसांड करूं नये.

आरोग्याचे नियम अगदीं साधे व कोणालाहि सहज अनुसरता येण्यासारखें आहेत. स्वच्छ हवा, सूर्यप्रकाश, साधें व ताजें अन्न आणि निर्मळ पाणी हीं साधनें आरोग्यवर्धक आहेत. शौचास साफ होणें, चांगली भूक लागणें, शांत झोप येणें, अंगांत उत्साह असणें या चार गोष्टी आरोग्य दर्शविणाऱ्या आहेत. सदा सुस्ती, गोड किंवा तिखट पदार्थ खाण्याची इच्छा, सदा तृप्ती किंवा भूक वाटणें, कपाळ चढल्याप्रमाणें असणें, तोंडाला घाण येणें आणि झोप स्वप्नमय असणें या गोष्टी प्रकृति ठीक नाहीं हें दर्शविणाऱ्या आहेत. शौचास साफ झाल्यावांचून जेऊं नये. दोन घासांनीं कमी जेवावें. अति गोड, तिखट, तळलेले खमंग पदार्थ अगदीं बेतानें खावे, कारण पडल्यावांचून दिवसा निजूं नये व रात्रीं जागूं नये. जिवापाड श्रम करूं नयेत आणि सदा उद्योगमग्न असावें. म्हणजे आरोग्याची हानि होत नाहीं, दीर्घायुष्य लाभतें व प्रकृति खणखणीत राहते.

असें आरोग्य मिळवून प्रत्येक व्यक्तीनें शंभर वर्षे सुखानें कर्तब-गारी दाखवीत जगावें. तरुण पिढीनें असला आशावाद आचरणांत आणावा. स्त्रियांनींच याविषयीं काळजी घेतली तर मुलामुलींना लहानपणापासून हें वळण लागेल. असो.

शरीरानंतर किंवा त्या समवेतच गृहिणीनें आपल्या मनाचें

आरोग्य चांगले राखण्याबद्दल जपलें पाहिजे. शारीरिक आरोग्य चांगलें असलें म्हणजे मन चांगलें असतेंच; पण तें चांगलें असलें म्हणजे सदैव चांगलें राहतेंच असें मात्र नाहीं. त्याच्या उन्नतीकरितां स्वतंत्र प्रयत्न केला पाहिजे.

मनाच्या आरोग्यास चांगल्या ग्रंथांचें वाचन, सत्संगत व सुविचार यांचा अत्यंत उपयोग होतो. वाचनानें मन प्रगल्भ होतें. सत्संगतीनें तें समतोल राहते व सुविचारानें त्याचें बल वाढतें. सुगृहिणीनें आपल्या स्थितीप्रमाणें या गोष्टींचा अवलंब करावा. याकरितां पतीचें साह्य हट्टानें मिळवावें.

स्त्रियांचें पावित्र्य ही एक अति उंची ठेव परमेश्वरानें त्यांच्या-जवळ ठेविली आहे. तिचें रक्षण करणें त्यांचें परमकर्तव्य होय. शुध्द व पवित्र आचरणानें स्त्रीला श्रेष्ठ दैवताचें पद मिळतें. गृहिणीनें तें प्राप्त करून घेण्याची उत्कंठा बाळगावी.

गृह हेंच जरी स्त्रियांचें मर्यादित कार्यक्षेत्र असलें तरी त्यांचा संबंध बाहेरच्या जगाशी अगदींच येत नाहीं असें नाहीं. आजकाल तर तो फारच येतो व पुढें येत राहण्याचा संभव आहे. तेव्हां आपलें पावित्र्य घरापुरतेंच नव्हे तर जगांत कोठेही निष्कलंक ठेवण्याची जबाबदारी स्त्रीवर आहे. याबाबत तिनें सीतेचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवण्यासारखें आहे. रावणासारख्या अत्यंत दुष्ट मनुष्याच्या बंदिवासांत पडूनहि तिनें आपलें पावित्र्य टिकविलें! ती जर भेकड, अविचारी, व चंचल वृत्तीची असती तर तिच्या हातून हें दिव्य खास निभावलें नसतें. बायका धीट, सदाचरणी, लज्जाशील व स्वाभिमानी राहतील तर त्यांच्याशी लगट करण्याचें सामर्थ्य कोणाहि पुरुषांत नाहीं.

म्हणून तरुण स्त्रियांनीं वाचन, सत्संगत व विचार इत्यादि साधनांनीं जगाचें स्वरूप ओळखण्यास शिकावें. अनुभवानें मनुष्याचे अंगीं प्रसंगावधान येतें. लुच्चा कोण ? सच्चा कोण ? तोंडापुरता कोण बोलतो ? याचा नीट अभ्यास करावा. वाटेल त्याची संगत एकदम धरूं नये. कोणाजवळहि आपलें मन एकदम मोकळें करूं नये. एखादी शंका आल्यास पतीला विचारून उलगडा करून घ्यावा. पतीपासून कांहींहि लपवून ठेवूं नये. त्यांस प्रेमानें कह्यांत आणावा. त्याचेवर शह ठेवण्याचा प्रयत्न करूं नये. आपल्या गुणांविषयीं, शीलाविषयीं, वागणुकीविषयीं, पतीचे मनांत शंका उभी राहील असें क्षुल्लक कामहि करूं नये. कांहीं प्रसंगांत तसें घडल्यास त्याचा तावडतोब निकाल करून घ्यावा. मनांत कुढूं नये अगर भिऊं नये.

परपुरुषाकडे पाहूं नये किंवा त्यांच्याशीं बोलूं नये, हा पातिव्रत्याचा नियम या काळांत चालणें शक्य नाहीं. पण या ठिकाणींहि आपली एक मर्यादा असावी. जगांत विनाकारण टीका होईल, पतीला न रुचेल किंवा दुसऱ्या पुरुषांना भलतेंच उत्तेजन मिळेल असें बोलणें, हंसणें गृहिणीनें टाळावें. परपुरुषानें कोणत्याहि मिषानें सलगी केल्यास त्यास तटकन् तोडावें. अगदीं बेलाशक तोडावें. म्हणजे तो पुनः पांचटपणा करण्यास धजणार नाहीं. या बाबतींत स्त्रियांनीं विद्युल्लतेप्रमाणें असावें. 'माझा चमचमाट पाहून तूं वाटल्यास मुग्ध हो; परतु जवळ येऊं नकोस हं. फुकट जळून मरशील.' असें त्यांनीं त्यास आपल्या कडक वर्तनानें दर्शवावें.

गृहिणीनें परपुरुषाशीं विद्युल्लतेप्रमाणें कडक तर स्वपतीशीं शरच्चंद्रिकेप्रमाणें शांत, स्निग्ध व मनाल्हादकारक असावें. पति-

सेवेविषयीं तत्परता, लटक्या व थोडावेळ टिकणाऱ्या रागाचे हावभाव, लज्जायुक्त हास्य आणि मधुर वाणी हीं पतीचें अंतःकरण जिंकण्याची शस्त्रास्त्रें आहेत. हीं केव्हांहि गंजूं देऊं नयेत. तीं नेहमीं सतेज ठेवावी. द्रव्योपार्जन करतांना पुरुषांना नानाप्रकारच्या खांचखळग्यांतून काट्याकुट्यांतून मार्ग काढावा लागतो. या दगदगीनें त्याचें शरीर थकतें व मन भागतें. अशा आर्त पुरुषाला सत्त्वशील भार्येचें सान्निध्य व तिची प्रेममय मंजुळ वाणी हें रामबाण औषध आहे. या अमृताच्या एका घोटानें तो पुनः ताजातवाना होतो व जीवनकलहांतील कोणताहि त्रास कःपदार्थ मानतो. सुगृहिणीनें असे अमृताचे पेले सदैव तयार करून ठेवावे.

पतीजवळ दागदागिन्याचा हट्ट घेणें, त्यास आपल्या हौशी सांगणें आणि त्या पूर्ण करण्याकरितां भुणभुण लावणें कांहींच गैर नाहीं, पण याहि गोष्टी काळवेळ पाहून कराव्या. पतीचें मन निर्वेध, प्रसन्न असेल, त्यास सवड असेल, त्यास पुढें संकटांत पडावें न लागेल असा विश्वास असल्यास त्याचेजवळ लाडका हट्ट घेणेंहि त्यास आनंदकरच होईल.

पतीशीं संसारविषयक गोष्टींचा खल करण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें कळत असेल तर राजकीय व सामाजिक विषयावरहि वादविवाद करावा. हास्यविनोदहि भरपूर असावा. पण त्यांत समजूतदारपणा पाहिजे. वादांतून किंवा हास्यविनोदांतून कलह किंवा परस्पर अप्रीति निर्माण होण्यासारखें बोलूं नये. बोलण्यांत त्रासिकपणा येत चालल्यास व आपली बाजू खरी असली तरी स्त्रीनें कमीपणा पत्करून तें बोलणें दुसऱ्या विषयांवर न्यावें. शिक्षणालंकृत—

पदवीधर-गृहिणींनीं सुध्दां याविषयीं दक्षता घ्यावी. कित्येकदां अगदीं साध्या बोलण्यांतून कलहाग्नीच्या ठिणग्या निघतात आणि जिवलग स्नेही कट्टे दुष्मन् बनतात. पतिपत्नींतहि असा बेबनाव होणें अशक्य नाहीं. म्हणून गृहिणीनें याबद्दल फार जपावें. असो.

आतां पाकशास्त्राकडे वळूं. गृहिणीधर्मामध्यें या विषयास अतिशय महत्त्व आहे.पातिव्रत्याप्रमाणेंच पाकशास्त्रनिपुणता हा गुण स्त्रियांना अत्यंत शोभादायक व अभिमानास्पद आहे. तरुण गृहलक्ष्मीनें संसारांत पडल्यादिवसापासून या अभ्यासास हात घालावा. पाकशास्त्रांत नैपुण्य मिळविण्यास घरची मोठी श्रीमंती पाहिजे अशांतला भाग नाहीं. कोंड्याचा मांडा करून साध्या पदार्थांना अमृताची चव देण्यांतच खरी करामत आहे. रोज एकाच पद्धतीचा सैंपाक करीत गेल्यास कंटाळा येतो. त्यांत नेहमी थोडा फार पालट असावा. पदार्थ तेच परंतु शहाणपणानें त्यांत पालट पाडून नवेपणा निर्माण करता येतो. म्हणून याविषयीं जितकी माहिती मिळवितां येईल तितकी मिळवावी. ‘ आम्हाला नाहीं बाइ तो सुग्रणपणा साधत. भाकरीभाजी मिळण्याची पंचाईत तिथें पक्वान्नाची वाटाघाट पाहिजे कशाला ? ” असें म्हणून किंवा मानून पाकशास्त्राच्या निपुणतेविषयीं अनास्था दाखविणें स्त्रियांना लांच्छनास्पद आहे. पुरुषानें जसें ज्ञान कणाकणानें मिळवावयाचें असतें, त्याचप्रमाणें स्त्रीनें श्रीमंती असो नसो, नानाविध खाद्य पदार्थ करण्याचें शिकून ठेवावें. ज्या कोणा बायकांना तसे पदार्थ करण्यास येत असतील त्यांच्याकडून त्यांची नीट माहिती घ्यावी. आपणांस सर्व कांहीं येतें अशी खोटीच घमेंड बाळगूं नये किंवा माहिती घेण्यास लाजूं नये.

हें साधण्यासारखें नसेल तर मराठी भाषेंत पाकशास्त्रावर कांहीं चांगलीं पुस्तकें झालीं आहेत, त्यांच्या आधारानें आपलें ज्ञान वाढवावें. त्यांतहि कधींमधींच करण्याचीं पंचपक्वान्नें बनविणें शिकण्यापेक्षां रोजचा साधा सैंपाकच कुशलतेनें व नवेपणानें कसा करीत रहावें हें आधीं शिकावें. कितीतरी बायकांना साधा सैंपाकहि वर्षानुवर्षे चांगला करतां येत नाहीं व या कमीपणाची त्यांना खंतहि वाटत नाहीं. गृहसौख्य निर्माण करूं इच्छिणाऱ्या गृहिणीनें हा दोष आपल्या अंगीं लाऊन घेऊं नये.

यानंतर एकच एक गोष्ट सांगण्यासारखी राहिली ती स्त्रियांच्या फावल्या वेळेसंबंधीं होय. संसाराचीं सर्व आवश्यक कामें आटो-पल्यानंतर स्त्रीनें वेळ मिळाल्यास–तसा थोडासा मिळतोच–त्याचा सदुपयोग करण्यास शिकलें पाहिजे. तशी कांहीं योजना न केल्यास आळसांत किंवा कुटाळक्या करीत बसण्यांत त्याचें पर्यवसान होतें. या वेळेचा दुरुपयोग झाल्यानेंच स्त्रियांमध्यें भांडखोरपणा, पतीची निंदा करण्याचा दोष, स्वतःच्या दारिद्र्याविषयीं असंतोष, दागिन्यांचा हव्यास इत्यादि दुर्गुण शिरतात. तरुण स्त्रियांनीं या दोषांना फार जपावें. हे दुर्गुण गृहसौख्यास फार मारक आहेत.

ज्याकाळीं आपल्या देशांत स्त्रियांना मोठा मान होता, त्याकाळीं त्यांना इतर शिक्षणाबरोबर ललितकलांचें शिक्षणहि देण्याची चाल होती. गायन, वादन, चित्रकळा, नर्तन इत्यादि कळा स्त्रियांना अत्यंत सुलभतेनें येण्यासारख्या आहेत. आतां काल पालटला आहे. या कला स्त्रियांना शिकवाव्या असें समाजाचें मत बनत चाललें आहे. या संधीचा लाभ स्त्रियांनीं घ्यावा. फावल्या वेळीं त्यांनीं

आवडीप्रमाणें कोणतीहि कला हस्तगत करावी. ज्यांना ईश्वरदत्त कंठमाधुर्य असेल त्यांनीं गायनकला शिकावी. ज्यांना तें साधत नसेल पण त्या विषयाची आवड असेल, त्यांनीं पेटी, सारंगी, बीन, फिडल, सतार यापैकीं कोणतेंहि वाद्यवादन शिकावें. हस्तकौशल्य ज्यांना साधण्यासारखें असेल त्यांनीं चित्रकलेचा ध्यास घ्यावा. विणणें, तुणणें, रांगोळ्या काढणें, लोकरीचीं कामें करणें या विद्या आतां अगदीं सामान्य झाल्या आहेत. पण त्यातही प्राविण्य मिळवावें. समाजांत मान मिळविण्यास अंगीं कलाकुशलता पाहिजे. आपलें नांव लोकापुढें यावें, सर्वांनीं आपली वाहवा करावी, असा प्रयत्न गृहिणीनें केला पाहिजे. स्त्रियांच्या कलाकौशल्याचीं प्रदर्शनें अलीकडे ठिकठिकाणीं भरतात. त्यांत आपलें काम पाठवावें. आपण नामवंत होऊन पतीच्या लौकिकांत भर घालणें कोणत्याहि गृहिणीस भूषणास्पद आहे. फावला वेळ कारणीं लावल्यास हें सहज साधेल.

स्त्रियांची योग्यता किती प्रकारांनीं वाढूं शकेल, हें काय सांगावें ?– पूर्वकालीं हें सर्व होतें. रघुकुलांतील राजा अज याची इंदुमति नांवाची एक आवडती राणी होती. ऋषिशापानें ती गतप्राण होऊन पडल्यावर अजानें जो विलाप केला आहे त्यांत त्यानें आपल्या राणीचें ' माझ्या संसाराची मालकीण, गृहराज्यांतील मंत्री, एकांतांतील खेळगडीण, आणि कलाकुसरींत पट्टशिष्या ' असें वर्णन केलें आहे. यावरून स्त्रियांची भूमिका किती उच्च आहे हें कळण्यासारखें आहे. शहाण्या व समंजस गृहिणींनी ती ध्यानीं घेऊन त्याप्रमाणें स्वतः होण्याचें ठरवावें.

संसाररूपी कारखान्यांत पुरुष हें यंत्र आहे. पण त्यास चैतन्य

देणारी शक्ति स्त्री आहे. तिनें आपलें कर्तव्य ओळखून या यंत्रास जोराची चालना दिली पाहिजे.

संसारसागरावर केव्हां केव्हां प्रचंड वादळें उठतात. संकटाचें काळेभोर आकाश वर पसरलेलें असतें. निराशेचा अंधार सर्वत्र पडलेला असतो, अडचणींचे खडक ठिकठिकाणीं लपलेले असतात. अशा भीषण काळीं पुरुषाला आपलें तारूं हाकारतांना मोठा आधार त्याच्या पत्नीचा असतो याकरितां तिनें आपल्या हृदयावर आपल्या दिव्य प्रेमाचा दीपस्तंभ उभारावा आणि त्यास धीर देत असावें.पुष्कळ प्रसंग असे असतात कीं, त्यावेळीं पुरुषांचा धीर खचतो, त्यांना भयंकर निराशा वाटते आणि ते अगदीं हतबल होऊन जातात. अशा वेळीं त्याच्या पत्नीनें पुढें होऊन आपल्या मधुर परंतु तेजस्वी वाणीनें त्याच्यांत पुनः उत्साह ओतला पाहिजे. गृहिणीधर्म उज्वलतेनें आचरण्याचा काळ हाच होय. असो.

तरुण गृहिणींनीं असा गृहिणीधर्म आचरून आपला व आपल्या पतीचा जन्म धन्य करावा.

लेखांक पांचवा

धनोपार्जन व गृहसौख्य

यांचा संबंध.

लेखांक पांचवा.

# धनोपार्जन व गृहसौख्य यांचा संबंध.

**अधनं दुर्बलं प्राहुर्धनेन बलवान् भवेत् ।**
**सर्वं धनवताः प्राप्यं सर्वं तरति कोशवान् ॥**

निर्धनाला दुबळा समजतात. धनानें मनुष्य बलसंपन्न होतो. धनवानांना सर्व कांहीं प्राप्त करून घेतां येतें. द्रव्याचा खजिना ज्याच्याजवळ आहे तो सर्व आपत्ति तरून जातो.

महाभारत.

**यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बान्धवाः ।**
**यस्यार्थाः स पुमाँल्लोके यस्यार्थाः स च पण्डितः ॥**

ज्याच्याजवळ पैसा आहे, त्यास मित्र व बांधव यांची प्राप्ती होते. ज्याच्याजवळ पैसा आहे, तोच मनुष्य आणि तोच जगांत पंडित.

रामायण.

संसारांत धनाचें महत्त्व आजकालचें नाहीं. फार प्राचीन आहे. रामायण महाभारतकालींसुद्धां आजच्या इतकीच धनाची सर्वश्रेष्ठता मानली जात होती. मग ऊठबसल्या पैसा लागणाऱ्या आजच्या काळांत ती अनंतपटीनें वाढली असल्यास नवल तें काय ? गृहसौख्य व धन यांचा अगदीं जिव्हाळ्याचा संबंध आहे. पैसा असेल तेथें प्रेम असेलच असा जरी नियम नाहीं तरी प्रेम आहे तेथें

पैसा असल्यास ( किंवा आल्यास ) प्रेमाची किंमत वाढते यांत शंका नाहीं. गृहसौख्य हा प्रेमाचाच विकास आहे, हें मागें सांगितलेंच आहे. संसारांत सर्व गोष्टी सुरळीत होण्यास धन पाहिजे तें एवढ्याकरितां.

संसाररथाची चालक शक्ति धन आहे. व्यवहाराचा प्राण धन आहे. संसारी मनुष्याचा नित्य जपाचा विषय धन आहे. धन आहे तर सर्व आहे, नाहींतर सर्वच शून्य! विनोदानें परंतु सत्यांशानें बोलायचें झाल्यास असेंहि म्हणतां येईल कीं, जगाला प्रकाशमान् करण्याची शक्ति गोल आकाराच्या तेजःपुंज सूर्यापेक्षां त्याच आकाराच्या चकचकीत रोप्यमुद्रेला जास्त आहे. जन्मांधाला अमावास्येच्या काळोखांतही धनवान् दिसूं शकतो. उलटपक्षीं त्याचा कफल्लक भाऊ तिखट दृष्टीच्या मनुष्याला भर दिवसा अगदीं उन्हांत उभा असला तरी दिसत नाहीं. हा मोठ्यांतला मोठा चमत्कार आहे पण तो खरा आहे यांत शंका नाहीं.

गृहसौख्याप्रीत्यर्थ धनाची ही आवश्यकता पाहिली आणि हिंदुस्थानच्या आजच्या स्थितीचा विचार केला म्हणजे जीव पिळवटून जातो! परकीय सत्तेनें चालविलेल्या बेहाय लुटीनें आणि दुष्काळांनीं सुवर्णभूमि म्हणून गाजलेला हिंदुस्थान आज दारिद्र्यानें किती गांजलेला आहे! व्यापार परक्यांनीं लुबाडलेला, कारागिरी यांत्रिक युगानें ठार केलेली आणि शेती केवळ मेघराजाच्या कृपेवर अवलंबून. उद्योग करून धनोपार्जन करावयाचें म्हटलें तरी वाव कुठें आहे? समाजांतील पांढरपेशावर्गाला तुटपुंज्या पगाराच्या नोकरीपेशावांचून दुसरें गत्यंतर नाहीं. धन मिळवायचें किती, खर्च करावयाचें किती आणि शिल्लक टाकावयाचें किती! — खरोखर जन्माची बिटंबना! उद्योग

व उत्साह यांचें कितीही अवसान आणिलें तरी विशेष उपयोग होत नाहीं, कुचंबणा थांबत नाहीं, खात्रीचा मार्ग सांपडत नाहीं. सारें हिंदुस्थान याच भीषण परिस्थितीमुळें निराश बनलेलें आहे. असो.

असें आहे तरी निरुपायांतील उपाय म्हणून हिंदी तरुणानें प्रयत्नदेवावर विश्वास ठेवून धनोपार्जनाकरितां झटलें पाहिजे व आतां काळोख असला तरी पुढें पहाट आहे हें ओळखून आशावाद स्वीकारला पाहिजे.

अमूक एका पद्धतीनें उद्योग करीत राहिल्यास मनुष्यावर लक्ष्मीची कृपा होतें असें जरी निश्चयानें सांगतां येत नाहीं तरी उद्योगी पुरुष तिच्या संबंधांत फारसा विफलमनोरथ होत नाहीं असें जगांतील सर्व पंडितांचें म्हणणें आहे. तेव्हां त्यावर श्रद्धा ठेऊन मनुस्मृतींत म्हटल्याप्रमाणें:—

नात्मानमवमन्येत पूर्वाभिरसमृद्धिभिः ।
आमृत्योः श्रियमन्विच्छेन्नैनां मन्येत दुर्लभाम् ॥

परंपरागत संपत्ती नाहीं म्हणून किंवा तिच्या प्राप्तीकरितां पूर्वी केलेले प्रयत्न व्यर्थ गेले आहेत म्हणून स्वतःचा अवमान करूं नये. ( म्हणजे मी भाग्यहीन आहे, मला धन प्राप्त होणारच नाहीं, अशा समजुतीवर स्वस्थ बसूं नये. ) तर मरण प्राप्त होईपर्यंत ( म्हणजे शेवटचा श्वास सोडीपर्यंत ) श्री मिळविण्याकरितां यत्न करीत असावें. ती दुर्लभ आहे असें मानूं नये.

हा उपदेश उपेक्षणीय नाहीं. संसारी तरुणानें तो मनीं वागवून धनोपार्जनार्थ आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करावा. सामान्य

लोकांनींच नव्हे तर ज्यांचेवर लक्ष्मीचें कृपाछत्र आहे, त्यांनींही तिचें चंचलत्व जाणून जागरूक राहावें. असो.

धनोपार्जन करून गृहसौख्यास स्थिरता आणावयाची झाल्यास तीन गोष्टी जमून आल्या पाहिजेत. १ सपाटून धन मिळणें. २ मिळकतीपेक्षां खर्च कमी असणें व ३ संचय होत जाणें. परंतु खेदाची गोष्ट अशी कीं, आजकाल बहुतेक संसारिक लोकांच्या आयुष्यांत या त्रिकुटाचा समन्वय कधींच जुळून येत नाहीं. तिघांचें प्रमाण एकमेकाशीं अगदींच व्यस्त राहातें. आयरूपी धनाची गंगा शक्य तितक्या सूक्ष्म धारेनें प्रगट होतें आणि व्ययाच्या समुद्राकडे मात्र ती सहस्र मुखांनीं धांवते. मग संचय होणार कोठून?—उलट त्याच्या जागीं ऋणाचा उकिरडा मात्र दिसूं लागतो.

सध्या आपल्या समाजांतील संसारिकाच्या आयव्ययाचें सामान्य स्वरूप खालीं दिल्याप्रमाणें आहे:—

| आय | व्यय |
|---|---|
| १ पगार | १ भोजनखर्च |
| २ शेतीचें उत्पन्न | २ कपडालत्ता |
| ३ व्यापारांतील नफा | ३ औषधपाणी |
| ४ व्याजबट्टा | ४ प्रवास व टपाल |
| ५ घरभाडें | ५ घरभाडें |
| | ६ हौस |
| | ७ कर्जफेड |
| | ८ दानधर्म |
| | ९ मुलांचें शिक्षण |
| | १० एखादा सरकारी कर |

अगदीं ठोकळ मानानें हिशेब केला तरी आय एकपट तर खर्च दुप्पट ! पांच तोंडांनीं धन आंत यायचें तर तें दहा तोंडांनीं बाहेर पडायचें ! काय हें व्यस्त प्रमाण ! अशा स्थितींत संचयाचा जन्म तरी संभवेल काय !—बरें, जमेच्या बाबी तरी सर्वांच्या वाट्याला सारख्या येतात का ? मुळींच नाहीं. पांचीं तोंडांनीं धन मिळणारा भाग्यवान् एखादा. एक किंवा दोन तोंडें म्हणजे शिकस्त. तीन म्हणजे डोकीवरून पाणी गेलें. असें असतां खर्चाचीं सदरें मात्र सर्वांच्या पिशवीला जळवाप्रमाणें चिकटलेलीं असतात. एकादें सदर नसलेला भाग्यवान् एखादाच ! याच्याही पुढची पायरी म्हणजे कांहीं संकटापायीं मिळकत कमी होणें किंवा अजिबाद बंद पडणें आणि खर्चाचीं भगदाडें मोठीं होणें ! ही दुर्दैवाची सीमाच म्हणावयाची. अशा वेळीं संचयाची कल्पना स्वप्नांत तरी अमलांत येईल काय ? बिकट कोडें आहे खरें.

आय–व्यय–संचयाचें हें तिकोनी कोडें ' जाऊं दे कीं. ' म्हणून दूर सारता आलें असतें तर किती मौज झाली असती ! मनुष्याच्या मागें लागलेल्या चिंतांचा गोतावळा किती लौकर नाहींसा झाला असता ! परंतु कोणाही संसारी मनुष्यास त्यांतून सुटता येत नाहीं, ही मोठ्या नामुष्कीची गोष्ट आहे. मग जें सोडतां येत नाहीं आणि घाबरलें तर मानगुटीला बसतें, त्याला कांहीं विचारानें आपल्या पकडींत आणण्याचा कावा लढवला पाहिजे. या करितां ह्या तिकोनी कोड्याचें खरें स्वरूप काय आहे, तें उग्र का दिसतें आणि कोणता उपाय योजिल्यास तें सौम्य होईल याचा विचार करूं.

सकृद्दर्शनीं या कोड्यांत न समजण्यासारखें कांहीं नाहीं. आप-

त्याला मिळणारें धन ती जमा. बाहेर जाणारें तो खर्च आणि या दोघांच्या ओढाताणींत आपल्याजवळ कांहीं शिल्लक राहिलेंच तर तो संचय. जमेपेक्षा खर्च कमी केला कीं संचयाचा जन्म झालाच. सारा उघडा हिशेब आहे ! मग घोडें अडतें कोठें?—उथळ विचार केला जातो म्हणून. केवळ वरच्या साधेपणाकडे पाहून याची किल्ली सांपडणार नाहीं. एखादी अनोळखी नदी ओलांडतांना तिच्या पात्रांत मध्यभागीं हिरवट झुडपाचीं टोकें दिसतात. एवढ्या अंदाजावर ती उथळ आहे असें मानून तिच्यांत शिरणें जसें वेडेपणाचें आहे, तसेंच या तिकोनी कोड्याचें वरचें साधें स्वरूप पाहून तें सुलभ आहे असें मानणें धोक्याचें आहे. म्हणून जरा शोधक दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

आय—व्यय व संचय यांचेविषयीं थोडासा विचार केल्यावर असें दिसून येतें कीं, या प्रत्येकास दुहेरी रूप आहे. तें असें:—

आय=आयती व कष्टाची.

व्यय=उत्पादक व अनुत्पादक.

संचय=स्तुत्य व निंद्य.

कोणतीही वस्तु मनुष्यास अनायासें लाभली तर तिची किंमत त्यास कमी वाटतें. किंबहुना तिकडे मग त्याचें लक्षच जात नाही. आयती संपत्ति मिळणें किंवा बापदाद्यांनीं मिळवून ठेविलेल्या संपत्तींतून आयती आय येत राहाणें या गोष्टी मोठ्या भाग्याच्या असल्या तरी तें भाग्य कितीकाळ टिकेल, हा प्रश्न आहे. भोग्य वस्तू कष्टानें मिळविलेली नसली म्हणजे मनुष्य तिचा उपयोग बेदरकारपणें करतो. ती लौकर नाश पावती तरी त्याची दिक्कत त्यास वाटत नाहीं. श्रीमंतांचीं मुलें

उधळी व चैनी निघतात, याचें कारण त्यांच्या हातांत खेळणाऱ्या धनाला त्यांनीं कष्टाची किंमत काडीइतकीही दिलेली नसतें हेंच होय. गरीबींत जन्मास आलेला एखादा कल्पक मनुष्य ज्यावेळीं आपल्या ध्येयाकरितां झगडत असतो आणि ज्यावेळीं त्यास भांडवलाची अडचण पदोपदी भासतें; त्यावेळीं त्यास त्याच्या समोरच चाललेल्या एखाद्या श्रीमंताची उधळपट्टी पाहून सुखेदाश्चर्य वाटतें. तो कष्टी होऊन मनांत म्हणतो: याच्या इतकें धन मजजवळ असतें तर ?— पण ही त्याची समजूत अगदीं चुकीची असते. खरोखर त्याच्या जवळ तसें धन असतें तर त्यानें उधळेपणांत दुसऱ्या कोणत्याहि श्रीमंतास लाजविण्याइतकी आघाडी खास मारिली असती. संपत्तीचें मूल्य ध्यानीं आल्यावर तिला कोण उधळील ? गरीबास तें कळतें व श्रीमंतास कळत नाहीं. म्हणूनच पहिला पै पैला जपण्याची धडपड करतो आणि दुसरा रुपयांनाहि तितकी किंमत देत नाहीं.

आयती संपत्ति हातांत आली कीं, तिचा खर्च कसा करावयाचा हा विचार उद्भवणें कठिणच आहे. मग खर्चास ताळ नाहीं आणि हिशेबास मेळ नाहीं. या आंधळेपणांत दूरदृष्टीचा केव्हांच नाश झालेला असतो. मग भविष्यकाळांतील कठिण प्रसंग दिसणार कोणाला ? श्रीमंत माणसें हळू हळू भिकेला लागण्याचें दुसरें कोणतेंही कारण नाहीं. म्हणून कोणत्याहि संसारी मनुष्यानें आपली आयती आय किती व कष्टाची किती, याचा विचार अगोदर करावा. म्हणजे खर्चावर योग्य नियंत्रण घालण्यास सोपें जाईल. कष्टानें मिळविलेल्या धनाचा दुरुपयोग करण्यास मूर्खावांचून कोणीही धजणार नाहीं. बागेंत स्वकष्टानें लाविलेल्या फुलझाडांचीं फुलें तोड-

तांनासुद्धां मनुष्यास विचार पडतो व दुसऱ्या कोणी त्याच्या त्या झाडास वेडावाकडा हात लावला तर तो त्यास खपत नाहीं. मग निढळाचा घाम गाळून मिळविलेल्या द्रव्याची हेळसांड उद्योगी मनुष्याकडून कशी होईल? त्याच्या हातून अविचारानें खर्च होणें कठिणच आहे. जपायचें तें आयत्या मिळकतीबद्दल. आतां हें कबूलच आहे कीं, असें भाग्य मोठ्या प्रमाणावर थोड्यांना लाभलेलें असते. पण ज्यांना तें कमी जास्त प्रमाणांत लाभलेलें आहे, त्यांनीं ही दक्षता घेतली पाहिजे. अशा लोकांनीं हें ठरवलें पाहिजे कीं, आयती आय खर्च करण्यास आपल्यास अधिकारच नाहीं. स्वकष्टानें जेवढी चालू मिळकत आहे तेवढ्यांतच उपजीविका करावयाची आणि आयती आय संचयाचें स्वाधीन करावयाची. अगदीं जिवावर बेतल्यावांचून या संग्रहास हात लावावयाचा नाहीं असा निश्चयच केलेला असला पाहिजे. म्हणजे रुपयांत आठ आणे तरी काम होईल. असा निश्चय करणें फार कठिण आहे व अंमलांत आणणें तर त्यांहून कठिण आहे यांत शंका नाहीं. पण तसें केलेंच पाहिजे. तरच संसाराच्या आडांत थोडेसें संचयाचें पाणी राहील. आणि कठिण प्रसंगीं तें आपला जीव, आरोग्य व चिंता वांचवील.

संसाराचें स्वरूप असें कांहीं चमत्कारिक आहे कीं, खर्चाच्या बाबी भुताप्रमाणें अकस्मात उद्भवतात. कष्टाची आय त्या सर्वांना पुरून उरण्याइतकी ऐस पैस नसते. अशा वेळीं संचयास हात लावणें भागच पडतें. इच्छा नसताही हा धक्का सहन करावा लागतो. यांतून कसें निभावून जावयाचें?—खर्चाचीं व संग्रहाचीं जीं दुहेरी

रूपें आहेत, त्यांचे विषयीं थोडा विचार केल्यास कांहीं मार्ग सापडेल काय ?–प्रयत्न करून पाहूं.

मागें सांगितलेंच आहे कीं, खर्च दोन प्रकारचे आहेत. एक उत्पादक व दुसरा अनुत्पादक. पहिला न केला तर आणि दुसरा केला तर दोष घडतो.

ज्या खर्चाच्या योगानें आपलें व आपल्या कुटुंबांतील मंडळीचें धारण पोषण होतें, शरीरास व मनास सुख लाभते आणि नवीन लाभ, कीर्ति, लोकप्रीति यांची प्राप्ती होते, तो उत्पादक होय. भोजनखर्च, कपडालत्ता, औषधपाणी इत्यादि गोष्टीबद्दल होणारा बहुतेक खर्च उत्पादक समजला पाहिजे. कारण याचा मोबदला आपणास अनेक प्रकारें मिळत असतो. संसारांत हा खर्च करावा लागतो व केला पाहिजे. त्याचप्रमाणें दानधर्म, हौस व शिष्टाचारपालनार्थ होणारा खर्चही उत्पादकच मानला पाहिजे. मात्र त्यांत तारतम्य राखलें पाहिजे व आपली योग्यता पाहून पाऊल टाकलें पाहिजे.

या व्यतिरिक्त होणारा बहुतेक खर्च अनुत्पादक असतो, यालाच उधळपट्टी हें दुसरें नांव आहे. समाजानें निंद्य ठरविलेल्या व्यसनापैकीं एक किंवा अनेक व्यसनें जडणें, खोट्या अभिमानाला बळी पडून अनाठायीं औदार्य दाखविणें, लॉटरी व रेसेस यांचा मोह उत्पन्न होणें, तकलुपी कीर्ति हवीशी वाटणें इत्यादि इत्यादि सार्‍या गोष्टी मनुष्यास अनुत्पादक खर्च करण्यास शिकवतात आणि अल्पावधींत त्यास धुळीला मिळवतात! आयत्या संपत्तीवर विराजमान झालेल्या लोकांना हा असला खर्चच आवश्यक वाटतो.

म्हणूनच त्यांच्या खर्चाचा ओघ बेसुमार वाढत जाऊन शेवटीं त्यांना कंगाल बनवतो. धनिकांनीं याचा विचार केला पाहिजेच; पण मध्यम व कनिष्ठ लोकांनींहि या विषयीं जागरूक असलें पाहिजे. आळसाप्रमाणें हा अनुत्पादक खर्चहि संसारी मनुष्याच्या घरांत न कळत घुसतो आणि संधि मिळतांच डाव साधतो.

वर सांगितल्याप्रमाणें खर्चाचा विचार केल्यास धनसंचयाकरितां फारसा त्रास पडणार नाहीं व त्याचें स्तुत्य स्वरूप कोणतें व निंद्य कोणतें याचा उलगडा होईल.

आपल्या योग्यतेप्रमाणें संसारांतील सर्व उत्पादक खर्च भागवून जी शिल्लक उरेल तोच संचय स्तुत्य होय. मिळत असतांही कदान्न खायचें, सदा दरिद्री वेषांत असायचें, जिवावरचें दुखणें आलें तरी गांठीचा पैसा सोडावयाचा नाहीं आणि पैकरितांहि माणुसकीवर पाणी सोडण्यास तयार व्हावयाचें. असें वागून धनाचे हांडे भरून ठेविले तरी त्याचा काय उपयोग ? असला संचय लहान किंवा मोठा असो तो निंद्यच होय. संसारी मनुष्यानें या दोषालाहि जपलें पाहिजे. संसारांत अडचणी आल्यावर त्रास होऊं नये म्हणून संचय करावयाचा असतो. त्याच्यामुळें सदाचेंच दैन्य मागें लागल्यावर मग तो सुखावह कसा होईल ? असो.

आय–व्यय व संचय या तिकोनी कोड्याचें सामान्य स्वरूप असें आहे. पण तेवढ्यानें कोणाही मनुष्यास त्याच्यावर मनापासून हुकमत चालवितां येणार नाहीं. त्याकरितां स्वतंत्र प्रयत्न पाहिजे. त्याचें नांव **जमाखर्च ठेवणें**. हीच त्याची किल्ली आहे. हिचा उप-

योग जो करील त्यास भ्रमांत पडावें लागणार नाहीं आणि त्याचीं अनेक संकटें दूर राहतील.

ज्याप्रमाणें व्यापारांत त्याचप्रमाणें संसारांत जमाखर्च ठेवणें अत्यंत अगत्याचें आहे. ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. गति उत्पन्न करणाऱ्या यंत्रांत ती निर्माण करण्याची व्यवस्था जशी केलेली असते, तशीच ती थांबविण्याचीहि केलेली असते. तसें न होईल तर तें यंत्र निरुपयोगी ठरेल. पैशाच्या व्यवहारालाही हाच नियम लागू आहे. त्याची गति ठरविण्याकरितां जमाखर्च नोंदण्याची काळजी घेतलीच पाहिजे.

अलीकडे पुष्कळांना हें कार्य कटकटीचें वाटतें. त्यांचें म्हणणें असें पडतें कीं, आमची जमा काय आणि तिचा हिशोब तो काय ठेवायचा ? येईल ती जमा, होईल तो खर्च, राहील ती शिल्लक. ती राहण्याची आशा नाहीं. कारण जमा वाढत नाहीं, खर्च थांबत नाहीं. मग त्यांना कागदाच्या स्वाधीन करून तरी काय होणार ? हें म्हणणं दर्शनी सरळ असलें तरी तें वेडेपणाचें आहे. तें तथ्यपूर्ण नव्हे. जमाखर्च ठेवणें हा व्यवहारज्ञ पुरुषाचा तृतीय नेत्र आहे. तो मिटणें योग्य कसें होईल ? पूर्वी आमच्या लोकांच्या अंगी हा अजागळपणा नव्हता. त्यावेळीं व्यापारी लोकाप्रमाणेंच इतर पांढरपेशे लोक घरटी जमाखर्च ठेवण्याची काळजी घेत. अलीकडे डायऱ्या घरोघरीं झाल्या आहेत; पण त्यांचा उपयोग करणारे लोक मात्र शेंकडा दहाही नाहींत. जमाखर्च ठेवण्याची ही हेळसांड गृहसौख्याला अप्रत्यक्ष बाधल्याशिवाय राहात नाहीं. जमाखर्च न ठेवता संसार करणें म्हणजे अंधेऱ्या रात्रीं कंदील न घेतां अनवाणी कांट्यांतून प्रवास

करण्याइतकें धोक्याचें आहे. हा बोध एकदम पटणार नाहीं.पण ज्यांना शंका असेल त्यांनीं एखाद्या व्यवहारचतुर मनुष्याचा सल्ला घ्यावा.

संसारांत होणारा जमाखर्च कागदावर उतरूं लागल्यावर लगेच जमा वाढत नाहीं किंवा खर्चाला पायबंद घालता येत नाहीं, ही गोष्ट खरी. पण पैसा येतो कसा आणि जातो कोठें ? एवढें ज्ञान तरी स्पष्ट होईल ना ? मग त्याची कांहींच किंमत नाहीं का ?

याकरितां प्रत्येक गृहस्थानें जमाखर्च ठेवण्यास अगोदर शिकलें पाहिजे व *त्याचें महत्त्व आपल्या* पत्नीला समजाऊन सांगितलें पाहिजे. मिळकत कितीहि अल्प असो, खर्च कितीही प्रकारचा व वेळीं जमेच्या बाहेर असो, तो कागदावर आला म्हणजे त्यास आळा घालण्याचा मार्ग सांपडतो.

दरमहा पंचवीस रुपये प्राप्ती असणाऱ्या इसमानें शुद्ध स्वरूपाचा जमाखर्च ठेवला असल्यास, त्याची पत्नी जर इरकली लुगड्याचा हट्ट घेऊन बसली, तर तिला असें समजाऊन सांगतां येईल कीं, हा जमाखर्च पहा आणि मग पांच रुपयाचें साधें पातळ घेऊं कीं, पंधरा रुपयाचें लुगडें घेऊं तें तूंच सांग—जमाखर्चाचें महत्त्व कळून घेतलेली कोणतीहि सुगृहिणी आंवाक्याबाहेर खर्च करण्याचा हट्ट धरणार नाहीं.

जमाखर्च ठेवण्याचा दुसरा उपयोग म्हणजे अवास्तव खर्च कुठें होतो हें कळतें. कंजुष मनुष्याखेरीज इतर प्रत्येक मनुष्य पैसा हातांत येतांच थोडा तरी उदारमनस्क उर्फ उधळ्या होतो. समजा, पगार हातांत पडला आहे. वाटेनें येतांना कापडाच्या फुलांचा गुच्छ विक्रीस असलेला दिसला. तो मोठा मोहक होता. घेण्याची इच्छा

स्वाभाविक उत्पन्न झाली.जवळ पैसा व मनांत इच्छा असली कीं, पैशाला पाय फुटले म्हणून समजावें. गुच्छ घेतल्यानंतर प्रश्न उपस्थित झाला तो ठेवायचा कुठें ? म्हणून लगेच जवळच्या कांच मालाच्या दुकानांतून एक सुंदर फुलदान घेतलें. पण घरीं येतांच तें फुलदान कुठें ठेवायचें हा प्रश्न आलाच पुढें. कारण हा राहणार साडेतीन खणाच्या खोलींत सहकुटुंब सहपरिवार ! मग मनांत यायचें कीं, तो गुच्छ घेतला नसता तरी पुरवतें. हा पश्चात्ताप तेंवढ्या वेळापुरता तरी तीव्र असतो. पण तो जर जमाखर्चांत कागदांवर उतरला नसेल, तर तो परिणामकारक होत नाहीं आणि पुनः आपल्या हातून तशाच प्रकारची उधळपट्टी होत राहते.

पुढें असें सतत होऊं लागलें म्हणजे तशी संवयच जडते. मग आवश्यक खर्च कोणता व अनावश्यक कोणता ? याचें तारतम्य राहात नाहीं. खर्चाचें तोंड आपोआपच मोठें होत जातें. शेतांत एखादीशी चोळ पडली तरी शहाण्या शेतकऱ्यास तिचा विचार करावा लागतो. नाहींतर फार थोड्या अवधींत ती सबंध शेत खरडून नेण्याइतकी बलवान बनतें. मग मोठी ताल घालूनही भागत नाहीं. खर्चाला हीच उपमा शोभण्यासारखी आहे. त्याचें भगदाड अकारण वाढूं देता उपयोगी नाहीं. ही गोष्ट जमाखर्चानेंच शक्य आहे. आपल्या हातून होणारे वेडेपणाचे खर्च सतत डोळ्यापुढें आले तर आपणास लाज वाटेल व त्यास निर्बंध घालण्यास आपण शिकूं.

या करितां जमाखर्च ठेवण्याची सवय लावून घ्या आणि महिना संपतांच तो ताडून पाहून पुढच्या महिन्याचे अंदाजपत्र ठरवा. तें ठरवतांना अनावश्यक खर्च न करण्याचा निश्चय करा. पहिल्यांदा

हें सारें जड जाईल; पण त्यांत खर्चाला पायबंद घालण्याची युक्ति खास सांपडेल.

संसारांत खर्चाला आणखी एक असें तोंड आहे कीं, जें बंद करणें शक्यच नाहीं. पण दुर्लक्ष केलें तर आवाक्याबाहेर जातें आणि मग पदोपदीं तोंडांत मारून घेण्याची पाळी येतें.

**व्यवहार सांभाळणें** असें याला अगदीं साधें भोळें नांव आहे. पण बाळ असे गुणी आहे कीं, सारखे छडीच्या धाकांत न ठेवलें तर हां हां म्हणतां गृहसौख्याचा चिवडा करील. इतरांना तो खमंग लागेल पण ज्याच्या घरीं तो तयार होईल, त्याच्या तोंडाची आगडोंब होईल.

समाजांतील समान धर्माचीं व योग्यतेचीं कुटुंबें प्रेमानें एकत्र होण्यास **व्यवहार सांभाळणें** ही एक महत्वाची गोष्ट आहे यांत शंकाच नाहीं. सलोखा सांभाळण्याकरितां, प्रेम दर्शविण्याकरितां आणि आदरसत्कार करण्याकरितां परस्पर देवाण घेवाण झालीच पाहिजे. पण ती कशी, कितपत व केव्हां व्हावी याचे कांहींच निर्बंध नसल्यामुळें नव्यानेंच संसारांत पडलेल्या स्त्रीपुरुषांना वारंवार बिचकल्यासारखें होतें आणि काय करावें, याचा बरोबर उलगडा न झाल्यामुळें खर्चापरी खर्च होऊन पुन्हा अपेश पदरीं येतें.

घराबाहेर चैन करण्यांत पुरुष जसा सोळा आणे मूर्ख ठरतो, तशीच व्यवहार सांभाळण्यांत बायको मूर्ख ठरते. अमक्याची सून लेक बाळंतीण झाली, बाळंतविडा केलाच पाहिजे. तमक्याच्या सुनेला न्हाण आलें, वाढणें नेलें पाहिजे. अमकीला डोहाळजेवण केलें नाहीं तर बरें दिसणार नाहीं. त्या याना एक खण तरी दिला पाहिजे.

इत्यादि इत्यादि इतके व्यवहार प्रत्यही उपस्थित होतात व त्यांत नायकांचें व्यवहारज्ञान इतकें अजब असतें कीं, तें जसेच्या तसें अनुसरलें तर कुबेरही टेकीला येईल. मग सामान्य गृहस्थ कोण झाडाचा पाला !

पुरुषांना हे उपटसुंभ खर्च करण्याची मनापासून इच्छा नसली तरी स्त्रियांच्या इच्छेला किंवा आग्रहाला मान देणें त्यांना भाग पडते. स्त्रिया हे खर्च करण्यास उत्सुक असतात,. याचा अर्थ त्यांना कांहीं-तरी उधळपट्टी हवी असते असें मुळींच नाहीं. सामाजिक लौकि-काची हाव त्यांना पुरुषापेक्षां विशेष असते. त्यांना मोडून काढण्यांत किंवा अप्रसन्न ठेवण्यांत विशेष अर्थ नाहीं. यापेक्षां असा प्रसंग उप-स्थित होतांच आपल्या स्त्रियांपुढें हे प्रश्न टाकावे. ज्या कुटुंबाशीं व्यवहार सांभाळावयाचा त्यांचा व आपला संबंध कशा धर्तीचा आहे ? तें कुटुंब आप्त, इष्टमित्र किंवा शेजारी या पैकीं कोणत्या सदरांतील आहे ? आपणांस आपल्या योग्यतेप्रमाणें किती खर्च करतां येईल ? तो कोणत्या धर्तीनें केला असतां आटोक्यांत राहील आणि लौकि-कांत बरें दिसेल ?

बेछूट नकार देऊन मागून त्रास करीत कांहींतरी करण्यापेक्षां वरील प्रश्न सामोपचारानें सोडविल्यास पुष्कळच उपयोग होईल. जगाला खुश करणें व त्याच्यापासून निर्भेळ भलेपणा मिळविणें जवळ जवळ अशक्य आहे, हें स्त्रियांना समजून सांगितलें पाहिजे.

आमचा स्त्रीसमाज अज्ञान स्थितींत ठेविला गेल्यामुळें बाहे-रच्या स्थितीची त्यांना जाणीवच नाहीं. त्यामुळें संसारांतील जमा-खर्चावर नियंत्रण का पाहिजे, हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं. त्यामुळें

त्यांच्याशीं हुजत न घालतां त्यांना प्रसन्न ठेवणें पुरुषांना जड जातें. याला उत्कृष्ट उपाय म्हणजे जमाखर्च त्यांच्या देखरेखीखालीं ठेवणें. त्यांना त्यांत काय कळतें? अशा कल्पनेनें त्यांना अज्ञानांत ठेवणें म्हणजे घरांत कटकटीला निमंत्रण देण्यासारखें आहे. हात राखून खर्च करण्याची हुशारी जितकी स्त्रियांत असतें, तितकी पुरुषांत असत नाहीं ही अनुभवाची गोष्ट आहे. घरांतील दूधदुभतें व खाण्यापिण्याचे पदार्थ यांची व्यवस्था पहा. पुरुष एका दिवसांत चट्टामट्टा करून मोकळा होईल. उद्याची फिकीर तो करणारच नाहीं. स्त्रियांचे हातून असे सहसा होणार नाहीं. सदर जमाखर्च त्या हात राखून करीत असतात. दुधाचा रतीब एवढा तेवढा असला तरी सर्वांना कालवण पुरवून पुनः त्यांतूनच लोण्याची बिट्टी काढण्याकडे त्यांचें लक्ष असतें. घरोघरच्या गृहिणी हा आय–व्यय–संचय प्रत्यहीं दाखवीत आहेत. त्यांनाच पैशाचा जमाखर्च योग्य प्रमाणांत ठेऊन थोडातरी संचय करणें जड जाईल काय? म्हणून माझ्या तरुण मित्रांना मी अशी शिफारस करितों कीं, त्यांनीं आपल्या स्त्रियांना ज्ञानी करावें आणि सांसारिक जमाखर्च त्यांच्या सल्ल्यानें ठेवावा. फायदा दिसल्यावांचून राहणार नाहीं. असो.

जमाखर्चावर नजर ठेऊन संचय करण्याचें योजिल्यावर यदाकदाचित् संचय झाला नाहीं तर निदान कर्ज तरी होत नाहीं. **संसारांत अनृणी असणें यांत फार मोठें सुख, समाधान व सोय आहे.** ज्यास कर्ज नाहीं त्याची पत दांडगी असते व तो निश्चिंत असतो.

संपत्ती मिळविण्यास जितकी अक्कल लागते, त्यापेक्षां ती सांभाळण्यास जास्त लागते म्हणतात तें कांहीं खोटें नाहीं. परिश्रमानें व

स्वतःच्या अक्कलहुशारीनें मिळूं लागलेला पैसा सुदैवानें भरपूर मिळूं लागला कीं, अत्यंत शहाणा म्हणविणाऱ्या मनुष्याचें डोकेंही ताळ्यावर राहात नाहीं. आपण करूं तें होईल हा अहंकार जागृत होतो. तोंडपुजे मित्रांचा व आप्तांचा गोतावळा जमतो. खर्चास ताळ रहात नाहीं. उजेड संपला कीं अंधेर असतो. उत्कर्षाचा वसंत संपला कीं, अपकर्षाचा उन्हाळा सुरूं होतो हा साधा नियम लक्षांत राहात नाहीं. जवळ संग्रह करण्याची सुबुद्धि सुचत नाहीं. पुढें आपत्काल सुरूं होतो. त्याचा वास अगोदर भोवतालच्या लोकांना येऊं लागतो. मग त्यांत जे स्वार्थी आहेत ते आपल्या पोळ्या अगोदर भाजून घेतात. आणि तें मुख्य धन्याच्या लक्षांत येऊं नये म्हणून तोंडभर स्तुतीचा पावा वाजवीत असतात. कांहीं काळानें संपत्ती येण्याचे झरे बंद होतात. त्याबरोबर आपल्याभोंवती किलबिल करून आपलें मनोरंजन करणारीं पाखरें उडून जातात. बरें तीं बाहेर जाऊन कृतज्ञतेनें गप्प बसतात का ? मुळींच नाहीं. आपल्याकडे खर्ची टाकलेल्या साऱ्या स्तुतीचा वचपा निंदेनें भरून काढतात व आपण एक अगदीं नालायख मनुष्य आहों अशी जगाची खात्री पटवून देतात.

याकरितां संपत्कालीं मनुष्यानें फार सावध राहिलें पाहिजे.

चोहोंकडून विजय, यश, पैसा येऊं लागतांच शहाण्या माणसानें डोकें ताळ्यावर ठेऊन शक्य तो संचय करावा. तोंडपुजे लोकांच्या नादीं लागूं नये, भपका दाखविण्याच्या भरीस पडूं नये आणि खोट्या अभिमानाच्या भरीं पडून अवास्तव खर्च करूं नये. चंद्राच्या सोळा कळा पूर्ण होतात, याचा अर्थच दुसरेच दिवशीं वद्य पक्षाला सुरुवात व्हावयाची असते. धन-मान-यश या बाबतींतहि हाच नियम आहे, हें मनास शिकवावें.

सुखकालांत घडलेली अळीएवढी चूकच दुःखकालांत भयंकर सर्पाचें स्वरूप धारण करीत असते. जग दुतोंडी आहे. तें एका तोंडानें स्तुति करीत असतें व त्याच वेळीं किंचित् मान मुरडून निंदाहि करण्यांत गुंतलेलें असतें. त्याच्या खुशीनाखुशीकडे लक्ष देऊं नये. भावी कालावर नजर टाकून संचय करावा.

जमेकरितां अविश्रांत श्रम करावे तेव्हां कार्यभाग होतो. खर्च हा खालीं वहात जाणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणें आहे. तो आपोआप होतो. तेव्हां त्यास थोडा निश्चयाचा व दक्षतेचा बंधारा घालून संचय होण्याची खटपट करावी. जीवनकलहाच्या तीव्रतेमुळें या बंधाऱ्यास मधून मधून धक्के बसण्याचा संभव आहे. पण पूर्वदक्षतेमुळें साराच बांध पडणार नाहीं.

संचय करण्याचे मार्ग अनेक आहेत. दागदागीनें करणें, जमीन शेतवाडी विकत घेणें, बँकेंत पैसे ठेवणें, एखाद्या कंपनीचे शेअर घेणें, विमा उतरणें इत्यादि.

या मार्गांपैकीं शेवटचा विमा उतरणें हा मार्ग गरीब लोकांना अति उपयुक्त आणि त्यांच्या आवाक्यांतील आहे. याकरितां प्रत्येक तरुणानें आपल्या शक्तिप्रमाणें शहाजोग कंपनींत विमा उतरावा.

विमा उतरण्या न उतरण्याबद्दल अनेक समजुती आहेत. त्यांत कांहीं सयुक्तिक असल्या तरी विमा उतरण्यांत कसलाच धोका नाहीं, हें निश्चित होय. विम्याचा संचय आपणाकडून कांहींसा बलात्कारानें केला जातो. यामुळें तो होतोच होतो. असो.

या दृष्टीनें जमाखर्च ठेवणें व त्यांची सांगड घालून त्यांतून संचय निर्माण करणें किती आवश्यक आहे, हें ज्याचें त्यानें ठरवावें. दुसऱ्यानें सांगून कळायचे नाहीं, कळलें तरी पटायचें नाहीं आणि

पटले तरी वळायचें नाहीं. लहानपणीं अभ्यास कर, खेळूं नको असें सांगण्यास गुरू व पालक असतात. आलेल्या कटु अनुभवानें वृद्धपणीं मनुष्य पुष्कळच सावध किंवा भित्रा झालेला असतो. शिवाय त्याची गात्रेंहि विगलित होत चाललेली असतात; त्यामुळें सृष्टीचें किंवा समाजाचे नियम तो पाळूं शकतो तारुण्यकालच असा आहे कीं, त्यावेळीं आपणच आपले गुरु, शास्ते, पालक किंवा मित्र असतो. तेव्हां ही असहाय्य किंवा स्वावलंबी स्थिति ध्यानीं घेऊन तिला अनुसरून संसाररथाची चालक शक्ति जें धन त्याच्यावर समंजस दृष्टि ठेवावी.

याकरितां आतांपर्यंत कळलें नसलें तर फिकीर करूं नका. आतांच कागद पेन्सील हातीं घेऊन आय किती आहे, खर्चाच्या वाटा किती आहेत, त्यापैकीं कोणत्या बंद किंवा कमी करण्यासारख्या आहेत, संचय होण्यास वाव आहे कीं नाहीं, असल्यास तो वाढविणे योग्य कीं अयोग्य इत्यादि अनेक गोष्टींचा विचार करा.

एकदम घाई करूं नका. उतावीळपणानें कोणतीहि गोष्ट नीट साधत नाहीं. जमेची बाब एकदम सुधारणें किंवा खर्चाची तोंडें एकदम बंद करणें किंवा संचय होऊं लागणें शक्य नाहीं; पण **'थेंबें थेंबें तळें साचें'** ही सामान्य म्हण ध्यानीं घेऊन सावध व्हा, नियम ठरवा आणि त्याप्रमाणें वागूं लागा. म्हणजे वर्ष सहा महिन्याचे आंत तुमच्या जमाखर्चात कांहीं तरी सुधारणा निःसंशय दिसेल. मग संचयाचा मार्ग सांपडेल आणि तो अंमलांत आणणें सोपें जाईल. थोडक्यांत सांगायचें तर खर्चाचें प्रमाण जमेच्या आंत असूं द्या म्हणजे संचय होईल.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे ग्रं. क्र. ... प्रत

लेखांक सहावा

# गृहसौख्यांत मुलांबाळांचें स्थान.

## लेखांक सहावा.

# गृहसौख्यांत मुलांबाळांचें स्थान.

यादृशं वपते बीजं क्षेत्रमासाद्य कर्षकः ।
सुकृते दुष्कृते वापि तादृशं लभते फलम् ॥

शेतकरी शेतांत ज्या प्रकारचें बीज टाकतो त्या प्रकारचें त्यास फल मिळतें. जर चांगलें बी पेरलें तर चांगलें व वाइट पेरलें तर वाईट फल येतें.

महाभारत.

आपापलीं कर्तव्यें समजून घेऊन पतिपत्नीनें संसाराचा डाव मांडल्यावर आणि दोघांचीही जवानी दाम्पत्यप्रेमाचें अनिर्वचनीय सौख्य उपभोगण्यांत जाऊं लागल्यावर त्यांच्या गृहांत साक्षात् स्वर्ग अवतरेल, यांत नवल तें काय ?

असा कांहीं काल लोटल्यावर त्यांचें संसारसुख अनंतपटीनें वाढावें व आपला संसार आणखी उत्साहानें करण्यास त्यांना उमेद यावी म्हणूनच जणूंकाय निसर्ग त्यांना अपत्याची देणगी बहाल करितो! गृहराज्यांत बालकाचें आगमन ही एक मोठी आनंदाची पर्वणी आहे. तीमुळें स्त्रीला आनंद, पुरुषाला आनंद, कुटुंबाला आनंद, भोंवतालच्या साऱ्या समाजाला आनंद! संसारांतील सर्वच लाभ आनंददायक असतात. परंतु त्या सर्वांत प्रथमापत्याचा लाभ कांहीं विशेष आहे. त्यास तुलना नाहीं.

'गृहरत्नानि बालकानि' म्हणून जो बालकांचा गौरव करण्यांत येतो तो उगाच नाहीं. दाम्पत्यप्रेमाच्या लतेवर उमलणारें हें सकुमार फूल किती आनंददायक आहे, याचें काय वर्णन करावें ? आकाशांत चांदण्या, वाऱ्यावर पाखरें, लतावृक्षावर फुलें व तळयांत कमळें ज्याप्रमाणें सहजी शोभतात, त्याचप्रमाणें गृहांतील अपत्यरूपी भूषणें त्यास शोभा देतात. गृहाची शोभा गृहिणीमुळें वाढते म्हणतात; पण तिच्या ओटींत मूल नसेल तर ? तिला सारें घर सुनें वाटतें. योग्य वेळीं, योग्य स्थितींत स्त्रीला अपत्यलाभ झालाच पाहिजे.

मातृपदानें स्त्रीला पूर्णत्व आणि पितृपदानें पुरुषास धन्यत्व प्राप्त होतें. अखिल मानवजातीला अपत्यप्राप्तीविषयीं उत्कंठा आणि ती तृप्त झाली म्हणजे परमानंद वाटतो तो यामुळें. गृहराज्यांत मुलांबाळांचें स्थान फार मोठें आहे. त्यांचें आगमन म्हणजे संसाराचा विकास.

अहाहा ! मुलांचें दर्शनहि दृष्टीला किती सुख देतें ! मुलांच्या बाबतींत अशी कोणती गोष्ट आहे कीं जी मनुष्यमात्रास आनंददायक वाटत नाहीं ? त्यांचें खेळणें, हसणें, बोबडे बोलणें, दुडदुड धावणें, इतकेंच नव्हे तर रडणें सुद्धां किती मोहक, कौतुकास्पद व हृदयवेधक असतें. मुलांकडे पाहण्यानेंहि आईच्या दुःखाचा उपशम होतो, पिता जीवनकलहाचे कष्ट विसरतो आणि वृद्धांना म्हातारपणाचा खेद वाटेनासा होतो. रोगग्रस्त माणसांनाहि मुलांचें सान्निध्य प्रिय होतें. संसार विरक्तांनाहि बालराजा रमवूं शकतो.

पुत्रस्पर्शापासून होणाऱ्या आनंदाला तर तुलनाच नाहीं, असें महाभारतकार म्हणतात. शाकुंतलांतील दुष्यंत म्हणतोः—

मुळींच कांहीं कारण नसतां मंद हास्य करितात ।
त्या योगानें थोड्या थोड्या दन्तकळ्या दिसतात ॥
बोल बोबडे मधुर बोलसी रमविती मानस फार ।
अंकावरती बैसायाची उत्कंठा अनिवार ॥
मांडीवरि कटिखांद्यावरि वा करीं अशा तनयास ।
खेळवितांना मलिन यदंगें धन्य होति ते खास ॥
लेलेशास्त्री कृत-म. शाकुंतल.

दुष्यंतानें वर्णिलेला हा आनंद बहुतेक मातापित्यांच्या अनुभवास येत नाहीं काय ?

परंतु संसारांतील हें परम कल्याणकारक सुख मनुष्यास सहजीं लाभणारें नाहीं, हें प्रत्येक स्त्रीपुरुषानें ध्यानांत ठेवावें. जगांत जेवढ्या म्हणून सुखदायक गोष्टी आहेत, त्या स्वभावतः तशा नाहींत. ज्या पध्दतीनें त्यांचा उपभोग घ्यावा किंवा उपयोग करावा, त्या पध्दतीनुरूप त्या सुखमय किंवा दुःखमय होतात. अपत्यलाभालाहि हाच नियम लागू आहे. कशीतरी प्राप्त झालेलीं अपत्यें सुखदायक होतीलच असा विश्वास नाहीं. संततीपासून सुख पाहिजे असेल तर स्त्रीपुरुषांनीं तिच्या आगमनापूर्वीपासून दक्षता घेतली पाहिजे. म्हणजे सृष्टिनियमाप्रमाणें अगोदर कांहींतरी कष्ट आणि मग त्याचें मधुर फळ. परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, इतर कित्येक ज्ञानाप्रमाणें सुप्रजाजननाचें शास्त्रहि आम्ही विसरलों आहों. यामुळें पुष्कळांची समजूत अशी आहे कीं, चांगलीं अपत्त्यें होणें केवळ दैवाधीन आहे. पण वस्तुस्थिति तशी नाहीं. मनोवांच्छित संतति होणें ही गोष्ट कोणाहि

दाम्पत्याच्या हातची आहे असें प्राचीन आर्यांचें मत असून त्यास अर्वाचीन कालाच्या सुप्रजाजननशास्त्रानें दुजोरा दिलेला आहे.

आपल्या योग्यतेनुरूप सुखदायक पत्नी मिळविणें व तिला अनुकूल करून घेणें जसें पुरुषाच्या हातांत आहे; पतीच्या मर्जीप्रमाणें वागून आपल्या पवित्र व प्रेमळ आचरणानें त्यास आपल्या मुठींत आणणें जसें पत्नीच्या स्वाधीन आहे, त्याचप्रमाणें मनोनुकूल अपत्य निर्माण करणें पतिपत्नींच्या हातांत निःसंशय आहे. मुलें फार लौकर होणें, पुष्कळशीं होणें, अगर मुलींच न होणें, झालीं तर अल्पायुषी होणें इत्यादि सर्व गोष्टी पतिपत्नींच्या कृतिवृत्तींवर अवलंबून आहेत.

चांगल्या अपत्यप्राप्तीकरितां दशरथानें केलेला पुत्रकामेष्टि यज्ञ, राजा दिलीपानें केलेली धेनुसेवा, द्रुपदानें द्रोणाच्या नाशाकरितां मागितलेला मुलगा या सर्वांचा इतिहास श्रद्धेनें नव्हे तर मनोवांच्छित संतति निर्माणशास्त्राच्या दृष्टीनें पाहिला तर आपणांस असें खास आढळून येईल कीं, हें थोतांड नव्हे. तें नियमबद्ध असें शास्त्रच आहे. वरील व्यक्तींना आपल्या मनोनुकूल संततिप्राप्तीकरितां आत्म-संयमन करावें लागलें आणि कांटेकोर नियमबद्धता स्वीकारावी लागली. तेव्हां त्यांचें ध्येय पूर्णत्वास पोंचलें.

या पौराणिक गोष्टी सोडून दिल्या आणि अगदीं अलीकडच्या इतिहासांत पाहिलें, तरी आपणांस तोच चमत्कार आढळून येतो. शिवबाचा जन्म अशा हेतूनेंच झाला. इतिहासप्रसिद्ध पटवर्धनकुल नांवालौकिकास चढण्याचें कारण त्या घराण्यांतील हरभटाची ‘स्वतांस पराक्रमी पुत्र व्हावा’ ही तीव्र इच्छाच होय. असो.

या शिवाय सर्वांच्या नित्य अनुभवांतील उदाहरण हवें अस-

त्यास वनस्पतिशास्त्राचें घेतां येईल. खाण्यासारखीं सर्व प्रकारचीं फळें, धान्यें, भाजीपाला व कंदमुळें यांची उत्क्रांति मनुष्यानें काय थोडी केली आहे ? साधें आम्रफळ पहा. कलम करण्याचें शास्त्र पूर्णावस्थेला नेऊन आपूस पायरीसारख्या जाती अस्तित्वांत आणिल्या. जीं फळें लहान होतीं, तीं मोठीं बनविण्यांत आलीं, जीं नीरस होतीं तीं सरस, ज्यामध्यें बिया फार होत्या तीं कमी बियाचीं, ज्यांना काटे होते त्यांना निष्कंटक करण्यांत आलें. ज्या मनुष्यबुद्धीनें वनस्पतिसृष्टींत इतकी उलथा पालथ केली, त्यास स्वतःच्या प्रजोत्पादनाचे बाबतींत कांहींच करता येत नसेल हें कसें शक्य मानावयाचें ? मनुष्याच्या सेवेस उपयोगी पडणाऱ्या ग्राम्य पशूंच्या अवलादींमध्येंहि त्यानें कल्पनातीत फरक पाडले आहेत. मग तो स्वतःच्या संततीविषयीं उदासीन राहाणें कसें शक्य आहे ? तात्पर्य, मनांत आणिल्यास मनुष्यास मनोवांच्छित संतति निर्माण करण्यास कांहींच हरकत नाहीं. निसर्ग जितका न्यायनिष्ठुर आहे तितकाच उदार आहे. त्याचे नियम पाळून त्यास खुलविल्यास तो मनुष्यावर कल्पनातीत उपकार करण्यास तत्पर आहे. कोणतीहि कोटी घ्या, योग्य ऋतुमान, शुद्ध बीज आणि शुद्ध क्षेत्र अशी संगति जुळल्यावर त्याचें फळ मनासारखें लाभलेंच पाहिजे यांत शंका नाहीं.

ज्या दाम्पत्यास उत्कृष्ट संतती पाहिजे असेल, त्यानें त्या शास्त्राचे प्रमुख नियम समजून घ्यावेत आणि तदनुरूप वर्तन करावें.

पहिली गोष्ट, संतती फार लौकर न होण्याबद्दल पतिपत्नीनें काळजी घेतली पाहिजे. तसें न झालें तर दाम्पत्यसुखांत अंतराय येतो, स्त्रीच्या तारुण्यावर आघात होतो, पुरुषाची जबाबदारी वाढते

आणि जन्माला येणारें मूल पूर्ण वाढीचें होण्यास अवसर सांपडत नाहीं. याकरितां समागमकाल सुरू झाल्यापासून जवळ जवळ तीन ते पांच वर्षें तरी अपत्य होऊं नये. साधारणपणें स्त्रियांचें वय अठराचे पुढें व पुरुषाचें पंचवीसच्या पुढें असावें. म्हणजे अपत्यप्राप्ति सुखदायक वाटेल.

आजच्या स्थितींत आपल्या राष्ट्राला संततिनियमनाची आवश्यकता आहे याबद्दल वादच नाहीं. वाटेल त्या प्रकृतीच्या, स्थितीच्या व आचाराविचारांच्या दंपतीस संतान झालेंच पाहिजे, त्याशिवाय मनुष्यजन्माचें सार्थक नाहीं. ही समजूत खुळेपणाची व समाजहितविघातक आहे. तिला आळा बसणें सर्वतोपरी इष्ट आहे. परंतु याच्या उलट सुदृढ, पूर्ण निरोगी, सुविचारी व सुखवस्तु जोडप्यांना संतति न होणें किंवा त्यांनीं ती न होऊं देणें हें तितकेंच अनिष्ट आहे.

उत्कृष्ट संततीवर राष्ट्राचें भवितव्य अवलंबून आहे, ही गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. विषयसुखाचा स्वार्थ डोळ्यांपुढें ठेऊन किंवा संततिसंगोपनाच्या जबाबदारीला भिऊन जें दाम्पत्य संततिप्रतिबंधाचें आचरण करील, तें समाज–राष्ट्रद्रोही ठरेल आणि निसर्गाचा शापही त्यांना भोगावा लागेल.

योग्यकालीं व योग्यस्थितींत अपत्य निर्माण झाल्यास तें गृहसौख्यांत भर टाकतें, पुरुषास संयमशक्ति शिकवितें आणि स्त्रीच्या अंगच्या कांहीं चांगल्या गुणांचा विकास करतें. अपत्यहीन पुरुष बेछूट होऊं लागतो आणि स्त्री आपली सदयता, त्यागवृत्ती, कोमलता, वत्सलता व संगोपनशक्ति गमावून बसते. ज्या गोष्टींचा उपयोग होण्यासारखी परिस्थिती निर्माण होत नाहीं, त्या हळू हळू नाश

पावतात. दाम्पत्यप्रेम चिरकाल टिकण्यास अपत्याची गांठ सहाय्य करतें. मुलाबाळांनीं शृंगारलेलें गृह समाजांत आदरणीय असतें.

अपत्य होणें हा निसर्गाचा मनुष्यास शाप नाहीं. आशीर्वाद आहे. फक्त 'अति तेथें माती' हा नियम लक्षांत ठेविला पाहिजे. अति खाण्यानें अजीर्ण होतें, आरोग्य बिघडतें. अति झोंपेनें आळस वाढतो, उत्साह मरतो. अति श्रमानें ग्लानी येते, आयुष्यहानि होते. अति विचारानें डोकें पिकतें. त्याचप्रमाणें अति विकारवशतेनें अति संततीचा शाप पत्करावा लागतो व दुःख भोगावें लागतें. 'अति सर्वत्र वर्जयेत्!'

अनियमित अपत्यप्राप्ती म्हणजे सधनावस्थेंत दारिद्र्याचा पाया आणि दारिद्र्यांत शुद्ध नरकवास, ही गोष्ट नाकारून चालणार नाहीं. उत्कट इच्छाशक्तीनें आणि नियमबद्ध वागणुकीनें ही आपत्ति टाळतां येतें; येईल!

दरिद्री मनुष्यास पुष्कळ मुलें कां व्हावीं आणि धनिकांच्या घरीं त्यांचा अभाव कां दिसावा? हें मोठें चमत्कारिक कोडें आहे. या चमत्कारास अगदींच कारणें नाहींत असें नाहीं. पण त्यांचा विचार येथें कर्तव्य नाहीं. एवढें खरें कीं हा चमत्कार दुःखदायक आहे. खायला अन्न नाहीं तेथें पोरांचें लेंढार, जेथें गजान्तलक्ष्मी नांदतें आहे तेथें त्यांचा पूर्ण अभाव, हा देखावा शोचनीय होय.

याहीपेक्षां शोचनीय गोष्ट म्हणजे भराभर मुलें होणें आणि तीं तितक्याच झपाट्यानें मरणें ही होय. अलीकडे अशी दुर्दैवी दाम्पत्यें किती तरी आढळतात! हतभागी स्त्री! बिचारीचा प्रतिवर्षी पाळणा आहे आणि ती त्याची दोरी हातांत घेतें न घेतें तों मृत्यु तिच्या

ओटींतील कोंवळा घांस काढून नेत आहे ! या स्थितींत पैसा व प्रकृति यांचा किती नाश होत असेल बरें ? याचा दोष कोणाकडे ? निःसंशय त्या दम्पतीकडे.

**मनुष्य आपला ताळ सोडतो पण सृष्टि आपला तोल सोडूं इच्छित नाहीं.** त्यामुळेंच जें अति झालें त्याचा नाश करण्यास निसर्गास मुळींच दिक्कत वाटत नाहीं, हें लक्षांत ठेऊन मनुष्यानें अपत्यप्राप्तीचे बाबतींत समंजसपणा ठेवावा.

आतां नियमित संततिलाभानें गृहसौख्यांत कशी भर पडते किंवा पाडतां येईल तें पाहूं.

सूर्योदयापूर्वी अरुणाची मनोहर छटा पूर्वक्षितिजावर झळकूं लागते. हा ब्राह्ममुहूर्त असतो. यावेळीं मनुष्यानें शय्यात्याग केला पाहिजे. तरच त्यास आरोग्य लाभते, उद्योग करण्यास उत्साह मिळतो आणि त्या उद्योगानें त्यास संपत्ति मिळते. मनुष्यानें प्रभातकाळीं लौकर उठण्याचा एक नियम अमलांत आणिला कीं, पुढच्या गोष्टी सुलभतेनें घडत जातात. अंथरुणाची मजेदार ऊब कशी सोडावयाची हाच महत्वाचा प्रश्न आहे, आत्मसंयमनाची कसोटी आहे. हीच गोष्ट पतिपत्नीच्या आयुष्यांत बालसूर्याचें आगमन होण्याच्या वेळीं तंतोतंत लागू पडते. प्रभातकालाप्रमाणेंच हा काळ मनोहर आहे. यावेळीं पुरुषानें मोठा मनोनिग्रह करून आपल्या येऊं घातलेल्या अवताराचा मार्ग सुकर करावयाचा असतो. एवढेंच त्यानें केलें म्हणजे त्याची तद्विषयक जोखीम संपली. स्त्रीची मात्र नंतर लौकर मुक्तता नाहीं. मातृपदाचा अतिशय मानाचा अधिकार तिच्याकडे यावयाचा

असतो. यावेळीं ती जशी वागेल, खाईलपिईल, विचार करील, त्याच प्रमाणें तिचें अपत्य निपजेल.

स्त्रीला योग्य वयांत ही अवस्था प्राप्त झाली असेल, तर त्याबद्दल तिनें किंवा तिच्या पतीनें खेद मानण्याचें किंवा काळजी करण्याचें कारण नाहीं. उलट एकमेकांनीं एकमेकांस प्रोत्साहन दिलें पाहिजे. या अवस्थेंत दोघांनाही थोडा थोडा स्वसुखत्याग करावा लागतो; पण त्याची दामदुप्पट पुढें मिळावयाची असते हें ध्यानीं घेऊन त्यांनीं तो केला पाहिजे.

या वेळीं पुरुषानें स्वतः संयमी होऊन आपल्या पत्नीला साह्य करावें. गरोदर स्त्रियांनीं कसें वागावें, याबद्दल मराठीमध्यें कांहीं चांगलीं पुस्तकें आहेत. तीं अवश्य आणून पत्नीस वाचण्यास द्यावीं आणि त्यांत सांगितल्याप्रमाणें तिचें आचरण सहजरीत्या घडेलसें करावें. ही गोष्ट उपेक्षा करण्यासारखी नाहीं. दिवसेंदिवस जिव्हाळ्याचीं वृद्ध माणसें असणें कठिण होत चाललें आहे. अशा स्थितींत आपलें आपणच शिकवलें व संभाळलें पाहिजे.

गरोदर अवस्थेंत स्त्रीनें फार श्रम करूं नयेत; अगदीं स्वस्थहि बसूं नये. जास्त खाऊं नये, उपाशी राहूं नये, झोंपाळूं होऊं नये, जागरण करूं नये, सदैव प्रसन्न असावें. चिडूं संतापूं नये अगर मनांत कुढूं नये. आपलें अपत्य चांगलेंच झालें पाहिजे, अशी उत्कट इच्छा बाळगावी. नशीबवादी असूं नये. देवादिकांच्या गोष्टी ऐकाव्या, बोलाव्या; थोर थोर पुरुषांचीं चरित्रें वाचावीं. इतिहासाचें मनन करावें आणि सर्वांत प्रमुख गोष्ट कीं मन अत्यंत पवित्र ठेवावें. यावेळीं स्त्री जशी वागेल, बोलेल, विचार करील, ध्यास धरील तसें

अपत्य होईल, हें निश्चयेंकरून जाणावें. अर्थात ह्या गोष्टींत तिला पतीनें साह्य केलें पाहिजे, हें उघडच आहे. तिला फाजील कष्ट न पडतील, तिच्या खाण्यापिण्याच्या विशिष्ट इच्छा तृप्त होतील, ती प्रसन्न राहील अशा गोष्टी पतीनें अगत्यानें केल्या पाहिजेत. म्हणजे मग पत्नीची सुखरूप मुक्तता कशी होईल याबद्दल चिंता करण्याचें कारण उरणार नाहीं. निसर्गाचे नियम अमलांत आणिले कीं, तो आपल्यास क्षेम ठेवण्याची काळजी घेतो. असो.

पुत्रप्राप्ति होण्याची सर्वांना सारखी आवड असली तरी समंजस पतिपत्नींनीं कोणत्याहि अपत्याचें सप्रेम स्वागत करावें. याविषयींहि खेद मानण्याचें कारण नाहीं. पुत्र किंवा पुत्री होणें हें पुष्कळांशीं पतिपत्नींचें आरोग्य, शरीरपिंड, मनोरचना यांवर अवलंबून आहे. तेव्हां जें फळ पदरांत पडेल त्यांतच आनंद मानावा. तें किडकें नसलें म्हणजे झालें आणि तें चांगलें करणें आपल्याच हातांत आहे.

लालन पालन व त्याची शुश्रुषा करण्याचा मनोधर्म स्त्रीमध्यें स्वाभाविक आहे. याविषयीं लागणारी हृदयाची प्रेमळता आणि शांत कष्टाळूपणा तिला निसर्गानें बहाल केलेलाच आहे, फक्त तो कसा अमलांत आणावा हें तिला कळलें वळलें पाहिजे.

शिशुसंगोपन म्हणजे मुलाला सारखें कपड्यांत गुरफटून ठेवणें, त्यास तळहाताच्या फोडाप्रमाणें जपणें, रडूं लागतांच प्यायला घेणें अथवा ज्यांस वैद्यकीय आधार नाहीं, असल्या गोष्टी करणें नव्हे. डोक्यावर घट्ट टोपी घालणें, न्हातांना त्यास बरें वाटते या समजुतीनें कडकडीत पाणी ओतणें, डोळ्यांत काजळ बरबटणें, त्यानें व्याक् करीपर्यंत स्तनपान करविणें आणि त्याच्या रडण्याचें कारण न हुडकणें

या गोष्टी स्त्रीनें जरूर टाळाव्या. रडणें हाहि मुलांचा व्यायाम आहे, हें लक्षांत असूं द्यावें. त्यास मोकळ्या अंगानें हातपाय हालवतां येतील असे कपडे घालावे. त्यास आंवळून निजण्यासारखें पांघरूण घालूं नये. तोंडावर तर मुळींच घालूं नये. माशांच्या निवारणार्थ पोकळ वस्त्र राहील असें करावे. आमच्या इकडे कितीतरी माणसांना जीव गुदमरून जाईल असें मुस्कट मारून निजण्याची संवय आहे. ती अति वाईट आहे. म्हणून बाळपणापासूनच ती न लागेल याबद्दल जपावे.

शिशुसंगोपन हें महत्त्वाचें कार्य आहे. तें स्त्रीनें चातुर्यानें समजून घेऊन करावें, म्हणजे अपत्यलाभाचा खरा फायदा पदरांत पडून गृहसौख्यांत कमतरता पडत नाहीं.

मुलांचीं पहिलीं २–३ वर्षें अगदीं निरुपद्रवी असतात. त्यांचें आरोग्य बिघडलें नाहीं, तर त्यांची आनंदमय क्रीडा अत्यंत आनंददायक असते. साधारणपणें अशीं निरोगी बालकें कारणावांचून रडत नाहींत. त्यांची समजूत चटकन् पटून तीं पुनः हंसूं लागतात. तीं हंसत खेळत झोंपीं जातात आणि हंसतमुखानेंच पुनः जागीं होतात. अशीं मुलें अवखळ मात्र भरपूर असतात. तो त्यांचा अवखळपणा मातेला पुरे पुरे करणारा असला तरी त्यांत तिला एक प्रकारचें अनुपमेय सुख होतें. आणि त्यासंबंधींच्या गोड तक्रारी पित्यासहि सुख देतात.

**हें चित्र पहा:—** सुट्टीचा दिवस आहे. तिसरा प्रहराचा सुमार आहे. आई विणण्याचें सामान घेऊन बसली आहे. पिता आराम खुर्चीवर पडून कांहीं वाचनांत निमग्न आहे. त्यांच्याभोंवतीं त्यांचा बाळराजा खेळत आहे. आपला मुलगा अवखळ आहे, हें त्यांस माहीत आहे. तरीपण दोघांना त्याच्याकडे कानाडोळा केला

आहे. ही संधि साधून त्यांच्या बाळराजानें काय केलें ? सुताची लड गुंतवून खाऊच्या पुड्याप्रमाणें स्वतांभोवतीं गुंडाळून घेतली आणि नंतर त्यांत रंगून स्वारी जवळच कोंपऱ्यांत ठेवलेल्या डेस्कावरील दौतीकडे गेली. उभें राहतां येतें. एखादें पाऊलहि टाकतां येतें; अशा कसरतींत दौत ओढली गेली, आपटली, उपडी झाली ! मनाला धन्यता वाटली ! आईनें लटका राग दाखविला ! मुलानें ओठ काढले. पित्यानें जवळ घेऊन समाजावणी केली ! पुनः बालराजा हंसूं लागला. तीं दोघेंहि त्याच्याबरोबर हंसूं लागलीं. दोघांनीं त्यास जवळ घेऊन छातीशीं लावून अपत्यप्रेमाचें अनिर्वचनीय सुख अनुभविलें.

संसारांत हें चित्र रमणीय नाहीं असें कोण म्हणेल ? संसार दुःखमय असला तरी त्यातील हे प्रसंग, हे क्षण निःसंशय स्वर्गसुखाच्या तोडीचे आहेत.

गृहसौख्यांत मुलाबाळांचें हें स्थान कमी प्रतीचें कोण म्हणेल ? मात्र मुलें निरोगी पाहिजेत. चिरचिरीं, रोगी, सदा अप्रसन्न अशा मुलांपासून मात्र मातापित्यांस फारसें सुख मिळण्याची आशा नसते. ममत्वामुळें अशा मुलांचा कोणी आईबाप त्याग करीत नाहींत हें खरें, पण एकंदरींत ती स्थिति दुःखदायकच.

या कालांतून मुलें थोडीशीं पुढें गेल्यावर म्हणजे चार पांच वर्षांपासून मुलांच्या शिक्षणास प्रारंभ होतो. या वेळीं त्यांस पुष्कळ गोष्टी समजूं लागतात. हट्ट घेऊन बसणें, आज्ञा भंग करणें, अमंगळ बोलणें, घाणेरडे राहणें इत्यादि अवगुण या वेळीं मुलांच्या अंगांत शिरण्याचा संभव असतो. याबद्दल मातापित्यांनीं विशेषेंकरून मातेनें जास्त दक्षता घेतली पाहिजे. मुलांच्या रडण्याला भिऊन अयोग्य गोष्ट

करण्यास तयार होणें अथवा त्यांच्या मर्जीप्रमाणें त्यांस वागूं देणें म्हणजे त्यांच्या भावी आयुष्याचा नाश करून आपल्या सौख्याचा घात योजण्यासारखें आहे.

मूल हट्टी होतें असें दृष्टोत्पत्तीस येतांच तें डोळ्यांच्या धाकांत येईल असा प्रयत्न सुरू ठेवला पाहिजे एकदम कठोरपणा करण्याचें, अंगावर खेंकसण्याचें किंवा दुसऱ्यावर रागें भरण्याचा आव आणून त्यास भेदरण्याचें कारण नाहीं. आपली इच्छा चालत नाहीं. माता-पिता सांगतील तेंच आपण ऐकलें पाहिजे अशी मुलाची पक्की खात्री झाली पाहिजे. हें करण्यास थोडा कठोरपणा लागतो. पण तो त्याच्या हिताकरितां पत्करला पाहिजे आपल्या रडण्यानें आपले आईबाप चटकन् नरम होतात, हें मुलांस समजलें कीं संपलें ! आपण समजतों तितकीं मुलें अजाण नसतात, मोठीं चाणाक्ष असतात. म्हणून त्यांची मात्रा न चालेल असें जपलें पाहिजे. पुष्कळदां असें होतें:—आई मुलावर रागावली कीं, मूल बापाच्या आश्रयास जातें व बापानें राग केला कीं, आईकडे येतें. अशावेळीं मुलाकडेच चूक असेल तर त्यास कोणीतरी आश्रय देऊन लाड करणें म्हणजे त्यास दुसऱ्या खेपेस ‘ जास्त हट्टी हो व आज्ञाभंग करण्यास शीक ’ असें सांगण्यासारखेंच आहे.

मुलांमध्यें भित्रेपणा नव्हे, तर समंजस आज्ञाधारकपणा अगोदर बाणला पाहिजे. याचें बीजारोपण अगदी लहान वयांतच करावयाचें असतें. त्याचप्रमाणें स्वच्छतेची आवड त्यांच्यामध्यें सहज निर्माण होईल असें आईबापांनींच वागलें पाहिजे. अमंगळ शब्द उच्चारण्यास मूल अनुकरणानें शिकतें. असे कितीतरी आईबाप

आहेत कीं, आपल्या मुलांसमोर तीं लहान आहेत या सबबीवर वाटेल ती चारगट भाषा किंवा शब्द वापरतात, आणि मुलांनीं त्यांचें अनुकरण केलें म्हणजे फिदी फिदी हसतात. त्यांतच त्यांस धन्यता वाटते. परंतु मुलांचें असलें अचरट बोलणें हें कौतुकास्पद बालसुभाषित नव्हे. कारण आज अशीं अचरट भाषा वापरणारीं मुलें उद्यां मोठीं झाल्यावर तोच प्रयोग मातापित्यावर करण्यास भीत किंवा शरमत नाहींत. म्हणून मुलांच्या लालनपालनाबरोबर त्यांच्या मनाचेंहि संगोपन योग्यप्रकारें होईल अशी दक्षता आईबापांनीं घेतली पाहिजे. लेखांकाच्या शिरोभागीं दिलेलें सुभाषित नीट ध्यानीं घेऊन सुप्रजा निर्माण करावी. तरच संसारांत खरेंखुरें सुख व संततिलाभाचा खरा खरा आनंद !

## लेखांक सातवा

# गृहसौख्याचे इतर भागीदार

## लेखांक सातवा.

# गृहसौख्याचे इतर भागीदार.

अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्रयेण च ।
ज्ञातयः सम्प्रवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ॥

तळ्यांत वाढणाऱ्या कमलाप्रमाणें, परस्परांस सहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन ज्ञातीचा उत्कर्ष होत असतो.

महाभारत.

प्राचीनकालापासून चालत आलेल्या आमच्या कुटुंब एकत्र नांदण्याच्या पद्धतीचा, मुंबईसारख्या बकाल वस्तीच्या नगरांतून, बीमोड होत चालला असला तरी इतरत्र तिचें स्वरूप फारसें बिघडलेलें नाहीं. आणि खेड्यापाड्यांतून व रेल्वेपासून लांब असलेल्या भागांतून तर ती पूर्वीप्रमाणेंच प्रचलित आहे. अर्थात् गृहसौख्याविषयीं विचार करितांना एकत्रित कुटुंबपद्धतीचाहि थोडासा विचार केला पाहिजे. ही पद्धत चांगली कीं वाईट याचा विचार येथें कर्तव्य नाहीं. पांखराप्रमाणें जोडीजोडीनें राहाण्याची प्रथा अंमलांत येईप्रर्यंत कुटुंबांतील अवांतर मंडळीच्या सुखदुःखाशीं आपला संबंध निगडित असणारच. तेव्हां तो वगळून गृहसौख्य लाभणें कठिण आहे. ज्यांच्या संसारांत राजाराणी पलीकडे माणसें नाहींत, असलींच तर एखादा युवराज किंवा राजकन्या, त्यांच्याविषयीं बोलायलाच नको; पण ज्यांचें

कुटुंब मोठें आहे, त्यांच्यावर सगळ्यांच्या सुखदुःखाची जबाबदारी आहे. ती भलेपणानें टाळतां येत नाहीं व टाळणें योग्यही नाहीं. गृहस्थधर्म पत्करलेल्या स्त्रीपुरुषांनीं तेंही कर्तव्य योग्यप्रकारें पाळलें पाहिजे.

हिंदूंचें एकत्र कुटुंब म्हटलें कीं, त्यांत मातापित्यापासून तों इमानी नोकरापर्यंत सर्वांचा समावेश होतो. यापैकीं योगायोग असेल त्याप्रमाणें एक किंवा अनेक माणसें पुरुषास पोसावीं लागतात आणि त्याच्या पत्नीस तीं सांभाळून घ्यावीं लागतात. वय, स्वभाव व नातें यांतही भिन्नत्व असल्यामुळें सर्वांना सलोख्यानें सांभाळून घेऊन भलेपणा मिळवणें प्रायः अशक्यच असतें. तरीपण कर्तव्य टाळतां येत नाहीं. म्हणून पतिपत्नीनें गृहसौख्यातील इतर भागीदाराविषयीं कसें वर्तन ठेविलें पाहिजे याचा थोडासा विचार करूं.

पतिपत्नींनीं परस्परावर प्रेम ठेवणें किंवा एकमेकाच्या सुखाबद्दल जपणें आणि दोघांनीं मिळून आपल्या अपत्यांचें संगोपन करणें या गोष्टी न सांगतांहि होण्यासारख्या आहेत. आंतड्याच्या ओढीनें मनुष्य त्या आपोआपच करीत राहतो. प्रश्न आहे, त्यापलीकडच्या कक्षेंत जी मंडळी येतात त्यांचा. त्यांच्याशीं सहकारितेनें, आदरानें व प्रेमानें राहून गृहसौख्याची वाटणी शक्यतों सारखी होईल असें करण्यांतच खरें चातुर्य आहे.

सुखाविषयीं एक महत्वाची गोष्ट प्रत्येक विचारी माणसानें आपल्या मनाशीं पटवून घेतली पाहिजे. **सुख हें विद्येप्रमाणें आहे. तें दिल्यानें वाढतें आणि जपण्यानें कमी होतें. निदान तें आंबतें किंवा नासतें यांत शंका नाहीं. केवळ स्वतःच्याच सुखाविषयीं विचार करणारा किंवा त्यालाच जपणारा कोणताही मनुष्य**

सुखी झाल्या-असल्या-चें उदाहरण पृथ्वीतलावर आढळणार नाहीं.

स्वसुखमार्गी व्यक्ति स्वतःस कितीहि सुखी किंवा सुरक्षित समजो; तशी ती सर्वथा असत नाहीं, राहू शकत नाहीं. तेव्हां जें जपल्यानें नासतें, परंतु देण्यानें वाढतें तें सुख भागिदारी करून वाढविणें श्रेयस्कर नाहीं काय ?

संसाराचे प्रारंभीं ज्या पुरुषावर मातापित्याचें किंवा तत्सदृश वडील माणसांचें छत्र आहे, त्यानें व त्याच्या पत्नीनें स्वतःस खरोखर धन्य मानिलें पाहिजे. मातापित्याची थोरवी वर्णन करण्याचें कारणच नाहीं. ती स्वयंसिद्धच आहे. ज्यांनीं आपल्यास जन्म दिला, वाढविलें व विद्याविभूषित केलें, ज्यांनीं आपल्याकरितां अनेक कष्ट सोसले आणि आपल्या सुखाकरितां स्वतःच्या सुखाकडे पाहिलें नाहीं, त्यांच्या उपकाराची महति काय वर्णावी ? खरोखर प्रत्येकानें त्याबद्दल कृतज्ञ असले पाहिजे आणि आपली पाळी येतांच त्यांना प्रेमादरानें वागवून आशीर्वाद मिळविला पाहिजे.

आतां हें खरें आहे कीं, कांहीं आईबाप मोठे खस्याळ असतात. त्यांची मर्जी सांभाळणें मोठे कठिण असतें; पण अशीं उदाहरणें थोडीं. आपल्या अपत्याकरितां स्वार्थत्याग करणारीं मातापितरेंच विशेष आहेत. तेव्हां अशा मातापितरांच्या मुलांनीं आपलें कर्तव्य विसरून चालणार नाहीं. आपल्याला कितीहि कष्ट पडले, आपल्या सुखांत थोडी कमतरता पडली किंवा आपल्यास थोडी द्रव्याची झीज सोसावी लागली तरी या सर्व गोष्टी पुरुषानें आनंदानें कराव्या आणि त्याच्या

पत्नीनें त्यांत पूर्ण सहमत असावें. आपल्या मुलांनीं आपली सेवा करावी असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं हें बीज अगाऊ पेरून ठेवावें.

कितीतरी अविचारी लोक असे आहेत कीं, ज्यांना संसार थाटतांच या कर्तव्याचा आजिबात विसर पडतो. त्यांच्या बायका काय सर्वस्वी परक्याच. नवरा आईबापास पुसत नाहीं असें पाहिल्यावर बायकोला सासुसासऱ्याचें प्रेम कोठून वाटणार ? परंतु ही कांहीं माणुसकी नव्हे. या कृतघ्नतेचें प्रायश्चित्त असें ना तसें मिळाल्यावांचून राहात नाहीं. संसारांत यश व सौख्य मिळवूं पाहणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं ही चूक होऊं देऊं नये. कांहीं लोक असेंहि आहेत कीं, ज्यांना आईबाप हयात असेपर्यंत त्यांची योग्यता व उपयोग कळत नाहीं व मागाहून पश्चात्ताप होतो. अशांनीं वेळींच सावध असणें बरें. असो.

कोणत्याही काळीं व स्थानीं नव्या व जुन्या पिढीच्या आचाराविचारांत ताळमेळ राहाणें शक्य नाहीं. काल सारखा पालटत असल्यामुळें जी गोष्ट काल ज्या स्वरूपांत होती, त्यांत ती आज राहात नाहीं. यामुळें कालच्या व आजच्या एकंदर स्थितींत अंतर पडतें. हें जुन्या लोकांना आकलन करतां येत नाहीं. नव्या लोकांना दिसत नाहीं. आमच्या आजाच्या पिढीनें वडिलांच्या पिढीला नांवें ठेऊन मागें खेचून धरण्याच्या प्रयत्न केला, तिनें आमच्या पिढीवर तोच प्रयोग केला, उद्यां आम्ही आपल्या मुलांबाळावर तोच करणार. नव्या जुन्याची ही तेढ परंपरेनें चालत आलेली आहे. ती तशीच चालू राहणार. समंजस माणसांनीं तडजोड किती होईल किंवा करतां येईल तें पाहावयाचें.

तरुणाची वृत्ति उत्साही, रंगेल, निर्भय व नव्याची चाहती

असत यामुळें तिची धांव पुढें असतें. याच्या उलट जगाचे बरे वाईट अनुभव चाखून मऊ बनलेली वृध्दांची वृत्ति निरुत्साही, भेकड व जुन्याला चिकटून बसणारी असतें. यामुळें मुलाला एक वाटतें, आवडतें, करावेसें वाटतें, तर त्याच्या वडील माणसास त्याच्या उलट वाटत असते. एक पुढें पळणार. दुसरा मागें ओढ घेणार. त्यांच्या मनःस्थितीनुरूप विचार केल्यास दोघांच्याहि मतांत व कृतींत सयुक्तता असते. या ओढाताणींत दोरी न तुटता व मनें न दुखावली जातां कार्यभाग झाल्यास तें इष्ट आहे. याकरितां दोनी पक्षांनीं थोडी थोडी देवाण घेवाण केली पाहिजे.

तरुण जोडप्यास ज्यावेळीं म्हातारीं माणसें दुराग्रही वाटतील त्यावेळीं त्यांनीं त्यांचें मन न दुखण्याकरितां थोडासा स्वार्थत्याग केल्यानें भागत असल किंवा एखादा आचार सांभाळणें इष्ट असेल तर तसें करावें. माणुसकीचा, न्यायाचा, सदयतेचा प्रश्न असेल आणि त्यांच्या मुळावरच घाव घालण्याची वृध्द माणसांची तयारी असेल तर त्यांच्या दुराग्रहाला मान लवाविण्यांत अर्थ नाहीं. रूढीबध्द आचारविचार, बायकांना वागविण्याची तऱ्हा आणि सामाजिक मतें या बाबतींत म्हातारी माणसें व तरुण लोक यांच्यांत एकमेळ होणें अशक्यच असते. सास्वासुना, जावाजावा यांची भांडणें यामुळें उद्भवतात. कुटुंबकलहाचें बीज बहुधा अगोदर बायकांत पेरलें जातें. या वेळीं कर्त्या पुरुषांपुढें मोठा प्रश्न पडतो. कोणाला सुखवावे आणि कोणाला दुखवावे? बायकोची कड घ्यावी तर वृद्ध व ज्येष्ठ माणसें नाखुश होतात. त्यांना प्रसन्न ठेवण्यास जावें तर जन्माची मैत्रीण दुःखी होण्याचा संभव असतो. संसारांत हा मोठा बिकट प्रश्न आहे. पण

कर्त्या पुरुषानें त्यास बुजता उपयोगी नाहीं. त्यानें शांत मनानें, पूर्ण न्यायानें व सहृदयतेनें तो सोडवावा. संसारांत कोणी कसें वागावें याची शिकवण सर्वांनाच स्पष्ट द्यावी आणि आपल्या कर्तेपणाची छाप सर्वांवर ठेऊन त्यांना तसें वागण्यास भाग पाडावें.

आपल्या घरांत आलेली सून किंवा जाऊ हें एक नवीन मनुष्य आहे, आपल्या कुटुंबांत तें अद्याप रुळावयाचें आहे आणि मनुष्य-स्वभावानुरूप त्यास कांहीं निराळेपण आहे ही गोष्ट किती तरी पोक्त बायकांना कळत नाहीं. या आडमुठेपणानें त्या नववधूच्या बोलण्या-चालण्याकडे पाहूं लागतात. मग क्षुद्र मानापमानाचा प्रश्न उपस्थित होतो. मग उणीदुरीं उत्तरें उभयपक्षीं सुरू होतात. तेव्हां हीं असलीं थेरें आपणास अगदीं खपणार नाहींत याची स्पष्ट जाणीव पुरुषानें आपल्या या पोक्त स्त्रियांना द्यावी आणि त्याचवेळीं आपल्या पत्नी-लाहि विनयशीलता, मधुर वाणी व कष्टाळुपणा याचें महत्त्व पटवून द्यावें.

यावेळीं तरुणगृहिणीनें कांहीं गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. संसारांत सुख आहे त्याचप्रमाणें दुःख आहे. मान आहे त्याचप्रमाणें जबाबदारी आहे. कर्तेपणांत जबाबदारीचें व लहानपणांत कमीपणाचें दुःख आहेच. मग त्या गोष्टींचा बाऊ करून उगीच विषाद का मानावा? आणि क्षुल्लक कटु बोलांना महत्त्व कां द्यावें? चार भांडीं एकत्र ठेवलीं तर तींसुद्धां एकमेकास लागून आवाज होतो; मग चार भिन्न स्वभावाचीं माणसें एकत्र आल्यावर थोडासा उपसर्ग झाल्यास कष्टी होण्यांत लाभ कोणता? सासुरवास या शब्दानें जो एक किळ-सवाणा देखावा डोळ्यापुढें उभा राहतो तसाच कांहीं प्रकार असेल तर त्याचा प्रतिकार अवश्य केला पाहिजे; परंतु वाटेल त्या गोष्टीचा

त्रास मानूं नये. नम्रता, कष्टाळुपणा, मधुर भाषण व क्षमाशील वृत्ति एवढ्या गुणांवर सर्वांना वश करून घेण्यास झटावें. म्हणावें तितकें हें कार्य सोपें नाहीं. पण त्याशिवाय गृहिणीधर्माची पूर्तता नाहीं.

पुष्कळ वृद्ध माणसें मोठी दूरदर्शी असतात. तरुण माणसांच्या कलानें घेऊन तीं आपला मान राखून सुखांत राहतात. शहाण्या सास्वांनीं हें व्रत घ्यावें. सून कर्ती झाल्याबरोबर संसाराचीं सर्व सूत्रें तिच्या स्वाधीन करून सुखासमाधानांत आयुष्य घालवावें. उगीच चिरचिर करून आपलें व सबंध कुटुंबाचें जीवित दुःखमय करूं नये. निदान स्वतःच्या पुत्राच्या कल्याणार्थ तरी जपावें.

कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनें हें जाणून असावें कीं, मान व प्रेम या गोष्टी दुराग्रहानें मागून मिळत नाहीत. इतर कोणत्याहि मोबदल्यानें त्यांची देवघेव होऊं शकत नाहीं. मानाला मान व प्रेमाला प्रेमच अगोदर दिलें पाहिजे.मग ती व्यक्ति लहान असो कीं मोठी असो. जवळची असो कीं दूरची असो. निष्कपट अंतःकरण व मधुर भाषण यांनीं मानाचा व प्रेमाचा मार्ग सुकर होतो. आकुंचित मनाच्या बायकांना या गोष्टीचें भान राहात नाहीं आणि त्या एकमेकीस दुरुत्तरें बोलून उगाच मनें दुखवतात. मनुष्यास इतर सर्व गोष्टींचें विस्मरण होतें परंतु दुर्भाषणानें निर्माण झालेल्या जखमा तो विसरूं शकत नाहीं. याकरितां सुगृहिणीनें आपल्या वाणीला जपावें. असो.

या नंतर बंधुभगिनीचा प्रश्न सोडवावयाचा.

आईबाप हयात असेपर्यंत भावांभावांनीं एकत्र राहावें, वेगळे होऊं नये अशी आपल्या समाजाची समजूत आहे व ती सयुक्तिकही आहे. थोडेसे पंख फुटतांच ज्यानें त्यानें आपलें कोटें सुधारण्यापेक्षां

मातापित्याचें छत्र असेपर्यंत शक्यतो सर्वांनीं थोडा थोडा स्वार्थ-त्याग करून एकजुटीनें राहाणें निःसंशय अभिमानास्पद व सुखावह आहे. परंतु कांहीं करणानें हें जमण्यासारखें नसेल तर एकोप्यानें राहण्याचें सोंग करण्यांत अर्थ नाहीं. असल्या वरपांगी एकीनें प्रेमाला कीड लागते व दुहींचा अग्नी धुमसत राहतो.

एकाच आईबापाच्या पोटीं आलेलीं मुलें प्रकृतिभिन्नत्वामुळें स्वभावतःच निरनिराळ्या मनोधर्मांची असतात. त्यांच्यामध्यें एक विचार, एक जूट दीर्घकालपर्यंत टिकणें शक्य नाहीं. पण तेवढ्यानें त्यांच्यातील स्नेहभाव नष्ट होण्याचें कांहींच कारण नाहीं. सर्वांनीं सावधगिरी ठेविली पाहिजे. तूर्त जीवनकलहामुळें भावाभावांना एकत्र नांदण्याचा प्रसंगच येत नाहीं. तेव्हां ही गोष्ट ध्यानीं घेऊन सर्वांनीं एकत्र राहाण्याचा काळ स्नेहांत काढावा. कर्त्या भावानें सर्वांच्या वाढीस सारखा वाव मिळेल असें वागावें. मनें विटेपर्यंत वाट पाहूं नये. द्रोह होण्याचे आंत वेगळें व्हावें. प्रेमसंबंधाला धक्का पोचूं देऊं नये. कळकाच्या बेटाचें उदाहरणं डोळ्यापुढें ठेवावें कळकाच्या बेटांतून कुऱ्हाडीचा उपयोग करूनही एखादा कळक काढणें कठिण असतें; परंतु तेच कळक एकमेकावर घासल्यास अग्नि उत्पन्न होतो व तो साऱ्या बेटाला खाऊन टाकतो.

भावांभावांत कलह लावण्याचें पुण्यकर्म ( ! ) कित्येक समाजकंटक मुकाट्यानें करीत असतात. अशांच्या नादीं लागूं नये आणि घरांतील व्यवहार परक्यापुढें नेऊं नये. बरोबरीच्या भावांना मित्रत्वानें वागवावें. त्यांच्या वित्ताचा अपहार करण्याचें दुष्टकार्य आचरूं नये. वडिलार्जित संपत्तीची वांटणी करितांना न्यायानें करावी. म्हणजे प्रेम-

बंध तुटत नाहींत. वेगळे झाल्यावर कोणीहि मागच्या गोष्टी मनांत ठेऊन धुमसूं नये. उलट प्रेमभाव वाढवून यथाशक्ती परस्परांस मदत करण्यास तयार असावें. कोणीही कोणावर भार टाकण्याचें करूं नये म्हणजे झालें. पुष्कळदां मोठ्या भावांच्या धुसपुशीत लहान भावंडांचें निष्कारण नुकसान होतें. त्यांच्याकडे कोणीच दुर्लक्ष करूं नये.त्यांच्या पालनपोषणाची व विद्याभ्यासाची जबाबदारी आनंदानें स्वीकारून त्यांना मनुष्य बनवावें. मातापित्यांचें ऋण फेडण्याचा तो एक मार्ग आहे याचें स्मरण असूं द्यावें.

कोणत्याहि कारणानें का होईना भाऊ भाऊ वेगळे झाले आणि आपापल्या व्यवसायाच्या निमित्तानें ते चार दिशेला पांगले म्हणजे त्यांचे पुन: घसटीचे संबंध येणें कठिणच असतें. विवाहादि प्रसंगाच्या निमित्तानें कांहीं माणसें एकत्र येतात. परंतु तो प्रसंग धांदलीचा व दगदगीचा असल्यामुळें प्रेमसंवर्धनास त्याचा विशेष उपयोग होण्यासारखा नसतो. याकरितां एखादी स्वतंत्र वेळ ठरवावी आणि कौटुंबिक संमेलन घडवून आणावें. ज्या भावंडांनीं बालपण एकत्र घालविलें, त्यांनीं प्रौढपणीं एकत्र जमून चार दिवस एकमेकांच्या संगतींत घालविणें अगत्याचें आहे. याकरितां वडील भावानें उपक्रम करावा. उन्हाळ्याची किंवा दिवाळीची रजा सर्वांना एकत्र होण्यास सोयीची होईल. कोणीहि ही संधी व्यर्थ दवडूं नये. इतर अनेक अडचणी बाजूला ठेऊन यावें. आपल्या सख्या व इतर निकटच्या बहिणी बोलावण्यांत याव्या. अत्यंत जिव्हाळ्यांतील स्नेही व ज्यांची संगत सर्वांना सुखकर होईल अशीं माणसें इष्ट असल्यास बोलवावी. संमेलनाचा एकंदर कार्यक्रम तीन दिवसांपेक्षां कमी व सात दिवसांपेक्षां

मोठा असूं नये. म्हणजे त्यांत गोडी येईल व राहील. एकत्र जमून खाणेंपिणें, गप्पामारणें, वनविहार करणें एवढाच या संमेलनाचा हेतु असावा. मागील गोष्टी बोलावयाच्या त्या सुद्धां सुख देणाऱ्या व प्रेम वाढविणाऱ्या अशा बोलाव्या. त्यांत उणींदुरीं उत्तरें न येतील, मागील कलहाच्या ठिणग्या न निघतील अशी काळजी घ्यावी. देणें घेणें—प्रेमाच्या देवघेवी—यावेळीं, अजिबात टाळाव्या. नाहींतर त्यांत अगदीं सारखेपणा तरी असावा. या प्रसंगीं कोणीहि आपल्या श्रीमंतीचें किंवा दारिद्र्याचें प्रदर्शन करूं नये. सर्व स्त्रीपुरुषांनीं प्रेमाच्या एका पातळींत यावें आणि चार दिवस अगदीं निर्वेधपणानें घालवून जातांना अगदीं मोकळ्या मनानें आणि प्रेममय अंतःकरणानें जावें. या असल्या संमेलनानें मागच्या सुखस्मृति विशेष गोड वाटतात आणि पुढच्या कालांत त्यांची स्मृति सुखदायक होते. अर्थात् हीं असलीं संमेलनें करावयाचीं म्हणजे द्रव्याचा प्रश्न येतो. पण ज्यानें त्यानें आपली पथारी पाहून पाय पसरण्याचें ठरविल्यास कोणत्याहि स्थितींतील कुटुंबास ही गोष्ट अशक्य नाहीं आणि तिचा मोबदला अपेक्षेपेक्षां जास्त मिळेल. मात्र हें संमेलन केवळ प्रेमसंवर्धनार्थ जमविण्याचें ठरवावें. या खेरीज इतर कोणताही हेतु असूं नये. स्त्रियांनीं याविषयीं विशेष दक्षता घ्यावयाची असते. हें संमेलन यशस्वी करण्याची गुरुकिल्ली मुख्यतः स्त्रियांचेकडे आहे, हें त्यांनीं विसरूं नये. असो.

हें थोडें विषयांतर झालें. पुनः आपण गृहसौख्यांतील राहिलेल्या भागिदाराकडे वळूं. हीं माणसें म्हणजे कांहीं आपत्काळानें आपल्या आश्रयास आलेलीं होत. या प्रकारांत पुरुष कमी. स्त्रियाच विशेष असतात.

कोणताही स्वाभिमानी पुरुष एवढ्या तेवढ्या कारणाकरितां किंवा एखाद्या संकटाला बिचकून आपल्या आप्तेष्टांत आश्रयास जाणार नाहीं. उपजीविकेचा मार्ग खुंटल्यामुळें, प्रेमळ मनुष्याच्या मृत्यूनें, भयंकर द्रव्यहानीमुळें किंवा जीवावरील दुखणें गेल्यावर केवळ निरुपायानें असा मनुष्य आश्रयास येईल. त्यावेळीं त्यास अत्यंत सहृदयतेनें वागवून त्यांचें दुःख कमी करणें प्रत्येक पतिपत्नीचें कर्तव्य आहे. प्रसंगावाचून कोणी येत नाही आणि परिस्थिती अजमावल्यावांचूनहि कोणी कोणाच्या घरांत घुसत नाहीं, हें लक्षांत घेऊन अशा आर्त मनुष्यास यथाशक्ति साह्य करावें. आपलें सामर्थ्यच नसेल व केवळ बाहेरच्या भपक्यानेंच तो आपल्या आश्रयास आला असेल तर त्याचेवर निष्कारण त्रासून त्याची अवहेलना करूं नये. त्यास एकीकडे घेऊन सरळपणें त्यास आपली स्थिति सांगावी आणि स्पष्ट शब्दांत पण सदयतेनें त्यास मार्ग धरण्यास सांगावें. पण आपलें सामर्थ्य असेल व तसा ऋणानुबंधच असेल तर द्रव्याकडे किंवा त्रासाकडे पाहून त्यास टाळूं नये. मोठ्या झाडाच्याच सावलीला कोणीही येऊन बसणार हें ध्यानीं घेऊन ज्याचा त्यास वाटा आनंदानें द्यावा. गृहस्थाश्रमांत तें मोठें पुण्यकर्म आहे. तें आचरिल्यानें आपलें नुकसान होण्याचा संभव नाहीं हें निश्चित समजावें.

पुरुषापेक्षां स्त्री विशेष अनन्यगतिक असते. तेव्हां अशी जी अनाथा ( बहीण, बायकोची बहीण, चुलती, मामी या पैकीं कोणीही ) आपल्याकडे येईल, तिला आश्रय द्यावा. अशावेळीं परमेश्वर आपल्या रूपानें त्यांचा पाठीराखा होऊं पाहतो. कोणतेंही मनुष्य जुळवून घेत त्यास उपयुक्त असतेंच. समंजस स्त्रीपुरुषांनीं तसा उपयोग करून

घ्यावा. त्या अनाथेचें आगमन म्हणजे मुर्देड असें मानूं नये. आपल्या हातून प्रत्यक्ष पोसणें होत नसेल तर आपल्या शक्तिबुद्धि-नुरूप तिला एखादा मार्ग दाखवून द्यावा. आपल्या पाठीवर कोणी तरी रक्षक आहे, एवढा विश्वास असल्यास कोणीही व्यवहारचतुर स्त्री आपला मार्ग काढल्यावांचून राहाणार नाहीं.

कितीतरी स्त्रीपुरुषांना असलीं अनाथ माणसें राबवून घ्यावयास पाहिजे असतात. '**कामाला असाव्या व खायला नसाव्या**' ही पैशाचिक वृत्ति होय. ही प्रथमतः सुखावह वाटली तरी मागून पाठीची साल काढल्यावांचून राहात नाहीं.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट सांगणें इष्ट वाटतें. ती ही कीं, अशा अनाथ विधवांच्या बाबतींत पुरुषांनीं आपल्या पापदृष्टीस जपावें. मन मोठें खट्याळ आहे. तें केव्हां दगा देईल याचा नेम नाहीं. आपल्या आश्रयास आलेल्या विधवेविषयीं अनुकंपा वाटूं लागतांच तिचें स्वरूप राक्षसी आहे कीं काय हें पाहावें. बहुधा तें तसें असतें. निदान त्या वळणावर जातें. म्हणून सावध असावें. ही गोष्ट विस्तवाशीं खेळण्यासारखी आहे. कोणासही न कळलें व आपला डाव सुलभतेनें साधत असला तरी तो नरक आहे. आपल्या गृहसौख्यावर त्याचा दुष्परिणाम झाल्यावांचून राहाणार नाहीं. या असल्या घाणीनें आपल्या कुटुंबसौख्याचा नाश होतो, आपली संतति बेताल बनते आणि समाजस्वास्थ्य बिघडतें ! —सावधान ! सावधान ! !

सुगृहणीनेंहि या बाबतींत पुष्कळ दक्षता घेतली पाहिजे. अशी अनाथ स्त्री आपल्या आश्रयास येतांच ती आपल्या हाडामांसाची असो नसो तिच्याविषयीं सहृदयता बाळगली पाहिजे. तिचें जीवन

आणखी रुक्ष न होईल, घरच्या पुरुषाकडून तिला भलताच त्रास न होईल असें जपलें पाहिजे. आपल्या वैभवाचा तोरा त्या अनाथ जीवापुढें दाखविण्यांत कांहींच अर्थ नाहीं. स्वभाव जमत नसेल तर खुशाल त्या मनुष्याला दाराबाहेरचा रस्ता दाखवावा; पण त्याच्या अनाथत्वाचा गैरवाजवी फायदा घेऊं नये.

मनुष्याच्या आत्म्याची तळमळ किंवा प्रसन्नता ही अगोचर असली तरी मोठी प्रभावशाली आहे. .हिच्यांतूनच शाप किंवा वर बाहेर पडतो. अनाथ मनुष्याचा आत्मा तळमळला तर तो झणझणीत शाप ओकल्यावांचून राहात नाहीं. तो परिस्थितीमुळें तोंडावर बोलूं शकत नाहीं. पण मनांतून जळफळतो. या जळफळाटास जपावें. विपत्कालानें घेरलेल्या मनुष्यास वाणीनें किंवा कृतीनें दुखविण्यांत पुरुषार्थ नाहीं. त्याचें साह्य आपणाकडून होण्यासारखें नसल्यास त्यास दूर लोटावें; पण गनिमी कावा लढवून त्यास मुका मार देऊं नये. तसें केलें तर त्याच्या अंतःकरणांत पेटलेली अपमानाची व चिडीची आग आपल्या सुखास खाईलच खाईल, हें पक्कें लक्षांत ठेवावें.

आतां आपत्कालांत सांपडलेली सर्वच माणसें सुधी नसतात, हेंही तितकेंच खरें आहे. कांहीं मोठी उपद्यापी असतात. जेथें चरतील तेथेंच निर्लज्जपणानें घाण करतील. अशांचा संपर्क बेलाशक टाळावा. दुर्जनांवर दया करणें म्हणजे सज्जनांना दुखवणें आहे. अर्थात असलीं खट्याळ माणसें कितीही जवळचीं असोत, त्यांची भीड धरण्याचें कारणच नाहीं. असो.

कुटुंबांतील माणसांपैकीं ज्यांच्या उपयोगी पडावयाचें किंवा ज्यांच्यावर उपकार करावयाचे त्यांच्या संबंधांत एक गोष्ट लक्षांत

ठेवावी. मोबदल्याच्या अपेक्षेनें कांहीं करूं नये. आश्रयार्थी मनुष्यावर केलेल्या उपकाराचें स्वरूप असें असावें कीं, त्याच्या आधारें तो चटकन् स्वावलंबी बनेल ! दुसऱ्याचें ओझ्यास हात द्यावयाचा याचा अर्थ तें सबंध आपल्या डोक्यावर घ्यावयाचें असा नव्हे. त्यास दम घ्यावा व तें सावरून घेण्यास त्यास संधि सांपडावी, एवढेंच साह्य आपणांस सुलभतेनें करता येईल. ही जाणीव त्या मनुष्यासही द्यावी. म्हणजे तोही सावध राहून आपल्यावर फार रेलणार नाहीं.

कोणत्याहि लहान मोठ्या उपकारामागें किंवा साह्यामागें निरपेक्षता असावी. माना–प्रेमाप्रमाणेंच उपकाराची फेड मागून मिळत नाहीं. उपकारकर्त्यापुढें उपकृत मनुष्य स्वभावतःच निष्प्रभ असतो व त्या स्थितीची त्यास लाज वाटत असते. अर्थात् आपण आपल्या कृतीनें किंवा वाचेनें त्यास आणखी लज्जित करूं नये. नाहींतर तो कृतज्ञता दर्शविण्याऐवजी आपला तिटकारा करूं लागेल.

कोणतेही निरपेक्ष उपकार वाया जात नाहीत. मात्र आपण त्याच्या फळाची वाट पाहूं नये. पुष्कळ लोक असे आहेत कीं, ते उत्साहाच्या भरांत किंवा लौकिकाकरितां दुसऱ्याचें साह्य करितात. पण मागून त्यांची अशी कुरकुर असते कीं, पहा मी अमक्या तमक्याला असा उपयोगी पडलो पण तो कांहीं मला आतां विचारीत नाहीं. परंतु या असल्या तक्रारींत अर्थ नाहीं. उपकाररूपी कर्ज लोकास दिल्यावर त्याचें स्मरणही न ठेवण्यांत शहाणपणा व मनाचा थोरपणा आहे. उपकृत मनुष्यानें आपल्या उपकारकर्त्यास स्मरणें यांत माणुसकी आहे. परंतु ती त्यानें दाखविणें किंवा न दाखविणें हें त्याच्याच मर्जीवर ठेवावें. आपण कांहीं न बोलणें उत्तम. अशा मुग्धतेमुळेंच

कदाचित् त्याची दामदुप्पट परत मिळण्याचा संभव आहे. 'गरज सरो न् वैद्य मरो' ही म्हण सर्वत्र अनुभवास येणारी आहे, मग उगीच गाजावाजा का ?

साह्य–उपकार देण्यांत जसें मनाचें थोरपण लागतें तसेंच तें घेण्यांत किंवा मागण्यांत तारतम्य लागतें. आपली अडचण आपणाकडून न निभण्यासारखी आहे अशी खात्री झाल्यावर मग भोंवताली नजर टाकावी. नंतर अमूक आप्त श्रीमान् .आहे एवढ्या विश्वासावरच त्याच्याकडे धावूं नये. सख्या बांधवांतही समानता असेल तर सख्य टिकून असते. दरिद्यानें श्रीमंताकडे उगीच तोंड वेंगाडण्यास जाऊं नये. जेथें खरोखरी सख्य असेल तेथेंच आपलें हृदय उघडें करावें. अशा स्थानीं पुष्कळदां आपण विफलमनोरथ होऊं पण श्रीमंतांनीं नाक भुंवया उडवून केलेल्या अवहेलनेपेक्षां या वैफल्याचें दुःख खास जास्त नसतें.

निर्धन मनुष्याच्या आप्तबांधवांचें वर्तुल संकुचित होत जातें, तर सधनांचें पसरत जातें. म्हणून सधन झालेल्या किंवा होऊं घातलेल्या मनुष्यानें तें वर्तुल आपल्या टप्यांत राहील असें करावें. गूळ तेथें मुंगळे असावयाचेच, पण त्याला परिमितता असावी. नाहींतर आपला चट्टामट्टा उडण्यास वेळ लागणार नाहीं. या करितां माणसाची पारख नीट करावी. सधनावस्थेंत तोंडावर मिळालेल्या स्तुतीला भाळण्यांत धोका आहे.

यावरून सगळ्यांना झिडकारीत सुटावें असा अर्थ नाहीं. गरजू कोण ? हलगरजी कोण ? स्तुतिपाठक कोण ? मतलबी कोण ? या सर्वांचा पडताळा घ्यावा आणि ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें ज्याला

त्याला जवळ किंवा दूर ठेवावें. विशेषेंकरून आपल्याला साधन करून कांहीं दुष्ट आपल्यावर अवलंबून असलेल्या भिडस्त, अबोल्या माणसांचा छळ करतात कीं काय याविषयीं फार जागरूक असावें. आपल्या संपत्तीनें आपल्या आप्तांचें एखादे वेळीं हित झालें नाहीं तरी पत्करेल पण त्यांचा घात न होईल याला जपलें पाहिजे.

संसारांत सर्वांना सारखें खुश ठेवणें शक्य नाहीं; पण सर्वांना न्यायदृष्टीनें वागविणें शक्य आहे. तेवढी दक्षता आपण घेतल्यास गृहसौख्याचा गाडा सरळ चालण्यास फारसा प्रत्यवाय येणार नाहीं.

लेखांक आठवा

# गृहसौख्य व शेजारधर्म.

## लेखांक आठवा.

# गृहसौख्य व शेजारधर्म.

**न तत्परस्य संदध्यात् प्रतिकूलं यदात्मनः ।**
**एष संक्षेपतो धर्मः......... ॥**

'आपल्याला जें प्रतिकूल म्हणजे दुःखकारक वाटतें तसें लोकाबरोबर वर्तन करूं नये हें सर्व धर्मांचें व नीतीचें सार आहे.'

विदुरनीति

'या करितां लोकांनीं जसें तुम्हाशीं वर्तन करावें म्हणून तुमची इच्छा आहे, तसेंच तुम्ही त्यांशीं वर्तन करा, कारण नियमशास्त्र व प्रवचन-शास्त्र हेंच आहे.'

बायबल.

एकेका कुटुंबापुरता गृहसौख्याचा विचार झाला. आतां घराबाहेर त्याचा विस्तार कसकसा होत गेला आहे आणि त्या बाबतींत व्यक्तीची + कुटुंबाचीं कर्तव्यें काय आहेत हें पाहिलें पाहिजे.

दोन किंवा अधिक व्यक्ती प्रेमसंबंधानें एकत्र नांदूं लागल्या म्हणजे कुटुंब बनतें आणि अशीं अनेक कुटुंबें एकत्र झालीं म्हणजे समाज तयार होतो. समाजांतील सर्वच कुटुंबांचे लागेबांधे गुंतलेले असले तरी प्रत्येक कुटुंबाचा निकटचा संबंध केवळ त्याच्या आजू-बाजूच्या चार पांच कुटुंबांशींच असतो. गृहसौख्याचा कुटुंबाबाहेरील

विस्तार या संबंधावर पुष्कळच अवलंबून आहे. तेव्हां तो कसा असावा किंवा असला पाहिजे तें आतां पाहूं. व्यवहारांत यास शेजार-धर्म असें म्हणतात.

आपल्या हाताच्या बोटाकडे पहा. पांचहि बोटें स्वतंत्र आहेत व त्यांच्यांत सारखेपणा नाहीं. परंतु सुखदुःखाची अनुभूति सर्वांना एका प्रमाणांत आहे आणि काम करतांना तीं एकमेकास पूरक होऊन वागतात. शेजारधर्मानें बांधल्या गेलेल्या कुटुंबांनीं आपसांत असें वर्तन केल्यास कोणाच्याहि हितसंबंधांत कसलाच बाध न येतां प्रत्येकाच्या गृहसौख्याची मात्र वाढ होईल. पण हें जमावें कसें? आमच्या समाजाची अशी कांहीं विपरीत अवस्था झाली आहे कीं, घरांत भांडणें आहेत तशीं तीं दोन शेजाऱ्यांत आहेत, दोन जातींत आहेत, सर्व देशांत आहेत. त्यामुळें कोणाचेंहि आसन स्थिर नाहीं. जो तो दुसऱ्याविषयीं साशंक आणि माझा जम नीट कसा बसेल या विवंचनेंत चूर! समाजाला सौख्य व स्वास्थ्य लाभावें कसें?

याकरितां शेजारधर्मांत सुधारणा झाली पाहिजे. तो कसा आचरावयाचा हें प्रत्येक कुटुंबानें समजून घेऊन तो आचारांत आणिला पाहिजे. असें जर न होईल तर एकेक कुटुंब स्वतःपुरतें सुखी असलें तरी त्याचें सौख्य किडकें राहील. असो.

शेजारधर्माविषयीं विचार करूं लागल्यावर एक गोष्ट चटकन लक्षांत येते. ती म्हणजे पूर्वीचा काल आतां राहिलेला नाहीं ही होय. पूर्वी आतांइतकी शहरें नव्हतीं, आणि खेड्यांतून जीं कुटुंबें नांदत, त्यांत एकाच वंशाच्या फुटून अलग अलग झालेल्या शाखा असत. आजहि महाराष्ट्रांत अशीं कांहीं खेडीं आहेत कीं, जेथें एकाच घरा-

ण्याचा विस्तार नांदतो आहे. हळू हळू ही स्थिति बदलत चालली आहे. जीवनकलह दिवसेंदिवस अत्यंत तीव्र होत गेल्यामुळें नामांकित घराणींही नामशेष होत चालली आहेत आणि आहेत त्यांचा विस्तार कमी होत चालला आहे. त्यामुळें समाजाच्या स्वरूपांत एकजिनसी-पणा राहिलेला नसून त्यांत बकालपणा येत चालला आहे. हिंदु संस्कृतीला हा मोठा धक्का असून समाजालाही धोका आहे. पण बनत चाललेल्या घडीला विसकटतां येत नाहीं. आहे त्या स्थितींतून मार्ग काढून समाजाचें बल वाढविलें पाहिजे.

पूर्वकालीं एकमेकाच्या शेजारीं नांदणारीं कुटुंबें जशीं एका वंशाचीच बहुधा असत तशीच ती पिढ्यान् पिढ्या एकाच गांवांत नांदणारी असत. दुष्काळ किंवा राज्यक्रांती या सारख्या आपत्काला-खेरीज कोणत्याहि गांवाची पांगापांग होत नसे. सर्वांचे ऋणानुबंध किंवा नातीगोतीं गांवांतल्या गांवांत, फार तर, पंचक्रोशींत असत. या चिरसहवासामुळें त्यांच्यामध्यें कलह होण्यास सोपें जात असलें तरी सर्वांना एकाच स्थानीं जन्माचें नांदावयाचे आहे या जाणिवेनें संक-टाच्या वेळीं एकजूट होण्यास आणि इतर वेळीं गुण्यागोविंदानें राह-ण्यास त्यांना अडचण पडत नव्हती. पंचवीस तीस वर्षांखालीं खेड्या-पाड्यांत दिसून येणाऱ्या एकजुटीचें वर्णन वृद्धांच्या तोंडून आजहि ऐकण्यास मिळतें. तो काल आतां राहिलेला नाहीं. आतां मोठीं खेडीं सुद्धां शहराचें रूप घेत आहेत. प्रवासाचीं साधनें विपुल झालीं. दुष्काळ सदाचाच मागें लागला. घरीं बसून निभाव लागणें अशक्य झालें. पोटापायीं जो तो आपली जन्मभूमी सोडून बाहेर जाऊं लागला. यामुळें अनेक स्वभावाचीं व भिन्न भिन्न स्थलींचीं कुटुंबें एकमे-

काच्या संगतींत येऊं लागली. अर्थात् त्यांच्यामधील शेजारधर्म जुन्यापेक्षां निराळा होणें, त्याचें मुख्य स्वरूप पूर्वींचेंच असलें तरी वेष भिन्न असणें स्वाभाविकच आहे. हा फरक जाणून घेऊनच समाजांत वावरलें म्हणजे झालें.

या लेखांकाच्या शिरोभागीं दिलेल्या सुभाषितामध्यें शेजारधर्माचें सार आहे म्हणण्यास हरकत नाहीं. बायबलांतील समानार्थी वाक्य देण्याचा हेतू हाच कीं, शेजारधर्माचें सामान्यस्वरूप कोठेंहि गेलें तरी एकच कसें आहे तें ध्यानीं यावें. असो.

आपल्या गृहसौख्याचे घराबाहेर गेलेले धागे शाबूत ठेऊं पाहणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं खालील नियम नीट लक्षांत घेतले पाहिजेत.

१—आपल्यावरून जग ओळखावें.

२—आपल्यावरून जग ओळखूं नये.

३—व्यक्ति तितक्या प्रकृति हा मानवधर्म आहे.

दुसरा नियम पहिल्याच्या अगदीं विरुद्ध असला व तिसरा पहिल्या दोघांचें रूपांतर असला तरी शेजारधर्म समजून घेण्यास त्यांची आवश्यकता आहे, हें सांगायला नको. यांतहि विशेषेंकरून पहिला नियम कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीनें, दुसरा श्रेष्ठांनीं कनिष्ठाविषयीं विचार करतांना आणि तिसरा कुटुंबांतील मुख्यानें ध्यानीं घेतला पाहिजे. पहिला नियम मुलाबाळांना व स्त्रियांना समजाऊन देण्यास, दुसरा स्वतःला शहाणपण शिकवण्यास आणि तिसरा आपसांत समजूत पाडण्यास सोपा आहे. वाचकांनीं विचार करावा.

एकमेकाच्या निकट सहवासांत आलेल्या कुटुंबांमध्यें सख्य निर्माण होण्यासच शेजारधर्माचा उपयोग होतो व झाला पाहिजे.

मागें सांगितलेंच आहे कीं, सख्याची उत्पत्ति समानतेवांचून नाहीं. तेव्हां शेजारधर्मानें निगडित झालेल्या कुटुंबांतही समानता पाहिजे. श्रीमंत व दरिद्री, मालक व नोकर, शहाणा व अजागळ किंवा स्वच्छ व अमंगळ अशा विषम स्थितीच्या कुटुंबांचा शेजार परस्परांना सुखावह होणें कठिणच आहे. मुंबईसारख्या बकाल वस्तीच्या नगरांत ही विषमता मोठ्या प्रमाणावर असते. म्हणूनच तेथील शेजारधर्म जेवढ्यास तेवढा आणि सख्य नांवापुरतें असतें. असो.

आतां पहिल्यांदा समान योग्यतेच्या शेजाराविषयीं पाहूं.

शेजारधर्म सुरू झाला म्हणजे कुटुंबांतील बायकांचे आणि मुलांचे संबंध अगोदर जुळून येतात आणि मागाहून पुरुष त्यांत पडतात. मग त्यांतूनच ओळखी, भला भाव, सख्य, घरोबा, क्वचित् स्थानीं व वेळीं नातें इत्यादि गोष्टी निर्माण होऊन पहिल्या पहिल्यांदा सर्व कांहीं अगदीं सुरळीत चालतें. बंडू, बबी, मधु इंदूकडे अंगतीपंगतीला जाऊं लागतात. सरलाताई विमलाबाईकडे स्वतःचें ताट वाढून घेऊन जेवायला येतात, प्रभाकरपंतांना वसंतराव चहाला आल्यावांचून बरें वाटत नाहीं. पुढें सरलाताईची सुंदर चटणी नमुन्यादाखल विमलाबाईच्याकडे येते आणि त्यांची एखादी नवीन तऱ्हेची उसळ सरलाताईकडे जाते. मग एकमेकींचीं घरकामें एकमेकांच्या सहाय्यानें होणें किंवा एकमेकींच्या गप्पांच्या नादांत ती तशीच पडून राहाणें; वसंतरावाची मंडळी थोडक्या दिवसाकरितां कोठें जाणार असल्यास त्यांनीं खानावळींत न जातां प्रभाकरपंताकडे भोजनास येणें, एकमेकानीं एकमेकाची भाजी आणणें किंवा बाजारहाट करणें इत्यादि व्यवहार सुरू होतो. अर्थात् असा प्रकार

घडून येण्यांत गैर कांहींच नाहीं. परंतु हें व्रत शेवटपर्यंत निभण्याची पंचाईत असतें. काय होतें कोणास माहीत? पण वळीव पावसाच्या ढगाप्रमाणें शेजारधर्माच्या या स्वच्छ सुंदर आकाशांत एखादा ढग उपस्थित होतो आणि कोणाला कल्पना नाहीं इतक्या झपाट्यानें त्याची वाढ होऊन आकाश भरून येतें. विजा कडकडूं लागतात. गडगडाटही चालू होतो आणि नंतर ऐन धुमश्चक्री! कित्येक वेळां गंमत अशी होते कीं, पुरुषांना या संकटाची वार्ताहि नसते. ते बिचारे ऐनवेळीं युध्दांत ओढले जातात. मूळ नांदीची त्यांना कांहींच कल्पना नसल्यांमुळें पुढच्या नाटकांत आपल्याकडे कोणती भूमिका आहे व ती कशी पार पाडावयाची आहे याचा त्यांना कांहींच उलगडा होत नाहीं. शांत झोपेंतून एकाएकी उठवून जागे केलेल्या माणसाप्रमाणें त्यांची मोठी चमत्कारिक अवस्था होते. आपल्या बायकोची मर्जी सांभाळून या संकटांतून पार पडणें त्या बिचाऱ्यास किती कठिण जात असेल याची कल्पना ज्याची त्याला.

दोन कुटुंबांत जमून आलेल्या स्नेहाचा शेवट असा विपरीत व्हावा हें एकंदरींत गैरच. परंतु कलहाचें मूळ कसें उपस्थित होतें, हें प्रथमतः कोणाच्याच ध्यानीं येत नाहीं. कारण तें खरोखरीच अगदीं क्षुल्लक व हास्यास्पद असतें. भांडणाऱ्या दोन कुटुंबांत जर तें उकलून दाखविण्यांत आलें तर त्यांनासुद्धां तें खरें वाटणार नाहीं. असें असतां पुष्कळदां ठिणगीची आग होते.

याकरितां प्रत्येक कुटुंबांतील स्त्रीपुरुषांनीं शेजारधर्म आचरितांना शेजाऱ्याशीं जीवश्च कंठश्च प्रेम न जमलें तरी चालेल पण साधा सलोखा सतत टिकेल अशा धर्तीचें धोरण राखावें. स्त्रियांचा

स्वभाव मुळांतच लागट असल्यामुळें त्यांच्यामध्यें प्रेम जमण्यास वेळ लागत नाहीं. याकरितां त्यांनीं याविषयीं विशेष दक्षता घेतली पाहिजे.

ज्या कुटुंबांचा शेजार जन्माचा आहे, त्यांची गोष्ट निराळी. पण इतर कुटुंबांनीं नव्या शेजोसंत जातांच पहिला नियम हा ठरवावा कीं शेजारच्या कुटुंबांतील प्रमुख माणसांच्या स्वभावाची पुरती पारख केल्या-वांचून' विशेष संबंध ठेवावयाचा नाहीं किंवा घरोबाहि वाढवावयाचा नाहीं. म्हणजे आपण अगदीं दगडी पुतळ्याप्रमाणें तटस्थ रहावयाचें असा अर्थ नाहीं. कुशलपूर्वक बोलणें, प्रसन्नतेनें हंसणें, सहजी उप-योगी पडण्यास तत्पर असणें आणि त्यांना आपली तोषीस न लागेल असें वागणें इत्यादि गोष्टी केल्या पाहिजेतच. यापेक्षां त्यांस कसेंसें वाटेल व त्यांना अडचण वाटेल असा संबंध आणूंच नये.

मनुष्यस्वभाव मोठा विचित्र आहे. एकाच कुटुंबांतील माणसें खरीं पण त्यांत तीन तऱ्हा असतात.

कोणा पुरुषाला माणसांची वर्दळ खपते तर त्याच्या कुटुंबि-नीला तें मुळींच आवडत नाहीं. किंवा याच्या उलटहि असूं शकतें. कित्येकांना फार बोलायला हवें असतें. कित्येकांना कामापेक्षां जास्त बोलणें रुचत नाहीं. कित्येकांना मुलें आवडतात. कित्येकांना त्यांचें [illegible]य असतें. कित्येक तोंडांत गोड पण अंतःकरणांत कडू तर कित्येक त्य[illegible]या उलट असतात. तात्पर्य एक शेजार म्हणजे अवघी सृष्टी लहान स्वरूपांत आपल्यापुढें असते. अशा स्थितींत आपण किती जपलें पाहिजे, हें सांगायला नको. **एखाद्या अनोळखी यंत्राला हात लावणें जितकें धोक्याचें आहे, तितकेंच अनोळखी**

समाजांत ध्यान न ठेवतां एकदम मिसळणें धोक्याचें-परिणामीं पश्चात्तापांत पाडणारें-आहे.

बाहेरच्या भपक्याला किंवा वरवरच्या देखाव्याला न भुलता किंवा बुजता डोकें शांत ठेवून माणसामाणसांची पारख करावी. एकदम अनुकूल किंवा प्रतिकूल मत बनवूं नये. या परिक्षेला उत्कृष्ट उपाय म्हणजे त्या कुटुंबांतील एकंदर माणसें आपसांत कशी वागतात हें बारकाईनें पाहाणें. तीं आपसांत सदा कावत कदरत असली किंवा कुटाळक्या करतांना आढळलीं किंवा त्यांची भाषा, आचार व विचार सभ्यतेला सोडून असल्याचें दिसून आलें तर आपण त्यांच्याशीं जपूनच व्यवहार केला पाहिजे हें उघडच आहे. याच्या उलट त्यांचें आपसांत प्रेम दिसलें, त्यांचें बोलणें चालणें लाघवी व सभ्य आढळून आलें तर त्यांच्याशीं विशेष संबंध घालण्यास हरकत नाहीं, असें समजून चालावें. पण असें असलें तरी संबंध वाढविण्याची घाई करूं नयेच. होतें काय ?—संबंध आला कीं, समानधर्म नसल्यास धक्का बसतो. म्हणून समानधर्म आहे कीं नाहीं हें अगोदर पहावें. प्रत्येक व्यक्तीला वाटत असतें कीं, मी शाहाणा, विचारी आणि सरळ आहे. माझ्या उपयोगी सर्वांनीं पडलें पाहिजे. मी स्वतः उपयुक्त आहे. जगानें माझी किंमत केली पाहिजे. इत्यादि. अर्थात् हा भ्रमच असतो. तो भोपळा परक्याकडून फोडला जातो आणि मग आपल्यास दुःख होतें. यापेक्षां प्रथमपासूनच स्वतःविषयींची फाजील उच्च व इतराविषयीं तुच्छ भावना न ठेवण्याविषयीं जपावें. दुसऱ्याच्यामधील दोष पाहण्यास फारसे डोळे फाडावे लागत नाहींत किंबहुना डोळे मिटूनसुद्धां ते दिसतात. गुण पाहणें, तो ओळखणें आणि मान्य

करणें यालाच शाबूत दृष्टी लागते अशी दृष्टी स्वतःविषयीं उच्च व परक्याविषयीं नीच भावना नसल्यानें प्राप्त होते.

शेजारच्या कुटुंबामध्यें आपल्याविषयीं भला भाव व्हावा आणि आपला त्यांच्यावर बोज राहावा असें ज्या स्त्रीपुरुषांना मनापासून वाटत असेल, त्यांनीं खालील गोष्टी टाळाव्या.

नाहीं त्या क्षुल्लक गोष्टीकरितां वारंवार साह्याची अपेक्षा करणें, पैशाची याचना करणें, अवेळीं त्यांच्याकडे जाऊन बसणें, बोलण्यांत चेंगटपणा असणें, पुरुषांनीं बायकांशीं किंवा बायकांनीं पुरुषांशीं कारण नसतां बोलण्याचा प्रसंग घालणें, आपलीं मुलें असल्यास त्यांच्यावर दाब न ठेवतां 'मुलेंच आहेत.' या सबबीवर त्यांचा उपसर्ग शेजार कुटुंबास होऊं देणें, त्यांचीं मुलें असल्यास त्यांना धिःकारानें वागविणें किंवा त्यांचे लाड करण्याचा देखावा करणें, प्रसंग न ओळखतां विनोद करणें, त्यांच्याविषयीं इतरांजवळ कुटाळक्या करीत बसणें, विशेष प्रसंगीं त्यांच्याविषयीं विरक्ति दाखविणें किंवा इतरांपुढें त्यांना तुच्छ करणें, आणि आपसांत लावालावी करणें इत्यादि प्रकार शेजारधर्मांत बिघाड आणणारे असून त्यांतूनच कलहाग्नि निर्माण होण्याचा संभव आहे. म्हणून या गोष्टी सहसा न होऊं देण्याविषयीं आपल्याकडून जपावें. कित्येक वेळां असे होतें कीं, कांहीं पुरुष किंवा स्त्रिया भारी लोचट आढळतात. त्यांच्यापासून आपलें रक्षण करावयाचें म्हणजे त्यांच्या खुशी नाखुशीकडे पाहून चालणार नाहीं. त्यांना दोन हात नेहमीं दूर ठेवणें चांगलें. त्यांची गय करण्यांत अर्थ नाहीं. कारण, अशीं माणसें आपणास केव्हांहि वाईटपणा देण्यासच सजलेली असतात.

आपण दुसऱ्यास त्रास द्यावयाचा नाहीं, दुसऱ्याचा मात्र आपण सहन करावयाचा हा शेजारधर्मांतील देवगुण आहे खरा पण त्यालाहि सीमा आहे. समाजांत कांहीं माणसें अशीं असतात कीं त्यांना आपण दुसऱ्यास किती त्रास द्यावा, याचा विचारच नसतो किंवा तसें ते सोंग आणितात. एखादें मनुष्य किंवा कुटुंब दुसऱ्याच्या उपयोगी पडतें एवढें कळतांच हीं असलीं भुतें लघळपणानें गोंडा घोळीत आणि तोंडापुरतें गोड गोड बोलत आपला हेतु साधूं पाहतात. तर अशांनाहि दाद देऊं नये. शेजारधर्म उभयपक्षीं पाळावयाचा असतो. एकमेकाच्या अडचणी ओळखणें, त्या दूर होण्याकरितां यथाशक्ति साह्य करणें आणि प्रेमादर ठेवणें या गोष्टी सगळ्यांनींच केल्या पाहिजेत. जें माणूस किंवा कुटुंब अशी देवाण घेवाण करण्यास तयार नाहीं, त्यास आपल्या सौजन्याचा अवास्तव लाभ मुळींच घेऊं देऊं नये. कारण, हीं असलीं माणसें बहुशः कृतघ्न व अंगचोर असतात. अशांचा मुलाहिजा काय म्हणून धरावयाचा !

**यस्मिन् यथा वर्तते यो मनुष्यः**
**तस्मिंस्तथा वर्तितव्यं स धर्मः ।**
**मायाचारो मायया वर्तितव्यः**
**साध्वाचारः साधुना प्रत्युपेयः ॥**

जो मनुष्य ज्याशीं जसें वर्तन ठेवील त्याशीं त्यानें तसेंच वर्तन ठेवावें हा धर्म आहे; कपट्याशीं कपटानें व खऱ्याशीं खऱ्या रीतीनें वर्तन करावें. विदुरनीति.

पैशाची देवघेव करण्यांतहि हेंच धोरण असावें. कारणावांचून कोणी कोणाकडे शब्द टाकूं नये आणि प्रसंग पडलाच तर भीड

न ठेवतां व्यवहार करावा. शब्दाला जागावें. मागतांना अत्यंत आर्जवी आणि देतांना उपमर्दकारक ताठा असूं नये. असो.

या ठिकाणीं बायकाबायकांत होणाऱ्या उसनवारीविषयीं किंवा गुपचुप व्यवहाराविषयीं थोडासा विचार केला पाहिजे. बायकांतील भांडणें पुष्कळदां या पायीं निर्माण होतात व कित्येक वेळां पुरुषांनाहि त्रास सोसावा लागतो.

पुष्कळ दाम्पत्यांची संसार करण्याची पध्दतच अशी गचाळ असतें कीं, ऐपत असतांही संसारांत आवश्यक लागणारें अन्नवस्त्र किंवा इतर वस्तु यांचा पुरवठा करावयाचा नाहीं. बायकोनें लक्ष द्यावयाचें नाहीं व नवऱ्यानें चौकशी करावयाची नाहीं. मग आयत्या-वेळीं एखादी महत्त्वाची गरज निर्माण झाली कीं, करा शेजाऱ्या-कडे तोंड वेंगाडणी. कित्येकवेळां तर मूठभर मीठ, चिमूटभर हळद, एवढासा खोबऱ्याचा तुकडा नाहींतर चार मेथ्याचे दाणे माग-ण्यास जाण्याची बाईची तयारी. एवढा संसार मांडल्यानंतर एवढ्या तेवढ्याकरितां शेजाऱ्याकडे जावें कसें ही शंकासुध्दां त्यांच्या मनाला शिवत नाहीं. शी ! शी !! ही संवय गृहिणींना शोभण्यासारखी नसून त्या घरच्या पुरुषांना लांच्छनास्पद आहे. यांतूनहि समजा, ऐपतच नसेल तर ?—कोरडें खावें. जेवढें मिळत असेल तेवढ्यांतच संसार करावा. पण असली अपमानकारक उसनवारी करून आपल्या घरचा बोज घालवूं नये.

प्रत्येक पुरुषाचें हें कर्तव्य आहे कीं, त्यांनीं आपल्या पत्नीवर असला प्रसंग आणूं नये. पत्नी सांगेल त्यावेळीं बाजार करावा आणि तिला काटकसरीचें महत्त्व समजाऊन द्यावें. चांगलेचुंगले खायला

पाहिजे असेल तर सपाटून उद्योग करून मिळकत वाढवावी. निर्लज्जपणा पत्करून उसनवारीनें चैन करूं नये. त्यांत खरें सौख्य नाहीं. कदाचित कांहीं वेळ आपली गरज भागेल पण पुढें लोक आपला कंटाळा करूं लागतील. त्याला जपावें.

व्यापाराप्रमाणें व्यवहारांतही मनुष्यानें आपली पत राखून असलें पाहिजे. संसाराची खाई मोठी विलक्षण आहे. मध्यम स्थितींतील कुटुंबांनीं कितीही दक्षता बाळगिली तरी एखादा प्रसंग अगदीं ओढाताणीचा येतो. एखादे वेळीं एखादा प्रतिष्ठित पाहुणा किंवा अतिथी अभ्यागत येतो आणि त्याच वेळीं संसारांत एखादी आवश्यक वस्तु संपलेली असते. अशा स्थितींत काय करावयाचें ? शेजाऱ्याचें साह्य घेतलेंच पाहिजे व तें घ्यावेंही. जर आपण कधींच उसन्यास जात नसूं तर या प्रसंगीं आपले शेजारी आपणास आनंदानें साह्य करतील. शेजाऱ्याकडे मी कधींसुद्धां साह्य मागणार नाहीं अशी घमेंड बाळगण्यांत अर्थ नाहीं. मनांत तशी प्रतिज्ञा केलेली असावी. पण जनांत आपली पत सांभाळून साह्य द्यावें व घ्यावें. शेजाऱ्याशीं आम्ही अशा बाबतींत नेहमीच फटकून राहूं तर त्यांना आपल्याकडे साह्य मागण्यास संकोच वाटेल. तसें होता उपयोगी नाहीं.

अविचारी समजुतीनें व वागणुकीनें उसनवारीमध्यें किती तोटा आहे, याची बायकांना कल्पना नसते आणि एकदां त्यांना ती सवय जडली म्हणजे मग त्यांना त्यांत होणारें नुकसान किंवा अपमान समजूत येत नाहीं. एका बाईचें प्रत्यक्ष पाहिलेलें उदाहरण सांगतो. या बाईस आपली श्रीमंती व व्यवहार चातुर्य दाखविण्याची भारी हौस. कोणत्या ठिकाणीं कोणता खर्च आवश्यक आहे आणि आपण कोणता

व्यवहार सांभाळला पाहिजे याचा तिला कांहीं सुमार नसे. तिचा नवरा आपल्या ऐपतीप्रमाणें सर्व जिन्नस वेळचे वेळीं आणून देई. परंतु या बाईची नेहमी ओढ कांहीं संपायची नाहीं. चहा साखरेची साधी बाब घेतली तरी तींत सुद्धां तिची तारांबळ. कारण त्या जिन्नसांचीही तिनें वेळीं अवेळीं उसनवारी करून ठेविलेली असावयाची. ती इतकी कीं, नवऱ्यानें आणून दिलेले हे दोन्ही जिन्नस परत देण्यांतच सम्पून जावयाचें. बाईच्या हातांत फक्त चहाच्या पुड्याचें टरफल व साखरेचा कागद शिल्लक राहायचा! कीं दुसरे दिवसापासून पुनः उसनवारी सुरू. नवऱ्यास सांगण्याची सोय नाहीं. बरें शेजारी पाजारी तरी कोठवर सहन करणार? लबाड बायांनीं मात्र तिच्या या केविलवाण्या स्थितीचा भरपूर फायदा घ्यायचा. जिन्नस उसने द्यावयाचे पण परत घेतांना भांडून तंडून दुप्पट घ्यावयाचे. बाई पडली नेहमीची गरजू. मुकाट्यानें भुर्दंड भरत राही.

ज्या गृहिणींना संसार व्यवस्थेनें करावयाचा आहे, त्यांनीं या असल्या फंदांत मुळींच पडूं नये. आपली गरीबी जशी उघडी करूं नये तशीच खोटी श्रीमंती दाखविण्याच्या मोहाला बळी पडूं नये. पहिल्यापासूनच याविषयीं काळजी घेतली म्हणजे आपली कधींच ओढाताण होत नाहीं. आणि ज्यावेळीं होईल त्यावेळीं शेजारणी निभाऊन नेतील.

जी गोष्ट उसनवारीची तीच इतर गुपचुप व्यवहाराची. पतीकडून लबाडीनें पैसे काढून दागदागिनें करणें किंवा खण लुगडीं घेणें आणि नंतर त्या जिनसा माहेरून मिळाल्याचा बहाणा करणें या गोष्टी अगदीं त्याज्य होत. त्यांत मनाला समाधान नाहीं. शिवाय

परक्याच्या साह्यानें असला व्यवहार केल्यावर त्यांत फसगत तर होतेच; पण आपलें व आपल्या पतीचें एकचित्त नाहीं ही गोष्ट उघड होते. सुगृहिणीला ही गोष्ट निःसंशय कमीपणा आणणारी आहे. असो.

उसन्यास न जाणें व गुपचुप व्यवहार न करणें या गोष्टी जशा गृहिणींना आवश्यक आहेत, तशाच पध्दतीनें असला व्यवहार करणाऱ्या शेजारच्या बायकाशीं तसला संबंध न ठेवणेंहि आवश्यक आहे. म्हणजे वरचेवर उसन्यास येणाऱ्या बायांनाही उसनें घालूं नये. या अशा बायका रागावतील म्हणून भिण्याचें कारण नाहीं; कारण त्यांच्या रागाला किंमतच नसते. ज्यांना नेहमीं उसन्याला जाण्याची संवय, त्यांच्याकडून आपली गरज कधींच भागावयाची नाहीं, हें अगदीं ठरल्यासारखेंच आहे. मग त्या रागावल्या काय न् लोभावल्या काय? दुसरी गोष्ट अशी उसनवारी आपण पेरीत गेलों तर वेळीं आपली अडचण व्हायची ती निराळीच. मग घरच्या मंडळींचा राग करून घेण्यापेक्षां अशा बायकांना नाखुश केलें म्हणून कोठें बिघडलें? त्याचप्रमाणें अशा बायकांनीं कांहीं गुपचुप व्यवहारांत आपलें साह्य मागितलें आणि त्यांत आपल्यास केवढाही लाभ दिसला तरी त्या भानगडींत पडूं नये. ढालगज बायकांना खोटें बोलणें व कांगावा करणें या गोष्टी सहज साधतात. सुगृहिणीला या विद्येची केव्हांच गरज पडत नाहीं. मग तिच्याकडे लक्ष द्या कशाला?

आतां श्रीमंत शेजाराविषयीं पाहूं.

पहिली गोष्ट आपण होऊन असलें शेजार पाहूं नये. असलें शेजार पाहणें म्हणजे शेराच्या झाडाखालीं जाऊन बसण्यासारखें आहे. निरुपायानें किंवा योगायोगानें तसा प्रसंग आलाच तर फार

बेतानें असावें. अशा शेजारास आपलें साह्य सहसा लागत नाहीं आणि त्याचें आपण घेण्याचा प्रयत्न केला तर तें अंगलट येण्याचा संभव असतो. मग त्या भानगडींत पडा कशाला? साह्याविषयीं उत्कंठा असावी ती समान योग्यतेच्या किंवा आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या कुटुंबाविषयीं असावी. क्वचित् प्रसंगीं सिंहाला उंदराच्या साह्याची गरज असते; पण तसा प्रसंग आल्यास उंदरानें शेफारून जाण्याचें कारण नाहीं. तेवढ्यापुरतें आपलें कर्तव्य उरकून त्यानें पळ काढावा हें बरें. श्रीमंताकडून कांहीं लाभ होईल, त्यांची कृपादृष्टी आपल्यावर असलेली बरी, असला हेतु स्वप्नांतहि मनाशीं बाळगूं नये. श्रीमंतांशीं ताठ्यानें वागण्यांत अर्थ नाहीं. नम्रतेनें पण दूर असणें हाच उत्कृष्ट मार्ग. श्रीमंतांच्या कक्षेंत नेहमीं असण्यांत गरीबांचा अनेक-प्रकारें तोटा आहे. या वागण्यानें जग त्यास लोचट व तोंडपुजा समजतें. श्रीमंताच्या नजरेंत त्याची उपयुक्तता भरण्याचा संभव कमी असतो आणि त्यानें केलेल्या साह्याचा मोबदला श्रीमंताकडून परत होईल अशी खात्री नसते. म्हणून बड्या शेजाराचा उपयोग न झाला, पुरवला, पण त्यांच्यापासून अपाय न व्हावा एवढ्यास जपावें. सगळींच श्रीमान कुटुंबें बेदरकार असतात, असें मुळींच नाहीं. कांहीं कांहीं फारच कुलीन, सौजन्यप्रिय आणि गुणग्राहक असतात. परंतु असा अनुभव आला तरी आपण आपली पायरी सोडूं नये, यांतच हित आहे.

बरें, आपल्यापेक्षां कमी योग्यतेचा शेजार असेल तर? तरीही आपण जपलें पाहिजे. आपल्या सधनतेच्या जोरावर त्यास त्रास देणें किंवा त्याचें साह्य घेण्याचा आपला हक्कच आहे असें मानणें चुकीचें

आहे. तें शेजार स्वभावानें गरीब असेल तर तें मनांतून आपल्यावर रुष्ट राहील. उर्मट असेल तर आपला अपमान करील. श्रीमंतांच्या बायकांना या विषयीं कांहींच सुमार नसतो. शेजारच्या गरीब बाया-बापड्यांनीं येऊन आपल्या येथें राबावें अशी खुळी इच्छा त्या धरतात. स्वतः उपयोगी पडण्याच्या नांवानें शून्य. अशा बायकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, दुसऱ्याचा उपयोग फुकटांत मिळत नाहीं आणि मिळालाच तर तो शेवटीं फार महाग पडतो. सर्वच गरीब कुटुंबें सज्जन असतात असें नाहीं. म्हणून श्रीमंतांनींही जपूनच पाऊल टाकावें. असो.

आपल्या शेजारीं अनाथ, निराश्रित, दुर्बल अशीं जीं माणसें असतील, त्यांच्याकडून मोबदला मिळण्याची अपेक्षा न ठेवतां त्यांना जरूर सहाय्य करावें. त्याचप्रमाणें विवाहादि मंगल प्रसंगीं गतकालांत घडलेले लहान मोठे खटके विसरून एकमेकांनीं एकमेकांचा मोठ्या आजारीपणांत किंवा एखादा मृत्यू घडला असल्यासहि आपल्याकडून देववेल तितकें साह्य द्यावें.

शेजाऱ्यास आपलीं दुःखें सांगू नयेत आणि त्याची सांगण्याची इच्छा नसल्यास आपण तीं ऐकण्याची उत्कंठा दाखवूं नये. मात्र त्यानें हृदय मोकळें करण्याचें योजिल्यास आपण शांत चित्तानें त्याचें म्हणणें ऐकावें, त्याला धीर द्यावा. त्याचें मन प्रसन्न होण्याबद्दल झटावें. शेजाऱ्याचें कळलेलें एखादें गुपित केव्हांहि बाहेर फोडूं नये. त्याच्यापासून आपल्यास झालेला एखादा त्रास किंवा झालेला अपमान किंवा घडलेलें नुकसान त्यानें सहेतुक केलें आहे कीं काय? याचा विचार करून मगच त्याच्यावर रागवावें. दुसऱ्याच्या कानगोष्टी ऐकून

शेजाऱ्यावर राग करूं नये. ज्यांच्याशीं आपला लोभ जडतो, तो ज्यांना पाहवत नाहीं अशीं कांहीं माणसें जगांत असतात. तीं त्याचा नाश करण्यास टपलेलीं असतात. तेव्हां त्यांच्या बोलण्यावर भिस्त ठेवून चांगल्या माणसाला दुखवूं नये. होतां होईतों शेजाऱ्याशीं जडलेला स्नेहसंबंध दृढ होण्याबद्दल झटावें व जपावें. असें एकमेकांनीं केल्यास सर्वांचेंच गृहसौख्य एकमेकाच्या सुखास॰ पोषक होऊन सर्वांनाच शांतिसमाधान लाभेल.

लेखांक नववा

# गृहसौख्य व राष्ट्रधर्म.

## लेखांक नववा

# गृहसौख्य व राष्ट्रधर्म.

महानप्येकजो वृक्षो बलवान्सुप्रतिष्ठितः ।
प्रसह्य एव वातेन सस्कन्धो मर्दितुं क्षणात् ॥
अथ ये सहिता वृक्षाः संघशः सुप्रतिष्ठिताः ।
तेहि शीघ्रतमान्वातान्सहन्तेऽन्योन्य संश्रयात् ॥

एकटा एकच वृक्ष कितीहि मोठा, बळकट व भूमींत खोल गेलेला असला तरी सोसाट्याच्या वाऱ्यानें एका क्षणांत बुंध्यासह उखडला जातो; परंतु जे वृक्ष एकत्र वाढलेले व एका जमावानें बळकट पायावर उभे असतात ते एकमेकांच्या आधारानें प्रचंड झंझावातालाही पुरून उरतात.

विदुरनीति.

एथपर्यंत गृहसौख्याशीं ज्यांचे संबंध प्रत्यक्ष गुंतले गेले आहेत त्यांचे विषयीं व त्यांच्या संगोपन-संवर्धनार्थ संसारी स्त्रीपुरुषांनीं कोणकोणतीं कर्तव्यें बजावलीं पाहिजेत त्याविषयीं पायरीपायरीनें सामान्य विचार केला. आतां जे संबंध प्रत्यक्ष दिसत नाहींत परंतु ज्यांचा संबंध गृहसौख्याशीं अगदीं निकट आहे त्यांचा विचार करूं.

थोड्याशा व्यापक दृष्टीनें या विषयाची छाननी केल्यास आपल्यास असें आढळून येईल कीं, समाज, देश, धर्म व संस्कृति या याच्या चतुःसीमा आहेत आणि व्यक्तीच्या सुखादुःखाचे किंवा हिता-

हिताचे संबंध त्यांच्यापर्यंत जाऊन भिडले आहेत. हे संबंध वर वर दिसण्यासारखे नसतील पण ते अजिबात नाहींतच असें मात्र मानतां-म्हणतां येणार नाहीं. व्यक्तीपासून समाजापर्यंत मानवजातीचा जो विस्तार झालेला आहे, ज्या भूमीवर तो स्थित आहे आणि ज्या धर्मानें तो एकत्र बांधला गेलेला आहे, त्या सर्वांचें सुखदुःख किंवा हिताहित गोफाच्या पद्धतीनें एकमेकांत विणलें गेलें आहे यांत शंकाच नाहीं. व्यक्तीच्या ठिकाणीं कुलाभिमान किंवा जात्यभिमान स्वभावतःच आढळून येतो, त्यास आपल्या जन्मभूमीविषयीं किंवा वतनवाडीविषयीं विलक्षण प्रेम वाटतें, याचें कारण काय? त्यांचे ठायीं त्याचा कांहींतरी मोठा जिव्हाळा असतो हेंच नव्हे काय?–म्हणूनच व्यक्तीच्या गृहसौख्याचा विचार करतांना त्याच्याशीं निगडित असलेल्या या दूरदूरच्या संबंधांचा परामर्ष घेतला पाहिजे.

दृष्टिपथांत येणाऱ्या कोणत्याहि वृक्षाकडे पहा. भूमीवर शाखादिकांचा व आंत मुळ्यांचा संसार पसरलेला आहे. या दोहोंत प्रत्यक्ष संबंध कांहीं दिसतो का? मुळींच नाहीं. परंतु त्या वृक्षाच्या शेवटच्या डहाळीचें शेवटचें कोवळें पान व भूमींतील शेवटची बारीक केसासारखी मुळी यांचा जिव्हाळा आहे. त्या सर्वांत एकच जीवनरस वाहून सर्वांचें धारण पोषण करितो आहे. मुळ्यांना कीड लागली तर वरची शाखा पर्णें वठूं लागतात. वर कांहीं रोग पडला तर मुळ्यांचा संसार बिघडूं लागतो. अगदीं याच पद्धतीनें मनुष्य, त्याचें गृह आणि आतां वर सांगितलेल्या त्याच्या चतुःसीमा यांचे संबंध एकमेकांत गुंतले गेले आहेत. सर्वांत एकच जीवनरस खेळतो आहे.

मनुष्यानें आपल्या सुखादु:खांचा विचार करितांना देशाधर्माची आठवण ठेवावयाची ती एवढ्याकरितां.

वठूं लागलेल्या वृक्षावर एखादी फांदी सतेज असते व तिच्या-वर नाचणारीं पानेंही हिरवीगार आढळतात, म्हणून काय तीं काळाच्या तडाक्यांतून सुटलेलीं असतात? नाहीं. त्या वृक्षाच्या नाशाबरोबर त्यांचाही नाश जवळजवळ येत चाललेला असतो. व्यक्तीलाही हाच नियम लागू आहे. कांहीं व्यक्ती किंवा कुटुंबें सुखांत–वैभवांत–असलेलीं आढळलीं तरी जर त्यांच्या भोंवतीलचा समाज, त्यांचा देश, धर्म किंवा संस्कृती दु:खांत असेल तर? नि:संशय त्या सुखी व्यक्तींचें किंवा कुटुंबांचें सौख्य धोक्यांत असलेंच पाहिजे. त्यांना त्याचा केव्हां धक्का बसेल याचा नेम नाहीं.

आपल्या देशस्थितीकडे पहा. बुद्धि, शौर्य, पराक्रम करण्याची इच्छा इत्यादि कोणत्या गुणांत आपण इतर देशापेक्षां कमी आहों? परंतु पहा:–साधारणत: कोणतीही व्यक्ती घ्या, जाती घ्या, संस्था घ्या. त्यांची वाढ होतच नाहीं व झाली तर ती फारवेळ टिकत नाहीं. काय बरें याचें कारण? आमचे पुनरुत्थानाचे प्रयत्नही काय थोडे आहेत? असें असतांना आमचें यश दूर का? एवढासा जपान हां हां म्हणतां–आमच्या समोर–पाश्चिमात्यांच्या मांडीला मांडी लावून बसतो आणि आम्ही मात्र एकेक पायरीनें जास्तजास्तच कंगाल होत चाललों आहोंत. काय बरें याचें कारण? आमचा देश पारतंत्र्याच्या गाळांत पुरता पुरला गेला आहे हेंच नव्हे काय? हिंदु जातीकडे पहा. जातीय उद्धाराचा व संघटणाचा एवढा गाजावाजा सुरू असतां कांहीं स्थानीं सबंध समाजच्या समाज महान् संकटांत आहे. कोणाचेंही

जीवन व धन सुरक्षित नाहीं, काय बरें याचें कारण ? हिंदुधर्मावर प्राणसंकट ओढवलें आहे हेंच नव्हे काय ? मग आम्ही आमच्या समाजा–देशा–धर्माविषयीं उदास राहून कसें चालेल ? एकवेळ आम्ही स्वतःचें सुखदुःख किंवा हिताहित बाजूला ठेविलें तरी पत्करेल पण देशाधर्माच्या सुखदुःखाची हेळसांड करतां कामा नये.

व्यक्ती, कुटुंब, कुल, वंश, जाति, समाज व राष्ट्र अशा चढत्या पायऱ्यांनीं मनुष्य विस्तार पावलेला आहे. देशापासून त्यास अन्नोदक व आश्रय मिळतो. धर्म त्यास बल देतो आणि त्याची संस्कृति त्याचें रक्षण करतें. अर्थात् उलटपक्षीं त्यानेंही आपल्या शक्ती-बुद्धीप्रमाणें या सर्वांचा अभिमान बाळगून त्यांचें संगोपन केलें पाहिजे. यांतच त्याचें सुख व तरणोपाय आहे.

माझें कुटुंब उदयास यावें, माझें कुल विस्तार पावावें, माझ्या वंशाची कीर्ति व्हावी, माझ्या जातीकडे अग्रेसरत्व असावें, माझ्या समाजास सर्वश्रेष्ठत्व मिळावें, माझें राष्ट्र वैभवाच्या परमोच्च स्थानीं विलसावें, माझ्या धर्माचा सर्वत्र जयजयकार असावा आणि माझ्या संस्कृतीचे पवाडे इतरांनीं गावें अशी ईर्षा धरून त्याप्रमाणें स्वतः वागणें, त्या पूर्तीकरितां झगडणें, वेळीं त्या साध्याकरितां सुख, धन व प्राण यांचीही पर्वा न करणें यांतच मनुष्यपणा आहे. नाहींतर व्यक्तीशः मी किंवा माझें कुटुंब सुखी आहे ना? बस्स झालें. असें मानून वरील ऋणानुबंधाकडे कानाडोळा करणें किंवा त्यांच्या अपमानाची व हीन स्थितीची चीड न बाळगणें या सारखी अधमता कोणतीच नाहीं.

कोणत्या विचारी व स्वाभिमानी मनुष्यास ही अधमता रुचेल?

गृहसौख्याचा शोध घेऊं पाहणाऱ्या तरुण स्त्रीपुरुषांनों ! आपल्या या परमोच्च कर्तव्याला केव्हांही विसरूं नका. त्याचें यथाशक्ति आचरण करा व सुखी व्हा.

प्राचीन काळीं प्रत्येक गृहस्थाश्रमी पुरुषावर तीन ऋणांचा बोजा असे. व तो त्यानें निवारिला पाहिजे, तरच त्याच्या जन्माचें सार्थक असें मानीत. हीं तीन ऋणें म्हणजे ऋषी–पितर व देव यांची होत. ऋषींचें ऋण वेदाध्ययनानें, पितरांचें संसार करण्यानें आणि देवांचें यज्ञयागादिकांनीं फेडण्याची जबाबदारी प्रत्येक पुरुषावर असे. कालानुरूप आज आपणा हिंदवासीयावर एकच फार मोठें ऋण आहे तें आपल्या देश–जननीचें होय. याची फेड आपण अंशतः तरी केलीच पाहिजे. अर्वाचीन कालीं पुढारलेल्या अशा सर्व राष्ट्रांनीं जो **राष्ट्रधर्म** प्रचारांत आणिला आहे, तो अंगिकारून आपण या ऋणाची फेड करूं शकूं. पारतंत्र्यांत तळमळणारी मायभू आपल्या अनेक हीनदीन देशबांधवांच्या मुखांनीं हंबरडे फोडीत असता कोणत्या सत्पुत्राला स्वतःचें सुख मोठें वाटेल ? जननी व जन्मभूमी यांचें ऋण फिटण्यासारखें नसतेंच मुळीं. पण तें कृतज्ञतेनें मान्य करणें व त्याच्या शोधाकरितां तळमळणें व्यक्तिमात्राचें कर्तव्य नाहीं का ?

स्वतःच्या उत्कर्षाकरितां झगडा पण त्यावेळीं मायभूमीचा उत्कर्ष पायातळीं तुडवूं नका. स्वतःचें कुटुंब, कुल, वंश, जाती किंवा समाज यांच्या उन्नतिकरितां तुम्हांस झटावेसें वाटते ना ? अगदों जरूर. पण तें करितांना आपल्याच देशांतील आपल्याच लाग्याबांध्याच्या इतरांना तुडवण्या बुडवण्याचा अधमपणा पत्करूं नका ! त्यांत भलेपणा नाहीं. सुख नाहीं व उत्कर्षहि नाहीं ! आपल्या धर्मोद्धारार्थ धन

द्या, मान द्या, प्राण वेंचा पण त्यांत दुसऱ्यांच्या धनाचा–मानाचा–प्राणांचा चुराडा करूं नका! आजचा राष्ट्रधर्म पाळावयाचा असेल तर त्यास हेंच पथ्य आहे. हाच एक सन्मार्ग आहे! दुसऱ्याच्या रक्तामांसावर पुष्ट होणारा मनुष्य अधोगतीला जातो अशी महाभारताची शिकवण आहे. ती अयथार्थ समजणें आत्मघातकीपणाचें आहे.

दुसऱ्या कुलाला न दुखवितां आपलें कुल उद्धरतां येईल. दुसऱ्या वंशास खची न करितां आपल्याचा विस्तार करतां येईल. दुसऱ्या समाजाच्या पायांत पाय न घालतां आपल्याच्या अडचणी दूर करतां येतील. दुसऱ्याच्या धर्मावर आघात न करतां आपल्याचा सांभाळ करतां येईल. आपली देशजननी एवढी विस्तृत, एवढी उदार, एवढी संपन्न आहे कीं, तिच्या मांडीवर सर्वांनीं सुखानें खेळावें आणि आपापलें अन्नोदक विपुलतेनें मिळवावें. मग आपसांत लाथाळी का? परक्यांच्या लत्तांनीं अजूनहि समाधान झालें नाहीं का?

कोणत्याहि व्यक्तीला आपला धर्म श्रेष्ठ व पूज्य वाटणें अगदीं स्वाभाविक आहे. तिच्या धारणपोषणार्थ त्याची आवश्यकता आहे. तिनें तो आपल्या इच्छेप्रमाणें यथासांग पाळावा. पण आतां त्या त्या धर्माचे हातपाय घराबाहेर व दुसऱ्याच्या आसनावर न जाऊं देण्याची दक्षता ज्यानें त्यानें घेतली पाहिजे. आपल्या गृहाच्या मर्यादेंत राहून तीन वेळाच का वाटेल तितक्या वेळा स्नान करावें, नाक धरून बसावें व सोवळेंओवळें पाळावें. त्याला कोणाचीहि आडकाठी येणार नाहीं. पण घर सोडून बाहेर आल्यावर त्यानें आपल्या इतर बांधवांशीं समभावानें वागण्यास शिकावें व आपलें वर्णश्रेष्ठत्व वाऱ्यावर उधळून द्यावें. अगदीं याच नमुन्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या धर्मांच्या

व पंथाच्या लोकांनीं स्वधर्माचरण करावें. धर्माच्या नावांखालीं एक-मेकाच्या उरावर बसण्याचे दिवस हे नाहींत. घराबाहेर, किंवा मंदिर सोडून किंवा मशिदीच्या पलीकडे आपल्या धर्माचा लाडीकपणा नेल्यास त्याचे दुष्परिणाम सर्वांना भोगावें लागतील व लागतात हें ध्यानीं घ्यावें. एखाद्या व्यक्तीला, जातीला किंवा समाजाला कांहीं सवलती मिळत असल्या किंवा तसा त्यास भ्रम असला तरी त्यानें शेफारून इतरांना कांट्याप्रमाणें सलूं नये. जात्यांतल्यांच्या मागोमाग सुपातल्यांची रवानगी असते. व्यक्तीधर्माचें अवास्तव स्तोम माजवून राष्ट्रधर्माला पराङ्मुख होणाऱ्या व्यक्तीचा किंवा समाजाचा शेवटीं नाश ठरलेला आहे. धर्म हा इहलोकीं अभ्युदय करणारा व परलोकीं कल्याण व शांति देणारा आहे यांत शंका नाहीं. पण राष्ट्रधर्माच्या आड तो आल्यास अगोदर इहलोकींच घात करील. मग परलोकांतील सुख कोठलें व शांति तरी कसली ? याकरितां प्रत्येक हिंदवासियानें राष्ट्रधर्माला प्राधान्य द्यावें. तें न करितां आम्ही अलग अलग राहूं तर एकट्या वृक्षाप्रमाणें बुंध्यासह उखडले जाऊं. राष्ट्राराष्ट्रांतील जीवनकलह तीव्रतर होत चालला आहे. यांत स्वतःचें आसन स्थिर ठेवावयाचें असेल तर राष्ट्रधर्माचा अंगिकार केला पाहिजे. दुसरा उपाय नाहीं. कोळसे करण्यास निघालेला अंगारक कुऱ्हाड चालवूं लागल्यावर कोणताहि भेदाभेद पाहात नाहीं, हें विचारी मनुष्यानें ध्यानांत ठेवावें. असो.

हिंदुस्थान पारतंत्र्यांत गुरफटल्यापासून आतांपर्यंत तो पायरी पायरीनें अधोगतीलाच चालला आहे. या दुर्दैवी देशांत नानाविध रोग बळावत आहेत, दारिद्र्याचा नंगा नाच सर्वत्र सुरू आहे, दुष्का-

ळांनीं धुमाकूळ घातला आहे आणि सर्वांचें आयुर्मान, बळ व आरोग्य सारखें घटत आहे. काय बरें याचें कारण? आतांपर्यंत या देशाच्या पुनरुध्दारार्थ प्रयत्न करणाऱ्या, संकटें सहन करणाऱ्या, आपलें रक्त सांडणाऱ्या व वेळीं आपले प्राण वेंचणाऱ्या उदारधी, समतोल विचार करणाऱ्या लोकनायकांनीं व देशसेवकांनीं 'राष्ट्रधर्म आचरा' असाच आक्रोश केला नाहीं काय? तरीही आमच्यांत आपसांतील लाथाळी आहेच. काय बरें याचें कारण? दुसऱ्याच्या लत्ता मस्तकीं बसत आहेत, साऱ्या जगांत आमच्या मायभूची विटंबना सुरू आहे आणि सारीं राष्ट्रें आमच्या तोंडावर थुंकत आहेत, तरीहि आमच्यांत एकोपा होत नाहीं. काय बरें याचें कारण? सर्व प्रश्नांचें एकच उत्तर. राष्ट्रधर्माचें मर्म आमच्या गळीं उतरत नाहीं. जो तो व्यक्तिशः सुखी होऊं पाहतो आहे. पण खरोखर तसा कोणी आहे?

माझ्या वाचकांनो! तुम्ही कोणत्याहि धर्माचे व पंथाचे असा. मी तुम्हांला आपले मानतो आणि क्षेमालिंगन देऊन विनवितो कीं, या बंधूंनो! आपण सारे एक होऊं या आणि राष्ट्रधर्म पाळूं या! या हिंदूंनो! जातीभेदाचें भूत कोठेंतरी गाडून टाका आणि समतेचा अंगिकार करा. जैनानों, लिंगायतानों, सत्यशोधकानों, आर्यसमाजी प्रार्थनासमाजी अनुयायानों! केवळ धर्माच्या नांवाखालीं परस्परांना तुच्छ लेखण्याचा खुळेपणा पुरें झाला! पारशी, ख्रिस्ती, मुसलमान, ज्यू, या भिन्नधर्मीय बंधूंनों चला, या साखळींत तुमचेहि दुवे घट्ट अडकवून टाका! या-मित्रानों या! आपसांत भांडण्यास यापुढें आपण अवकाशच ठेऊंया नको! साऱ्या धर्मांचीं मूलतत्त्वें एकच नाहींत का?-मग आपसांत विद्रोह का बरें?

हिंदभूमि आपली सर्वांचीच जननी नाहीं का ? मग तिच्या उद्धारार्थ झगडायचें कीं तमासगिरांनीं टाकलेल्या चार दाण्याच्या आशेनें आपसांत झुंजायचें ? इतिहासांतरीचीं वैरें आतां पाहिजेत कशाला ? सर्वांना आसरा, अन्न, वैभव, बल देणारी मायभू पायीं तुडवावयाची ? हा धर्म कोठला ? यावेळीं प्रत्येक हिंदी माणसानें ज्या भूमींत माझा जन्म झाला, ज्या ठिकाणीं माझे पूर्वज नांदले व वंशज नांदणार आहेत त्या भूमीच्या उद्धारापुढें बाकीच्या सर्व गोष्टी तुच्छ समजावयास नकोत काय ? हिंदुस्थानांत जन्म घेतलेल्या व येथेंच राहूं पाहणाऱ्या इंग्रजानें सुद्धां भलत्या मोहाला बळी न पडतां या देशाला आपला मायदेश मानून चाललें पाहिजे.

हिंदुस्थानचें सुख तेंच आपलें व कुटुंबाचें किंवा जातीचें सुख, त्याचें जें संकट, तेंच आपणा सर्वांचें संकट, त्याचा अपमान तोच सर्वांचा अपमान अशी आत्मीयता प्रत्येक हिंदवासियाच्या रोमरोमांत भिनली पाहिजे. खरोखर ज्या दिवशीं असा योग घडून येईल, तोच भारताचा भाग्यदिन !

## स्वदेशीचा पूर्ण अंगिकार.
## परदेशीवर कडकडीत बहिष्कार !

हा राष्ट्रधर्माचा मूलमंत्र आहे. हा अमूकच पध्दतीनें जपला पाहिजे असें सुतराम् नाहीं. ज्यानें त्यानें आपापल्या सवडी-प्रमाणें, सोयीप्रमाणें व सामर्थ्यानुरूप त्याचें स्मरण मात्र अहोरात्र व प्रत्येक कृती करतांना असावें. खाणें, पिणें, मौज करणें, व्यवहार पाळणें, वस्त्रें घेणें या प्रत्येक वेळीं वरील मंत्राची आठवण ठेवावी आणि तसें आचरण करावें. थोड्याशा सुखाकरितां, जिव्हा-

लौल्याकरितां, चैनीकरितां परदेशी माल घेणें म्हणजे प्रत्यक्ष मातेवर पापी दृष्टी टाकण्या इतकें नीच—अती नीचपणाचें आहे हें विसरूं नये. स्वदेशीचा अंगिकार म्हणजे घडयाळाऐवजी घंगाळ गळ्यांत अडकवून फिरणें नव्हे किंवा यांत्रिक सुधारणेवर बहिष्कार घालणें नव्हे. जेणेंकरून आपल्या देशाचें दैन्य मिटेल, त्याचा मान वाढेल, त्यास वैभव प्राप्त होईल, असें कोणतेंही कृत्य वा मार्ग राष्ट्रधर्मांत येऊं शकेल. त्याचप्रमाणें व्यक्तीधर्मांची तुलना करणें ( माझा धर्म श्रेष्ठ कीं तुझा हें भांडण ) जसें मूर्खपणाचें आहे तद्वत राष्ट्रधर्माचे नियम पाळतांना किंवा राष्ट्रसेवेचा मार्ग चोखाळतांना आपसांत श्रेष्ठकनिष्ठपणाचा वाद उपस्थित करणेंहि मूर्खपणाचें आहे.

हिंदुस्थानाच्या उद्धाराकरितां जे जे झटत आहेत, त्या सर्वांचे मार्ग भिन्न भिन्न असले तरी जोंपर्यंत त्यांचा हेतु एक आहे तोंपर्यंत एकमेकांनीं एकमेकांस तुच्छ लेखणें किंवा चूक समजणें आत्मघातकीपणाचें आहे. हिंदु, जैन, लिंगायत, ख्रिस्ती, किंवा मुसलमान यांनीं आपआपल्या धर्ममताप्रमाणें केलेली प्रार्थना सर्वांतर्यामीं भरून राहिलेल्या परमेश्वरास जाऊन पोंचते असे जर आपण मानतों तर राष्ट्रदेवतेची पूजाहि ज्यानें त्यानें आपल्या आवडीनिवडीप्रमाणें केली तर कोठें बिघडलें ? दुसऱ्यानें मार्ग कोणताहि स्वीकारला किंवा कोणत्याहि लोकनायकाचें अनुयायित्व पत्करलें तर तेवढ्यामुळें त्यास कमीपणा का दिला जावा ? जहाल, मवाळ, क्रांतिकारक किंवा सत्याग्रही कोणीही परस्परास तुच्छ लेखूं नये. जेथें सहकार्य होण्यासारखें असेल तेथें सर्वांनीं एकदिलानें काम करावें. जेथें भिन्नत्व येईल तेथें आपआपला पंथ जोरानें चालवावा. पण दुसऱ्याच्या पायांत पाय घालून

जगांत तमाशा दाखवूं नये. खरोखर आमच्या लोकांचें कित्येकवेळां फार चुकतें ! गांधी श्रेष्ठ कीं, टिळक श्रेष्ठ ? असल्या वादांत झाला तर कार्यनाश होईल, होतो. आमच्यांतील विग्रहावर चरणाऱ्या पोळांना यामुळें स्वास्थ्य लाभतें व आमची गंमत पाहण्यास मिळतें.

राष्ट्रधर्माचा अंगिकार केल्यावर ज्याला त्याला कार्य करण्यास केवढा मोठा अवसर आहे आणि कार्य केवढें प्रचंड आहे याची आपणास कल्पना तरी आहे काय? व्यापार, शिक्षण, समाजसुधारणा, शेती, विद्या, कलाकुशलता किती म्हणून विषय सांगावे ? या सर्व स्थानीं प्रत्येकास व्यक्तिशः प्रकाशमान् होऊन राष्ट्रभूचें मुखहि उज्ज्वल करण्याची संधि सांपडणार नाहीं काय ? आणि एकदां ती लाभल्यावर भांडण्यास वेळ मिळेल ? तरुणपिढीनें ध्यान द्यावें.

राष्ट्रधर्माशीं गृहसौख्याचा निकटचा संबंध आहे हें आम्ही पुनः एकवार सांगतों.राष्ट्र भिकारी म्हणून आपण सर्व भिकारी आहों. राष्ट्रास मान नाहीं म्हणून आपणास कोणी विचारीत नाहीं. राष्ट्र नानाप्रकारच्या आपदांनीं गांजलेलें म्हणून व्यक्तीहि गांजलेली ! एखाद्या व्यक्तीला किंवा कुटुंबाला थोडेसें सुख मिळालें तरी तें खरें नव्हे. परदेशांत कोणत्याहि योग्यतेचा हिंदी तुच्छ मानला जातो ! किंबहुना येथें सुद्धां पुष्कळदां रेल्वेंत वाटेल त्याचा अपमान होऊं शकतो! तुम्ही केवढेही बुद्धिमान, संशोधक, पराक्रमी, शूर, वीर, असा तुमची वाढ ठरावीक मर्यादेपलीकडे जात नाहीं. या सर्वाचें गमक काय ? आपली भारतमाता परक्याची दासी आहे !

दासीपुत्र म्हणून या जगांत किती दिवस नांदावयाचें ?

लेखांक दहावा

गृहसौख्य आणि

विषयोपभोग.

## लेखांक दहावा

# गृहसौख्य आणि विषयोपभोग.

धर्मार्थकामाः सममेव सेव्या
यो ह्येकभक्तः स नरो जघन्यः ।
तयोस्तु दाक्ष्यं प्रवदन्ति मध्यम्
स उत्तमो योऽभिरतस्त्रिवर्गे ॥

धर्म, अर्थ व काम यांचें सेवन सारख्याच प्रमाणांत करणें योग्य आहे यापैकीं जो एकाचेच सेवन करील तो कनिष्ठ, दोहोंचें करील तो मध्यम. उत्तम तोच कीं जो तिघांचे स्थानीं सारख्याच प्रमाणांत रत असेल.

महाभारत.

संसारांत विषयोपभोगास महत्वाचें स्थान आहे. धर्मनीतीच्या दृष्टीनें तो एक पुरुषार्थ असून त्याची हेळसांड कोणाही पुरुषानें करूं नये असें ज्ञात्यांचें सांगणें आहे. सभ्यतेचा पोकळ आव आणून केवळ शब्दांचा बाऊ करणाऱ्या लोकांना हा विषय पांचट किंवा उपेक्षणीय वाटत असेल; परंतु तसा तो नाहीं. उलट तो विचारणीय, आदरार्ह व धर्म्य आहे. सभ्यतेच्या नांवाखालीं याचेवर जो बहिष्कार घालण्यांत आला आहे, त्यामुळें समाजाचें यत्किंचितहि हित साधल्याचें दिसत नाहीं आणि सामान्य जनांची दिशाभूल मात्र झालेली स्पष्ट आढळून येतें. गृहसौख्याच्या दृष्टीनें ही वस्तुस्थिति फारशी स्पृह-

णीय नाहीं. मागें आपण धर्म व अर्थ याविषयीं तरुण स्त्रीपुरुषांचीं कर्तव्यें कोणकोणती आहेत त्यांचा विचार केला. या लेखांकांत '**कामा**' विषयीं पाहूं.

प्रस्तुत विषय नाजूक तर खराच पण त्याचेविषयीं मुग्धता स्वीकारल्यास ही लेखमाला सूत्रविरहित पुष्पमालेप्रमाणें विस्कळीत किंवा पायावांचून बांधलेल्या गृहाप्रमाणें डळमळीत राहील. या करितां सभ्यतेचा अतिक्रम न होऊं देतां व रसिक वाचकांना उमज पडेल अशा सांकेतिक भाषेंत जेवढें सांगतां येईल तेवढें सांगण्याचा प्रयत्न करितो.

लेखांक दोनमध्यें पतिपत्नीच्या अनुरूपतेचा विचार करितांना दाम्पत्यप्रेमाचें महत्व वर्णन केलें आहे. या प्रेमास मुख्य आधार कशाचा आहे बरें ?– विषयसुखाचाच नव्हे काय ? विवाह बंधनानें एक झालेल्या स्त्रीपुरुषांत संसारांतील इतर सर्व सुखें लाभून जर हें एक सुख कमी पडेल तर त्यांचें दाम्पत्यजीवन यशस्वी होईल काय ? अशा जोडप्यांना परस्पर समागमसौख्य लाभलें नाहीं, किंवा तें लाभूनहि त्यांच्या विषयवासना एकमेकाकडून अतृप्त राहिल्या तर त्यांच्यामध्यें विवाहमंत्रांनीं निर्माण केलेलें दाम्पत्याचें नातें प्रेमळ व पवित्र राहील काय ? — केव्हांही नाहीं. कारण, तसें असतें तर जरठतरुणीविवाह विशेष आनंदाचा ठरला असता आणि विजोड दंपतीनें आपला संसार सुखानें केला असता. परंतु या जगांत तसें झालेलें किंवा घडलेले आढळून येत नाहीं. अबाधित विषयसुखसेवन आणि त्याची तृप्ती हेंच दाम्पत्यप्रेमाचें मुख्य रहस्य आहे. म्हणून तरुण स्त्रीपुरुषांनीं हें रहस्य समजून घेऊन संसार केला पाहिजे. असो.

वासना व विकार एवढ्यापुरतेंच पाहिल्यास मनुष्य व इतर

प्राणी यांत विशेष अंतर नाहीं. परंतु परमेश्वरदत्त बुद्धिबलावर मनुष्यानें आपली फार मोठी उत्क्रांति करून घेतली आणि इतर प्राणीमात्रावर विजय मिळविला. पशुपक्षी कीटक यांचे आहार विहार पहा. अगदीं आदिमावस्थेंत त्यांची जी स्थिती होती, तीच आज आहे. परंतु तीच दृष्टि आजच्या सुधारलेल्या मानवावर टाका बरें. एका काळीं गुहेच्या आश्रयानें राहणारा हा द्विपाद आज गगनभेदी प्रासाद बांधून त्यांत विहरत आहे आणि आपल्या वास्तुशास्त्रानें विश्वकर्म्यासहि लाजवीत आहे. एकेकाळीं वन्य पशूप्रमाणें कंदमूळावर जीव जगविणारा हा मानव आजचा आहार किती उत्कृष्ट प्रतीचा करितो! वास्तुशास्त्रा-प्रमाणें त्यानें आपलें पाकशास्त्रही विविधतेनें किती पूर्णत्वास पोंचविलें आहे! त्याचप्रमाणें त्याच्या वस्त्राप्रावर्णाकडे पहा. पूर्वकालीं नग्न-स्थितींत हिंडणारा किंवा फार तर कातडी किंवा झाडाच्या सालीं पांघरणारा जीव आज किती चैनींत आहे! इतर प्राण्यांच्या सुख-दु:खांची विशेष पर्वा न करितां त्यांची लोकर, केस किंवा कातडी हिरावून घेऊनच हा थांबला नाहीं, तर निसर्गातील कापूस, रेशीम व ताग या तंतुमय पदार्थांचा शोध लावून त्यापासून त्यानें बहुविध सुंदर वस्त्रें निर्माण केलीं आहेत आणि त्यांच्या आच्छादनानें आपल्या देहाचें रक्षण करून सौंदर्य वाढविलें आहे. असा हा बुद्धि-मान् प्राणी स्त्रीपुरुषसंबंधांतच जंगली कसा राहील? या विषयांतही त्यानें विलक्षण आघाडी मारून कामशास्त्र व सुप्रजाजननशास्त्र यांना त्यानें जन्म दिलेला आहे.

स्त्रीपुरुषांचें शृंगारसुख मुळांतच अनुपमेय व अनिर्वचनीय. पण बुद्धिमान् मनुष्यानें तें आहे तसेंच स्वीकारलें नाहीं. स्त्रीपुरुषांनीं

निसर्गदत्त स्वभावरचना ध्यानीं घेऊन त्यानें पूर्ण विचारानें विवाह-संस्था अस्तित्वांत आणिली आणि तिच्या नियमनाखालीं सर्वांना हें स्वर्गसुख अबाधित उपभोगतां यावें अशी व्यवस्था केली. कोणत्याहि समाजाकडे पाहिल्यास या व्यवस्थेनें '**पुष्कळांचें पुष्कळ हित**' झालेलें दिसून येतें.

विषयसुखाचे बाबतींत मनुष्याचे विकार पशुपक्ष्याइतकेच प्रबल व उच्छृंखल असले तरी त्याचे विचार प्रगल्भ व सुसंस्कृत झालेले आहेत आणि काव्य व कला यांच्या संसर्गानें त्याचें मन चोखंदळ बनलेलें आहे. यामुळें एतद्विषयक आचरणांत त्याच्यामध्यें व इतर जीवकोटींत महदंतर आढळून येतें. सुधारलेल्या मनुष्यास विषयोपभोग घेतांना विशेषेंकरून रात्रीचा समय व पूर्ण एकांत प्रिय आहे. या शिवाय स्वच्छ शुभ्र व मृदु आसनें, सुगंधित द्रव्यें, रुचिकर खाद्यें व मधुर पेयें यांची जोड त्यानें या सुखास दिल्यामुळें तें अनंतपटीनें वाढलें आहे. हें सर्व खरें; पण यांत त्याचें एक चुकतें. या बाबतींत तो परिमित नाहीं, ही मोठ्या सखेदाश्चर्याची गोष्ट होय. पशुपक्ष्यांमध्यें ठरावीक ऋतूपलीकडे या विषयाची आवड किंवा उच्छृंखलता दिसत नाहीं. मनुष्याचें मात्र तसें नाहीं. खाण्यापिण्यांत जसा तो निरर्गल तसाच या सुखाचे बाबतींतही आहे. '**कामातुराणां न भयं न लज्जा**' अशी त्याची स्थिती आहे. या बाबतींत त्याची व पशूची तुलना केली तर पशूलाच प्रशंसापत्र द्यावें लागेल. मनुष्यप्राणी जो जो सुधरत चालला आहे तो तो त्याची आत्मसंयमनशक्ति कमी होत चालली आहे, असें म्हणावें लागतें.

कोणताहि विकार मोठा कार्यप्रभावी आहे. पण केव्हां ?

त्यास विचाराचा पायबंद असेल तर! त्याचप्रमाणें सुखादुःखाची गोष्ट. एका ठरावीक मर्यादेपर्यंतच त्यांचा गुण दिसतो. दुःख अति झालें म्हणजे त्याचें दुःखपण संपतें. सुखही अति झालें म्हणजे बेचव होतें. विषयसुखही या सामान्य नियमांतून वगळलें जाणार नाहीं.

ऐन तारुण्यांत विकार प्रबल असतात व संयमनशक्ति अगदींच कमी असते. अशा स्थितींत अतिरेक होणें स्वभावसिद्धच आहे. तरुण स्त्रीपुरुषांनीं याच वेळीं जपलें पाहिजे. पूर्वकाळीं एकत्र कुटुंब पद्धतीमुळें तरुण जोडप्यास तितकें स्वातंत्र्य व एकांत लाभत नव्हता. आजला हा अर्गल अनेकावर आजिबात नसतो. मग ज्याचा त्यानेंच आपला सांभाळ करावयाला नको काय?

विषयसुखसेवनार्थ उत्कंठित असलेल्या तरुण दाम्पत्यानें अगदीं पहिली गोष्ट करावयाची म्हणजे आपलें बल, आरोग्य व आयुष्य यांचा स्वतांला विसर पडूं देतां उपयोगी नाहीं. मनुष्य कितीहि सुदृढ व निरोगी असो, त्याच्या अंगीं इंद्रियनिग्रह नसेल तर अल्पावधींत त्याच्या सर्वस्वाचें दिवाळें वाजतें आणि मागाहून ही चूक कोणत्याहि प्रायश्चित्तानें किंवा पश्चात्तापानें सुधारण्याची आशा नसते. याकरितां प्रारंभापासूनच अत्यंत दक्षतेनें वागणें बरें.

तारुण्याच्या प्रभातकाळांत पतिपत्नींनीं परस्पराकडे अत्यंत उत्कंठेनें आकर्षित होणें, निशीथ समयींची वाट पाहाणें किंवा पूर्ण एकांताकरितां टपून बसणें यांत विशेष कांहीं नाहीं. निसर्गानें तें सहजगत्याच घडून येत असतें. परंतु ही स्थिति, ही आतुरता दीर्घकाल चालू ठेवणें आणि जणूं काय ती एक संवयच, इतकी ती आपल्या अंगांत व मनांत बाणवून घेणें यांस चातुर्य लागतें. चिर तारुण्य

प्राप्त करून घेणें जसें प्राय: कठीण आहे, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणाची ज्योत पहिल्या दिवसाइतकीच वर्षानुवर्षें एक तेजानें तेवत ठेवणें अशक्य आहे. परंतु भरपूर आयुष्य पदरांत पाडून घेणें जसें मनुष्यास शक्य आहे, तसेंच तारुण्य-काळ लांबवणें आणि वर सांगितलेली ज्योत बहुत काळ तेवत ठेवणेंहि शक्य आहे. आणि याला एकच सर्व श्रेष्ठ उपाय. इंद्रियनिग्रह.

वैद्यकानें व आरोग्यशास्त्रानें या विषयीं आठवड्यांतून फक्त एकच दिवस मंजूर केलेला आहे. ज्यांचें खाणेंपिणें चांगलें, आरोग्य उत्कृष्ट आणि बल उत्तमप्रतीचें आहे त्यांना ही सवलत अगदींच तोकडी वाटण्याचा संभव आहे. परंतु आज आमची जी स्थिती आहे ती लक्षांत घेतां किती जोडप्यांना वरील देणग्या भरपूर आहेत? म्हणून प्रत्येक व्यक्तीनें आपली स्थिति पाहून व काळवेळ ओळखून चाललें पाहिजे.

आमच्या इकडे लज्जाविनयादि गुणांनीं संपन्न असलेली पत्नी खात्रीनें हा नियम पाळूं शकेल. जपावयाचें तें पुरुषानें. स्त्रियांना काम आठपट असतो, हा खुळचट सिद्धांत उराशीं बाळगून कित्येक पुरुष अनर्गल होऊं पाहतात आणि तसा उच्छृंखलपणा आपण केला नाहीं तर आपल्या पराक्रमाचें तेज आपल्या पत्नीवर पडणार नाहीं व सामान्य जनांत आपण दुर्बल व हास्यास्पद ठरूं असें त्यांना वाटत असते. पण हा समज अगदींच वेडेपणाचा आहे. आजकाळ साऱ्या समाजाचें सामर्थ्यच खालच्या पायरीवर आलें आहे. स्त्रीवर्गा-मध्यें सुद्धां तितकें त्राण राहिलेलें नाहीं. मग भलत्याच समजुती उराशीं बाळगून आत्मनाश का करून घ्यावा?

आणखी एक लक्षांत ठेवले पाहिजे. धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचें सेवन सारख्या प्रमाणांत केलें पाहिजे अशी धर्माची आज्ञा ना ? मग कोणत्याहि एकाचा अतिरेक करून कसें चालेल ? धर्मावरच लक्ष ठेवलें तर अर्थ व काम बुडतील. नुस्ता अर्थच पाहिला तर धर्माचा नाश होईल. हें जर खरें, तर केवळ कामासक्तीनें सर्वस्वाचा नाश का होणार नाहीं ? म्हणून इंद्रियनिग्रह करा. मन ताब्यांत ठेवा. उच्छृंखल होऊं नका. असें पदोपदीं सांगावयाचें.

विषयोपभोगांत इंद्रियनिग्रहाची मुख्य कळ आपल्या ताब्यांत ठेविली कीं मग बाकीच्या गोष्टी अगदीं सुलभ आहेत. त्या इतर गोष्टी कोणत्या व त्यांचेसंबंधीं कोणकोणतीं कर्तव्यें आहेत तें आतां पाहूं.

या सुखासंबंधीं भिन्नभिन्न प्रकारानें विचार करूं लागल्यावर एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येतें. ती म्हणजे हें सुख एकट्या पुरुषाचें किंवा एकट्या स्त्रीचें नाहीं ही होय. इतर इंद्रियांचीं सुखें अशीं आहेत कीं, तीं ज्याचीं त्याला स्वतंत्रपणें भोगतां येतात. सुवास घेणें, गायन ऐकणें, मधुर पदार्थ खाणें, सुंदर देखावा पाहाणें इत्यादि गोष्टी व्यक्तिशः ज्याला त्याला करतां येतात आणि त्यापासून निर्माण झालेलें सुख स्वतंत्रपणें भोगतां येतें. पण एक विषयसुखच असें आहे कीं, स्त्रीपुरुषांनीं त्याची आपसांत भागीदारी केली पाहिजे. या अशा भागीदारीवांचून ह्या सुखाची उत्पत्तीच होत नाहीं. अर्थात् ज्यांना त्याची गरज आहे, त्यांनीं आपल्या भागीदाराच्या शरीराकडे व मनःस्थितीकडे लक्ष ठेवून त्याची सहानुभूति संपादन केली पाहिजे, हें उघडच आहे.

विवाहानंतर पतिपत्नीचें नातें कितीही पवित्र व अभेद्य मानलें जात असलें तरी तसें तें खरोखरी असणें ही गोष्ट त्या पतिपत्नींचें

प्राप्त करून घेणें जसें प्रायः कठीण आहे, त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या परस्पर आकर्षणाची ज्योत पहिल्या दिवसाइतकीच वर्षानुवर्षे एक तेजानें तेवत ठेवणें अशक्य आहे. परंतु भरपूर आयुष्य पदरांत पाडून घेणें जसें मनुष्यास शक्य आहे, तसेंच तारुण्य-काळ लांबवणें आणि वर सांगितलेली ज्योत बहुत काळ तेवत ठेवणेंहि शक्य आहे. आणि याला एकच सर्व श्रेष्ठ उपाय. इंद्रियनिग्रह.

वैद्यकानें व आरोग्यशास्त्रानें या विषयीं आठवड्यांतून फक्त एकच दिवस मंजूर केलेला आहे. ज्यांचें खाणेंपिणें चांगलें, आरोग्य उत्कृष्ट आणि बल उत्तमप्रतीचें आहे त्यांना ही सवलत अगदींच तोकडी वाटण्याचा संभव आहे. परंतु आज आमची जी स्थिती आहे ती लक्षांत घेतां किती जोडप्यांना वरील देणग्या भरपूर आहेत? म्हणून प्रत्येक व्यक्तीनें आपली स्थिति पाहून व काळवेळ ओळखून चाललें पाहिजे.

आमच्या इकडे लज्जाविनयादि गुणांनीं संपन्न असलेली पत्नी खात्रीनें हा नियम पाळूं शकेल. जपावयाचें तें पुरुषानें. स्त्रियांना काम आठपट असतो, हा खुळचट सिद्धांत उराशीं बाळगून कित्येक पुरुष अनर्गल होऊं पाहतात आणि तसा उच्छृंखलपणा आपण केला नाहीं तर आपल्या पराक्रमाचें तेज आपल्या पत्नीवर पडणार नाहीं व सामान्य जनांत आपण दुर्बल व हास्यास्पद ठरूं असें त्यांना वाटत असते. पण हा समज अगदींच वेडेपणाचा आहे. आजकाळ साऱ्या समाजाचें सामर्थ्यच खालच्या पायरीवर आलें आहें. स्त्रीवर्गा-मध्यें सुद्धां तितकें त्राण राहिलेलें नाहीं. मग भलत्याच समजुती उराशीं बाळगून आत्मनाश का करून घ्यावा?

आणखी एक लक्षांत ठेवले पाहिजे. धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचें सेवन सारख्या प्रमाणांत केलें पाहिजे अशी धर्माची आज्ञा ना ! मग कोणत्याहि एकाचा अतिरेक करून कसें चालेल ? धर्मावरच लक्ष ठेवलें तर अर्थ व काम बुडतील. नुस्ता अर्थच पाहिला तर धर्माचा नाश होईल. हें जर खरें, तर केवळ कामासक्तीनें सर्वस्वाचा नाश का होणार नाहीं ? म्हणून इंद्रियनिग्रह करा. मन ताब्यांत ठेवा. उच्छृंखल होऊं नका. असें पदोपदीं सांगावयाचें.

विषयोपभोगांत इंद्रियनिग्रहाची मुख्य कळ आपल्या ताब्यांत ठेविली कीं मग बाकीच्या गोष्टी अगदीं सुलभ आहेत. त्या इतर गोष्टी कोणत्या व त्यांचेसंबंधीं कोणकोणतीं कर्तव्यें आहेत तें आतां पाहूं.

या सुखासंबंधीं भिन्नभिन्न प्रकारानें विचार करूं लागल्यावर एक गोष्ट प्रामुख्यानें लक्षांत येतें. ती म्हणजे हें सुख एकट्या पुरुषाचें किंवा एकट्या स्त्रीचें नाहीं ही होय. इतर इंद्रियांचीं सुखें अशीं आहेत कीं, तीं ज्याचीं त्याला स्वतंत्रपणें भोगतां येतात. सुवास घेणें, गायन ऐकणें, मधुर पदार्थ खाणें, सुंदर देखावा पाहाणें इत्यादि गोष्टी व्यक्तिशः ज्याला त्याला करतां येतात आणि त्यापासून निर्माण झालेलें सुख स्वतंत्रपणें भोगतां येतें. पण एक विषयसुखच असें आहे कीं, स्त्रीपुरुषांनीं त्याची आपसांत भागीदारी केली पाहिजे. या अशा भागीदारीवांचून ह्या सुखाची उत्पत्तीच होत नाहीं. अर्थात् ज्यांना त्याची गरज आहे, त्यांनीं आपल्या भागीदाराच्या शरीराकडे व मनःस्थितीकडे लक्ष ठेवून त्याची सहानुभूति संपादन केली पाहिजे, हें उघडच आहे.

विवाहानंतर पतिपत्नीचें नातें कितीही पवित्र व अभेद्य मानलें जात असलें तरी तसें तें खरोखरी असणें ही गोष्ट त्या पतिपत्नींचें

परस्पराशीं जें आचरण घडेल त्यावर अवलंबून राहील. स्त्रीजातीला तुच्छ लेखणें व पुरुषजातीला चढवून ठेवणें या गोष्टी सहजसाध्य असल्या तरी भागीदारीनेंच जन्मास येणाऱ्या विषयसुखाची गोडी मात्र तशानें मिळणारी नसते, ही वस्तुस्थिती प्रत्येक पुरुषानें ध्यानीं घ्यावी. दुर्बलतेमुळें व लोकलज्जेस्तव स्त्री आपलें अंतःकरण उघडें करूं शकत नाहीं. परंतु पुरुषानें तिला आपलें हृदय न देतां तिचें हृदय मागितलें तर तें मिळत नाहीं हें निश्चित होय. ध्वनीला प्रतिध्वनी, आघातला प्रत्याघात असा सृष्टीचा नियम आहे. तद्वतच हृदय दिलें तर हृदय मिळतें. रुक्षतेला स्निग्धता मिळत नाहीं.

पतीनें काय किंवा पत्नीनें काय वरील नियम ध्यानांत घेऊन दाम्पत्यप्रेमाचा बरोबर मोबदला करावा आणि प्रामाणिकपणानें भागीदारी चालवावी. सुख ओरबडून मिळत नाहीं. अनुनयाचें मूल्य देऊन तें हसत खेळत घेतलें पाहिजे. ज्या दाम्पत्यांस हें साधतें त्यांच्या हातांत स्वर्गसुखाची किल्ली आली. असो.

पतिपत्नीइतका निकट सहवास दुसऱ्या कोणाचाहि होत नाहीं. तो त्यांना अत्यंत प्रिय वाटला पाहिजे. याला पहिला उपाय म्हणजे

**देहाची व मनाची स्वच्छता हा होय.**

घामट मनुष्याविषयीं कोणालाहि प्रेम किंवा आदर वाटत नाहीं. उलट त्याच्या सहवासाची किळसच वाटते. याकरितां प्रत्येक पतीनें व पत्नीनें स्वच्छतेवर तीव्र कटाक्ष ठेवावा. कोणतेंही इंद्रिय घाणेरडें किंवा त्याच्यांतून उग्र किंवा असह्य दर्प बाहेर पडेल अशा स्थितींत असूं नये. मनुष्याचा देह हा शुक्रशोणितापासून झालेला असला तरी स्वभावतः तो घाणेरडा नाहीं.अस्वच्छता,आरोग्यनाश आणि

रोगग्रस्तता यामुळें त्याच्यांत विकृति होते. मग त्याचीं द्वारें घाण मारूं लागतात. दुर्गंध हा जसा आरोग्याला तसाच मानसिक स्वास्थ्यालाहि मारक आहे. घाण मारणाऱ्या जागेंत आपण स्वस्थपणें वावरूंसुद्धां शकत नाहीं. मग देहानें व मनानें एक होणाऱ्या कामसमाधींत कोणती घाण खपेल ? म्हणून पतिपत्नीमध्यें स्वच्छतेची आवड पाहिजे.

स्वच्छतेमुळें आपला सहवास दुसऱ्यास प्रिय तर होतोच; पण त्याशिवाय आपल्या रूपाचें तेज दुसऱ्यावर पडतें. सुंदर परंतु अजागळ स्त्रीपेक्षां काळीसावळी पण स्वच्छतेनें राहणारी स्त्री विशेष नीटस व आकर्षक वाटेल. असो.

मनाची प्रसन्नता हा सहवासप्रियतेचा दुसरा उपाय आहे. प्रसन्नचित्त मनुष्य स्वभावतः प्रेमळ, शांत, विनोदप्रिय, निःस्वार्थी आणि परसेवातत्पर असतें. दुसऱ्याच्या अस्तित्वास योग्य तो मान देऊन त्याच्या सुखास धक्का न लावतां आपण आपलें सुख पाहिलें पाहिजे हें साधें परंतु महत्त्वाचें तत्त्व त्यास पटतें व तसें त्याचें आचरण असतें. उलटपक्षीं चिरचिऱ्या स्वभावाचा मनुष्य घामट मनुष्याइतकाच किळसवाणा असतो. त्यास आपल्या सुखापुढें दुसऱ्याच्या सुखाचा विचारच करतां येत नाहीं. अर्थातच अशा मनुष्याचा सहवास प्रिय होणार कसा !

सहवासप्रियतेचा तिसरा उपाय म्हणजे गुणग्राहकता होय. प्रत्येक मनुष्य गुणदोषमिश्रित आहे. अगदीं निर्भेळ धातू कोणाचीच नाहीं. अर्थात् आपल्या सहवासांत आलेल्या मनुष्याच्या बारीकसारीक दोषाकडे कानाडोळा करून त्याच्या गुणाकडे कौतुकानें पाहाणें, त्यांची प्रशंसा करणें व त्यांना उत्तेजन देणें यांतच खरें मनु-

ष्यपण आहे. जें दाम्पत्य अशा गुणग्राहक स्वभावानें आपल्या संसार-मित्रास वागवून घेत असेल, त्यांचा सहवास एकमेकास अत्यंत आनंददायक होत असेल यांत नवल तें काय ?

सहवासप्रियतेचा चवथा उपाय म्हणजे आपल्या भागीदाराच्या सुखवर्धनार्थ आपल्या सुखाकडे कानाडोळा करणें. हिंदु पतिव्रतेत हा गुण फार मोठा आहे. पुरुषांनीं त्याचा आदर केला पाहिजे. त्यांच्या सुखाची दामदुप्पट खास होईल.

मागें सांगितलेंच आहे कीं, उपभोगवृत्ति हा पुरुषांचा प्रमुख गुण असून त्यागवृत्ति हा स्त्रियांचा आहे. पण या गुणांनाही मर्यादा आहे. ती ओलांडल्यास तेच गुण दुर्गुण होतात.

स्त्रियांच्या त्यागवृत्तीला फुलाप्रमाणें झेलून जपणारी पुरुषांची उपभोगवृत्ति उभयतांना सुखावह होते. ती जर बेफाम झाली तर स्त्रीच्या त्यागवृत्तीचा प्राणान्त होतो आणि दाम्पत्यप्रेमरहस्याला कीड लागते. ही कीड उघड नाहीं तरी गुप्तपणानें गृहसौख्याचा नाश करणारी आहे.

आंब्यासारखें मधुर फळ माकडाच्या हातांत गेलें तर तें त्यास मटकावत नाहीं असें नाहीं; पण त्यांत त्याची मर्कटता प्रगट झाल्यावांचून राहात नाहीं. सामान्य मनुष्य तें फळ कोणीकडून तरी खाऊन अवशिष्ट भाग फेंकून देतो; पण कलेचा भोक्ता केवळ खाण्यांत आनंद मानीत नाहीं. त्या फळाचें त्यास कौतुक वाटतें. हलक्या हातानें त्याचा आस्वाद घेण्यांत त्यास खरें सौख्य होतें. उपभोगवृत्तींत हा सावकाशपणा, हृदयाची कोमलता, कलेची आवड आणि परिमितता पाहिजे.

साध्या जेवणामध्यें हा अनुभव आपणास येतो. चव घेऊन हास्य मुद्रेनें, विनोद करीत, अन्नाशीं मस्ती न करितां, टापटिपीनें आणि योग्य तितकेंच जो जेवतो त्याची पंगत आपणांस सुखावह होते. उलटपक्षीं अचावचा जेवणारा, हूं म्हणून खाणारा किंवा त्रासत जेवणारा आपणास अप्रिय होतो. कांहीं लोक भात कालवितांना असा कालवितात कीं, पाहाणारास किळस यावी. कोणत्याहि वस्तूचा उपभोग घेतांना दुसऱ्यास अशी किळस वाटणें शोभण्यासारखें नाहीं.

प्रेमादरभाव निर्माण होणें किंवा हळू हळू नष्ट होणें याला अशींच क्षुल्लक कारणें घडत असतात. खाण्याजेवण्याप्रमाणेंच आपण खेळण्याची गोष्ट घेऊं. या बाबतींतहि दुसऱ्याच्या हृदयाकडे पाहून वागणारा मनुष्य सर्वांस प्रिय होतो. ऊठबसल्या खेळावर आसक्ति ठेवणारा, काळवेळ न ओळखणारा, चिडणारा, कपट करणारा, विनोद न जाणणारा, गंभीर राहणारा, उत्सुकता न दर्शविणारा असा खेळगडी कोणासच रुचत नाहीं. आणि यदाकदाचित् अशा खेळगड्यांनीं खेळण्याचें योजिलेंच तर त्या खेळांत खरी मजाहि येत नाहीं.

दिवसाचें सारें कर्तव्य संपलें आहे, शरीर स्वस्थ व आरोग्यप्रद आहे, मन प्रफुल्लित आहे, उद्यांची चिंता मागें नाहीं अशावेळीं दोन सारख्या जोडीचे, आवडीनिवडीचे खेळगडी कांहीं खेळ काढून बसले तर त्यापासून त्यांना आनंद होतो आणि परस्परांच्या संगतीविषयींची त्यांची आतुरता वाढीला लागते. मग त्यांना असे प्रसंग वरचेवर यावे असें मनापासून वाटतें.

खेळांत बलात्काराला जागा नाहीं. असा योग मारून मुटकून आणणें व आनंद घेऊं पहाणें म्हणजे कोयनेलची गोळी तोंडांत टाकून

लिमलेटच्या गोळीची चव यावी अशीं इच्छा करण्यासारखें वेडे-पणाचें आहे.

खाण्यापिण्याचें किंवा खेळण्याचे हे सामान्य नियम दाम्पत्य-प्रेमरहस्यालाहि लागू पडतात. लज्जाशीलतेमुळें कांहीं अप्रिय गोष्टी पत्नी मुकाट्यानें मान्य करते–किंवा सोसते; पण त्यांत तिला सुख नसल्यामुळें ती सुख देऊं शकत नाहीं. तेव्हां त्याचें पृथक्करण पतीस करतां आलें पाहिजे.

विषयोपभोगांत केवळ आपल्याच इच्छातृतीवर डोळा ठेव-णारा पुरुष निर्दय, मूर्ख व अभागी म्हटला पाहिजे. कारण, त्यांतील खरें सुख त्याच्या वाट्याला कधींच येत नाहीं. खेळण्यामध्यें प्रतिपक्षी उदासीन, दुःखी, निर्बुद्ध किंवा निरुत्साही असल्यास मजा येतें काय? समागमसुखाचा खेळही असाच आहे. त्यांत दोघांचीं मनें उत्सुक असलीं पाहिजेत व रमलीं पाहिजेत. लज्जेमुळें पत्नी आपला भाव स्पष्ट दर्शवूं इच्छित नाहीं. किंबहुना ती तो लपविते. पतीनें हा लपंडाव ओळखला पाहिजे.

पुरुषाच्या मनाला मुग्ध करण्याच्या अनेक कला स्त्रीला निस-र्गानेंच बहाल केल्या आहेत. त्या जाळ्यांत पुरुषानें सांपडावें असें तिला वाटत असतें. परंतु त्यानें त्यांत फसावें असें मात्र तिला वाटत नाहीं. उलट, त्यानें आपल्या लीला ओळखून, त्यांचेवर हिकमती लढवून, आपला पराभव करावा आणि आपणास दासी बनवावें, अशीच तिची हार्दिक इच्छा असते. अर्थात् हें रहस्य जो ओळखेल तोच खरा पुरुष !

समागमसुखाचे वेळीं पत्नीकडून होणारे हावभाव आणि अस्पष्ट

मधुर भाषा ओळखणें ही एक नाजूक कला आहे. दिखाऊ नाजुकपणाला बिचकेल तो मूढ. निष्कारण बल दाखवील तो पशु! यावेळीं लज्जा-युक्त मंद हास्यांत येणारा नकार बहुतांशीं रुकार असतो, तर कित्येक-वेळा त्यागवृत्तीनें चटकन् मिळणारा रुकार हा अनिच्छेचा नकार असतो. अर्थात् या नकारारुकाराचें तारतम्य जाणून जो वागेल तोच खरा रसिक, खरा पंडित आणि खरा उपभोक्ता!

शेवटीं या विषयीं स्वामी रामतीर्थांचें एकच सुबोध वचन सांगून त्याप्रमाणें वागा म्हणजे तुमचें जीवन सुखमय होईल एवढें विनवून हा लेखांक संपवितो.

"आपलें जीवित केवळ विषयोपभोगाकरितां नसून जीवितयात्रा सुरळीत चालण्याकरितां विषयोपभोगाची योजना आहे."

लेखांक अकरावा

# दाम्पत्यप्रेम व वियोगकाल.

## लेखांक अकरावा.

# दाम्पत्यप्रेम व वियोगकाल.

वृक्षलतांचें संगोपन व भरणपोषण पाणी व उष्णता या दोहोंच्या कडून प्रामुख्यानें होतें. प्रेमलतेलाही हाच नियम लागू आहे. या स्थानीं संयोग पाण्याचें व वियोग उष्णतेचें कार्य करितो. प्रेमलतेच्या जिवंतपणाला व वाढीला दोहींची आवश्यकता आहे. पण ती समुचित प्रमाणांत. त्यांचा अतिरेक किंवा अभाव तिच्या नाशास कारणीभूत होईल.

सृष्टीच्या घडामोडींत किंवा व्यवहारांत हा अनुभव नित्याचा आहे कीं जी स्थिति एकसारखी एकाच स्वरूपांत घडत राहील तिचा कंटाळा वाटूं लागतो व ज्या वस्तूची विपुलता होईल तिच्याविषयीं अनादर उत्पन्न होतो.

वर्षाकाल का असेना, पावसानें सारखी झोड उडवली, कांहीं दिवसांत सूर्यदर्शन अगदीं झालें नाहीं कीं, मनुष्यच काय पण पशुपक्षी व वृक्षलतासुद्धां कंटाळून गेलेल्या दिसतात. त्याचप्रमाणें कोणतेंही फळफळावळ, भाजीपाला किंवा धन धान्य विपुल झालें कीं, सर्वांकडून त्यांची हेळसांड होतें. सततपणा व विपुलता यांचेमध्यें स्थितीची मोहकता व वस्तूचें मूल्य कमी करण्याचा गुण आहेच आहे.

सखेदाश्चर्याची गोष्ट. पण दाम्पत्यप्रेमहि या नियमांतून मुक्त नाहीं. तारुण्यानें पूर्ण विकसित, एकमेकास अगदीं अनुरूप, सुंदर असें

तरुणतरुणीचें जोडपें प्रेमबद्ध झालें. मदनानें आपलें अचुक शरसंधान करून हीं दोन्ही सावजें एकाच प्रेमजालांत पकडलीं. पुढें त्या दोघांच्या वडीलधाऱ्या माणसांनीं त्यांच्या विवाहास कोणताही अडथळा न आणतां त्यांचा संयोग घडवून आणिला. दोघानांही इष्ट होतें तें प्राप्त झालें.

इच्छतोरत्र यों लाभः स्त्रीपुंसोरमृतोपमः।

परस्परांची इच्छा करणाऱ्या स्त्रीपुरुषांना परस्परांचा लाभ झाला तर तो अमृततुल्यच होय. या उक्तीप्रमाणें तें दाम्पत्य आनंदसागरांत पोहूं लागेल नव्हे?–होय. प्रथमतः कांहीं काल तर त्यांना असें वाटेल कीं, छे, आतां आपला वियोग कालत्रयीं होता कामा नये. एका क्षणाचा विरहहि आपणास असह्य होईल आणि तसें झालेंच तर आपले प्राण उडून जातील! पाण्याविना मासळी कधीं जगली आहे?–प्रेमाच्या पहिल्या उन्मादांत, इच्छापूर्तीच्या आनंदाच्या पहिल्या उसळींत असेंच वाटायचें. पण हें खरें आहे का? दीर्घकालपर्यंत ही जादू टिकूं शकेल का?–

नाहीं! नाहीं!! नाहीं!!!

हा नकार मोठा कठोर आहे. यांत काडीचेंहि काव्य नाहीं. सकृद्दर्शनीं तो खोटाही वाटेल. पण अरेरे! तसा तो नाहीं. सृष्टीच्या प्रमुख नियमाला तो अपवाद होऊं शकत नाहीं.

पुष्पाची कमनीय प्रफुल्लता, उषेचें चेतोहारी तेज, संध्येचे मनमोहक रंग, चंदनाची सुखकर शीतलता, चंद्रिकेची अतुल रमणीयता आणि तरुण दाम्पत्यांतील प्रेमोन्माद या गोष्टी कांहीं कालच टिकणाऱ्या व ठरावीक मर्यादेपर्यंतच सुख देणाऱ्या आहेत. ती मर्यादा संपली कीं, त्यांतील जादू संपली. अर्थात् त्यांचेपासून पुनःपुनः सुख

पाहिजे असेल तर त्यांच्या संयोगानंतर कांहीं काल त्यांचा वियोगही झाला पाहिजे. दुसरा उपाय नाहीं.

चमत्कार तर खराच पण तो अनुभवाचा आहे. संयोग सुखकर आहे तोंच वियोग उपस्थित झाला पाहिजे आणि वियोगापासून दुःख होऊं लागतांच संयोग घडून आला पाहिजे. म्हणजे दाम्पत्यप्रेमाला पुनः नवी रुची येते.

दाम्पत्यप्रेमांत वियोगास अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे आणि तो कितीही तापदायक व कडू असो त्याचा प्रसाद पतिपत्नीवर मधून मधून चांगलाच झाला पाहिजे, यांत शंका नाहीं. मनासारखीं संयोगित झालेलीं जोडपीं भाग्यवान् तर खरींच; पण त्यापैकीं ज्यांना मधून मधून परस्परांचा विरहताप लाभला, तीं त्याहीपेक्षां विशेष भाग्यवान् होत.

स्त्रीपुरुषप्रेमांत वियोगाचें माहात्म्य केवढें मोठें आहे, पहावयाचें आहे का ?–जगांतील काव्यसम्पदा पहा. मोठ्यांत मोठा भाग स्त्रीपुरुषांच्या प्रेमविषयाला वाहिलेला आहे. आणि त्यांतहि त्यांच्या संयोगापेक्षां वियोगाचें वर्णन अतिशय आहे. आपल्याकडील संस्कृत साहित्याची वर वर चाळणा केली तरी संभोग किंवा उत्तान शृंगारापेक्षां विप्रलंभ शृंगाराचें वर्णन व महत्त्व विशेष आढळतें. काय बरें याचें कारण ?

साधारणपणें सर्वांना आवडणारें कादंबऱ्या-नाटकें यांचें वाङ्मय अशाच स्वरूपाचें असतें. कोणत्याही कादंबरीचा किंवा नाटकाचा खरा रसभरित भाग नायक नायिकेच्या ताटातुटीचा, विरहाचा किंवा वियोगदुःखपीडित तरुण तरुणीच्या शोकवर्णनाचा असतो. लेखकानें

शुभमंगल सावधान म्हटलें कीं संपलें ! त्यास पुढें सांगण्यासारखें कांहीं नसतें व वाचकांना तें समजून घेण्याची इच्छा नसते. प्रेमी जीवांची तातातूट झाल्यानंतरच कथेला रंग चढतो. त्यांची परस्पर प्रीति, त्यांचा विरह, पुनर्मीलनाविषयींचे त्यांचे प्रयत्न, आर्तता व त्यांत त्यांच्या वाट्यास येणारी विफलता इत्यादि गोष्टींचें वर्णन लेखक रसाळ पणानें करूं शकतो व वाचकहि सोत्कंठ मनानें वाचूं इच्छितो. कारणच हें आहे कीं, प्रेमाची खरी परीक्षा, त्याचें वर्धन आणि त्यांच्या चिंतनानें मिळणारें सुख वियोगांतच सांठविलेलें आहे.

वाचक म्हणतील तुमचें म्हणणें कबूल. पण या नाटक-कादंबऱ्यांतील गोष्टी आमच्या संसारांत कशा उपयोगी पडणार ?—कां बरें ? नाटक कादंबरी संसाराचेंच चित्र नाहीं का ? त्यांत वर्णन केलेल्या गोष्टी थोड्या भडक रंगांत खुलविलेल्या असतात, म्हणून काय त्या सत्यसृष्टींत मुळींच पाहण्यास किंवा अनुभवण्यास मिळत नाहींत ? दाम्पत्यप्रेमाचीच बाब घ्या. आपल्या भोंवतालच्या समाजांतच असें एखादें आदर्शवत् जोडपें नसतें काय ? आणि आम्ही म्हणतों, या बाबतींत मनुष्यानें दुसऱ्याकडे कशाला पाहिलें पाहिजे ? त्याच्या संसारांत त्यास हें मनोहर चित्र दिसणार नाहीं काय ?

असें म्हणतात कीं, जनावर जेथें चरतें तेथल्या हिरवळीपेक्षां दूरचें रान त्यास विशेष हिरवेगार दिसतें. स्वसुखाविषयीं मनुष्याची अशीच फसगत होत असेल का ? बहुतेकांना आपलें असें वाटायचेंच कीं, मजपेक्षां इतर विशेष सुखी आहेत. त्यांचीं सुखें जास्त, दुःखें अगदीं कमी. असतील तीहीं सहज सहन करण्यासारखीं. मी मात्र असा

अभागी !–पण ही विचारसरणी योग्य व खरी असतेच का ?–विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

कित्येक स्थानीं पतिपत्नीच्या संबंधांत पाहावें. दोघेंहि एकमेकांस अनुरूप असतात. पण दोघांनाहि आपली फसगत झाल्याचें वाटत असतें व शोक होत असतो. कित्येक खुळचट व अविचारी पुरुषाकडे पाहावें. त्यांच्या अप्सरातुल्य पत्नी त्यांना बकोशा झालेल्या असतात आणि परस्त्रिया रंभा वाटतात !

याकरितां ज्यांना नाटक कादंबऱ्यांतील दाम्पत्यप्रेम पहावयाचें–अनुभवावयाचें–उपभोगावयाचें असेल त्यांनीं स्वतःच्याच घरांत स्वताचा संसार रसिकतेनें पाहण्याचा अभ्यास करावा. त्यांच्या श्रमाचें सार्थक झाल्यावांचून राहणार नाहीं. असो.

पतिपत्नीचा परस्पराविषयीं पूर्ण अनुराग असो व त्यांचा सहवास एकमेकास कितीहि सुखावह होवो; एकसारखेपणामुळें त्यास मंदत्व येऊन तो दोघांनाही कंटाळवाणा होणें अगदीं शक्य आहे. याकरितां समंजस पतिपत्नींनीं आपल्या जीवनक्रमांत मधून मधून वियोगकाल जुळवून आणण्याची खटपट केली पाहिजे. एकेकाळीं (कोणाला माहीत असा काळ कधीं होता कीं नाहीं ?–गृहित धरायचें.) प्रेमीजनांचा वियोग घडवून आणण्यास राक्षसजातीचे खलपुरुष किंवा स्त्रिया असत. त्यावेळीं वस्ती थोडी. अरण्यें फार आणि राक्षसांचा सुळसुळाट. प्रवासाचीं साधनें अल्प व मंदगतीचीं. यामुळें प्रेमीजनांचा वियोग म्हणजे एक मोठें दिव्य होतें. याच अद्भुतरम्य कालांतील कथानकें विशेष रमणीय असतात. पण ती स्थिति, तो काळ आतां राहिलेला नाहीं. आपण त्या काळास टाकून फार

फारच लांब आलेलों आहों. त्यानंतरचा काल म्हणजे ऐतिहासिक. पुरुषांनीं व्यापाराकरितां किंवा पराक्रम गाजविण्याकरितां दूरदेशीं जावें आणि त्यांच्या प्रोषित पतिकांनीं विरहाचें दुःख भोगीत काल कंठावा आणि पतीच्या वाटेकडे डोळे लाऊन बसावें असाही एक काळ होता. पण तोही आतां राहिलेला नाहीं. चालू काल विशेषेंकरून हिंदुस्थानांतला चालू काल प्रणय जमायला, संयोगाचें सुख लुटायला आणि विरहाचें दुःख भोगायला अगदीं-अगदीं रद्दड आहे! देशाला स्वातंत्र्य नसल्यामुळें सर्व स्त्रीपुरुषांवर प्रेतकळा पसरलेली आहे आणि दारिद्र्याचीं लक्तरें अंगावर आहेत.! कसला प्रणय आणि कसलें दाम्पत्यसुख! जगाचा आटोप करून आकाशास हात घालण्यास उतावीळ असलेलें पौरुष आहे कुठें?—तेंच इंग्लंडकडे पहा. जगाच्या मानचित्रावर कोणीकडेही ब्रिटिश साम्राज्याच्या लालरंग चमकतो आहे. अर्थात् ब्रिटिशतरुणाला आपलें तेज उधळून आपल्या प्रेयसीचें मन जिंकण्यास केवढा मोठा वाव आहे! आपल्या प्रणयिनीला चिमकुल्या इंग्लंडांत सोडून देशदेशांतरीं जाणाऱ्या ब्रिटिश तरुणाच्या विरहदुःखाचें भाग्य हिंदी तरुणाला मिळेल काय? **पतिपत्नीच्या प्रणयाला रंग यायला सुद्धां स्वदेश स्वतंत्र लागतो!**—स्वराज्याच्या व स्वातंत्र्याच्या कालांत डफतुंतुण्याच्या तडफदार वाद्यावर तयार झालेल्या शृंगारिक लावण्या आजलाहि मनाला मोहित करतात याचें काय कारण? आजचीं प्रेमगीतें त्या लावण्यापुढें निःसत्व वाटतात. काय बरें कारण?—सेवावृत्तीच्या ठरावीक चाकोरींतून आमचें जीवन चालल्यामुळेंच हा शिळेपणा व कंटाळवाणेपणा आलेला नाहीं काय? असो. नाहीं त्या गोष्टीची

उगीच हळहळ करण्यांत विशेष लाभ नाहीं. आपण आपल्या विषयाकडे वळूं.

काल कसाही असो व स्थिती कोणतीहि असो. संयोगानंतर पतीपत्नींचा मधून मधून वियोग घडला पाहिजे यांत शंका नाहीं. आजच्या स्थितींत असे वियोग घडणें किंवा घडवून आणणें अशक्य नाहीं. मात्र ते चांगल्या प्रकारचे असावे.

विद्यार्जनार्थ दूरदेशीं पतीला जाण्याची संधि मिळणें, किंवा देशाच्या स्वातंत्र्यार्थ झगडतांना त्यास कैदेंत जाण्याचें भाग्य लाभणें आणि पत्नीला विरहांत काळ कंठावा लागणें हा वियोग उत्कृष्ट होय. पति कॉलेजांत शिकत असतां घडणारा वियोगकाल आणि सुटीमध्यें त्याचा पत्नीशीं होणारा संयोगकाल याचें सुख ज्यांनीं उपभोगिलें असेल किंवा ज्यांना मिळतें ते भाग्यवान् होत. हाही वियोग उत्तमच. पत्नी अवेळीं माहेरी जाणें, बाळंतपणामुळें दूर होणें, हा वियोग मध्यमप्रतीचा. पति बेकार स्थितींत वणवण करीत फिरत असतांना घडलेला वियोग कनिष्ठ आणि पतिपत्नीपैकीं कोणीतरी बीमार होऊन झालेली पांगापांग रद्दड होय.

कनिष्ठ व रद्दड वियोगांत मजा नाहीं आणि ते कोणाच्याही वाट्याला येऊं नयेत. वियोगकालीं पतिपत्नी निरोगी, सुदृढ व आनंदी पाहिजेत. तरच त्यांना समागमकालांतील सुखस्मृति आनंद देतील आणि पुनर्भेटीची आतुरता सुख देईल.

वियोग दुःखमिश्रित सुखावह असला तरी तो भोगावयाचा कसा हें तरुण दाम्पत्यास समजलें उमजलें पाहिजे. नाहींतर त्यापासून अनर्थही होण्याचा संभव आहे.

अगदीं पहिली गोष्ट म्हणजे वियोग होण्यापूर्वी व नंतरही पतिपत्नींचीं हृदयें परस्पराविषयीं अगदीं शुद्ध पाहिजेत. दोघांचें परस्परावर प्रेम असूनही जर त्यांच्या मनांत एकमेकांविषयीं कोठेंतरी संशयाचें कुसळ असेल तर तें वियोगांत मुसळ होऊन प्रेमाचें टाळकें सडकल्यावांचून राहणार नाहीं. प्रेमी जीव संशयी असण्यांत गैर नाहीं पण त्यालाही कांहीं मर्यादा नको का ?—का जरा दूरत्व लाभतांच एकानें दुसऱ्यास हरामखोर ठरवून जळफळत राहावयाचें ? एकदां मनाची मिळणी पूर्ण झाल्यावर, प्रेमाचा परमोच्च बिंदु गांठल्यानंतर आणि हृदयाची ओळख हृदयाला पटल्यानंतरही पतीनें पत्नीविषयीं किंवा तिनें त्याच्याविषयीं साशंक राहावें ? मग हृदयमीलन झालें याचा अर्थ काय ?

खरोखर असला अचरटपणा शहाण्या जोडप्यानें केव्हांही करूं नये.

कांहीं स्त्रिया अशा असतात. त्या पतीपासून दूर होत असतां 'यांची त्या टवळीशीं सलगी आहे. आपल्या पश्चात् काय होणार दिसतेंच आहे.' अशा चिंतेनें जातात आणि सारा वियोगकाळ चडफडत घालवितात. त्याचप्रमाणें नवरोबा. कित्येक असे खमंग कीं, बायकोवर त्यांचा नेहमीं पाहारा. माहेरीसुद्धां तेवढ्याकरितां धाडीत नाहींत. अशांचा समागमकाल कसा सुखमय होत असेल, त्यांचें त्यांना माहीत. मग वियोगाची बात कशाला ?

तात्पर्य, समागमसुख कसें भोगावयाचें आणि वियोगकालीं तें वाढीला कसें लावावयाचें हें दाम्पत्यानें समजून घेतलें पाहिजे.

वियोगावस्थेंत पत्नीनें कसें वागावें याबद्दल पोथ्यापुस्तकांतून

पुष्कळ वर्णन केलेलें आहे. पुरुष हा स्वतंत्र असल्यामुळें तोच स्खलित होण्याचा विशेष संभव. तेव्हां वियोगकालीं विशेष दक्षता घ्यावयाची पतीनें. पत्नीनें अमूक वस्त्रें नेसायचीं, अमकेच पदार्थ खायचे, सगळे सुखोपभोग वर्ज्य करायचें, सदा खिन्न असायचें इत्यादि व्रत प्राचीनकाळीं पतिवियुक्ता स्त्री पाळीत असे. आजला तें कोठवर शक्य आहे याचा विचार जिचा तिनें करावा. ज्यांना तें आवडेल त्यांनीं खुशाल ते करावे. त्यांत ढोंग किंवा कृत्रिमता असूं नये म्हणजे झालें. पण साधारणतः कोणत्याहि तरुणीनें समाजांत गैर दिसेल, इतर पुरुषांची पापदृष्टि लालचावेल किंवा पतिपर्यंत त्या वर्तनाची वार्ता पोंचल्यास त्यास संताप होईल असें वर्तन करूं नये. **खरें म्हणजे खऱ्या प्रेमी जीवाला आपला जोडीदार दूर होतांच सारे सुखोपभोग तुच्छच वाटतात व वाटले पाहिजेत.** पण तसें जरी झालें नाहीं तरी ज्याच्यामुळें प्रेमांत व्यत्यय येईल किंवा त्यास कीड लागेल असें कांहीं करूं नये. स्त्रीचें चारित्र्य पांढऱ्या स्वच्छ परीटघडीप्रमाणें आहे. तिच्यावर अगदीं एवढासा मळ पडला तरी दिसून येतो. पुरुषांचें तसें नाहीं. त्यांचेंहि चारित्र्य स्वच्छ पाहिजेच. पण तें खाकी रंगाप्रमाणें मळखाऊ असतें, हें बायकांनीं लक्षांत ठेवावें.

पुरुषानेंही आपलें चारित्र्य शुद्ध ठेवण्याची दक्षता घेतली पाहिजे. निसर्गानें त्यास दिलेल्या स्वातंत्र्याचा त्यानें दुरुपयोग केल्यास अनेक घाणेरडे रोग त्याच्या मानगुटी बसतात व ती तैनात वंश-परंपरेची होते. पुरुषांनीं सावध असावें. असो.

वियोगकालीं पुरुषावर आणखी एका कर्तव्याचा बोजा असतो. तो म्हणजे पत्नीनें सोपविलेला संसार सांभाळणें होय. या विषयींही

त्यानें निष्काळजीपणा दाखवूं नये. घरांतील भांडीकुंडी, धान्य, वस्त्रें-प्रावर्णें, ठेवणीचे जिन्नस यांच्यांत बायकांचा जीव असतो. अर्थात् ही धडपड पतीचा संसार नीट चालावा म्हणूनच असते. तेव्हां तिच्या मागें तीच व्यवस्था राखली जावी. याविषयीं अनास्था झाली तर तिचा भुर्दंड आपल्यासच भोगावा लागतो, हें पतीनें ध्यानांत ठेवावें.

आतां पत्रव्यवहाराची चांगली सोय झाली आहे. वियोगकालीं दाम्पत्यानें या सोयीचा योग्य लाभ घ्यावा. पण त्यांतही तारतम्य असावें.

पतिपत्नीमधील पत्रव्यवहार प्रेममय परंतु साधा व सभ्य असावा. का तें सांगतां येत नाहीं पण असला पत्रव्यवहार फोडून वाचण्याची उत्कंठा भोंवतालच्या जगाला असते. तेव्हां आपलीं पत्रें चुकून किंवा जाणूनबुजून कोणाच्याहि हातांत पडलीं तरी तीं हास्यास्पद होण्यासारखीं थिल्लर असूं नयेत. उगीच लाडकीं विशेषणें देणें, काव्याच्या लकेरी मारणें किंवा प्रेमाचा पूर वाहविणें यांत मजा नाहीं. उलट त्यांतील कृत्रिमता त्यांना फोल ठरवते. यापेक्षां तें स्पष्ट, साधें, सविस्तर व स्निग्ध असावें. विरहाची तीव्र जाणीव आणि भेटीची उत्सुकता त्यांत प्रतिबिंबित झालेली असावी. सन्मित्राप्रमाणें विचार-विनिमयही असावा. एकमेकाला टोमणें मारणें, मागच्या कागाळ्या काढणें, संशय घेणें हें अगदीं वर्ज्य असावें. त्यापेक्षां मग पत्रें न लिहिलेलीं बरीं. असो.

कांहीं लोक वियोगाला तयार असतात; परंतु तो उचितकाला-पर्यंत सहन करणें त्यांच्यानें होत नाहीं. अशा पुरुषांची पत्नी माहेरीं किंवा आप्तांत जाऊन थोडाकाळ लोटला नाहीं तोंच ते तिच्या मागोमाग आमंत्रणावांचून जातात आणि आपल्या पत्नीप्रेमाचें प्रद-

र्शन दाखवितात. असें आगमन व्यवहारास धरून नाहीं हें त्यांचें त्यांनाही कळत असावें, कारण, या आगमनासंबंधीं ते कांहींतरी बहाणा करितात. असा असा गेलों. मध्यें सहज उतरलों. ही त्यांची सबब असतें. परंतु सुविचारी व शहाण्या पत्नीला आपल्या पतीचा हा लघळपणा खपत नाहीं. कारण तिच्या मैत्रिणींत व माहेरच्या मंडळींत तिची कुचेष्टा होतें. आपल्या प्रेमाखातर आपल्या पतीनें हास्यास्पद व्हावें, हें तिला रुचत नाहीं. पण मनांत ती रागावते, यांत शंका नाहीं. याकरितां असला लघळपणाही टाळावा. व्यवहारशून्यत्व दाम्पत्य-प्रेमांत थोडतरी अडथळा आणतें.

या उदाहरणाच्या उलटही कांहीं पुरुष वागतात म्हणजे पत्नी दूर गेली कीं, हे आपले पूर्ण फटिंग. आपला समाचार द्यावयाचा नाहीं. पत्नीचा घ्यावयाचा नाहीं. तिनें बिचारीनें दोन ओळीच्या कुशलपत्राकरितां झुरत राहावें आणि यानें उदासीन राहावें. हा निर्दय-पणा आहे. असें वागणेंही शहाणपणाचें ठरत नाहीं. असो.

आतां वियोगाची आवश्यकता केव्हां भासतें तें पाहूं.

एकच गोष्ट,एकच स्थिति मनुष्यास सतत सहन करतां येत नाहीं. मधूनमधून आलटापालट झालीच पाहिजे. पतिपत्नी कितीही प्रेमळ, एकजवाची, विश्वासाची, एकविचाराची व सुशील असोत. त्यांचें सतत साहचर्य त्यांना केव्हांतरी कंटाळवाणें वाटूं लागतें. त्या वेळीं प्रत्येकास आपलें प्रत्यहींचें कर्तव्य करण्यास मन घेत नाहीं. अगदीं लहानसान गोष्टींतसुद्धां मर्जी बिघडूं लागतें. पत्नीचा स्वयंपाक पतीला रुचेनासा होतो. पतीची वाणी निष्कारण कठोर होतें. दोघेही चिड-ल्याप्रमाणें वागूं लागतात, बोलूं लागतात, एकमेकास दुरुत्तरें करूं

लागतात. अशावेळीं खास समजावें कीं, आतां वियोगाची आवश्यकता आहे. या वेळीं वाटेल ती युक्ति लढवून वियोग घडवून आणावा. निदान पतीनें तरी चार दिवस कांहीं निमित्तानें कोठें प्रवासास जावें. अशावेळीं एवढ्याशा वियोगानेंसुद्धां दोघानांही बरें वाटतें. महिन्या दोन महिन्याची सुट्टी मिळेल तर काय मजाच.

सध्याच्या दुर्धर जीवनकलहांमध्यें कांहीं दाम्पत्यें अशीं असतात कीं, ज्यांना वियोग घडवून आणण्यास कोणताच मार्ग सुलभ नसतो. पत्नीला माहेरचा जिव्हाळा अगर तसें आप्त कोणीच नसतें. पतीला रजा मिळत नाहीं किंवा पैशाचें बल नसतें. खरेखर अशी स्थिती म्हणजे त्या जोडप्याचें दुर्दैव होय. परंतु त्यांनींहि निराश होऊं नये. कांहीं युक्ती योजून वियोग घडवून आणावा. सतत साहचर्याच्या कुचंबणेंत दाम्पत्यप्रेमास आंबू देऊं नये.

ताकाला रुचीपुरतें तरी मीठ टाकावें लागतें. दाम्पत्यप्रेमांत वियोगाची तितकी किंमत खास आहे. संसारांत दुसरें कोणतेंही प्रमुख कारण नसतां ज्यावेळीं तुम्हाला किंवा तुमच्या पत्नीला कंटाळा आल्यासारखा वाटेल, त्यावेळीं खास समजा कीं, थोड्याफार वियोगाची जरूर आहे.

वर्षांतून एक महिना तरी अशी सुट्टी घ्या व द्या.

लेखांक बारावा

# जीविताची सफलता.

## लेखांक बारावा.

# जीविताची सफलता.

अर्थागमो नित्यमरोगिता च
प्रिया च भार्या प्रियवादिनी च ।
वश्यश्च पुत्रोऽर्थकरी च विद्या
षड् जीवलोकस्य सुखानि राजन् ॥

राजा ! सदोदित द्रव्यप्राप्ति, निकोप प्रकृति, मधुर भाषण करणारी प्रेमळ पत्नी, आज्ञाधारक पुत्र व धनोत्पादक विद्या या सहा गोष्टी मृत्युलोकच्या सुखें होत.

विदुरनीति.

हजारों वर्षें होऊन गेलीं. विदुरानें धृतराष्ट्रास जो सुंदर उपदेश केला आहे, त्यांत संसारसुखाचीं हीं अत्यंत महत्त्वाचीं व आवश्यक साधनें कथन केलीं आहेत. आज तरी आपण संसारी माणसें या सहा सुखापेक्षां विशेष काय मागतो ? किंवा भविष्यकाळीं तरी लोक यापेक्षां जास्त काय मागतील ? तीनही कालांत आणि जगांत बहुतक सर्वांचें मागणें हीं सहा सुखें आपणास लाभावीं हेंच आहे. संसाराचें यश किंवा मानवजन्माचें सार्थक म्हणजे हीं सहा सुखें लाभणें आणि तीं दीर्घकाळ टिकणें यांतच आहे.

साधारणपणें मनुष्याच्या जीविताची सफलता यापेक्षां कांहीं

निराळी सांगतां येणार नाहीं. होय. पण असा लाभ होण्याचें भाग्य कितीजणांच्या वाट्याला येतें ?

संसाराची रचना अशी विचित्र आहे कीं, दहांत एकाला तरी हीं सारीं सुखें प्राप्त होतात कीं नाहीं कोण जाणे ? मनासारख्या गोष्टी संसारांत घडत जाणें अशी त्याची रचनाच नाहीं मुळीं. त्यांतून आजच्या पारतंत्र्यमग्न हिंदुस्थानांत तर सहा राहोतच एखादें सुखहि एखाद्या मनुष्यास भरपूर मिळणें अशक्य होऊन बसलें आहे. **जें आत्मवश तें सुख** अशी आमच्या तत्त्वज्ञानांतील सुखाची व्याख्या. आणि प्रत्यक्षांत पाहावें तों आम्ही गुलामाहूनही गुलाम. मग आमची व सुखाची गांठ पडायची कोठें न् कशी ? तात्पर्य, संसारसुख लाभण्यास व जीविताची सफलता होण्यास वर्तमान काल अगदींच विपरीत आहे, यांत शंका नाहीं.

मग आपण काय कपाळाला हात लावून बसायचें ?—आणि तसें जर आपण केलें तर संसारकर्तव्य कोणी करावयाचें? गृहसौख्यास आवश्यक असणारीं कर्तव्यकर्में कोणी आचरावयाचीं ?—रडत बसणें, खिन्न होणें, जगाच्या लाथा खात पडणें हा कांहीं आर्यांचा धर्म नव्हे, स्वभावही नव्हे. आहे या स्थितींतून आम्हीं आपला उद्धार केला पाहिजे आणि आमच्या जीविताची सफलता जगाच्या निदर्शनास आणिली पाहिजे.

विदुरानें धृतराष्ट्रास उपदेश केला त्या काळींहि त्यानें सांगितलेल्या गोष्टी सर्वांना प्राप्त होत होत्या अशांतला भाग नाहीं. संसारांत सर्व गोष्टी मनासारख्या होत नाहींत, हा अनुभव त्या काळींही येत होता आणि म्हणूनच मनुष्यानें कोणत्याहि स्थितींत निराश किंवा

दुःखी न होतां आपलें जीवितकर्तव्य कसें पार पाडावें याचा अत्यंत सुंदर व महत्त्वाचा उपदेश महाभारतांत सर्वत्र केलेला आहे.

संसारांत सुखाबरोबर दुःख आणि सोयीबरोबर अडचणी आहेतच. कधीं एक तर कधीं दुसरें मनुष्यास आळीपाळीनें मिळतें. याकरितां शहाणपणाचा मार्ग म्हणजे सुखाचे वेळीं न शेफारतां किंवा दुःखाचे वेळीं हताश न होतां दोहोंचाहि स्वीकार

सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।
प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः ॥

या सद्वचनाप्रमाणें नाउमेद न होतां करावा.

आज आपलें राष्ट्र मोठ्या संकटांत आहे. उद्धाराचे सर्व मार्ग सगळीकडून बंद झाल्याप्रमाणें दिसत असून शत्रु प्रबल आहेत; पण अशाहि विपन्नावस्थेंत शांतिपर्वांत भीष्माचार्यांनीं धर्मराजास जो सदुपदेश केला आहे तो आपण आपल्या मनांत मुरवला पाहिजे आणि तसें आचरण केलें पाहिजे. तो बोध असाः—

मग्नस्य व्यसने कृच्छ्रे धृतिः श्रेयस्करी नृप
धैर्येण युक्तं सततं शरीरं न विशीर्यते
विशोकता सुखं धत्ते धत्ते चारोग्यमुत्तमम्
आरोग्याच्च शरीरस्य स पुनर्विन्दते श्रियम्

धर्मा, महत्संकटांत सांपडलेल्या मनुष्यानें धीर धरणें श्रेयस्कर आहे. नेहमीं धैर्य असलें म्हणजे शरीराची हानि होत नाहीं. शोकाचा त्याग केल्यानें सुख होतें व उत्तम आरोग्य लाभतें. आरोग्यानें शरीर सुदृढ राहून त्यापासून गेलेलें वैभव परत मिळविण्यास मनुष्याला सुलभ जातें.

खरोखर हा उपदेश ज्याच्या अंगीं बाणेल त्याच्या हातून काय होणार नाहीं ? तात्पर्य मनुष्यानें आत्मोद्धारार्थ झटणें यांतच त्याची माणुसकी आहे.

**कर्मणा येन केनैव मृदुना दारुणेन च ।**
**उद्धरेद्दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ॥**

सौम्य किंवा तीव्र कोणत्याहि उपायानें प्रथमतः आपला हीन स्थितींतून उद्धार करावा आणि समर्थ होऊन धर्माचरण करावें.

आतां धर्माचरण करणें म्हणजे नाक धरून बसणें नव्हे किंवा नुसतें भगवंताचें नामस्मरण करणें नव्हे. सारा भर देवावर देऊन आपण कांहीं न करणें याला भक्ति म्हणत नाहींत. तर देशकाल परिस्थिति ओळखून ज्याच्या योगें स्वतःचें व देशाचें कल्याण होईल अशीं कर्तव्यें करणें. तीं आचरतांना मात्र—

**पूर्वे वयसि तत्कुर्याद्येन वृद्धः सुखं वसेत् ।**
**यावज्जीवेन तत्कुर्याद्येन प्रेत्य सुखं वसेत् ॥**

पूर्ववयांत असें आचरण करावें कीं, ज्याच्यायोगें वृद्धपणीं सुख होईल आणि सर्व आयुष्यभर असें काम करावें कीं, जेणेंकरून मरणानंतर सुख होईल.

आजच्या कर्तबगार तरुणाला असें वागणें काय अशक्य आहे?

पूर्ववयांत जोराचा प्रयत्न करून विद्या व कलाकुशलता यांचा संग्रह केला तर मध्यवयांत धन मिळविणें सोपें जाणार नाहीं काय ? आणि असें शिस्तीनें सर्व आयुष्यभर वागल्यावर सुख, कीर्ति, यश व मानमरातब याला कमतरता पडेल ? मृत्यूचें भय वाटेल ? मुलींच

नाहीं. कारण आपलें कर्तव्य यथायोग्य बजावण्यांतच आनंद निर्माण होतो.

सामान्य जनांच्या दृष्टीनें सुखाचीं जेवढीं साधनें आहेत तेवढीं ज्यांना प्राप्त झालीं आहेत, किंवा होतात, त्यांना खरोखर सुख लाभतें का ?—बहुश: नाहीं. कारण सुख वस्तूंत नाहीं. तें आपल्या मन-स्थितीवर अवलंबून आहे. द्रव्यास हा सदाच पुढें पुढें धावत असतो. जीवित कंठण्यास धन पाहिजे; पण तेवढ्यावरच भर देऊन वागल्यास तें सुखमय होईलच अशी खात्री नाहीं.

**साधी राहणी आणि उच्च विचारसरणी** यांतच खरा आनंद आहे. जगांत जेवढे खरेखुरे थोर पुरुष ( धनानें नव्हे ) होऊन गेले आहेत; व ज्यांच्या यशाचें किंवा कीर्तीचें आपणास कौतुक वाटतें आणि ज्यांच्याकडे आपण आदरानें पाहतों त्यांचा आयुष्यक्रम आपणास काय सांगतो ?–साधी राहणी. उच्च शील. बोलल्या प्रमाणें कृति आणि स्वसुखत्याग. प्रत्येक तरुणानें या कित्त्याचें यथा-शक्ति अनुकरण करावयाचें ठरविलें तर तें अगदींच अशक्य आहे का ? जीवितसाफल्याची इच्छा आहे ना ? मागे नांव राहावें, जगानें भलें म्हणावें असें वाटतें ना ?—मग त्याची किंमत नको का पटवायला ?

संसारी तरुणतरुणींनो ! संसाराचा गाडा कसातरी ओढण्यांत मौज नाहीं. विशेष पद्धतीनें देशधर्माचें स्मरण ठेऊन तो करा. आपल्या आवाक्याबाहेर कांहीं करा असें कोणीच म्हणत नाहीं. धर्माचें व नीतीचें सुद्धां हेंच सांगणें आहे कीं, जें कांहीं करणें असेल तें शक्ति-बुद्धिप्रमाणें करा.

माणसें व्हा आणि देवासारखें आचरण करा !

भक्तिभावानें वाहिलेल्या एवढ्याशा गंधफुलाला किंवा पळीभर पाण्यालासुद्धां देव भाळतो. मग तेवढीहि सेवा तुम्हाला करतां येणार नाहीं ? अलबत आली पाहिजे. पायरी पायरीनें चढा. आपलें कुटुंब, कुल, जाती, समाज, देश आणि धर्म असें आपलें क्षेत्र वाढवा ! अंतरात्म्याला स्मरून कर्तव्याच्या या तलावांत एक बारीकसा खडा टाका. त्यापासून निर्माण होणाऱ्या वर्तुलाची कक्षा शेवटपर्यंत जाऊन भिडेल ! प्रत्येकाच्या एवढ्याएवढ्याशा बिंदूनें सिंधूची भरती होईल !

**कर्तव्याचे हे तेजस्वी किरण प्रत्येक घरांतून बाहेर पडोत !**

**सर्व देशबांधवांना सुख लाभो !**

**हिंदुस्थानावर स्वातंत्र्यसूर्य तळपो ! !**

**॥ शुभं भवतु ॥**

REFBK-0004090

# मधुकर मासिक

स. ना. ह. आपटे.

अखिल महाराष्ट्रांतील सर्व साधारण स्त्रीपुरुष वाचकांचें सात्विक मनोरंजन करून त्यांना उद्‌बोधक ज्ञान देणें आणि आपला देश, धर्म, समाज व संस्कृति यांच्या स्थिति विषयीं कालानुरूप समतोल विचार सांगणें हा या मासिकाचा प्रधान हेतु आहे. कुलीन स्त्रीपुरूषांनीं वाचण्यास सर्वतोपरी योग्य.

वार्षिक वर्गणी ३ रु.

पत्ता कोरेगांव

सातारा.

माणसें व्हा आणि देवासारखें आचरण करा!

भक्तिभावानें वाहिलेल्या एवढ्याशा गंधफुलाला किंवा पळी-भर पाण्यालासुद्धां देव भाळतो. मग तेवढीहि सेवा तुम्हाला करतां येणार नाहीं? अलबत आली पाहिजे. पायरी पायरीनें चढा. आपलें कुटुंब, कुल, जाती, समाज, देश आणि धर्म असें आपलें क्षेत्र वाढवा! अंतरात्म्याला स्मरून कर्तव्याच्या या तलावांत एक बारी-कसा खडा टाका. त्यापासून निर्माण होणाऱ्या वर्तुलाची कक्षा शेवट-पर्यंत जाऊन भिडेल! प्रत्येकांच्या एवढ्याएवढ्याशा बिंदूनें सिंधूची भरती होईल!

**कर्तव्याचे हे तेजस्वी किरण प्रत्येक घरांतून बाहेर पडोत!**

**सर्व देशबांधवांना सुख लाभो!**

**हिंदुस्थानावर स्वातंत्र्यसूर्य तळपो!!**

**॥ शुभं भवतु ॥**

REFBK-0004090

ग्रंथालय ठाणे

४०४०

## मधुकर मासिक

सं. ना. ह. आपटे.

अखिल महाराष्ट्रांतील सर्व साधारण स्त्रीपुरुष वाचकांचें सात्विक मनोरंजन करून त्यांना उद्बोधक ज्ञान देणें आणि आपला देश, धर्म, समाज व संस्कृति यांच्या स्थिति विषयीं कालानुरूप समतोल विचार सांगणें हा या मासिकाचा प्रधान हेतु आहे. कुलीन स्त्रीपुरुषांनीं वाचण्यास सर्वतोपरी योग्य.

वार्षिक वर्गणी ३ रु.

पत्ता कोरेगांव

सातारा.